कर्नाटक सरकार

समाज विज्ञान

भाग - 2

10

Standard

इयत्ता-10

Karnataka Textbook Society(R)

No.4,100 Feet Ring Road, Banashankari 3rd Stage,

Bengaluru - 85

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अनुक्रमणिका

पाठ क्रम	पाठ	पृष्ठ संख्या
	इतिहास	
7.	स्वातंत्र्याची चळवळ	1
8.	गांधीयुग आणि राष्ट्रीय चळवळ	7
9.	स्वातंत्र्योत्तर भारत	27
10.	20 व्या शतकातील राजकीय घडामोडी	34
	राज्यशास्त्र	
4.	जागतिक समस्या आणि भारताची भूमिका	46
5.	जागतिक संघटना	50
	समाजशास्त्र	
3.	सामाजिक चळवळी	61
4.	सामाजिक समस्या	71
	भूगोलशास्त्र	
8.	भारतातील खनिजे व शक्तीसाधने	86
9.	वाहतूक आणि दळणवळण	96
10.	भारतातील उद्योगधंदे	108
11.	भारतातील नैसर्गिक आपत्ती	116
12.	भारताची लोकसंख्या	123
	अर्थशास्त्र	
3.	पैसे आणि कर्ज	129
4.	सार्वजनिक अर्थव्यवस्था आणि अंदाजपत्रक	138
	व्यवहार अध्ययन	
3.	व्यवसायाचे जागतिकीकरण	147
4.	ग्राहक शिक्षण आणि संरक्षण	153

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

इतिहास

प्रकरण - 7

स्वातंत्र्याची चळवळ

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया

- **राष्ट्रीयतेचा उदय**
- **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
- **मवाळ, जहाल आणि क्रांतीकारक**

राष्ट्रीयतेचा उदय

भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याची चळवळ ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि चित्तथरारक अध्याय आहे. 19 व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीयतेची कल्पना जलद गतीने वाढू लागली. स्थानिक राजांनी परकीय सत्तेविरुद्ध केलेली युद्धे आपण यापूर्वी अनेकवेळा अभ्यासली आहेत. ही युद्धे राजकीय स्वहितासाठी केलेली युद्धे होती. परकीय साम्राज्याविरुद्ध ही चळवळ असल्यामुळे त्यांचे प्रयत्न म्हणजे राष्ट्रीयतेचा प्रारंभ होता.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात दळणवळण, संपर्क साधने, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, वृत्तपत्रव्यवसाय आणि सांस्कृतिक संघटनांचा उदय या सर्वांचा विकास झाला. परंतु दुष्काळ व ब्रिटीशांचे आर्थिक धोरण यामुळे निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीमुळे लोक कंगाल झाले. याचा परिणाम म्हणून भारतीय; ब्रिटीशांच्या विरोधात संताप व्यक्त करू लागले. या कालखंडात झालेल्या शेतकऱ्यांच्या व आदिवासींच्या चळवळी याची साक्ष देतात. विविध संकटांना तोंड देत असलेल्या भारतीयांना 1857 च्या दरम्यान ब्रिटीशांविरुद्ध योजनाबद्ध पद्धतीने आपला विरोध व्यक्त करण्यासाठी 'पहिले स्वातंत्र्ययुद्ध' कारणीभूत ठरले. याचा परिणाम म्हणून इंग्रजी शिक्षण घेतलेल्या नवीन बुद्धीवादी वर्गांनी राष्ट्रीयतेची स्पष्ट कल्पना जनमानसात रुजविली. यामुळे राष्ट्रीयतेला एक स्पष्ट रूप मिळाले व याचे संस्थात्मक रूप म्हणजे 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' होय.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

1857 च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या घटनेनंतर भारत देशामध्ये नव्या राजकीय पर्वाला प्रारंभ झाला. बुद्धिवादी भारतीयांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीयतेचा दृष्टीकोन असलेल्या अनेक नवनव्या संघटना स्थापन झाल्या. द हिंदू मेळा, द ईस्ट इंडियन असोसिएशन, पुणे सार्वजनिक सभा व द इंडियन असोसिएशन इ. संघटना होत्या. वृत्तपत्राद्वारे ब्रिटीश सरकारच्या धोरणाचा विरोध होऊ लागला. ब्रिटीश सरकारने लॉर्ड लिटनच्या काळात वृत्तपत्रांवर बंधने घालणारा

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' अंमलात आणला. या पार्श्वभूमीवर काँग्रेससारख्या राष्ट्रीय स्वरूपाच्या संघटनेच्या स्थापनेशिवाय पर्याय नव्हता.

1885 मध्ये मुंबई शहरात राष्ट्रीय अधिवेशनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊन भारतातील राजकारणाला नवी दिशा मिळाली. या अधिवेशनाचे पहिले अध्यक्ष डब्ल्यू सी. बॅनर्जी हे होते. या संघटनेच्या स्थापनेसाठी निवृत्त ब्रिटीश अधिकारी ए.ओ. ह्यूम यांचे अविरत प्रयत्न कारणीभूत ठरले. त्यांनी बाँबे, मद्रास व कलकत्ता केंद्रातील राजकीय नेत्यांना भेटून, त्यांच्याबरोबर सार्वजनिक हितसंबंधाविषयी चर्चा केली. याचा परिणाम म्हणून काँग्रेस या संस्थेची स्थापना झाली. सुरूवातीच्या सभेमध्येच काँग्रेसने राष्ट्रीय एकात्मता साध्य करणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे; असे जाहीर केले. सामाजिक व सांस्कृतिक विविधता असलेल्या भारतीयांमध्ये एकी निर्माण करण्यास टप्प्याटप्प्याने प्रयत्न करण्यात आले. या कालखंडातील राष्ट्रीय नेत्यांचीही ही जबाबदारी होती.

प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रे प्रसिद्ध करून त्याद्वारे राजकीय समस्यांवर चर्चा होऊ लागली. त्यामुळे राजकीय समस्या व नवीनविचार जनमानसापर्यंत पोहचविण्यास मदत झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस बळकट होत असल्याची जाणीव झालेल्या ब्रिटीशांनी ''फोडा आणि राज्य करा' ही नीती अंमलात आणली. हिंदू व मुस्लीमात फूट पाडण्यासाठी धूर्त राजनीतीचा वापर ब्रिटीशांनी केला. तरीसुद्धा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने राष्ट्रीय विचारसरणीशी सुसंगत व कृतीशील योजना तयार केली.

19 व्या शतकाच्या अखेरीस भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये राजकीय मतभेद आढळून आले. कार्यपद्धती, विश्वास, तत्वे व चळवळीचे स्वरूप या बाबींवर आधारित मवाळ व जहाल असे दोन गट पडले.

मवाळमतवादी

दादाभाई नौरोजी

गोपाळकृष्ण गोखले

काँग्रेसच्या स्थापनेनंतर पहिला वीस वर्षाचा काळ रुढपणे 'मवाळयुग' म्हणून ओळखला जातो. प्रामुख्याने मवाळ नेत्यांमध्ये म.गो. रानडे, व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी आणि गोपाळकृष्ण गोखले हे प्रमुख होते. मवाळांचा, ब्रिटीशांच्या नि:पक्षपतीपणावर आणि व्यवस्थापनावर दृढविश्वास होता. संविधानात्मक मार्गाने त्यांनी अर्ज, विनंत्या करून आपल्या मागण्या सरकारपुढे मांडल्या. मवाळांनी लोकांना राजकीय परिस्थितीची जाणीव करून दिली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

त्यांनी देशाच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी सार्वजनिक सभांचे आयोजन केले. चर्चेनंतर उद्योगधंद्यांची वाढ करणे, संरक्षण खात्यावरील खर्च कमी करणे, शैक्षणिक क्षेत्रात विकास साधणे अशा अनेक मागण्या सरकारपुढे मांडल्या. देशातील दारिद्र्यरेषेचा अंदाज घेण्यास त्यांना भाग पाडले.

प्रथमच मवाळांनी भारतातील ब्रिटीशांच्या गैरराज्यकारभाराविषयी विश्लेषण केले. भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे चाललेला आहे ही आकडेवारी आणि वस्तुस्थिती लोकांच्यासमोर मांडली. दादाभाई नौरोजींनी भारतीय संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे चालला आहे हे सांगितले. यालाच आर्थिक 'निःसारणाचा सिद्धांत' (Drain Theory) म्हणतात. निर्यात कमी होऊन आयात वाढल्यामुळे प्रतिकूल रक्कमेच्या शिल्लकीत वाढ झाली आणि भारतातील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे जाऊ लागला. हे त्यांनी स्पष्ट केले. भारताच्या खजिन्यातून दिला जाणारा पगार, निवृत्ती वेतन, ब्रिटीश अधिकाऱ्यांचे शासकीय खर्च या मागनि भरपूर संपत्तीचा प्रवाह इंग्लंडला गेला. मवाळांचा काळ हा 'उदार राष्ट्रवादाचाकाळ' म्हणूनही ओळखला जातो.

दादाभाई नौरोजी यांच्याप्रमाणेच आर.सी. दत्तांनीही आपल्या लेखातून भारतातील संपत्ती ब्रिटीशांनी कशी रिकामी केली याचे वर्णन केले. 1885 ते 1905 या कालावधीला 'मवाळ मतवाद्यांचा काळ' असे इतिहासकार मानतात.

जहालमतवादी

काँग्रेसचा एक गट मवाळांच्या सौम्य वागणुकीवर नाखूष होता. त्याना 'राजकीय दास' असे म्हटले गेले. ज्यांनी मवाळांच्या वृत्तीचा निषेध केला आणि जहाल विचारांची कास धरली. त्यांना जहाल म्हणून ओळखले गेले. अरविंदो घोष, लाला लजपत राय, बिपिनचंद्रपाल आणि बाळ गंगाधर टिळक हे जहाल नेते होते. कायदेमंडळात भारतीय सभासदांचे नामांकन करून आम्ही फार मोठे उपकार करत आहोत या ब्रिटीशांच्या धोरणाला त्यांनी जोरदार विरोध केला. (कृपया 1861 व 1892 चा भारतीय कायदा यातून अधिक माहिती मिळवा)

अरविंदो घोष

बाळ गंगाधर टिळक

लाला लजपत राय

बिपिनचंद्रपाल

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बंगालची फाळणी

बंगाल हा ब्रिटीश विरोधी चळवळीचा व ब्रिटीश विरोधी कारवायांचा केंद्रबिंदू होता. तो दडपून टाकण्यासाठी व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने प्रशासकीय कारण पुढे करून बंगालच्या फाळणीची योजना आखली. बंगाल प्रांत हा हिंदू व मुस्लीम बहुसंख्य असलेला प्रांत होता. पूर्वभागात मुस्लीम व पश्चिम भागामध्ये हिंदू मोठ्या प्रमाणात रहात होते. जनगणनेच्या अहवालानुसार ही आकडेवारी ब्रिटीशांना कळाली आणि विशाल अशा या भूप्रदेशाचे 1905 मध्ये विभाजन केले. या प्रमाणे दोन्ही समुदायामध्ये फूट पाडून स्वातंत्र्य चळवळीची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला.

ब्रिटीशांचे 'फोडा आणि राज्य करा' या धोरणानुसार बंगालची फाळणी झाली. त्याला भारतीय राष्ट्रीय कांग्रेसने विरोध केला. परंतु बंगालीभाषेच्या मुस्लीम व हिंदू समुदायांना एकत्र आणण्याचे काम भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने केले. हिंदू व मुस्लीम समुदायात एकात्मता निर्माण करण्यासाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रम आखण्यात आला होता. बंगालच्या फाळणी विरुद्ध संपूर्ण देशभरात जोरदार विरोध झाला. यामध्ये स्वदेशी चळवळ ही अत्यंत महत्त्वाची होती. जहाल मतवांद्यांनी ही चळवळ सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले स्वदेशी चळवळीने विदेशी वस्तू व त्याची आयात करणाऱ्या संघटनांवर बहिष्कार घातला. स्वदेशी वस्तू वापराव्यात यासाठी भारतीयांना प्रेरित केले. या स्फोटक परिस्थितीमुळे 1911 मध्ये ब्रिटीश सरकाने बंगालची फाळणी रद्द केली.

''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच'' या टिळकांच्या घोषणेने भारतीयांच्या मनातील विचारांना वाट मिळाली. संपूर्ण स्वराज्य मिळविणे; हे जहाल मतवाद्यांचे ध्येय होते. त्यांनी सामान्य लोकांचीही मने स्वातंत्र्य चळवळीसाठी तयार केली या पार्श्वभूमीवर धार्मिक आचरणाद्वारे लोकांना संघटित करून ब्रिटीशांविरुद्ध लढण्यास त्यांना उद्युक्त केले. गणेश चतुर्थी, शिवजयंती, दुर्गापूजा इ. उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करून लोकांना प्रेरणा दिली. याचा परिणाम म्हणून मुस्लीमांची अस्मिता टिकविण्यासाठी 1906 मध्ये मुस्लीम लीगचा उदय झाला. टिळकांनी मराठी भाषेत 'केसरी' व इंग्रजीमध्ये 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरू करून ब्रिटीशांविरुद्ध चळवळीचे अस्त्र म्हणून त्यांचा वापर केला. सर्वसामान्य माणसांना ब्रिटीशांविरुद्ध लढा देण्यास प्रेरित केले. त्यांच्या प्रक्षोभक विचारांचे अग्रलेख वाचून लोकांच्या भावनांचा उद्रेक झाला. ब्रिटीशांनी टिळकांना अटक करून तुरुंगात टाकले. तुरूंगातील वेळेचा सदुपयोग करून टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून स्वातंत्र्य चळवळीस आक्रमक रूप दिले.

> **हे तुम्हाला माहित असू दे :**
> टिळकांनी गणेश चतुर्थी व शिवजयंती हे उत्सव सार्वजनिकपणे साजरे करून लोकांमध्ये राष्टीयत्वाची भावना निर्माण केली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

क्रांतीकारक

क्रांतीकारक संपूर्ण स्वराज्याचे स्वप्न पहात होते. भारतीयांवर अन्याय करणाऱ्या ब्रिटीशांना हिंसात्मक मार्गाने भारताबाहेर पळवून लावू शकतो असा त्यांचा दृढविश्वास होता. गुप्त संघटनांच्या माध्यमातून भारत व भारताबाहेर शाखा स्थापन करून त्यांनी पैसा व शस्त्रास्त्रे गोळा केली आणि क्रांतीकारकांना प्रशिक्षण दिले. 'लोटस' व 'डागर' या दोन गुप्त संघटनांची इंग्लंडमध्ये स्थापना करण्यात आली व तेथेच असलेल्या अरविंद घोषांसारख्या क्रांतीकारकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीस पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे अमेरिकेत 'गदा' नावाची क्रांतीकारक संघटना स्थापन झाली. भारतात 'अनुशीलन समिती' व 'अभिनव भारत' या गुप्त संघटना कार्यरत होत्या. आपल्या ध्येयसिद्धीसाठी त्यांनी बॉंबचा व बंदुकीचा वापर केला. ब्रिटीश सरकारने त्यांची ही कृत्ये दडपून टाकण्यास सर्वतोपरी प्रयत्न केले व क्रांतीकारकांच्यावर वधाचा आरोप ठेवून त्यांना अटक केली आणि फासावर चढविले या संदर्भात अनेक भारतीय क्रांतीकारकांना फाशी देण्यात आली. व्ही. डी. सावरकर, अरविंद घोष, अश्विनी कुमार दत्त, राजनारायण बोस, राजगुरु, चाफेकर बंधू, शामाजी कृष्णवर्मा, रासबिहारी बोस, मादाम कामा, खुदिराम बोस, रामप्रसाद बिस्मिल, अशपाक उल्लाखान, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, जतीनदास हे प्रमुख क्रांतीकारक होते.


भगत सिंग

चंद्रशेखर आझाद

व्ही. डी. सावरकर

ब्रिटीश राज्यव्यवस्थेला हादरवून भारताला तात्काळ स्वातंत्र्य मिळवून देण्याचे त्यांचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. तरीही भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये क्रांतीकारक हे जनसामान्यांचे स्फूर्तीस्थान होते. जहालमतवादी काही नेत्यांनी पुढे ही चळवळ चालूच ठेवली. त्यामध्ये अरविंदो घोष हे प्रमुख होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये क्रांतीकारकांचे योगदान हे बहुमूल्य आहे.

स्वाध्याय

I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना _____ या साली झाली.
2. आर्थिक निःसारणाचा सिद्धांत _____ यांनी मांडला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही घोषणा _____ यांनी केली.
4. बाळ गंगाधर टिळक यांनी मराठी भाषेमध्ये _____ हे वृत्तपत्र सुरु केले.
5. 'अभिनव भारत' नावाची गुप्त संघटना _____ येथे कार्यरत होती

II. खालील पैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

1. भारतीय राष्ट्रीय कांग्रेसचे संस्थापक _____
   a) महात्मा गांधी b) ए.ओ. ह्यूम
   c) बाळ गंगाधर टिळक d) गोपाळ कृष्ण गोखले
2. 'मराठा' हे वृत्तपत्र यांनी सुरु केले _____
   a) जवाहरलाल नेहरू b) रासबिहारी बोस
   c) बाळ गंगाधर टिळक d) व्ही. डी. सावरकर
3. मुस्लीम लीगची स्थापना _____ या साली झाली.
   a) 1924 b) 1922
   c) 1929 d) 1906
4. बंगालची फाळणी या व्हॉईसरॉयने केली.
   a) लॉर्ड कॉर्नवॉलिस b) डलहौसी
   c) लॉर्ड कर्झन d) रॉबर्ट क्लाईव्ह

III. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी कोणकोणत्या संघटना अस्तित्वात होत्या?
2. मवाळ मतवाद्यांनी ब्रिटीशांसमोर कोणकोणत्या मागण्या मांडल्या?
3. आर्थिक निःसारणाचा सिद्धांत (Drain Theory) स्पष्ट करा.
4. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख क्रांतीकारकांची नावे लिहा.
5. स्वातंत्र्य चळवळी मध्ये बाळ गंगाधर टिळक यांचे योगदान कोणते?
6. बंगालची फाळणी रद्द होण्याची कारणे कोणती?

IV. उपक्रम

1. स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतीकारकांची चित्रे गोळा करून अल्बम तयार करा.
2. मवाळमतवादी नेत्यांची चित्रे गोळा करा व त्यांची चरित्रे वाचा.

V. प्रकल्प

1. देशभक्तीवर आधारित एक नाटिका वर्गात सादर करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 8

गांधीयुग आणि राष्ट्रीय चळवळ

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया

- गांधीजींचे जीवन
- गांधीजींची आध्यात्मिक साधना
- खिलाफत चळवळ
- सविनय कायदे भंग चळवळ
- गोलमेज परिषद
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांनी केलेल्या सुधारणा
- महंमदअली जीना
- भारतातील गांधीजींची प्रारंभिक चळवळ
- जलियनवालाबाग हत्याकांड
- असहकार चळवळ
- चलेजाव चळवळ
- सुभाषचंद्र बोस व इंडियन नॅशनल आर्मी (आझाद हिंद फौज)
- जयप्रकाश नारायण
- जवाहरलाल नेहरू

भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये महात्मा गांधीजींचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपली स्वतःची अशी एक आदर्श पद्धत निर्माण केली. 1920 ते 1947 चा काळ 'गांधीयुग' म्हणून ओळखला जातो. या काळात गांधीजींच्या विचारांचा आणि तत्वांचा पाया घातला गेला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा मिळाली.

बालपण व जीवनाचा विकास

मोहनदास करमचंद गांधी ज्यांना आपण प्रेमाने 'बापू' म्हणून संबोधतो. त्यांचा जन्म2 ऑक्टोबर 1869 रोजी तत्कालीन गुजराथ राज्यातील काठेवाड प्रांतातील पोरबंदर येथे झाला त्यांच्या वडिलांचे नाव 'करमचंद गांधी' असे होते. ते राजकोट संस्थानचे दिवाण होते. त्यांच्या आईचे नाव 'पुतळाबाई' असे होते. त्यांच्या आईमुळे त्यांच्यावर नीतीमूल्यांचा प्रभाव पडला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोरबंदर येथे झाले. 1888 मध्ये ते कायद्याच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले व बॅरिस्टर पदवी घेऊन भारतात परतले. 1893 मध्ये दादा अब्दुल्ला व कंपनीची वकिली करण्यासाठी ते दक्षिण आफ्रिकेतील 'नटाल' येथे गेले. गांधीजी तेथे फक्त तीन महिन्यांसाठी गेले होते,



दक्षिण आफ्रिकेतील गांधिजी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

परंतु त्यांनी तेथे 20 वर्षाचा प्रदीर्घ काळ व्यतीत केला. आफ्रिकेमध्ये काळे लोक व भारतीयांवर ब्रिटीश सरकारने लादलेल्या वर्णभेद धोरणाला त्यांनी तीव्र विरोध केला या चळवळीद्वारे त्यांनी 'सत्याग्रह' नावाचे नवीन सामाजिक अस्त्र वापरले, यातून लोकांना नीतीमूल्यांची त्यांनी शिकवण दिली. आफ्रिकन आजही अभिमानांने सांगतात की एक सामान्य व्यक्ती म्हणून आफ्रिकेत आलेले गांधीजी एक परिपक्व व्यक्तिमत्व बनून भारतात परतले.

हे तुम्हाला माहित असू दे :

आफ्रिकेमध्ये गांधीजींनी सत्याग्रह, अहिंसा या तत्वांवर आधारित चळवळ प्रथमच सुरू केली 'नटाल इंडियन काँग्रेस' नावाची एक संस्था त्यांनी स्थापन केली. प्रथमच महात्मा गांधीजींनी 'इंडियन असोसिएशन' नावाच्या वृत्तपत्राद्वारे स्वतःचे विचार व जनमत मांडले. आपल्या चळवळीची गती वाढविण्यासाठी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स ऑर्गनायझेशन' नावाच्या संस्थेची स्थापना केली. सत्याग्रह चळवळीचे प्रशिक्षण देण्यासाठी आफ्रिकेमध्ये 'फिनिक्स' व 'टॉलस्टॉय पार्क' नावाच्या आश्रमांची स्थापना केली. त्याचे स्नेही हार्मन कॅलेनबाक, पत्नी कस्तुरबा, त्यांची मुले व इतर मित्रमंडळींनी त्यांना सहकार्य केले. या चळचळीच्या दबावामुळे ब्रिटीश सरकारने दक्षिण आफ्रिकेतील काळे लोक व भारतीयांविरुद्ध असलेले सर्व निर्बंध हटविले. एकदा दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधीजी डर्बन ते प्रिटोरिया असा प्रथम दर्जाच्या डब्यातून प्रवास करत होते. त्यावेळी रेल्वेच्या गोऱ्या अधिकाऱ्यांनी जबरदस्तीने त्यांना त्या डब्यातून फलाटावर ढकलून दिले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील विविध वसाहतींमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या हलाखीच्या स्थितीची जाणीव झाली. इंग्लंडपेक्षा तीव्र स्वरूपाचा वर्णभेद दक्षिण आफ्रिकेत आहे, असे गांधीजींनी नमूद केले आहे. दक्षिण आफ्रिकेतील प्रदीर्घ चळवळीनंतर गांधीजी 1915 मध्ये भारतात परत आले.

भारतातील गांधीजींच्या प्रारंभिक चळवळी

भारतात परतल्यानंतर त्यांचे राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मार्गदर्शनानुसार भारतीयांचे जीवन व समाजातील वास्तव जाणून घेण्यासाठी त्यांनी रेल्वेच्या तृतीय दर्जाच्या डब्यातून प्रवास करून संपूर्ण भारत पालथा घातला. 1916 मध्ये अहमदाबाद येथे साबरमती आश्रमाची स्थापना केली व आपल्या चळवळीला सांस्थिक दर्जा प्राप्त करून दिला. शेतकरी दलित, आदिवासी, मजूर, कामगार व गरिबांच्या समस्या जाणून घेतल्या. 1917 मध्ये बिहारम धील चंपारण्य येथे नीळ कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी 'चंपारण्य चळवळ' सुरु केली व ब्रिटीशांना नमते घेण्यास भाग पाडले. 1918 मध्ये अहमदाबाद येथे सूतगिरणी कामगारांच्या वेतनवाढीसाठी चळवळ सुरु करून त्यात ते यशस्वी झाले. त्याचवर्षी गुजराथमधील 'खेडा' येथे झालेल्या जमीन महसूल विरोधी चळवळीमध्येही त्यांना यश मिळाले. या सर्व चळवळीमध्ये

www.textbookpdf.in

गांधींजींनी सत्य, अहिंसा व सत्याग्रह या सारख्या आदर्श मार्गाचा अवलंब केला. भारतातील सामान्य लोकांच्या बरोबर संवाद साधून स्वातंत्र्य चळवळ ही लोकाभिमुख बनवली

महात्मा गांधीजींच्या आगमनाने स्वातंत्र्य चळवळीस एक नवी दिशा मिळाली. गांधीजींनी आपल्या चळवळीत असहकार, अहिंसा व सत्याग्रह यासारख्या प्रमुख अस्त्रांचा वापर केला. 'हरिजन' व 'यंग इंडिया' या वृत्तपत्रातून त्यांनी आपल्या तत्वांचा प्रसार केला.

हे तुम्हाला माहित असू दे :

गांधीजींच्या प्रवेशामुळे नव्या काँग्रेसमध्ये सर्वसामान्य लोकांना मुक्त प्रवेश मिळून 'जनसामान्यांची संघटना' म्हणून ती नावारूपास आली. संघटनेमार्फत घेतलेले निर्णय अंमलात आणण्यासाठी असहकार व सविनय कायदेभंग चळवळीची रूपरेषा आखली गेली. समाजाच्या उन्नतीसाठी दारिद्रय रेषेखालील मागासलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योजनाबद्ध कार्यक्रमांची आखणी केली. आपला उद्देश साध्य करण्यासाठी. एक करोड रुपयांची 'टिळक स्वराज्य फंडाची' गुंतवणूक केली. या रीतीने महात्मा गांधीजींच्या आगमनानंतर काँग्रेसमध्ये संपूर्ण परिवर्तन घडून आले. त्यामुळे या कालखंडाला 'गांधीयुग' असे म्हणतात.

गांधीजींची आध्यात्मिक साधना व चळवळ

सत्याग्रह : सत्याग्रह हा गांधीजींच्या चळवळीचा मुख्य घटक आहे 'सत्याग्रह' या शब्दाचा अर्थ म्हणजे सत्यासाठी आग्रह धरणे. दक्षिण आफ्रिकेमध्ये महात्मा गांधीजींनी वापरलेल्या अस्त्रांपैकी हे एक प्रमुख अस्त्र होते. सत्याग्रह हा अहिंसेवर आधारित चुकीची वागणूक, हिंसा, खोटारडेपणा यांचे खंडन व तिरस्कार करण्याचा उपाय आहे. भारताच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये या अस्त्राचा त्यांनी सातत्याने वापर केला हाच एक मोठा सामाजिक आविष्कार होय.

अहिंसा : गांधीजींच्या चळवळीचा मूलभूत घटक म्हणजे अहिंसा. लष्कर, पोलीस व कायदा ही ब्रिटीशांची प्रभावी शस्त्रे असूनही त्याविरुद्ध सत्य, अहिंसा व उपवास या सारख्या साध्या शस्त्रांचा वापर करून गांधीजींनी ब्रिटीशांना नमते घेण्यास भाग पाडले. हा एक ऐतिहासिक संदेश त्यांनी जगाला दिला.

हिंदू - मुस्लीम ऐक्य : गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात हिंदू मुस्लीम एकतेचे प्रतिपादन केले या दोन्ही समुदायात एकी नसेल तर भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे व भविष्यकाळात भारत एक राष्ट्र म्हणून नावारूपाला येणे या गोष्टी फारच अवघड आहेत असे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

त्यांचे मत होते. हिंदू व मुस्लीम हे भारतमातेचे दोन डोळे आहेत. असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी 1919 मध्ये खिलाफत चळवळीला काँग्रेसकडून पाठिंबा दर्शविला.

ही पृथ्वी मानवाच्या सर्व गरजा भागवू शकते पण अतिलोभ भागवू शकत नाही - गांधी

असहकार चळवळीला प्रेरक ठरलेल्या घटना

जालियनवाला बाग हत्याकांड

जालियनवाला बाग हत्याकांड

ब्रिटीशांनी मार्च 1919 मध्ये 'रौलेट ॲक्ट' हा कायदा अंमलात आणला. याद्वारे भारतीय राष्ट्रवादी लोकांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य सुरू ठेवले. या कायद्यानुसार कोणत्याही व्यक्तीला विनाचौकशी अटक करून न्यायालयाकडून अपराधी घोषित करून शिक्षा करण्याची मुभा होती. स्वातंत्र्य चळवळीतल्या लोकांचे सभा घेण्याचे, संघटना तयार करण्याचे, मुक्तपणे आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. गांधीजींनी याला जोरदार विरोध करण्यासाठी 'सत्याग्रह सभा' नावाच्या संस्थेची स्थापना केली व चळवळ सुरू ठेवली. त्यांनी मोठमोठ्या सभा, मिरवणुका व बहिष्कार इत्यादी राजकीय कार्यपद्धतींचा अवलंब केला.

ब्रिटीश सरकारने रौलेट ॲक्टच्या विरोधात चळवळ करणाऱ्या नेत्यांना दडपून टाकण्याचा निश्चय केला. गांधीजींनी 6 एप्रिल 1919 रोजी एका मोठ्या चळवळीची तयारी केली. पंजाबमध्ये डॉ. फकरूद्दीन, डॉ. सत्यपाल यांना अटक करण्यात आली. या अटकेच्या विरोधात जनतेने 13 एप्रिल 1919 रोजी, बैसाखी या सणादिवशी पंजाबमधील अमृतसरजवळील जालियनवाला बागेत निषेध सभेचे आयोजन केले. अमृतसरचा सेनाधिकारी जनरल डायर यांनी तेथे जमलेल्या निरपराध जनतेवर 10 मिनिटे अव्याहतपणे बेछूट गोळीबार केला. या गोळीबारात 380 लोक मृत्युमुखी पडले. तर हजारो लोक जखमी झाले. या घटनेमुळे गांधीजी व इतर नेते शोकाकूल झाले. या घटनेनंतर पंजाबमध्ये लष्करी राजवट लागू करण्यात आली. या हत्याकांडाच्या निषेधार्थ रविंद्रनाथ टागोर यांनी आपल्याला मिळालेली 'नाईटहूड' ही पदवी ब्रिटीश सरकारला परत केली. या गोळीबारानंतर गांधीजींनी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

असहकार चळवळ सुरू केली. आपल्या निष्पाप व निरपराध भारतीयांवर गोळ्या झाडणाऱ्या जनरल डायरला भारतीय क्रांतीकारक उधमसिंगने इंग्लंडमध्ये जाऊन ठार मारले.

खिलाफत चळवळ

तुर्कस्तानचा सुलतान हा जगभरातील मुस्लीमांचा 'खलिफा' म्हणजेच धर्मप्रमुख होता. पहिल्या महायुद्धाच्या वेळी तुर्कस्तान इंग्लंडच्या विरोधी गटात होते. म्हणून ब्रिटीशांनी तुर्कस्तानाच्या खलिफास अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे जगातील सर्व मुसलमान एकत्र आले व त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध बंड पुकारले. भारतातही महम्मद अली व शौकत अली या दोघा भावंडानी तुर्कांच्या बाजूने 1919 मध्ये 'खिलाफत चळवळ' सुरू केली. हिंदू मुस्लीमांनी संघटित होऊन जर इंग्रजांना विरोध केला तर ते देश सोडतील, असा गांधीजींचा विश्वास होता. या संदर्भात मुसलमानांनी काँग्रेसमध्ये सामावून जाणे हे अपरिहार्य होते. त्याचमुळे गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा घोषित केला. अशाप्रकारे देशभर इंग्रजांच्या विरोधात चळवळ सुरू झाली. अनेक राष्ट्रीय नेत्यांनी आणि कॉग्रेसने खिलाफत चळवळीमध्ये सक्रीय सहभाग घेतला.

असहकार चळवळ

4 सप्टेंबर 1920 रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात ब्रिटीशांविरुद्ध 'असहकार चळवळ' सुरू करण्याचा ठराव पास करण्यात आला. अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य मिळविणे, ब्रिटीशांच्या निर्दयी व विकृत स्वरूपाच्या कारभाराचा लोकांना परिचय करून देणे, जालियनवाला बागेतील हत्याकांडासारख्या घटना भविष्यकाळात घडू नयेत यासाठी ब्रिटीशांच्या राज्यकारभारास कडाडून विरोध करणे हे प्रमुख उद्देश होते. रौलेट ॲक्ट मागे घेणे, नवीन राजकीय सुधारणा अंमलात आणणे व भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे या प्रमुख मागण्या होत्या.

असहकार चळवळीतील प्रमुख कार्यक्रम

1. शाळा, महाविद्यालये व न्यायालयांवर बहिष्कार टाकणे.
2. 1919 च्या कायद्यानुसार घेण्यात येणाऱ्या प्रांतीय कायदे मंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकणे.
3. ब्रिटीश सरकारने बहाल केलेल्या पदव्या, सन्मान परत करणे.
4. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामांकन झालेल्या सदस्यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देणे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5. सरकारी कार्यक्रमात सहभागी न होता बहिष्कार टाकणे.
6. विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे.

या बरोबर असहकार चळवळीचे इतर कार्यक्रम म्हणजे हातमागावरील विणकऱ्यांना प्रोत्साहन देणे, खादीचे कापड तयार करणे, राष्ट्रीय शाळांची स्थापना करणे, हिंदू व मुस्लीम यांच्यांत ऐक्य साधणे, अस्पृश्यता निवारण करणे, महिलांना त्यांच्या दयनीय स्थितीतून मुक्त करून त्यांना सक्षम बनविणे.

असहकार चळवळ

असहकार चळवळीच्या दरम्यान घडलेल्या प्रमुख घटना

1. देशबंधू चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, राजेंद्रप्रसाद इत्यादी ज्येष्ठ वकिलांनी आपल्या वकिलीचा त्याग केला.
2. विद्यार्थ्यांनी शाळा महविद्यालयांवर बहिष्कार टाकला.
3. 1919 च्या कायद्यानुसार प्रांतीय निवडणुकांमध्ये आपल्या उमेदवाराला उभे न करता त्यावर बहिष्कार टाकला.
4. काशी विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ, बिहार विद्यापीठ व जामिया मिलिया इस्लामिया या राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.
5. रविंद्रनाथ टागोर यांनी 'नाईटहूड' ही पदवी ब्रिटीश सरकारला परत केली.
6. सामान्य लोक व स्त्रियादेखील या काँग्रेसच्या चळवळीत सहभागी झाल्या विदेशी वस्तू विक्री करणाऱ्या दुकानांसमोर निदर्शने करण्यात आली चौकाचौकात विदेशी वस्तू जाळण्यात आल्या.
7. 1921 मध्ये 'प्रिन्स ऑफ वेल्स' या राजपुत्राच्या भेटीच्या कार्यक्रमाला विरोध करण्यात आला.

असहकार चळवळीचे परिणाम

या चळवळीची प्रमुख उद्दिष्टे साध्य होऊ शकली नसली तरी त्यामुळे काही गंभीर स्वरूपाचे परिणाम झाले. प्रामुख्याने राष्ट्रीय चळवळीचे जनसामान्यांच्या चळवळीत रूपांतर झाले. काँग्रेस प्रणित या चळवळी मुळे स्वातंत्र्य चळवळीला एक क्रांतीकारक वळण मिळाले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हिंदू-मुस्लीम या जातीमध्ये तात्पुरती एकी निर्माण झाली. फक्त शहरातच नव्हे तर ग्रामीण भागातसुद्धा ही चळवळ पसरली. अस्पृश्यता निवारण, सार्वजनिक ठिकाणी महिलांना प्रवेश इ. लक्षणीय बदल घडून आले.

चौरीचौरा मधील घटना

उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्हयातील 'चौरीचौरा' या ठिकाणी 5 फेब्रुवारी 1922 रोजी 3000 शेतकऱ्यांचा एक मोठा गट पोलीस स्टेशन समोर जमा झाला. दारूच्या दुकानासमोर निदर्शने करणाऱ्या भारतीयांवर लाठीमार करणाऱ्या ब्रिटीश पोलीसांविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी हे शेतकरी जमले होते. ब्रिटीश पोलीसांनी जमलेल्या शेतकऱ्यांवर गोळीबार सुरु केला. शेतकरी संतप्त झाले व त्यांनी पोलीस स्टेशनला आग लावली. पोलीस स्टेशनमध्ये असणारे 22 अधिकारी जिवंत जाळले गेले. याचप्रमाणे हिंसात्मक घटना इतर ठिकाणी घडू लागल्या. गांधीजींनी भारतीयांजवळ नैतिक शक्तीची कमतरता आहे व अहिंसात्मक मार्गाने न्याय मिळविण्याची तयारी अपूर्ण आहे असे सांगितले त्यामुळे 12 फेब्रुवारी 1922 रोजी असहकार चळवळ मागे घेण्यात आली. गांधीजी लोकांना ब्रिटीशांविरुद्ध भडकावतात असा आरोप ठेवून त्यांना 10 मार्च 1922 रोजी अटक करण्यात आली व 6 वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. तुरुंगात असताना गांधीजी आजारी पडले म्हणून दोन वर्षातच त्यांची सुटका झाली. गांधीजींच्या या निर्णया मुळे राजकीय पोकळी निर्माण झाली.

स्वराज्यपक्ष

असहकार चळवळ मागे घेतल्यामुळे कॉंग्रेस मधील उत्साह ओसरला. चित्तरंजनदास व मोतीलाल नेहरू यांनी कायदेमंडळावर टाकलेला बहिष्कार मागे घेतला व त्यात प्रवेश करण्याचे ठरविले. कायदेमंडळाच्या कामकाजात व्यत्यय आणून स्वातंत्र्य चळवळ आणखी तीव्र करण्याचा त्यांचा मानस होता. सप्टेंबर 1923 मध्ये चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली. त्याच वर्षी मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनात स्वराज्य पक्षातील उमेदवारांनी निवडणूक लढविण्याचे ठरविले. नोव्हेंबर 1923 मध्ये झालेल्या निवडणुकीत स्वराज्य पक्षाने 101 स्थानापैकी 42 स्थानांवर विजय मिळविला.


मोती लाल नेहरू

नागरी कायदेभंग चळवळीची कारणे

1927 मध्ये ब्रिटीशांनी सायमन कमिशनची नेमणूक केली. 1919 मध्ये अंमलात आलेल्या भारत सरकारचा कायदा (मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा) याची अंमलबजावणी व त्याचे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतीयांवरील परिणाम याचा आढावा घेण्यास 3 फेब्रुवारी 1928 रोजी 'सायमन कमिशन' भारतात आले असताना 'सायमन परत जा' अशा घोषणा देऊन काँग्रेसने त्यांना तीव्र विरोध दर्शविला मुंबई, लाहोर, मद्रास इ. ठिकाणी बंद पाळण्यात आला. लाहोरमध्ये मोर्चाद्वारे झालेल्या निदर्शनाच्यावेळी लाला लजपतराय यांच्यावर लाठीहल्ला झाल्याने ते मृत्युमुखी पडले. त्यामुळे भारतात राष्ट्रीय चळवळीला तीव्र गती मिळाली.

लाला लजपतराय यांच्याबद्दल जास्त माहिती मिळवा

ब्रिटीश सरकारने भारतीयांना आव्हान दिले की सर्व राष्ट्रीय पक्षांना व समुदायांना मान्य होईल अशी घटना काँग्रेसने तयार करून दाखवावी त्यामुळे 1928 मध्ये मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना झाली. या समितीने 'नेहरू अहवाल' तयार केला. गांधीजींनी सुद्धा या नेहरू समितीचे कौतुक केले. भारत देशाला ब्रिटीश साम्राज्यांतर्गत वसाहतींचा दर्जा व फेडरल राज्य व्यवस्था, अल्पसंख्यांकासाठी असणारे राखीव मतदारसंघ कमी करणे, ब्रिटीश प्रांताची भाषावार प्रांत म्हणून विभागणी करणे, भारतीयांना सर्व मूलभूत हक्क प्राप्त करूनदेणे, भारतात लोकशाही राजवट आणणे इ. शिफारसी या समितीद्वारे करण्यात आल्या नंतर ब्रिटीश लेबर पक्षाचा नेता रामसे मॅकडोनॉल्ड याने व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन बरोबर चर्चा करून भारताला ब्रिटीश साम्राज्यांतर्गत वसाहतींचा दर्जा देण्याबद्दल विचार करू असे घोषित केले.

नंतर घडलेल्या प्रमुख घटना म्हणजे 1929 मध्ये लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनानंतर राष्ट्रीय चळवळीला तीव्र गती मिळाली. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात काँग्रेस व राष्ट्रीय चळवळीचे मुख्य ध्येय 'पूर्ण स्वराज्य' मिळविणे हेच आहे असा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला. 26 जानेवरी 1930 हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून घोषित करण्यात आला. ब्रिटीशांविरुद्ध आयोजित करण्यात आलेल्या या कायदेभंगाच्या चळवळीची संपूर्ण जबाबदारी गांधीजींच्यावर सोपविण्यात आली. या ऐतिहासिक दिवसाची नोंद घेण्यासाठी म्हणून स्वतंत्र भारताची घटना 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आली.

सविनय कायदेभंगाची चळवळ

1930 मध्ये काँग्रेस कार्यकारिणीची सभा साबरमती येथे झाली. व त्यामध्ये कायदे भंग चळवळ करण्याचा निर्णय घेण्यात आला. गांधींनी 2 मार्च 1930 रोजी 11 मागण्या असलेले पत्र व्हॉईसरॉय आयर्विन यांना लिहिले. ब्रिटीश सरकारने जर या मागण्या मान्य केल्या नाहीत तर

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नागरी कायदेभंग चळवळ, साराबंदीची चळवळ सुरू करण्यात येईल असे घोषित केले. या मागण्या मान्य न झाल्यामुळे 12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी आपल्या अनुयायांबरोबर साबरमती आश्रम ापासून गुजराथ मधील दांडी येथील समुद्र किनाऱ्यापर्यंत सुमारे 375 कि.मी. पदयात्रा काढली. 6 एप्रिल रोजी गांधी दांडी येथे पोहोचले व मिठाचे उत्पादन करून मिठाचा कायदा मोडला. या चळवळीमुळे चरख्याला प्रसिद्धी मिळाली. हजारो लोक गांधीजींच्या चळवळीत सामील झाले. मिठाच्या सत्याग्रहानंतर 6 एप्रिल ते 13 एप्रिल पर्यंत राष्ट्रीय आंदोलनाचा सप्ताह साजरा करण्यात आला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सामील झालेल्या विजयालक्ष्मी पंडित, कमला नेहरू, वल्लभभाई पटेल, सी. राजगोपालाचारी, बाबू राजेंद्र प्रसाद आणि हजारो लोकांना अटक करण्यात आली. देशाच्या अनेक भागात ही चळवळ पसरली.

मिठाचा सत्याग्रह

तुम्हाला हे माहित आहे का?

- या दांडीच्या पदयात्रेमध्ये कर्नाटकाचा अठरा वर्षीय युवक मैलर महादेवाप्पा हा सुद्धा सामील झाला होता.
- कर्नाटकातील काँग्रेसने एक समिती स्थापन केली होती. त्यातील सभासद आर.आर.दिवाकर, कौजलगी हनुमंतराव, गंगाधर देशपांडे, हार्डीकर मंजप्पा आणि कार्नाड सदाशिवरावानी कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे मिठाचे उत्पादन केले.

पूर्वी घोषित केल्या प्रमाणे सरकारच्या निर्णयानुसार 1930 ला भारतीय उमेदवारांची पहिली गोलमेज परिषद भरविली गेली. भारतीय नेत्यांच्या सहभागशिवाय कोणतेही निर्णय घेतले जाऊ शकत नाहीत. याची जाण इंग्रजांना आली. या परिषदेमधे अस्पृशांसाठी एक स्वतंत्र संधी उपलब्ध करून देण्यात आली. परिषदेला उपस्थित रहाण्याकरिता गांधीजी आणि काँग्रेस नेत्यांची कैदेतून सुटका केली. पण गांधी आणि काँग्रेसने उपस्थित रहाण्यास नकार दिला. संस्थानाचे उमेदवार, निरनिराळ्या समुदायांचे नेते बी.आर.आंबेडकर, एम.आर.जयशंकर, तेज बहादूर, मोहमद अली जीना, श्रीनिवास शास्त्री आणि इतरांनी त्यामधे भाग घेतला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वायत्त राज्ये, जबाबदार सरकार आणि जातीय उमेदवारांना या परिषदेत मंजुरी देण्यात आली. पण काँग्रेसच्या अनुपस्थितीमुळे तेथे काहीही निष्पन्न झाले नाही. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने परिषदेला उपस्थित रहावे आणि इंग्रजांचे उद्देश सफल होण्यास मदत करावी. 1931 मध्ये व्हाईसराय आयर्विनने काही योजनावर गांधिजीशी चर्चा करण्यासाठी भेट घेतली. 1931 मध्ये 'गांधी आयर्विन करार' झाला. गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहिले. मोहमद अली जीना आणि बी.आर.आंबेडकर हे या परिषदेला उपस्थित होते.

निवडणुकीमधे अस्पृश्यांसाठी वेगळा मतदारसंघ असावा. अशी मागणी आंबेडकरांनी केली. हे गांधीजीना मान्य नव्हते. त्यामुळे गांधीजी आणि आंबेडकरांच्या मध्ये तात्विक मतभिन्नता निर्माण झाली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत कांहीही निष्पन्न झाले नाही. पण इंग्रजानी अस्पृशांना वेगळा मतदारसंघ देण्याची कबुली दिली. गांधीजीनी आमरण उपोषण चालू केले. आंबेडकराना समजावण्याचे प्रयत्न झाले. दरम्यानच्या काळात 'पुणे करार' झाला. या करारानुसार परिशिष्ट वर्गासाठी विभक्त मतदार संघ रद्द करण्यात आले. या वर्गासाठी राखीव जागा वाढविण्यात आल्या. अशा जागी दलित नेत्याना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे अस्पृश्यांचा वेगळा संघ होण्याची शक्यता वाढली. पण राजकीय विभाजन टाळण्यात आले.

इंग्रजांना केंद्रामधे संघटित सरकार आणि राज्यांमधे स्थानिक सरकार स्थापन करायचे होते. हाच हेतू मनामधे ठेवून 1932 च्या शेवटी तिसरी गोलमेज परिषद भरविली. सरकारने सुचविलेली ही पद्धत काँग्रेसला मान्य नव्हती. त्यामुळे या अधिवेशनात ते सहभागी झाले नाहीत.

या अधिवेशनाद्वारे इंग्रजांना बऱ्याच सुधारणा करायच्या होत्या. 1935 मध्ये भारतीय सरकार कायदा अंमलात आला. या कायद्याने भारतीय संघटना आणि प्रांतीय स्वातंत्र्याची मुभा देण्यात आली. भारतीयांना राजकीय हक्क मिळाले. त्यामुळे काँग्रेस आणि मुस्लिम लीग निवडणुकीमधे सामील झाले. निवडणुकीमधे काँग्रेसला बहुमत मिळून त्यांनी मंत्रिमंडळ बनविले.

युरोपमधील राजकीय चळवळीमुळे दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले. भारतीय व्हाईसरायने ही जर्मनी विरूद्ध युद्ध पुकारले. याचा निषेध करून काँग्रेसने मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. ब्रिटिशांच्या निर्णयाविरूद्ध गांधीजीनी वैयक्तिक सत्याग्रह पुकारला. भारतीयांच्या समाधानाकरिता स्टॅफोर्ड क्रिप्सला भारतात पाठविण्यात आले.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

छोडो भारत (चले जाव) चळवळ (1942) :

चलेजाव चळवळ

आपल्या युद्ध प्रयत्नांना भारतीयांचा पाठिंबा मिळविण्यासाठी ब्रिटिश सरकारने 'क्रिप्स मिशन' भारतात पाठविले. या मिशनने भारतासमोर काही सूचना मांडल्या. भारताला वसाहतीचा दर्जा देणे आणि मंत्रिमंडळाची स्थापना करणे असे प्रस्ताव मांडले. काँग्रेसने 'चलेजाव चळवळ' सुरू केली.



वल्लभभाई पटेल

अबुल कलाम आझाद

राष्ट्रातील जनतेला गांधीजीनी 'करा अथवा मरा' हा संदेश दिला या संदर्भात गांधीजी, नेहरू, राजेंद्र प्रसाद, अबुल कलाम आझाद, सरदार वल्लभाई पटेल, आचार्य कृपलानी, कस्तुरबा गांधी आणि अनेक नेत्याना अटक झाली. संपूर्ण भारत या चळवळीत सामील झाला. काँग्रेसचे बरेचसे नेते तुरुंगात गेल्यामुळे काँग्रेस व्यतिरिक्त इतर संघटना प्रसिद्धीला आल्या. या परिस्थितीमुळे नवीन नेत्याची तात्काळ गरज निर्माण झाली. याचवेळी जयप्रकाश नारायण नेतेपदी आले. काँग्रेसच्या समाजवादी शाखेचे ते प्रमुख नेते होते. संपूर्ण भारतभर आपल्या अनुयायासह त्यानी क्रांतीकारी चळवळी सुरू केल्या. समाजवादी संघटनेने आपल्या योजना 'स्वातंत्र्य चळवळ आघाडी' या नांवाने अंमलात आणल्या. त्यानी कामगारांना प्रशिक्षण दिले. लोकांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी उद्युक्त केले. त्यांनी देणग्या गोळा करून चळवळीला योग्य दिशा दिली.

कृती : चर्चाकरा 'चलेजाव चळवळीमध्ये भारतीय स्वेच्छेने सहभागी झाले'.

कुतूहलाचा विषय हा आहे की यावेळी स्वातंत्र चळवळीची सुरूवात भारतीय सीमेच्या बाहेरून झाली. या संदर्भात सुभाषचंद्र बोस यांचे प्रयत्न अपूर्व आहेत. 1937 च्या निवडणुकी नंतर सरकारमधे समाविष्ट होण्यासाठी मुस्लिम लीगला बोलावण्यात आले नाही. पण 1939 ला ज्यावेळी दुसरे महायुद्ध सुरू झाले ; त्यावेळी भारतीयांना सुद्धा युद्धात सहभागी करून घेण्याचा एकतर्फी निर्णय इंग्रजानी घेतला. मंत्रीमंडळातील काँग्रेसजनांनी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आपल्या पदाचे राजीनामे दिले. या परिस्थितीत मुस्लिमलीग ने 'विमुक्ती दिवस' साजरा केला. ते चलेजाव चळवळीत सामील झाले नाहीत. पुढे त्यांनी भारताच्या फाळणीचा मुद्दा ठेवला.

तुम्हाला हे माहित आहे का?

ईसूर घटना: ईसूर हे म्हैसूरु संस्थानातील शिमोगजिल्ह्यात 'शिकारीपूर' जवळील खेडे आहे. ईसूर मधील विद्यार्थी चळवळीने आपल्या गावाला 'स्वतंत्र खेडे' म्हणून जाहीर केले. प्रत्येकांनी गांधी टोप्या घातल्या. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना गावात प्रवेशबंदी केली. पण 1942 मधे गांवात शिरणाऱ्या अधिकाऱ्यांना टोप्या घालण्याची जबरदस्ती केली. अधिकाऱ्यांच्या बरोबरील पोलीस अधिकाऱ्याने लोकांच्यावर गोळीबार केला. त्यामुळे प्रक्षुब्ध जमावाने त्याची हत्या केली. इतिहासामधे ही घटना 'ईसूर घटना' म्हणून ओळखली जाते.

शेतकरी आणि कामगार आंदोलन

स्वातंत्र्य चळवळीमध्ये शेतकरी आणि कामगार संघटनानीही महत्वाची भूमिका बजावली. काही संघटना काँग्रेसच्या प्रभावाखाली होत्या; तर काही मार्क्सवादाने प्रेरित झाल्या होत्या. ब्रिटिश कालात शेतकऱ्यांनी जमीनदार आणि युरोपियन मळेवाल्यांच्या विरूद्ध बंड केले होते. त्यांनी चंपारण्य जिल्ह्यात निळीचे उत्पादन करण्यास विरोध केला शिवाय शेतकऱ्याविरूद्ध आंदोलन केले. गांधीजींनी सत्याग्रह करून इंग्रजाना जमीन महसूल रद्द करण्यास भाग पाडले.

राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून काँग्रेसने शेतकऱ्यांची संघटना तयार केली. चंपारण्य, खेडा व इतर भागातील शेतकऱ्यांच्या चळवळीवर गांधीजीचा प्रभाव होता. काँग्रेसने प्रभावित झालेले तेहबाग, मलबार मधील शोषित शेतकरी, जमीनदार व इंग्रजांच्या विरूद्ध बंड करून उठले. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आणि चलेजाव चळवळीमध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांचाही समावेश होता. किसान सभेच्या झेंड्याखाली अनेक विरोधक एकत्र आले. हे विरोधक काँग्रेसचे पाठीराखे होते तर काहीवेळा त्यांच्या विरोधातही होते. तेलंगाणा शेतकरी बंडखोरांनी आंध्रातील रेड्डी जमीनदारांना आव्हान दिले. बंगाली शेतकऱ्यांनी जमीनदारांच्या पिळवणुकीविरूद्ध बंड केले. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांनी अल्प मजुरीच्या विरोधात आवाज उठविला. या विरोधाच्या परिणामामुळे 'कर्जमुक्ती कायदा' अस्तित्वात आला.

कामगारांचे बंड

1827 मधे कलकत्ता येथे कामगार चळवळ सुरू झाली. ताग, कापड गिरण्या, रेल्वे सेवा मधील कामगार आपल्या हक्कांसाठी संघटित होऊ लागले. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या विरूद्ध रेल्वे कामगारांनी स्टेशनमध्ये नारे दिले आणि वाढीव मजुरीचा आग्रह धरला. कलकत्त्याचा मुद्रण संघ आणि बॉम्बे कापड गिरणी कामगारांनी राष्ट्रीय जागृती वाढवली. मद्रास कामगार

www.textbookpdf.in

संघटनेची स्थापना झाली. याबरोबरच बऱ्याच संघटना उदयाला आल्या. कामगार संघटनानी काँग्रेसला पाठिंबा दिला. 1926 मधे 'ट्रेड युनियन ॲक्ट' अंमलात आला.

आदिवासी चळवळ

ईस्ट इंडिया कंपनीने कर आणि जंगल कायदा अंमलात आणल्याने आदिवासी चळवळीला सुरूवात झाली. आदिवासीनी धार्मिक कारणासाठी लढा दिला. त्यांनी आपल्या वैभवशाली इतिहासाची जाण ठेवून वसाहतवादाला विरोध केला. आदिवासी बंडखोरात 'संथालांचे बंड' आणि 'मुंदा चळवळ' या प्रमुख आहेत. या संदर्भात कर्नाटकातील 'हलगलीच्या बेरडांचे बंड' हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

'संथाल आदिवासी चळवळ' ही भारतातील जुनी चळवळ मानली जाते. हे लोक बंगाल आणि ओरिसातील टेकड्यातील होत. ज्यावेळी ब्रिटिशानी जमीनदारी पद्धत अंमलात आणली. तेव्हा या जमातीचे लोक निराश्रित झाले. जमिनी मूळ मालकांकडे गेल्या. जमीनदारांनी त्यांना खूप त्रास दिला होता. जमीनदार, सावकार आणि इंग्रज सरकारच्या वाईट वागण्यामुळे संथालाच्यामधे असहिष्णू वृत्ती बळावली. कंपनीने सभ्य आणि शांतताप्रिय लोकांचे शोषण केले. संतप्त संथालानी गुप्त सभा घेतल्या. या सभेत जमिनदार आणि प्रमुख नागरिकांची लूट करण्याचे ठरविले. बंडाचे लोण, बरहत, भगतपूर आणि राजमहल येथे अधिक तीव्र झाले. दंगलखोरानी शत्रूला ठार मारले. जमीनदार आणि सावकार पळून गेले. सरकारने बंड दडपून टाकण्यासाठी सैन्याचा वापर केला. त्यात ते यशस्वी झाले. अनेक बंडखोराना अटक झाली. संथालाचे आंदोलन संपले. पण पुढील चळवळीना त्यांची प्रेरणा मिळाली.

कोल व मुंड या आदिवासी जमातीबद्दल जास्त माहिती मिळवा

सुभाषचंद्र बोस

सुभाष चंद्र बोस

भारतातील क्रांतीकारकांच्यामधे सुभाषचंद्राचे स्थान अत्यंत म हत्वाचे होते. ''भारतीय सिव्हिल सर्व्हिसमधे'' त्यांचे स्थान चौथ्या क्रमांकावर होते. त्यांनी इंग्रजांची उच्चपदस्थ नोकरी नाकारली. तरीसुद्धा स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यानी सक्रीय सहभाग घेतला. ते नेताजी या नावाने प्रसिद्ध होते.

1930 मधील गांधीजीच्या शांततापूर्ण चळवळी बरोबरच सुभाषचंद्र बोसनी परदेशी स्थायिक झालेल्या भारतीयांना इंग्रजाविरूद्ध लढण्यास सज्ज केले. त्यांनी व्हिएन्ना, बर्लिन, रोम, इस्तंबूल आणि इतर देशामध्ये प्रवास केला. तेथे स्थित असलेल्या

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतीयांना मातृभूमीला मदत करण्यास प्रेरित केले. युरोपमध्ये साम्यवाद आणि समाजवादाचा उदय झाला. त्याचा प्रभाव भारतामधील काँग्रेसवर झाला आणि त्यामुळे काही बदल झाले. काँग्रेसवासीयांच्यावर समाजवादींच्या आदर्शवादाचा प्रभाव पडला. याच पार्श्वभूमीवर जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोसांनी 1934 ला 'काँग्रेस समाजवादी पक्षाची' स्थापना केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या हरिपूरमधील सभेच्या वेळी गांधीच्या पाठिंब्यामुळे बोस त्याचे अध्यक्ष झाले. इंग्रजाबरोबरच्या युद्धनीतीबाबत गांधीचे मवाळ धोरण होते तर सुभाषजींचे कडक धोरण होते. ही मतभिन्नता त्यांच्यामध्ये निर्माण झाली. अशा परिस्थितीत सुभाषजीना आंतरराष्ट्रीय मदतीची अपेक्षा होती. पण गांधीजी त्याबद्दल नाराज होते. 1938 मध्ये काँग्रेसच्या त्रिपुरा येथील सभेला गांधीजीचा विरोध असूनही सुभाषचंद्र बोस त्याचे अध्यक्ष झाले. त्यामुळे गांधी आणि सुभाष यांच्यामधील दरी अधिक रूंद झाली. काँग्रेसमध्ये राहून ब्रिटिशांच्या बरोबर लढण्याचे सुभाषजीचे मनसुबे धुळीला मिळाले. काँग्रेस आणि गांधीजीच्या योजनांशी सहमत न झाल्यामुळे नेताजीनी 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. त्याचा सुधारित आणि जलद योजना राबविण्याचा उद्देश होता. सुभाषजीनी इंग्रजाच्या युद्ध तयारीला आणि महायुद्धातील भारताच्या सहभागाला विरोध दर्शविला. परिणामी इंग्रजानी त्याना अटक केली.

तुम्हाला हे माहित आहे का?

'जर्मनी अगोदर भारताला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे. युरोपमधील इंग्लंडच्या प्रत्येक पराभवामुळे भारतामधील इंग्रजी साम्राज्याचा वचक कमी झाला होता. भारताच्या सहकार्यामुळे अथवा साम्राज्याच्या मदतीमुळे ब्रिटनचे अस्तित्व होते अशी वाच्यता आपण बंद केली पाहिजे. अशा अवघड परिस्थितीमध्ये भारताने स्वतःचा विचार प्रथम करावयास हवा होता.'

सुभाषचंद्र बोस

इंग्रजांचा पराभव करण्यासाठी त्यांच्या शत्रूबरोबर हातमिळवणी करण्याची इच्छा बाळगून स्वतःच्या राहत्या घरातील नजरकैदेतून निसटून ते जर्मनीला पोहचले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता जर्मनीचा हुकूमशहा हिटलरचा पाठिंबा मिळवला. जर्मनीतील भारतीय युद्ध कैद्यांची फौज स्थापना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी आझाद हिंद रेडिओ या माध्यमाद्वारे भारतीयांसाठी भाषणे प्रसारित केली. युद्धामध्ये जपान यशस्वी होईल आणि त्यांची स्वातंत्र्य

तुम्हाला हे माहित आहे का?

'मी देवासमोर अशी शपथ घेतो की मी भारताला आणि माझ्या 38 करोड देशवासियांना स्वतंत्र करेन..... स्वातंत्र्यानंतर सुद्धा सतत देशाच्या अस्तित्वासाठी माझ्या स्वतःच्या रकताच्या शेवटच्या थेंबापर्यंत झटेन'.

सुभाषचंद्र बोस

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

मिळविण्यासाठी मदत होईल अशा अपेक्षेने रासबिहारी बोसांनी लढण्यासाठी भारतीयांना संघटित केले. त्यांच्या या कार्यात सुभाष सहभागी झाले. रास बिहारीनी 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' नांवाची मिलीटरी फौजेची टोकियोमधे स्थापना केली. तिलाच 'इंडियन नॅशनल आर्मी' असे नांव दिले. तद्नंतर त्यांनी त्याचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांच्याकडे दिले. या प्रसंगी सुभाषचंद्रानी 'दिल्ली चलो' ची घोषणा केली. त्यांनी 'तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन' अशा शब्दात भारतीयांना विनंती केली. तेथे 'झांशी रेजिमेंट' नांवाची आय.एन.ए.ची स्त्रियांची फौज होती. कॅप्टन लक्ष्मी सेहगल या फौजेची मुख्य अधिकारी होती.

कृती : स्वातंत्र्यचळवळी बद्दल सुभाष चंद्र बोसाचे काय मत होते या विषयावर निबंध लिहा.

रंगून येथून सुभाषजींनी मिलिटरी युद्धकौशल्य वापरून इंग्रजांच्या जोखडात असलेली दिल्ली हस्तगत करण्याची योजना आखली. त्यावेळेपासून आय.एन.ए. च्या सैन्यांनी दिल्ली व्यापण्याची तयारी केली. सरतेशेवटी नेताजींच्या आदेशाने बर्मा सीमेवर सशस्त्र हल्ला सुरू केला. इंग्रजांमध्ये आणि आय. एन.ए.मधे भयंकर युद्ध झाले. त्याचवेळी विमान अपघातात सुभाषजींचा मृत्यू झाला. ब्रिटिश सैन्याने बर्माची राजधानी रंगून हस्तगत केली आणि आय.एन.ए.च्या सैनिकांना अटक झाली. गांधीजीसह काँग्रेसच्या नेत्यानी आय.एन.ए. च्या सैन्याला मुक्त करण्याचा प्रयत्न केला.

डॉ बी.आर.आंबेडकर

सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही. असा ठाम विश्वास डॉ.आंबेडकरांचा होता. बहिष्कृत समाजातील शूद्रांना जर आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळाले नाही तर राजकीय स्वातंत्र काय कामाचे! ते एक मृगजळच. भारताचे राजकीय अस्तित्व अचेतन नसून ते सचेतन भावनिक राष्ट्र आहे.

डॉ.बी.आर.आंबेडकर

त्यांनी जातीभेदाचा अभ्यास केला. त्याचे निर्मूलन करण्याची योजना आखली. अस्पृश्यांच्या प्राथमिक गरजाही नाकारल्या गेल्या हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी महाड आणि काळाराम देउळ चळवळ सुरू केली. तीनही गोलमेज परिषदेला ते उपस्थित राहिले आणि मौलिक सल्लेही दिले. अस्पृश्यांचे नेतृत्व आणि हरिजनोद्धार या मुद्यावरून गांधी आणि आंबेडकरांच्यात मतभेद दिसून आले. दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीमुळे त्यांच्यात वादविवाद झाले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बडोदा महाराजांच्या संस्थानात आंबेडकर दिवाण होते. त्यांनी मुंबई कायदेमंडळ (मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सील) आणि व्हाईसराय कार्यकारी मंडळाचे (व्हाईसरॉय एक्झ्युकेटिव्ह कौन्सील) अत्यंत दक्ष सभासद म्हणून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. ते काँग्रेस पक्षात सामील झाले नाहीत. त्यांच्या ऐवजी 'बहिष्कृत हितकर्णी सभा' आणि 'स्वतंत्र कार्मिक पार्टी' रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया' या दोन स्वतंत्र पक्षांची स्थापना केली. त्यांनी 'प्रबुद्ध भारत', 'जनता', 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' अशी अनेक वृतपत्रे प्रसारित केली. कम्युनिस्ट आणि सोशॅलिस्ट सारख्या विचारापासून दूर राहून शेतमजुरांच्या प्रगतीसाठी त्यानी काम केले.

तुम्हाला हे माहित आहे का?
वृत्तपत्राशिवाय नेता हा पंख नसलेल्या पक्ष्याप्रमाणे आहे.
डॉ.बी.आर.आंबेडकर

स्वतंत्र भारतासाठी मार्गदर्शक म्हणून संविधान तयार झाले. डॉ.बाबू राजेंद्र प्रसाद हे या घटना समितीचे अध्यक्ष होते. नंतर डॉ.बी.आर. आंबेडकरांची सर्वानुमते घटना मसूदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यानी घटनेमध्ये समानतेवर भर दिला. अस्पृश्यते विरूद्ध कायदेशीर संरक्षणही मिळविले. भारतीय घटनेने अस्पृश्यता हा गुन्हा मानला आहे. स्वातंत्र्यानंतर ते भारताचे कायदा मंत्री झाले. ते आधुनिकता, वैचारिकता आणि पाश्चिमात्य तत्वज्ञानाने जरी प्रेरित झाले होते तरी आपल्या वतनाशी प्रामाणिक होते. त्यांनी जातीयतेचा उबग आल्याने हिंदू धर्माशी फारकत घेऊन बौद्ध धर्माचा स्वीकार केला. जो बदल मार्क्सवादी हिंसा आणि रक्तपाताने आणू पहात होते. तोच बदल बौद्ध धर्माच्या अहिंसा आणि शांतीच्या मार्गाने आणला जाऊ शकतो असा त्यांचा विश्वास होता. या योगदानाबद्दल त्यांना मरणोत्तर 'भारत रत्न' हा किताब देण्यात आला.

कृती
डॉ. आंबेडकरांच्या आत्मचरित्राचे वाचन करा.

हे तुम्हाला माहित आहे का?

महाराष्ट्रातील 'महाड' येथील तळ्याचे पाणी अस्पृश्यांना वापरण्यास बंदी होती. त्याचे पाणी अस्पृश्यानाही वापरण्यास मिळावे याकरिता 'महाड चळवळ' झाली त्याचप्रमाणे काळाराम देवळात त्याना प्रवेश नाकारण्यात आला होता. तेथेही त्यांना प्रवेश मिळावा म्हणून आंबेडकरानी क्रांतीकारी चळवळ केली. या चळवळीमुळे जरी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण झाली तरी त्याला म्हणावे तसे यश लाभले नाही.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जवाहरलाल नेहरू


जवाहरलाल नेहरु

होमरूल चळवळीतून नेहरूनी स्वातंत्र्य आंदोलनात प्रवेश केला. 1920 च्या असहकार चळवळीतील ते एक प्रमुख नेता होते. 1929 च्या लाहोर अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. या अधिवेशना दरम्यान पूर्ण स्वराज्य म्हणजेच संपूर्ण मुक्त भारताचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. गांधिजीनी असहकार चळवळ मागे घेतल्यामुळे नेहरू नाराज झाले.

नेहरूंच्या विचारामुळे राजकीय कार्यक्रमांना एक नवी दिशा मिळाली ते कम्युनिस्ट तत्वांनी प्रभावित झाले. परिणामत: नेहरू आणि सुभाषचंद्र बोसनी 'काँग्रेस समाजवादी पक्षाची' स्थापना केली.

नेहरू भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 49 व्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर चाललेल्या साम्राज्यशाही युद्धापासून काँग्रेसने परावृत्त रहावे असे त्यानी घोषित केले. चरखा आणि हरिजन चळवळी प्रभावी नाहीत असे त्यानी सांगितले. यावरून गांधीजीच्या आदर्शवादापासून ते परावृत्त झाले ; असे दिसते.भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 50 व्या अधिवेशनात नेहरूनी समाजवाद आणि कम्युनिस्टच्या बाबतीत मृदू धोरण स्वीकारले. त्यांनी घोषित केले की भारतामध्ये काँग्रेसने संपूर्णपणे लोकशाहीला पाठिंबा दिला. समाजवाद नाही तर लोकशाहीसाठीच झगडायचे ठरविले.

कृती

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरुच्या परराष्ट्र धोरणाबद्दल अधिक माहिती वाचा.

पंतप्रधान नेहरू हे उद्योगशीलता आणि आधुनिक भारताचे शिल्पकार होते. 'भारताचे पोलादी पुरूष' गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली संस्थानाचे विलिनीकरण झाले. त्यांच्या देखरेखीखाली संस्थाने भारतीय संघराज्यात सामील झाली. त्यानंतर भारतीय लोकशाहीचा पाया भाषावर प्रांतरचनेने मजबूत केला. भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्हीच्या तत्वावर आधारलेली 'मिश्र आर्थिक योजना' ही आधुनिक भारताला त्यांनी दिलेले योगदान आहे. शीघ्र औद्योगिकीकरणामुळे विकास शक्य आहे असे त्यांचे मत होते. भारताला पंचवार्षिक योजनेद्वारा विकासांच्या मार्गावर नेण्यात ते अग्रेसर होते. दोन गटात ताणतणाव असतांना भारताने वादग्रस्त प्रसंग टाळले आणि अलिप्त धोरण स्वीकारले. ते सत्तेच्या राजकारणापासून दूर राहिले. त्यांनी शांती आणि सुसंवाद या धोरणांचा सतत पाठपुरावा केला. ते 1964 ला स्वर्गवासी झाले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

मोहमद अली जीना :



जीना आणि गांधिजी

1906 मधे मोहमद अली जीनानी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. दादाभाई नौरोजी यांचे खाजगी सचिव म्हणून त्यानी काम पाहिले. न्यायालयीन खटल्याम ध्ये त्यानी टिळकांचे समर्थन केले. असंतोष पसरविल्याबद्दल त्याना दोषी ठरविण्यात आले. या प्रसंगामुळे ते प्रसिद्धीच्या झोतात आले. ते होमरूल लीग चळवळीत सामील झाले. 1916 मधे झालेल्या अनेक अधिवेशनात हिंदू-मुस्लिम एकतेची गरज आहे असे ते म्हणाले. प्रथमपासून मुस्लिम धार्जिण राजकारणी म्हणूनच ते ज्ञात होते. ब्रिटिश सत्तेला त्यांनी विरोध केला. रौलेट ॲक्ट-ला नापंसती दर्शवून त्यांनी केंद्रिय कायदा सल्लागार मंडळपदाचा राजीनामा दिला. गोलमेज परिषदेमध्ये ते राष्ट्रवादी मुस्लिम आहेत. असे घोषित केले. 1937 च्या निवडणुकीनंतर काँग्रेस आणि मुस्लिम लीग संमिश्र सरकार स्थापण्यात अयशस्वी झाले. तेव्हा त्यांनी आपल्या कामाचे तंत्र बदलले. जसजशी भारताला स्वातंत्र्य घोषित करण्याची वेळ जवळ आली तशी त्यांची पाकिस्तानची मागणी तीव्र झाली. देशाची फाळणी करण्यात ते यशस्वी झाले.

भारताची फाळणी

संपूर्ण स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेसचा अभेद्य भारत यावर दृढविश्वास होता. पण मुस्लिम लीग ने त्यांच्यासाठी स्वतंत्र देशाचीच मागणी केली. 1940 मधे मुस्लिम लीगच्या लाहोर अधिवेशनात हिंदू आणि मुस्लिम अखंड देश होऊच शकत नाही असे जाहीर केले. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनमधे कामगार पक्ष सत्तेवर आला. त्यानी भारताच्या राजकारणातील बिकट परिस्थिती दूर करण्याचे उपाय योजले. भारताच्या स्वयंशासनाबद्दल बोलण्यास कॅबिनेट आयोग पाठविले. या आयोगाने काँग्रेस आणि मुस्लिम लीगशी चर्चा केली. भारताला एकत्र परंतु स्वायत्त सरकार स्थापण्यास सुचविले. त्याचबरोबर संविधान रचना सभा आणि हंगामी राष्ट्रीय सरकारही बनविण्याचा सल्ला दिला. हंगामी सरकार स्थापण्यावरून काँग्रेस आणि मुस्लिम लीग मध्ये म तभेद सुरु झाले. 16 ऑगस्ट 1946 हा दिवस मुस्लिम लीग ने स्वतंत्र राष्ट्र स्थापण्यासाठी 'प्रत्यक्ष कृतीदिन' म्हणून साजरा केला. याचा परिणाम असा झाला की संपूर्ण देशात जातीय दंगली उसळल्या. राजेंद्रप्रसादांच्या नेतृत्वाखाली मतदार सभा अयोजित केली होती. त्यात मुस्लिम लीग ने सहभाग घेतला नाही.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

काँग्रेस आणि मुस्लिमलीगमधील संबंध अधिकाअधिक बिघडत गेले. याचवेळी ब्रिटिश सरकारने सत्ता हस्तांतराचा निर्णय घोषित केला. मार्च 1946 मधे भारताचा व्हाईसराय म्हणून लॉर्ड माउंटबॅटनला पाठविण्यात आले. माउंटबॅटनची गांधी, जीना आणि इतरांशी चर्चा झाली. भारताची फाळणी करण्याची योजना आखण्यात आली. जुलै 1947 मध्ये भारतीय स्वातंत्र्य मसुदा पास होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले. त्याप्रमाणे 15 ऑगस्ट 1947 ला भारत आणि पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे अस्तित्वात आली. 'रॅडक्लिफ कमिशनने' दोन्ही देशांच्या सीमारेषा आखल्या. पंडित जवाहरलाल नेहरूनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

30 जानेवारी 1948 या दिवशी हिंदू मुस्लिम ऐक्याचे शिल्पकार गांधीजी प्रार्थना सभेला चालले असताना नथुराम गोडसेंनी त्यांची हत्या केली.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

1. गांधीजींचा जन्म _____ रोजी झाला.
2. जालियनवाला बाग येथील निषेध सभा _____ या कायद्या विरुद्ध आयोजित केली होती.
3. अली भावंडांनी _____ ही चळवळ सुरु केली.
4. मुस्लीमांसाठी स्वतंत्र राष्ट्र स्थापण्याची मागणी _____ यानी केली.
5. 1929 मध्ये झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष _____ हे होते.
6. _____ या व्यक्तीने महाड आणि काळाराम मंदिराची चळवळ सुरु केली.
7. इंडियन नॅशनल आर्मीच्या झाशी रेजिमेंटचे नेतृत्व _____ यांच्या कडे होते.
8. गांधींनी मिठाचा सत्याग्रह _____ येथे केला.
9. चलेजाव चळवळ _____ या साली झाली.

II. योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा

1. पहिली गोलमेज परिषद _____ साली भरली होती

   a) 1930 b) 1932

   c) 1931 d) 1942

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2. 'स्वराज्य पार्टी'ची स्थापना _____ या साली झाली

a) 1924 b) 1922

c) 1929 d) 1906

3. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या हरिपूर येथील अधिवेशनाचे अध्यक्ष _____

a) सरदार वल्लभभाई पटेल b) डॉ.बी.आर आंबेडकर

c) लाला लजपतराय d) सुभाषचंद्र बोस

4. भारताचे पोलादी पुरुष _____

a) भगतसिंग b) चंद्रशेखर आझाद

c) अबुलकलाम आझाद d) सरदार वल्लभभाई पटेल.

III. खालील प्रश्नांची समूहात चर्चा करून उत्तरे लिहा.

1. गांधीजींच्या चळवळीची आध्यात्मिक साधने कोणती?
2. असहकार चळवळीच्या कार्यक्रमांची यादी करा.
3. बंगालची फाळणी रद्द करण्याची कारणे कोणती?
4. चौरीचौराच्या घटनांचे वर्णन करा.
5. मिठाच्या सत्याग्रहाचे वर्णन करा.
6. 'चलेजाव चळवळ' असफल होण्याची कारणे कोणती?
7. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या जहालांची नावे लिहा.
8. दुसऱ्या गोलमेज परिषदेचे परिणाम कोणते?
9. स्वातंत्र्य चळवळीत सुभाषचंद्र बोस यांनी कोणते योगदान दिले?
10. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासींच्या बंडाचे वर्णन करा.
11. पंतप्रधान झाल्यावर नेहरूंनी कोणती भरीव कामगिरी केली?

IV. उपक्रम

1. स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो जमवा आणि अल्बम बनवा.
2. इंडरनेटच्या मदतीने जालियनवालाबाग दांडी यात्रेचे फोटो आणि माहिती गोळा करा.
3. सत्याग्रह आणि अहिंस या गांधीच्या योजनावर भाषणे आयोजित करा.
4. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सुभाषचंद्र बोसांच्या अभिप्रायाबद्दल निबंध लिहा.

V. प्रकल्प

1. तुमच्या शाळेत देशभक्तीचे दर्शन घडविणाऱ्या नाटकांचे आयोजन करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 9

स्वातंत्र्योत्तर भारत

या पाठात आपण खालील गोष्टीचा अभ्यास करूया :

- **भारताच्या विभाजनाचे परिणाम**
- **निर्वासितांची समस्या**
- **राज्यांची पुनर्रचना**
- **सरकार स्थापनेची समस्या**
- **संस्थानांचे विलिनीकरण**

15 ऑगस्ट 1947 हा दिवस भारतासाठी कांही अंशी त्रासदायक आणि कांही अंशी आनंददायी असा संमिश्र होता. असंख्य हुतात्म्यांच्या त्यागाने व बलिदानाने हे स्वातंत्र्य प्राप्त झाले. देशाच्या फाळणीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. सरकारने ही परिस्थिती कशी हाताळली हे समजून घेण्यापूर्वी त्यावेळची परिस्थिती काय होती; हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रथमतः देशाच्या फाळणीमुळे नवीन समस्या उद्‌भवल्या देश जातीय दंगलीमध्ये होरपळून निघाला. दोन्ही देशातील लाखो लोक आपल्या भवितव्यासाठी धडपडत होते. देशातील या निर्वासितांना अन्न व निवारा देणे हे देशासमोर एक मोठे आव्हान होते. पाकिस्तानात जाणाऱ्या लोकांपेक्षा भारतात येणाऱ्या लोकांची संख्या अधिक होती.

दुसरे म्हणजे भारतातील संस्थानांचे संघराज्यांमध्ये एकीकरण करणे ही एक मोठी समस्या होती. भारतात त्यावेळी एकूण 562 संस्थाने होती. सुरुवातीला थोडासा विरोध करून बरीच संस्थाने संघराज्यामध्ये सामील होण्यास तयार झाली. परंतु उत्तरेकडील काश्मीर आणि जुनागड व दक्षिणेकडील हैदराबाद ही संस्थाने सहजासहजी सामील होईनात. भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी हे आव्हान स्वीकारले. आणि ते यशस्वी झाले. तसेच-देशात सुरक्षितता व ऐक्य निर्माण करण्यातही ते यशस्वी झाले.

तिसरे, फाळणीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला फार मोठा धक्का बसला. देशाला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी शेती वाणिज्य, व्यापार व उद्योग या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे होते. कारण जवळजवळ अडीच शतका पेक्षा जास्त काळ भारतातील साधनसंपत्ती वसाहतवादी राष्ट्रानी आपल्या देशात नेली होती. दादाभाई नौरोजींनी आपल्या 'आर्थिक निःसारणाच्या सिद्धांता' मध्ये याबाबत सखोल चर्चा केली आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

चौथे, भारतापुढे आपले स्वतंत्र संविधान तयार करणे हेही एक मोठे आव्हान होते. एक लोकशाही गणराज्य म्हणून स्थिरस्थावर होण्यासाठी स्वतःचे नवे संविधान तयार करणे अत्यावश्यक होते. डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 'घटना मसुदा समितीने' भारताला एक वैशिष्ट्यापूर्ण अशी घटना तयार करून दिली. यामुळे कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळाला बळकटी प्राप्त झाली.

पाचवे, प्रदीर्घ काळाच्या धडपडीनंतर मिळालेले स्वातंत्र्य शत्रूपासून अबाधित ठेवणे हे परमकर्तव्य होते. म्हणून आपले लष्कर मजबूत करण्यास भारताने सुरुवात केली. तत्कालीन लष्करव्यवस्था ही इतर राष्ट्रांपेक्षा कमी नव्हती. यासाठी आपण इतिहासाचे सुरवातीपासून अवलोकन करणे गरजेचे आहे.

सहावे, भारतीय समाजामध्ये लिंगभेद व वर्णभेद अस्तित्वात असल्याने सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी सामाजिक रचना मजबूत करणे गरजेचे होते. तसेच अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी नवीन परराष्ट्र धोरणाची आखणी करणे क्रमप्राप्त होते. या सर्व आव्हांनाना समर्थपणे तोंड देवून आज जगातील एक बलाढ्य लोकशाही राष्ट्र अशी भारताची ख्याती झाली आहे.

जातीय दंगली-

युद्धापेक्षा जातीय दंगलीमध्येच जास्त मनुष्यहानी झाली आहे असे म्हटले जाते. धार्मिक दंगलीमुळे समाजामध्ये दहशत निर्माण होते. भारताचा ऐतिहासिक अनुभवही यापेक्षा वेगळा नाही.

भारतामध्ये अनेक धर्म आहेत. अनेक परदेशी राज्यकर्त्यांच्या आगमनानेही अनेक धर्मांची भर पडली या विविधतेमुळे इंग्रजांना 'फोडा व राज्य करा' हे धोरण राबविणे सुलभ झाले. यामुळे लोकांच्या मनात संशय निर्माण होवून जातीय दंगली घडू लागल्या. हिंदू-मुस्लीम दंगलीनी हिंसक वळण घेतले आणि हे मतभेद विकोपाला गेले. 1947 मध्ये भारत - पाकिस्तान फाळणीच्यावेळी उत्तर भारतात जातीय दंगली मोठ्या प्रमाणात उसळल्या या दंगलीमध्ये लाखो हिंदू - मुस्लीम लोकांचा बळी गेला. ज्यावेळी दिल्लीमध्ये स्वातंत्र्योत्सव साजरा केला जात होता त्यावेळी गांधीजी नौखाली व इतर कांही भागातील दंगलग्रस्तांचे सांत्वन करण्यात मग्न झाले होते.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान नेहरूंसमोर हा अत्यंत जटील असा प्रश्न होता. परंतु व्यवस्थितपणे प्राधान्य देवून कांही महिन्यातच नेहरूंनी हा प्रश्न यशस्वीरित्या सोडविला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

या दुष्ट दंगलींमुळेच नेहरूंच्या मनात निधर्मी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना निर्माण झाली. या घटनांमुळे भारतीय संविधानामध्ये निधर्मी तत्वांचा समावेश करणे सुलभ झाले. जरी मौलाना अबुल कलाम आझाद व खान अब्दुल गफारखान यासारख्या नेत्यांनी पाकिस्तानच्या फाळणीला विरोध केला तरी ते ही फाळणी थांबवू शकले नाहीत.

या जातीय दंगली आजतागायत सुरुच आहेत. या दंगली मागे कांही आंतरराष्ट्रीय व्यक्तींचा हात आहे. भारताच्या घटनेने प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. यामागे भारत एक निधर्मी राष्ट्र व्हावे अशी उदात्त भावना आहे. भारतीय घटनेचा हा उद्देश सर्व भारतीयांनी समजून घेणे गरजेचे आहे.

निर्वासितांच्या समस्या

देशाच्या फाळणीनंतर निर्वासितांची समस्या अत्यंत मोठ्या प्रमाणात उद्‌भवली. या काळात लक्षावधी लोक कोणत्याही एका देशात (भारत किंवा पाकिस्तान) स्थिरस्थावर होण्यासाठी धडपडत होते. बहुतांश लोकांचे मत असे होते की ज्या देशात आपण जन्मलो, वाढलो तेथेच आपल्याला स्थायिक व्हायला मिळावे. सुरवातीला ही एक अत्यंत गंभीर समस्या होती. परंतु 1951 पर्यंत पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांची व्यवस्था करण्यात भारताला यश मिळाले.

परंतु पूर्व पाकिस्तान (बांगला देश) मध्ये. हे पेचप्रसंग बऱ्याच काळापर्यंत सुरु होते. फाळणीनंतर बऱ्याच काळापर्यंत तेथे जातीय दंगली सुरुच होत्या - परिणामतः 1971 पर्यंत हे लोक भारतात येतच राहिले. 1971 मधील बांग्ला मुक्तीसाठीच्या युद्धात भारताने त्या देशाला पाठिंबा दिला. त्यामुळे जवळजवळ 10 लाख लोक भारतात आले. भारत सरकारने तसेच पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय व त्रिपुरा या राज्यसरकारांनी निर्वासित लोकांना आवश्यक त्या सुविधा पुरवून त्यांना आश्रय दिला. तसेच त्यांचे पुढील जीवन जगण्यास सहाय्य केले. बंगालमधून आलेल्या निर्वासितांना फक्त बंगाली भाषाच अवगत असल्याने त्यांनी तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पश्चिम बंगालमधील लोकसंख्या वाढली. 1965 ते 1970 च्या दरम्यान, भारताला फार मोठ्या आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले. दुष्काळामुळे भारताची आर्थिक परिस्थिती ढासळली. परंतु मानवतेच्या दृष्टिकोनातून निर्वासितांच्या समस्यांवर तोडगा काढण्यात आला. निर्वासितांच्या अवाढव्य संख्येमुळे व त्यांच्या अनेक समस्यांमुळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाला. एवढे होवूनसुद्धा भारताने माणुसकी जपली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नेहरूंच्या काळापासून तिबेटहून अनेक निर्वासित भारतात आले अंदाजे एक लाख वीस हजार तिबेटीयन निर्वासित भारतात आले. 1960 च्या दशकात तत्कालीन म्हैसूर सरकारने म्हैसूर जिल्ह्यातील बैलुकुप्पे येथे सुमारे 3000 एकर जमीन तिबेटियनांच्या पुनर्वसनासाठी मंजूर केली. आज हेच गाव तिबेटियन लोकांचे प्रमुख केंद्र बनले आहे. इतक्या समस्या असूनही त्यांच्या आगमनाने सांस्कृतिक विकासही झाला आहे.

नवीन सरकारची स्थापना

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा म्हणजेच 15 ऑगस्ट 1947 दिवशी तात्पुरत्या स्वरूपाचे सरकार स्थापन करण्यात आले. लॉर्ड माऊंट बॅटन हेच गव्हर्नर जनरल म्हणून काम पहात होते. जवाहरलाल नेहरू यांची भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून निवड झाली. 26 जानेवारी 1950 रोजी भारताची घटना अंमलात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे घटना मसुदा समितीचे चेअरमन होते. राज्यघटना अंमलात आल्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद हे भारताचे पहिले राष्ट्रपती बनले. घटनेनुसार भारत हे एक सार्वभौम, प्रजासत्ताक लोकशाही गणराज्य म्हणून घोषित करण्यात आले. पुढे 42 व्या घटनेतील दुरूस्तीनुसार निधर्मी (secular) समाजवादी (socialist) हे शब्द सामील करण्यात आले. याच आधारावर भारत सरकारने स्वतंत्र अलिप्ततावादी (non alignment) धोरण अवलंबिले. भारताने संसदीय लोकशाही सुद्धा सुरु केली.

हे तुम्हाला माहित आहे का?

संसदीय लोकशाही : घटना समितीने विविध देशातील संविधानांचा तुलनात्मक अभ्यास केला, अनुभव घेतला आणि असे अनुमान काढले की, उमेदवार निवडून बनविलेले संविधान हे सर्वात चांगल्या प्रकारचे सरकार होय, म्हणून त्यांनी अध्यक्षीय पद्धत नाकारली आणि संसदीय लोकशाही पुरस्कृत केली.

संस्थानांचे विलिनीकरण


वल्लभभाई पटेल

ब्रिटीशांनी भारत सोडला तेव्हा भारतामध्ये 562 संस्थाने होती. राष्ट्राची विभागणी करतांना ब्रिटीशांनी तीन पर्याय दिले होते. पहिला भारतीय संघराज्यात सामील होण्याचा, दुसरा पाकिस्तानात सामील होण्याचा आणि तिसरा दोन्ही संघराज्यात सामील न होता स्वतंत्र राहण्याचा सरकारने सर्व संस्थानांना संघराज्यात सामील होण्यासाठी निमंत्रित केले. ज्या संस्थानिकांनी भारतीय संघराज्यात सामील होण्याची तयारी दर्शविली त्यांना 'वार्षिक तनखा'(Privypurse) देण्याचे मान्य

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

केले. तसेच त्यांच्या प्रतिष्ठेला साजेसे राहणीमान ठेवण्याचे आणि कांही खास सवलती देण्याचे विशेषाधिकार दिले. विलिनीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये जुनागड, हैदराबाद व जम्मू आणि काश्मीरने तीव्र विरोध केला. अशा बिकट परिस्थितीत भारताचे 'पोलादी पुरूष' म्हणून ओळखले जाणारे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी विलीनीकरणाची योजना अत्यंत यशस्वी करून दाखविली.

जुनागड

येथील नवाब पाकिस्तानात सामील होण्याचा विचार करीत होता. परंतु राज्यातील बहुसंख्य प्रजेने जुनागड भारतीय संघराज्यात सामील व्हावे म्हणून नबाबाविरूद्ध बंड पुकारले. बंडाला तोंड न देवू शकल्यामुळे नबाबाने पाकिस्तानात पलायन केले. तेथील दिवाणाच्या विनंतीवरून भारत सरकारने लष्कराला पाचारण करून शांती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अखेर 1949 मध्ये जुनागड भारतीय संघराज्यात सामील झाले.

हैदराबाद

हे संस्थान निजामांच्या अधिपत्याखाली होते. स्वतंत्र राहण्याच्या उद्देशाने निजाम ाने भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार दिला. साम्यवादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली तेलंगणाच्या शेतकऱ्यांनी सशस्त्र हल्ला चढविला. निजामाच्या क्रूर सैन्या बद्दल प्रजेच्या मनात तीव्र संताप होता. भारत सरकारने लष्कराला पाचारण करून निजामाचा पूर्ण पराभव केला. आणि अशारीतीने हैदराबादचा भारतीय संघराज्यात सामील होण्याचा मार्ग खुला झाला. 1948 मध्ये हैदराबाद भारतीय संघराज्यात सामील झाले.

जम्मू आणि काश्मीर

भारत आणि पाकिस्तानच्या मध्ये वसलेल्या जम्मू आणि काश्मीरचा राजा हरिसिंग हा होता आणि त्याला स्वतंत्र रहायचे होते. काश्मीर भारतात जाईल या भीतीने पाकिस्तानने जम्मू काश्मीरच्या खोऱ्यातील कांही जमातींच्या सहाय्याने हल्ला केला. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते शेख अब्दुल्ला यांनी काश्मीरच्या मुक्तीसाठी लढा दिला. आणि पाकिस्तानात जाण्यापेक्षा भारतीय लोकशाही संघराज्यात सामील होणे केंव्हाही चांगले असा विचार करून भारतीय संघराज्यात सामील होण्याची कबुली दिली. पाकिस्तानच्या दबावामुळे राजा हरिसिंगने भारत सरकारकडे मदतीची याचना केली. पाकिस्तानचे सर्व प्रयत्न असफल ठरल्यानंतर जम्मू काश्मिर कांही अटीवर भारतीय संघराज्यात सामील झाले. काश्मीरचा काही भाग पाकिस्तानमध्ये राहिला जानेवारी 1949 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने युद्धबंदीचा (cease fire) आदेश जारी केला. काश्मीरचा कांही प्रदेश पाकिस्तानने बेकायदेशीर रीत्या बळकावलेला आहे. त्याला पाकव्याप्त काश्मीर (P.O.K.) म्हणतात. जम्मू काश्मीरचे भारतामध्ये केलेले विलिनीकरण हे इतर राज्यांपेक्षा वेगळ्या पद्धतीने केले आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

पाँडिचेरी

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही कांही प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यात होता. पाँडिचेरी, करैकल, माहे आणि चंद्रनगर येथे फ्रेंचांच्या वसाहती होत्या. काँग्रेसच्या धडपडीनंतर साम्यवादी आणि इतर संघटनानी भारतात विलीन होण्याची इच्छा व्यक्त केली. 1954 मध्ये ही संस्थाने विलीन करण्यात येवून पाँडिचेरीला 1963 मध्ये केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आले.

गोवा

गोव्याचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण करण्यासाठी जोरदार चळवळ चालू होती. गोवा पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली होता. पोर्तुगीजांना गोवा सोडून जाण्याचा आदेश दिला गेला. तरीही पोर्तुगीजांनी आंदोलकांविरूद्ध दडपशाहीचे धोरण अवलंबिले. त्यांनी आफ्रिका व युरोप येथून जादा सैन्याच्या तुकड्या मागवून स्वतःचे वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न केला. इ.स.1955 मध्ये भारताच्या विविध प्रांतातील लोक एकत्र आले. आणि सर्वांनी मिळून पोर्तुगीजांविरूद्ध 'गोवा मुक्ती आंदोलन' सुरु केले. अशा परिस्थितीत भारत सरकारने गोवामुक्तीसाठी सैन्यबलाचा वापर केला आणि गोवा स्वतंत्र झाला. इ.स.1987 पर्यंत गोवा केंद्रशासित प्रदेश होता व नंतर ते स्वतंत्र राज्य म्हणून घोषित करण्यात आले.

भाषावार प्रांतरचना (राज्यांची पुनर्रचना)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची सर्वात महत्वाची लोकशाही चळवळ म्हणजे भाषावार प्रांतरचनेची चळवळ होय. राज्यकारभार सुरळितपणे चालविण्यासाठी भाषावार प्रांतरचनेची मागणी करण्यात आली. ब्रिटीशांच्या काळात राज्यकारभार व्यवस्थित नव्हता. कारण संस्थानांद्वारे राज्यकारभार चालविण्यासाठी वापरली जाणारी भाषा ही साम ान्य माणसांची भाषा नव्हती. अशा परिस्थितीत भाषावार प्रांतरचना करण्याची अत्यंत गरज होती. आंध्र महासभेमार्फत पोट्टी श्रीरामुलू यांनी 58 दिवस उपोषण करून 1952 मध्ये प्राणत्याग केला. त्यांनी 'विशालांध्रा' या स्वतंत्र राज्याची मागणी केली होती. यानंतर सत्याग्रहीनी आंध्रप्रदेशाची तीव्र मागणी केली. इ.स.1953 मध्ये सरकारने 'फाजल अली आयोगाची' रचना केली. के.एम.पणिक्कर आणि एच.एन.कुंझ्रू हे या समितीचे सदस्य होते. इ.स.1953 मध्ये 'आंध्रप्रदेश' हे भाषावार प्रांतरचनेतील पहिले राज्य उदयास आले. या आयोगाच्या शिफारसीनुसार इ.स.1956 मध्ये 'राज्य पुनर्रचना कायदा' संसदेने संमत केला. यानुसार 14 राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले.

कृती

1970 नंतर अस्तित्वात आलेल्या नव्या राज्यांची यादी तयार करा.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारताच्या विविध प्रांतात कन्नड भाषा बोलणारे लोक विखुरलेले होते. हा सर्व भाग एकत्र आणण्यासाठी अखिल कर्नाटक राज्य रचना परिषदेच्या (All Karnataka State Formation Parishat) नेतृत्वाखाली चळवळ सुरू करण्यात आली. शेवटी 1 नोव्हेंबर 1956 रोजी बेंगलूरु येथील एका समारंभात तत्कालीन राष्ट्रपती डॉ.बाबू राजेंद्र प्रसाद यांनी 'म्हैसूरु राज्याचे' उद्घाटन केले. पुढे 1 नोव्हेंबर 1973 रोजी कर्नाटक असे नाव देण्यात आले. आता सध्या भारतामध्ये 29 राज्ये आणि 7 केंद्रशासित प्रदेश आहेत.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:

1. ईस्ट इंडिया कंपनीचा शेवटचा गव्हर्नर जनरल _____ हा होता.
2. भारताचे पहिले गृहमंत्री _____ हे होते.
3. भारताचे पहिले राष्ट्रपती _____ हे होते.
4. इ.स. _____ मध्ये पाँडिचेरीचा भारतात केंद्रशासित प्रदेश म्हणून समावेश करण्यात आला.
5. राज्य पुनर्रचना कायदा _____ मध्ये अस्तित्वात आला.

II. खालील प्रश्नांची उत्तरे आपापसात चर्चा करून द्या :

1. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतापुढे कोणकोणत्या समस्या होत्या?
2. निर्वासितांची समस्या कशा पद्धतीने सोडविण्यात आली?
3. पाँडिचेरीला फ्रेंचांच्या तावडीतून कसे सोडविण्यात आले?
4. पोर्तुगीजांच्या ताब्यातून 'गोवामुक्ती' कशी करण्यात आली?
5. भाषावार प्रांत रचनेच्या प्रक्रियेबद्दल थोडक्यात माहिती द्या.

III. उपक्रम :

1. भारताचा नकाशा काढून त्यामध्ये वेगवेगळी राज्ये व त्यांची राज्यभाषा दाखवा.

IV. प्रकल्प :

1. भारतातील राज्ये व त्यांची मातृभाषा आणि त्यांच्या राजधान्यांची यादी तयार करा.
2. तुमच्या शिक्षकांच्या व इंटरनेट्च्या मदतीने आजूबाजूच्या राज्यांचा एकमेकांवर सांस्कृतिक परिणाम कसा झाला याबाबत माहिती मिळवा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 10

20 व्या शतकातील राजकीय घडामोडी

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करुया.

- **पहिले महायुद्ध**
- **हुकूमशहांचा उदय**
- **चीनची क्रांती**
- **अमेरिकेचा उदय**
- **रशियन राज्यक्रांती**
- **दुसरे महायुद्ध**
- **शीतयुद्ध**

पहिले महायुद्ध

इ.स.1914 च्या पूर्वीपासूनच ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, इटली, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि रशिया यांच्यामध्ये युरोप आणि वसाहतीवर ताबा मिळविण्यासाठी वारंवार संघर्ष व झगडे होत होते. औद्योगिक क्रांती आणि नवनवीन संशोधनांमुळे युरोपियन राष्ट्रांमध्ये प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. अनेक वर्षांचा इतिहास हेच स्पष्ट करतो की युरोपियन देशांमध्ये बाजारपेठ व भारतासहित असंख्य देशातील नैसर्गिक संपत्ती मिळविण्यासाठी प्रचंड स्पर्धा होती. या संदर्भातील अनेक ठराव हे विविध देशामधील सीमावादाला कारणीभूत ठरले. यामुळे बलाढ्य युरोपियन देशांमधील सत्तेच्या समीकरणांचा समतोल ढळला.

वरील सर्व घटनांमुळे प्रत्येक बलवान देश सैन्य गोळा करण्यामध्ये गुंतला. अनेक मैत्रीकरार करण्यात आले. कांही देशामध्ये उत्कट राष्ट्रभक्ती वाढीस लागली. साम्राज्यवादी प्रवृत्ती बळावली. पहिल्या महायुद्धामुळे देश दोन गटामध्ये विभागले गेले. ब्रिटन, फ्रान्स आणि रशिया या तीन देशांनी आपल्यात सलोखा करार (Triple Entente) केला तर जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि इटली या तीन देशांनी आपापसात मैत्रीचा करार (Triple Alliance) केला. कांही काळानंतर इटली प्रतिस्पर्ध्यांना जावून मिळाला. जसजशी युद्धपरिस्थिती निर्माण झाली तसतसे गटांचे स्वरूपही बदलले.

पहिले महायुद्ध 28 जुलै 1914 पासून 11 नोव्हेंबर 1918 पर्यंत सुरू होते. पहिल्या म हायुद्धाचे प्रमुख कारण म्हणजे 28 जुलै 1914 रोजी ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्यूक फ्रान्सीस फर्डिनांड (Archduke Fanz Ferdinand) याची विश्वासघाताने केलेली हत्या हे होय. या घटनेमुळे ऑस्ट्रिया आणि सर्बीया या दोन देशांमध्ये ताबडतोब फूट पडली.

सुरवातीला अमेरिका तटस्थ होती. रशिया जर्मनीच्या विरोधात होता. अशारितीने युद्ध समाप्तीच्या वेळी चित्र पूर्णपणे बदलले होते. अमेरिका ब्रिटन व फ्रान्सला जावून मिळाली होती.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नोव्हेंबर 1917 साली रशियामध्ये समाजवादी क्रांती झाली त्यामुळे रशियाने जर्मनीबरोबर युद्ध बंदीचा (Ceasefire) करार केला आणि युद्धातून आपले अंग काढून घेतले. तीन मित्रराष्ट्रांनी मिळून जोरदार हल्ला केल्यामुळे जर्मनीने पराभव पत्करला आणि युद्ध थांबविले.

इ.स.1919 मध्ये अपमानित झालेल्या कांही मित्रराष्ट्रांनी व्हर्सेलिसच्या तहावर सह्या केल्या. ऑस्ट्रिया-हंगेरी आणि ऑटोमन राष्ट्रांचे अस्तित्व नाहिसे झाले. जर्मनीने आपला बराचसा भाग गमावला. युरोपच्या नकाशात आमूलाग्र बदल झाला. छोटी छोटी स्वतंत्र राष्ट्रे उदयाला आली. भविष्यात युद्धांना आळा घालण्याच्या हेतूने 'राष्ट्रसंघाची' (League of Nations) स्थापना करण्यात आली.

शरम आणि मानखंडनेच्या भावनेमुळे पराभूत राष्ट्रांमध्ये आक्रमक देशभक्ती निर्माण झाली. युद्धामध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई आणि जर्मनीवर लादलेल्या अनेक निर्णयांमुळे जनतेवर विपरित परिणाम झाले. बेरोजगारी, गरिबी आणि आर्थिक मंदीमुळे सर्वत्र असंतोषाचे वातावरण पसरले. स्वत:च्या फायद्यासाठी जर्मन उद्योजकांकडून शोषण केले जावू लागले. या वातावरणामुळेच हिटलर सारख्या हुकूमशहाचा उदय झाला. हिटलरचा उदय म्हणजेच दुसऱ्या महायुद्धाची नांदी होती. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि अमेरिकेतील शस्त्रास्त्र उत्पादकांनी आणि व्यापाऱ्यांनी या काळात प्रचंड फायदा मिळविला.

हे तुम्हाला माहित असू द्या :

पहिल्या महायुद्धात नागरिकांसह सुमारे 1,00,00,000 (एक कोटी) लोक (दोन्ही गटातील मिळून) मारले गेले. 2,00,00,000 (दोन कोटी) लोक जखमी झाले. आणि 35,00,000 (पस्तीस लाख) लोकांना कायमचे अपंगत्व आले. इतर कोणत्याही युद्धाप्रमाणे पहिले महायुद्धसुद्धा कांही लोकांच्या हव्यासापोटी व फायद्यासाठीच करण्यात आले. अपरिमित जिवीत हानी, रक्तपात, नागरी मालमत्तेचे नुकसान हे पहिल्या म हायुद्धाचे भयानक परिणाम होत.

रशियन राज्यक्रांती :

रशिया हे विस्ताराने जगातील सर्वात बलाढ्य राष्ट्र होय. 19 व्या शतकात रशियामध्ये झारची राजवट होती. त्यांचा राज्यकारभार अत्यंत क्रूर आणि दडपशाहीचा होता. सरदार, जहागीरदार, शेतकरी आणि गरीब लोकांची पिळवणूक केली जात होती. कामगारवर्ग आणि इतरांचा बिमोड करून भांडवलदारांचा एक नवा वर्ग तयार झाला. झारांच्या मनमानी कारभाराला लोक कंटाळले होते. इ.स.1905 मध्ये जपानसारख्या छोट्या राष्ट्राने रशियाला

www.textbookpdf.in

हरविले. त्यामुळे रशियनांनी झारविरूद्धच्या बंडाच्या चळवळीचे स्वरूप व्यापक केले. याचा परिणाम म्हणून अनेक दंगे उसळले. कामगारांनी संप पुकारले. कामगार आणि शेतकऱ्यांनीही सशस्त्र लढा चालू केला. झारने निर्दयीपणाने या बंडाचा बिमोड केला व अनेक लोकाची कत्तल केली.

यानंतर व्ही.आय.लेनिन यांनी शेतकऱ्यांना आणि कामगारांना क्रांतीकारी कौशल्याविषयी मार्गदर्शन केले. परिणामत: कामगारवर्ग अधिकाधिक चळवळींमध्ये गुंतला. अशा परिस्थितीत लेनिन यांना देशातून हद्दपार करण्यात आले. जेव्हा हे संप विकोपाला जावून परिस्थिती आवरणे कठिण झाले. तेंव्हा शेवटचा रशियन झार दुसरा निकोलस (Nicholas II) देश सोडून पळून गेला. हीच फेब्रुवारी 1917 सालची 'रशियन राज्यक्रांती' (फेब्रुवारी क्रांती) म्हणून ओळखली जाते. उदारमतवादी मॅनशेवीक्स (liberal Mansheviks) यांनी सत्ता काबीज केली. त्यांनी रशियाला 'लोकशाही प्रजासत्ताक'(Democratic Republic) म्हणून घोषित केले.


लेनिन

याचसुमारास अज्ञातवासातील लेनिन रशियाला परत आला. त्यांने शांती, अन्न व भूमी' यासारख्या साध्या व सोप्या घोषणा लोकांसाठी दिल्या. कामगारांनी व गरीब शेतकऱ्यांनी याला मन:पूर्वक प्रतिसाद दिला. ऑक्टोबर 1917 मध्ये कामकरी किंवा कामगार पक्षाच्या बोलशेवीक्स (Bolsheviks) यांच्या नेतृत्वाखाली क्रांती घडून आली. लेनिन या क्रांतीकारी दलामध्ये सामील झाला आणि 7 नोव्हेंबर 1917 रोजी त्यांनी रशियाला 'समाजसत्तावादी प्रजासत्ताक' (Socialist Republic) म्हणून घोषित केले. याला रशियाची 'ऑक्टोबर क्रांती' म्हणतात. लेनिन रशियन सरकारचे राष्ट्राध्यक्ष बनले.

सत्तेवर आल्याबरोबर लेनिन यांनी सर्व जमिनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत असे घोषित केले. त्यांने अनेक आर्थिक व राजकीय धोरणे राबविली. याद्वारे सर्व रशियन लोकांना मोफत शिक्षण, आरोग्य, क्रीडा, निवारा इ. सुविधा पुरविण्यात आल्या. कार्ल मार्क्स यांचे वैज्ञानिक, समाजवादी विचार अंमलात आणणारा लेनिन हा पहिला राज्यकर्ता होता. संपूर्ण मानवी इतिहासामध्ये ही पूर्णपणे असमान अशी समाजव्यवस्था होती. ही व्यवस्था प्रारंभिक अवस्थेत असतानाच इ.स.1924 मध्ये लेनिनचा मृत्यू झाला.

लेनिननंतर जोसेफ स्टॅलीन हा रशियाचा राष्ट्राध्यक्ष बनला. रशियाला अमेरिकेच्या तोडीचे राष्ट्र बनविण्यात स्टॅलीनचा अत्यंत महत्वाचा वाटा होता. स्टॅलीनने सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनांद्वारे रशियाच्या विकासाचा मार्ग पूर्णपणे बदलला. रशियाने जगातील पहिला मानवनिर्मित उपग्रह अंतराळात सोडला. युरी गागारीन हा जगातील पहिला अंतराळवीर ठरला. भारताने

www.textbookpdf.in

स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनेचा आराखडा (नमुना) रशियाकडूनच घेतलेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाने समाजवादी गटराष्ट्राचे नेतृत्व केले. त्यांनी आशियायी, आफ्रिकन आणि अमेरिकन मुक्ती लढ्यांना पाठिंबा दिला. परंतु रशियाला जगातील सर्वात शक्तीशाली, बलाढ्य राष्ट्र बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये स्टॅलीनने अनेक मोठ्या चुका केल्या. समाजवादी लोकशाहीला सामर्थ्यवान बनविण्याकडे त्यांने फारसे लक्ष दिले नाही. याचा परिणाम असा झाला की क्रांतीच्या विरोधात लढणारी दले बलवान बनली. नंतर 1985 मध्ये. ग्लॉसनॉस्ट (glasnost मोकळे पणा) आणि 1987 मध्ये पेरेस्ट्रोएका (Perestroika -पुनर्रचना) यासारख्या सुधारित तत्वांचा गोर्बाचेव्ह यांनी वापर केला. यानंतर रशियातील समाजवादी व्यवस्था ढासळली आणि सोव्हिएत युनियन विखुरले गेले.

हे तुम्हाला माहित असू दया :

पेरेस्ट्रोएका (perestroika) आणि ग्लॉसनॉस्ट (glassnost) : सोवियत कम्युनिस्ट पक्षातर्फे देशाच्या विकासासाठी लोकशाहीकरीता आणि कांही सुधारणा घडवून आणण्यासाठी नागरिकांना कांही प्रस्ताव मांडता यावेत याकरिता गोर्बाचेव्ह यांनी वरील दोन शब्द प्रचलित केले. त्याचा अर्थ पेरेस्ट्रोएका - पुर्नरचना, ग्लासनॉस्ट स्पष्टपणा, मोकळे पणा.

हुकुमशहा (Dictators) :

हिटलर : पहिल्या महायुद्धानंतर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे जर्मनीमध्ये हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनीसारख्या हुकूमशहांचा उदय झाला. पहिल्यांदा हिटलर पंतप्रधान झाला. आणि त्यापाठोपाठ हिंडेनबर्गच्या मृत्यूनंतर हुकूमशहा बनला. हिटलर फ्युअरर बनला. हिटलरने सत्ता मिळवली तेंव्हा साम्यवादी आणि समाजवादी जर्मनीमध्ये सामर्थ्यवान बनले होते. याविरूद्ध उद्योगपतींच्या पाठिंब्याने हिटलरने साम्यवादी आणि समाजवाद्यांना दडपून टाकले. त्यांने कामगार संघटना आणि राजकीय पक्षांवर बंदी घातली. 'नाझी' हा एकमेव राजकीय पक्ष आहे असे त्यांने घोषित केले.

हिटलर

हिटलरने आपले तात्विक विचार लोकांच्या मनात रुजविले. तसेच ज्यू लोक सर्व जगावर ताबा मिळवतील असे जर्मन लोकांच्या मनात बिंबवून भीती आणि विकृती निर्माण केली. जर्मनीचा आर्यवंश हा जगातला सर्व श्रेष्ठ वंश आहे असे त्यांने जाहीर केले. याचा प्रचार करण्यासाठी हिटलरने नाझी तत्वांचा अवलंब केला. नाझी तत्वज्ञानाचा थोडक्यात सारांश असा: जगातला सर्वश्रेष्ठ वंश म्हणजे जर्मनीचा आर्यवंश, फक्त जर्मन लोकच जगावर राज्य करण्यास पात्र आहेत. इतर सर्व जमाती

www.textbookpdf.in

फक्त स्वत:वर राज्य करवून घेण्यास लायक आहेत. ज्यू लोक जर्मनीच्या सर्व समस्यांना जबाबदार आहेत. त्यांच्याबरोबरच साम्यवादी, कॅथॉलिकस आणि समाजवादीही तितकेच कारणीभूत आहेत हे लोक जगण्यास असमर्थ आहेत. अशा प्रकारची अत्यंत तीव्र किंवा प्रखर देशभक्तीची भावना खूपच क्रूरतेने आचरली जात होती. वंशभेदाचा प्रसार करण्यासाठी हिटलरने गोबेल्स(Goebels) नांवाच्या खास मंत्र्यांची नेमणूक केली. लोकांच्या मनामध्ये अशांतता आणि दहशत निर्माण करण्यासाठी त्यांने 'ब्राउन शर्टस'(Brown Shirts) नावाच्या खाजगी सैन्याचे संघटन केले.

अशारीतीने सर्वत्र सामूहिक खून आणि हत्याकांडे सुरू झाली. यामुळेच इतिहासात हिटलरची कारकीर्द अत्यंत कुप्रसिद्ध झाली. अंदाजपत्रकाप्रमाणे हिटलर हा सुमारे 6 मिलियन ज्यू लोकांच्या आणि एक करोडपेक्षा जास्त इतर नागरिकांच्या मृत्यूला कारणीभूत होता. त्याच्या सामूहिक हत्याकांडाला हॉलोकॉस्ट (Holocaust) असे संबोधले जाते. इ.स. 1935 मध्ये त्यांने 'न्यूरेंबर्ग लॉज'(Nuremberg Laws) नावाचे स्वत:चे कायदे बनविले. त्यांने पन्नास लाख ज्यूंची गॅस चेंबरमध्ये हवा, प्रकाश व अन्नपाण्याविना कोंडून कत्तल केली. त्यांने त्यांना कॉन्सन्ट्रेशन कँप्समध्ये (Concentration camps) गुलामासारखे राबवून घेतले. विषारी गॅस व सामूहिक गोळीबाराद्वारे सामूहिक हत्येमध्येच त्यांने स्वैर आनंद मिळविला. मुलेबाळे, स्त्रिया किंवा वृद्ध माणसे या कशाचाही विचार न करता तो त्यांच्या हत्येचा कट करीत असे. सामूहिक हत्त्याकांडासाठी तो आपल्या हुकूमशाही शक्तीचा वापर करीत असे. संपूर्ण जग जिंकण्याची महत्वाकांक्षा आणि आर्यवंशाचा प्रसार हे दुसऱ्या महायुद्धाला कारणीभूत असणाऱ्या अनेक कारणांपैकी एक होय. अशाप्रकारे हिटलरच्या वंशभेदाचा अध्याय त्याच्या मृत्यूनेच समाप्त झाला.

मुसोलिनी : 20 व्या शतकाच्या आरंभी सुरू झालेल्या सामाजिक चळवळी, पहिल्या महायुद्धाचे विपरित परिणाम आणि रशियन राज्यक्रांतीमुळे समान राजकीय दलाबरोबरच मुसोलिनीच्या 'समाजसत्ताविरोधी आक्रमक राष्ट्रवादी पंथाचा (Fascism) उदय झाला. प्रखर देशभक्तीची प्रवृत्ती, शत्रूंचा नायनाट, हिंसाचाराचे श्रेष्ठत्व, वंशश्रेष्ठता, साम्राज्यवादाचा विस्तार, हत्याकांडाना पाठिंबा इ. समाज सत्ताविरोधी आक्रमक राष्ट्रवादी पंथाची (Fascism) प्रमुख वैशिष्ट्ये होती.

1922 ते 1943 पर्यंत इटलीचा पंतप्रधान असलेला मुसोलिनी हा 'राष्ट्रीय फॅसिस्ट पक्षाचा (National Fascist Party) संस्थापक होता. इ.स.1925 मध्ये त्याने लोकशाही सरकार विसर्जित करून कायदेशीररित्या हुकूमशाहीचा अवलंब केला. स्वत:च्या गुप्त पोलिसांच्या

www.textbookpdf.in

पाठिंब्याने त्यांने आपल्या राजकीय विरोधकांचा नायनाट केला. त्यांने कामगार संघटना, संप, टाळेबंदी वगैरे दडपून टाकले. तो हुकुमशहा बनला. हिटलरच्या तहामध्ये तो सामील झाला आणि लाखो लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. इ.स.1945 साली विश्वासघाताने त्याचा खून करण्यात आला.

दुसरे महायुद्ध

लोक पहिल्या महायुद्धातील मृत्यू आणि दुर्घटना विसरण्यापूर्वीच 1 सप्टेंबर 1939 रोजी पोलंडच्या विरोधात दुसरे महायुद्ध सुरू झाले. मानवाच्या इतिहासात दुसरे महायुद्ध हे अत्यंत संहारक व रानटी समजले जाते. या महायुद्धात 30 पेक्षा जास्त देश थेट सहभागी झाले होते. दुसरे महायुद्ध हे इ.स.1939 ते 1945 पर्यंत चालले. 1930 मध्ये विकसित देशांच्या विध्वंसक धोरणांमुळे युरोप आणि अमेरिकेला प्रखर आर्थिक मंदीला तोंड द्यावे लागले. लोकांची जीवनशैली अत्यंत शोचनीय अवस्थेपर्यंत घसरली होती. कृषी आणि औद्योगिक उत्पादन ठप्प झाले होते. बेरोजगारीचे प्रमाण धोकादायक होते, पहिल्या महायुद्धातील पराभवाच्या अनुषंगाने, अपमानास्पद तह आणि आर्थिक हानीमुळे अनेक देशात प्रखर देशभक्ती जागृत झाली. जर्मनी आणि इतर युरोपियन देशातील उद्योगपतीनी राष्ट्रभक्तीच्या प्रसारासाठी प्रचंड देणग्या दिल्या. या साधनांचा वापर करून द्वेष आणि उद्धटपणाच्या चळवळी सक्रिय झाल्या, जर्मनीमध्ये हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी सारखे हुकुमशहा सत्तेवर आले. पूर्व आशियामध्ये आपले साम्राज्य विस्तारण्याच्या हेतूने जपान चिनी प्रदेशावर हल्ले करीत होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान 'ॲक्सीस (Axis शत्रूराष्ट्रे) आणि 'अलाइज' (Allies मित्रराष्ट्रे) असे दोन प्रतिस्पर्धी गट तयार झाले. जर्मनी, जपान व इटली हे ॲक्सीस' गटात होते तर ब्रिटन फ्रान्स, रशिया आणि इतर कांही देश 'अलाइज' गटात होते. जेंव्हा जर्मनीने पोलंडवर हल्ला केला तेंव्हा पोलंडचा मित्र असलेल्या ब्रिटनने जर्मनीविरूद्ध युद्ध पुकारले. परंतु प्रत्यक्षात मात्र ब्रिटन पटकन पोलंडच्या मदतीला धावला नाही. पोलंड जर्मनीने काबीज केले. यासुमारास रशियामध्ये साम्यवाद असल्याने हिटलर रशियावर आक्रमण करेल असे ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका आणि इतर राष्ट्राना वाटत होते. याबद्दलची कल्पना असल्यामुळेच 24 ऑगस्ट 1939 मध्ये रशियाने जर्मनीबरोबर 'युद्धबंदीचा अनाक्रमण करार' केला.(No-war Pact किंवा Molotov-Ribbntrop Pact) परिणामत: हिटलरने पूर्वे ऐवजी पश्चिमेकडे हल्ला चढविला. इटलीशी करार करून हिटलरने डेन्मार्क, नॉर्वे आणि हॉलंडसहित पश्चिम युरोपातील बराच भाग काबीज केला. 1941 मध्ये हिटलरने सोव्हीएत रशियावर हल्ला चढविला. अशारितीने रशियाला

www.textbookpdf.in

जबरदस्तीने किंवा नाइलाजाने युद्धात भाग घ्यावा लागला. अशा आणीबाणीच्या परिस्थितीत, जपान हिटलरच्या गटात सामील झाला. जपानने आक्रमण करून पॅसिफिक महासागराच्या पश्चिमेकडील अमेरिका आणि युरोपच्या ताब्यात असणारा बराचसा प्रदेश जिंकला.

इटली आणि जर्मनीने उत्तर आफ्रिका आणि सुएझ कालव्यातील ब्रिटीशांच्या वसाहती काबीज करण्याचा प्रयत्न केला परंतु तो असफल ठरला. 1942 च्या स्टॅलीनग्राड युद्धाम ध्ये रशियाने जर्मनीच्या तुकड्यांचा पराभव केला. त्यानंतर 1943 मध्ये जर्मनीला पूर्व युरोपमध्ये पराभवांच्या मालिकेलाच सामोरे जावे लागले. या पराभवांमध्ये रशियाचा वाटा अत्यंत महत्वाचा होता. मित्रराष्ट्रे इटलीमध्ये सामील झाली. जपानला हरवून अमेरिका पश्चिम पॅसिफिक बेटांना (Western Pacific Islands) मिळाली. रशियन लाल गटाद्वारे काढलेला भव्य मोर्चा आणि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या आक्रमणांमुळे जर्मनीला जबरदस्तीने शरणागती पत्करावी लागली आणि बर्लिनचे राज्य ढासळले. 1945 मध्ये हिटलरने आत्महत्या केली. याबरोबरच युरोपमधील युद्ध संपुष्टात आले. इ.स.1945 मध्येच अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर पहिला अणुबॉंब टाकला. यामुळे लाखो लोक बेचिराख झाले. याचे परिणाम जपानला आजही भोगावे लागत आहेत. 15 ऑगस्ट 1945 मध्ये रशियाकडून मांचुरियाची सुटका झाल्यानंतर जपानने पूर्णपणे शरणागती पत्करली आणि याबरोबरच मित्रराष्ट्रांनी युद्धामध्ये पूर्णपणे विजय मिळवला.

जास्तीत जास्त लोकांच्या मृत्यूचा आणि दुखापतीचा साक्षीदार असलेल्या दुसऱ्या म हायुद्धामुळे संपूर्ण जगामध्ये अनेक सामाजिक व राजकीय बदल घडून आले. राष्ट्रसंघाची (लीग ऑफ नेशन्स) जागा संयुक्त राष्ट्रसंघाने (UNO) घेतली. अमेरिका, सोव्हिएत युनियन ऑफ रशिया, चीन, ब्रिटन आणि फ्रान्स हे देश संयुक्त राष्ट्र सुरक्षा मंडळाचे कायम सदस्य बनले. रशिया आणि अमेरिका हे दोन देश अत्यंत आक्रमक प्रतिस्पर्धी बनले ही परिस्थितीच शीतयुद्धाची नांदी ठरली. आशियाई आणि आफ्रिकन देशांना स्वातंत्र्यप्राप्तीमुळे निर्माण झालेल्या हितकारक वातावरणाचा लाभ झाला. ब्रिटन, फ्रान्स आणि इतर बऱ्याच देशांना आपल्या अधिकाराखाली स्थित असणाऱ्या वसाहती गमवाव्या लागल्या. यामध्ये भारताच्या स्वातंत्र्याचाही समावेश करावा लागेल. अमेरिकेने अण्वस्त्रांचा वापर सुरू केला. त्यामुळे सर्व बलाढ्य राष्ट्रे अण्वस्त्र संग्रहासाठी स्पर्धा करू लागली.

चीनची क्रांती

चीन या देशाला खूप मोठा इतिहास व प्राचीन संस्कृती लाभली आहे. स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात चीन हा भारताप्रमाणे संपूर्ण वसाहतींचा देश नव्हता. तो एक निम वसाहतींचा देश होता. म्हणजेच चीनचा कांही भाग स्वतंत्र होता. याशिवाय चीनवर फ्रान्स,

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जपान आणि इतर साम्राज्यवादी देशांचा प्रभाव होता. चीनमध्ये सरदारांकडून राज्यकारभार चालविला जात असे. म्हणजेच जमीनदारांकडून आणि युद्धपिपासू व्यक्तीमार्फत देशावर नियंत्रण ठेवले जात असे. तेथे भारताप्रमाणे उद्योगधंद्याचा विकास झालेला नव्हता.



यापाठोपाठ राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही आणि जीवनातील अनेक प्रश्न पुढे आ वासून उभे होते. इ.स.1911 मध्ये 'कोमिंगतांग' (Kyomintang) पक्षाचा सन-एत-सेनच्या नेतृत्वाखाली सम्राटांच्या विरोधात असणाऱ्या लोकशाहीने क्रांती केली. पण ती पूर्ण होवू शकली नाही. इ.स.1925 साली चीनमध्ये साम्यवादी पक्षाचा (Communist Party) उदय झाला.

खेड्यांमध्ये शेतकऱ्यांच्या चळवळी आणि शहरामध्ये कामगारांचे संप सक्रिय झाले. सन्-एत्-सेनच्या निधनानंतर कोमिंगतांग पक्षाचे नेतृत्व चँग-कै-शेक या दडपशाही करणाऱ्या व्यक्तीच्या हातात गेले. त्यांने सम्राटाशी हातमिळवणी करून साम्यवाद्यांच्या विरोधात त्यांच्याच प्रदेशात जावून युद्ध पुकारले.

जवळजवळ 70,000 क्रांतीकारी मारले गेले. स्वत:च्या संरक्षणासाठी माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक 'लाँग मार्च' ही मोठी पदयात्रा उत्तरेकडील भागात काढण्यात आली. जगाच्या इतिहासातील हा एक असामान्य लष्करी प्रयोग होता. यापूर्वी कधीही मिळाला नव्हता; इतका पाठिंबा याला शेतकऱ्यांकडून मिळाला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हे तुम्हाला माहित असू द्या :

'दी लाँग मार्च' (दीर्घ संचलन) चिनी कम्युनिस्ट (साम्यवादी) क्रांतीकाऱ्यावर चँग-कै-शेक द्वारा केलेल्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी चीनी क्रांतीकारी माओच्या नेतृत्वाखाली काढलेली ही एक ऐतीहासिक पदयात्रा होय, य प्रसंगी 80,000 क्रांतीकारी सैनिकांना चीनच्या दक्षिण-पूर्व भागातील चँग येथून उत्तर-पश्चीम भागतील युनान येथे. हलविण्यात आले. हे अंतर अंदाजे 10,000 कि.मी. इतके होते. ही पदयात्रा ऑक्टोबर 1934 ला सुरु झाली व ऑक्टोबर 1935 ला संपली. त्यावेळीफक्त 10,000 लोक जिवंत होते. इतिहासामधे माणसाच्या सामाजिक क्रांतीसाठी इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित राहून ते दीर्घ अंतर चालत पार करण्याची ही एकमेव घटना आहे. म्हणून या पदयात्रेला 'लाँग मार्च' असे म्हणतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान जपानने चीनच्या बऱ्याच प्रांतावर हल्ला केला. या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी चीनची कम्युनिस्ट पार्टी (साम्यवादी पक्ष) पुढे सरसावली इ.स.1945 मध्ये जपानचा युद्धामध्ये पराभव झाला. जपानच्या सैन्याने माघार घेतल्याने कम्युनिस्ट पक्षाच्या लोकमुक्ती सैन्याने जिंकलेला प्रदेश ताब्यात घेतला. त्यांनी शेतीबाबत सुधारणांची घोषणा केली. जमीन लोकांना वाटून देण्यात आली. म्हणून त्यांना जनतेचा पाठिंबा मिळाला, जरी काही भाग चँग-कै-शेकच्या ताब्यात असला तरी बराचसा भाग कम्युनिस्ट पक्षाने बळकावला होता. इ.स.1949 पर्यंत बरीच शहरे त्यांच्या ताब्यात आलेली होती. 1 ऑक्टोबर 1949 मध्ये लोकमुक्ती सैन्याने पेकिंग (बिजींग)मध्ये प्रवेश केला. आणि बिजींगमध्येच चीनच्या लोकशाही प्रजासत्ताकाचा उदय झाला. माओ-त्से-तुंग हे राष्ट्राध्यक्ष बनले.

या क्रांतीनंतर सामूहिक शेतीचा अवलंब करण्यात आला. सर्वांना मोफत शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा यासारख्या मूलभूत सुविधा देण्यात आल्या. औद्योगिक विकास साधण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाला खूपच महत्व देण्यात आले. इ.स.1958 साली 'लीप फॉरवर्ड प्रकल्प' (विकासाची झेप) राबविण्यात आला. खाजगी मालमत्तेचे रूपांतर सामाजिक मालमत्तेत करण्यात आले. इ.स.1966 मध्ये 'सांस्कृतिक क्रांती (Cultural Revolution) ची चळवळ सुरू झाली. या चळवळीद्वारे हजारो चुका घडल्या. या चुका सुधारण्याकरिता इ.स.1979 मध्ये डेंग शिओपिंग सत्तेवर आला. त्यांने बऱ्याच सुधारणा केल्या. या पार्श्वभूमीवर चीनने भांडवलशाही उत्तमप्रकारे आत्मसात केली. आज कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली चीन हा एक जगातील प्रमुख देश म्हणून प्रगत झाला आहे.

© KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

शीतयुद्ध :

दुसऱ्या महायुद्धानंतर दोन जागतिक सत्ताधाऱ्यांमध्ये राजकीय, आर्थिक, लष्करी आणि इतर गोष्टीमध्ये सतत भीती, तिरस्कार, द्वेष आणि काळजीचे वातावरण निर्माण झाले त्यालाच 'शीतयुद्ध' म्हटले जाते. अमेरिकेच्या प्रभावाखालील भांडवलशाही राष्ट्रे आणि रशियाच्या प्रभावाखालील समाजवादी राष्ट्रे यांच्यातील अघोषित युद्ध म्हणजेच शीतयुद्ध होय. मानवी समस्यांचे निवारण करण्याचा उपाय कोणता-भांडवलशाही का समाजवाद? जरी या दोन विचारधारांमध्ये इ.स.1917 पासून मतभेद असले तरी ते लोकांसमोर उघडकीस आले ते दुसऱ्या महायुद्धानंतरच. 1989 मध्ये रशियाची समाजवादी व्यवस्था ढासळेपर्यंत शीतयुद्ध अत्यंत प्रबळ होते. या दोन गटाव्यतिरिक्त भारत, इजिप्त आणि इतर देशांच्या नेतृत्वाखाली अलिप्ततावादी (Non-aligned moment) चळवळ सुरू झाली. शीतयुद्धामुळेच दोन गटातील अण्वस्त्र स्पर्धा वाढली. या स्पर्धेमध्ये अमेरिका सरस ठरली. अमेरिका संपूर्ण जगातील अण्वस्त्र व्यापार करारावर सह्या करण्यासाठी पुढे सरसावली. अनेक राष्ट्रांना आपल्या गटात ठेवण्यासाठी लष्करी संघटना स्थापण्यात आल्या. 'उत्तर ॲट्लांटिक संरक्षण करार'-नॉर्थ ॲट्लांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन(NATO)', आग्नेय आशिया संरक्षण करार'-साउथ ईस्ट एशियन ट्रिटी ऑर्गनायझेशन(SEATO), मध्य पूर्व-उत्तर संरक्षण करार'-सेंट्रल ईस्ट नॉर्थ ट्रिटी ऑर्गनायझेशन (CENTO) इ. करार अमेरिकेच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.तर रशियाच्या नेतृत्वाखाली 'वॉर्सा करार'(Warsaw Pact) करण्यात आला. अमेरिकेतील प्रत्येक राज्यामध्ये अण्वस्त्र कारखाने उभे करण्यात आले. अण्वस्त्र स्पर्धाही मोठ्या प्रमाणात वाढली होती. याबरोबरच विविध देशांमध्ये लष्करी तळ स्थापन करणे, हेरगिरी आणि प्रचार, अंतराळयुद्धासारखी (Space war) वैज्ञानिक व तांत्रिक चढाओढ इ. गोष्टीपण वाढल्या होत्या.

संपूर्ण जग निरनिराळ्या प्रकारच्या अदृष्य युद्धात व काळजीत गुरफटलेले होते. शीतयुद्धामुळे अनेक भीतीदायक प्रसंग निर्माण झाले.-कोरियन युद्ध, व्हिएतनाम युद्ध 1956 ची सुएझ कालवा कोंडी, 1961 मधील बर्लिनचा आणिबाणीचा पेचप्रसंग आणि 1962 चा क्यूबाचा पेचप्रसंग हे त्यापैकी कांही होत. इ.स.1985 पर्यंत शीतयुद्ध अत्यंत तीव्र झाले आणि अमेरिकेने सर्वांना नामोहरम केले. जगातील नैसर्गिक संपत्तीवर ताबा मिळविण्यात अमेरिका यशस्वी झाली. आर्थिक अडचणी आणि अंतर्गत कलहामुळे रशिया त्रस्त झाला. शस्त्रास्त्रस्पर्धा एकतर्फी झाली आणि अमेरिका हे जगातील एकमेव शक्तीशाली राष्ट्र म्हणून ओळखले जावू लागले.

www.textbookpdf.in

अमेरिका या बलाढ्य राष्ट्राचा उदय

1927 च्या जागतिक मंदीमुळे अमेरिकेमध्ये अनेक राजकीय बदल घडून आले. पहिल्या महायुद्धात अमेरिकेने मित्रराष्ट्रांना आर्थिक व लष्करी सहाय्य केले आणि त्यांना विजय प्राप्त करण्याचे सामर्थ्य मिळवून दिले. इ.स.1929 मध्ये अमेरिकेतील आर्थिक विकास पूर्णपणे मंदावला. परिणामत: औद्योगिक व कृषी उत्पादन पूर्णपणे ढासळले. याशिवाय खाणकाम, जहाजबांधणी, मोटारगाड्या आणि घरगुती उपकरणे यासारख्या लोकोपयोगी वस्तूंचे उत्पादन तोट्यात आले. आर्थिक पेचप्रसंग हा राजकीय बदलाचा साक्षीदार होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान जपानने अमेरिकेचे नाविकतळ असलेल्या 'पर्ल हार्बरवर' हल्ला केला. परिणामत: अमेरिका मित्रराष्ट्रांच्या बाजूने लढण्यास जागतिक युद्धात खेचली गेली. रूझवेल्टनी सामान्य माणसांना लष्करी दले स्थापन करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी महिलांना सामाजिक क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. युद्धामध्ये अमेरिका विजयी झाली. दुसरे महायुद्ध सुरू असतांना देखील अमेरिका इतर देशांना संयुक्तराष्ट्रसंघाची स्थापना करण्यासाठी सहकार्य करीत होती. 1945 नंतर मात्र अमेरिका हे जगातील सर्वात शक्तीशाली राष्ट्र बनले. शीतयुद्धाच्या परिणामानंतर अमेरिका हे जगातील एकमेव शक्तीशाली राष्ट्र म्हणून ओळखले जावू लागले.

अभ्यास

I. गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा :

1. _____ यांनी रशियामध्ये साम्यवादी (Communist) सरकार स्थापन केले.
2. पहिले महायुद्ध _____ साली संपले.
3. _____ हा फॅसिस्ट हुकूमशहा होता.
4. दुसरे महायुद्ध _____ साली सुरू झाले.
5. जपानने अमेरिकेच्या _____ या नाविकतळावर हल्ला केला.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या :

1. 'रशियन राज्यक्रांतीमध्ये लेनिनची भूमिका' याबद्दल चर्चा करा.
2. पहिल्या महायुद्धाचे तत्कालिक कारण कोणते?

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. 'नाझी विचारधारेमुळे जर्मनीचा नाश झाला' या विधानाचे समर्थन करा.
4. दुसऱ्या महायुद्धाची कारणे कोणती?
5. शीतयुद्ध म्हणजे काय?
6. चीनच्या क्रांतीचे परिणाम कोणते?
7. अमेरिकेने आर्थिक मंदीवर कशी मात केली याचे वर्णन करा.

III. उपक्रम :

1. इंटरनेट व वर्तमानपत्रांच्या सहाय्याने भारताने इतर देशाबरोबर जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले याबद्दलची माहिती गोळा करून त्यावर एक निबंध लिहा.

IV. प्रकल्प :

1. जगातील विविध देशांच्या राष्ट्रध्वजांची चित्रे गोळा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

राज्यशात्र

प्रकरण - 4

जागतिक समस्या आणि भारताची भूमिका

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया

- **मानवी हक्कांची अवहेलना**
- **शस्त्रास्त्र स्पर्धा**
- **आर्थिक असमानता**

युद्धोत्तर काळात भारत हा साम्राज्यशाही व वसाहतवदाच्या ऱ्हासाचा साक्षीदार होता. जुन्या जगाच्या कुशीतून एका नवीन जगाचा उदय झाला. 1945 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जन्माने एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. परंतु आज देखील जग मानवी हक्कांची पायमल्ली, शस्त्रास्त्र स्पर्धा, आर्थिक असमानता, वर्णभेद, आणि दहशतवादासारख्या समस्यांच्या विळख्यात सापडलेले आहे. राष्ट्रकुटुंबाचा एक जबाबदार सदस्य या नात्याने भारत या जागतिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी प्रमुख भूमिका पार पाडत आहे.

मानवी हक्कांची अवहेलना

वर्षानुवर्षे मानवतावादी, मानवाचे जन्मजात हक्क अथवा मानवी हक्कांचे प्रतिपादन करत आले आहेत. पण, दुर्दैवाने जगातील बहुतेक भागामध्ये प्रदिर्घ कालावधीसाठी बऱ्याच लोकांना हेच मानवी हक्क नाकारले गेले आहेत. धर्म, वंश, लिंग, जात, वर्ण आणि राष्ट्रीयता यांच्या आधारावर मानवी हक्कांची अवहेलना व शोषण झालेले दिसून येते.

1776 चे अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध , 1789 ची फ्रेंच राज्यक्रांती, 20 व्या शतकाच्या पूर्वार्धातील भारत व इतर अनेक देशांचा स्वातंत्र्य लढा या सर्व घटनांनी मानवी हक्कांना पुष्टी दिली. मानवी हक्कांच्या अवहेलनाच्या विरोधात 10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेने (UNO) केलेली मानवी हक्कांची घोषणा हे एक महत्वाचे पाऊल ठरले. जगभरातील मानवाच्या हक्कांचा पाठपुरावा भारताने नेहमीच केला आहे. भारतीय घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश करुन भारताने या मुद्यावर अधिक भर देवून या संदर्भात महत्वाचे पात्र निभावले आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत देखील जगातील मानवाचे मूळ हक्क उचलून धरले. गुलामगिरीची पद्धत, माणसांची तस्करी, बालकामगार पद्धत, स्त्रियांचे शोषण यांच्यावर जागतिक मानवी हक्काच्या घोषणेनुसार

तुम्हाला माहित असू दे.

जगणे, स्वातंत्र्य, समानता व्यक्तीचा सन्मान या गोष्टी आंतरराष्ट्रीय मानवी हक्कात अंतर्भूत असून भारतीय घटनेमध्ये त्यांचा समावेश केला आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रतिबंध करण्यात आला आहे. ज्या देशांमध्ये लोकशाही पद्धत अस्तित्वात आहे त्या सर्व राष्ट्रांनी जगण्याचा व स्वातंत्र्याचा हक्क, संरक्षणाचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्य व शैक्षणिक स्वातंत्र्य इत्यादी हक्क घटनात्मक हक्क म्हणून आपल्या संविधानामध्ये सामाविष्ट केले आहेत. परंतु अजूनही निरंकुश हुकुमशाही किंवा एकपक्षीय राजवटीमध्ये शोषण व मानवी हक्कांची पायमल्ली होताना आढळून येते. वंशहत्या, सर्व प्रकारचे शोषण आणि सर्व प्रकारची दडपशाही यांना भारत विरोध करतो. संयुक्त राष्ट्रसंघटना आणि इतर जागतिक संरक्षणाच्या माध्यमातून भारत मानवी हक्कांच्या संरक्षणाचा आग्रहाने प्रयत्न करत आहे.

युनोने या हक्कांची अंमलबजावणी सुलभ व्हावी यासाठी 'मानवी हक्क जाहिरनामा' (Human Rights Declaration) ही मार्गदर्शिका सर्व देशांमध्ये पोचविली आहे. या मार्गदर्शिकेत 30 कलमे आहेत. उदा. माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व समानता हे हक्क प्राप्त आहेतच. त्यामध्ये गुलामगिरी तसेच स्त्रियांच्या शोषणाचे निर्मूलन करण्याचीही तरतूद आहे. सुरवातीपासूनच भारताने सार्वत्रिक मानवी हक्कांची घोषणा केली आहे. भारतीय सांविधानामध्ये तिसऱ्या भागात 12 ते 35 कलमांतर्गत मूलभूत हक्कांचा समावेश केला आहे. युनोच्या सर्वसाधारण सभांमधुनही भारताने मानवी हक्कांच्या अंमलबजावणीबाबत सकारात्मकपणे समर्थन केले आहे.

मानवी हक्कांच्या शोषणासंबंधी 1966 मध्ये युनोने एका सभेचे आयोजन करून प्रत्येक राष्ट्रांने मानवी हक्कांचे रक्षण केलेच पाहिजे असे निक्षून सांगितले. परिणामतः मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'मानवी हक्क आयोगाची' स्थापना झाली. भारतात याला पूरक अशा 'राष्ट्रीय मानव हक्क आयोग', 'महिला आयोग' 'राष्ट्रीय परिशिष्ट जाती आयोग', 'राष्ट्रीय परिशिष्ट जमाती आयोग', 'मागासवर्गीय आयोग' आणि 'अल्पसंख्यांकांचा आयोग' इ.ची स्थापना कर्नाटकातही झाली आहे.

शस्त्रास्त्र स्पर्धा

"अण्वस्त्रयुगामध्ये आपण युद्ध संपविले पाहिजे नाही तर युद्ध आम्हाला संपवून टाकेल." अशी एक प्रसिद्ध म्हण आहे. प्रचलित जगाचे शस्त्रास्त्र स्पर्धा हे एक अत्यंत गंभीर लक्षण आहे. पृथ्वीच्या अस्तित्वासाठी निःशस्त्रीकरण हे अत्यंत निकडीचे आहे. शस्त्रास्त्रांच्या तीव्र आणि जीवघेण्या स्पर्धेला रोखण्यासाठी निःशस्त्रीकरण हा एकमेव उपाय आहे.

निःशस्त्रीकरण म्हणजे शस्त्रास्त्र स्पर्धा रोखण्यासाठी ठराविक प्रमाणात किंवा संपूर्णपणे शस्त्रांस्त्रांची कपात, शस्त्रास्त्र स्पर्धा, जागतिक भय, अस्थिरता, तणाव किंवा प्रत्यक्ष युद्ध इत्यादी गोष्टींना कारणीभूत ठरते. या सगळ्या अनिष्ट गोष्टींना दूर ठेवण्यासाठी सध्या जगासमोर निःशस्त्रीकरण हा एकच पर्याय. वास्तविकरित्या शस्त्रास्त्र किंवा युद्धसामुग्री म्हणजे अनावश्यक

www.textbookpdf.in

आर्थिक व्यय किंवा नुकसानच आहे. या संदर्भात अमेरिकेचे अध्यक्ष असलेले आयसन होवर (Eisen Hower) यांनी म्हटले आहे, " जग फक्त शस्त्रास्त्रांवर खर्च करत नसून, कामगांरांचा घाम, शास्त्रज्ञांची विद्वता आणि बालकांच्या आशाआकांक्षा वाया घालवत आहे."

अणुयुगाच्या प्रारंभामुळे शस्त्रास्त्र नियंत्रण आणि निःशस्त्रीकरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एक शांतताप्रिय देश या नात्याने भारत निःशस्त्रीकरणावर अधिक जोर देत आहे. जगाच्या भविष्यातील संरक्षणाच्या दृष्टीकोनातून युद्ध टाळण्यासाठी गंभीर प्रयत्नांची गरज आहे. 1963 पासून अमेरिका (USA) व रशियाने (USSR) अनेक द्विपक्षीय करार केले आहेत. निर्णयात्मक शस्त्र नियंत्रण करार, (Strategic Arms Limitation Treaty – SALT) मर्यादित चाचणी बंदी करार(Partial Test Ban Treaty), समग्र चाचणी बंदी करार (Compherhensive Test Ban Treaty – CTBT), पुनरुत्पादन बंदी करार(Non-Proliferation Treaty) इत्यादी करारानुसार अण्वस्त्र स्पर्धा रोखण्यासाठी महत्वाची पाऊले उचलली आहेत. अशा प्रकारे भारतासह सर्व राष्ट्रांनी "परस्परांचा अटळ नाश" (Mutual Assured Destruction – MAD) रोखण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

आर्थिक असमानता

विश्व कुटुंबातील सदस्यामधील आर्थिक असमानता ही एक प्रमुख समस्या ठरत आहे. साम्राज्यशाही व वसाहत वादाच्या इतिहासामध्ये या आर्थिक असमानतेची व शोषणाची बीजे रोवली गेली. युरोपातील साम्राज्यवादी राष्ट्रांनी आफ्रिका, आशिया व लॅटीन अमेरिकेतील कांही देशात आपल्या वसाहती निर्माण केल्या. साम्राज्यशाहीच्या या धोरणामुळे वसाहतवादाला बळी पडलेली ही राष्ट्रे आर्थिकरित्या मागासलेलीच राहिली. 20 व्या शतकांच्या पूर्वार्धापर्यंत त्यांची प्रगती कुंठीत झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशेषता आफ्रिका व आशियातील राष्ट्रांनी आर्थिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, कृषी व्यवसाय, उद्योगधंदे, वाहतूक आणि दळणवळण, विज्ञान, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रामध्ये प्रगती साधण्यासाठी आर्थिक अडचणी समोर आल्या त्यामुळे या राष्ट्रांना विदेशी राष्ट्रांकडून आर्थिक मदतीची गरज भासू लागली.

1945 नंतर जग अमेरिका आणि कम्युनिस्टरशिया अशा दोन गटात विभागले गेले. त्यांनी मागासलेल्या राष्ट्रांना सहाय्य देण्यास सुरुवात केली. परंतु आर्थिकरित्या मागासलेल्या राष्ट्रांचे विकसित राष्ट्रांनी शोषण करुन स्वतःचा राष्ट्रीय स्वार्थ साधून घेतला.

या परिस्थितीत भारताने अलिप्ततावादी धोरण अवलंबिले. कोणत्याही अटीशिवाय विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना मदत करण्याच्या धोरणाचा भारताने पुरस्कार केला त्याचबरोबर आर्थिकरित्या मागास राष्ट्रांचा आत्मगौरव उचलून धरण्याचा प्रयत्न भारताने केला याच्या सोबत विकसित राष्ट्रांकडून अविकसित राष्ट्रांकडे भांडवलाचा पुरवठा व्हावा या दृष्टीने भारताने

www.textbookpdf.in

प्रयत्न केले. अशा रितीने अमेरिका व इतर राष्ट्रांकडून होणाऱ्या मागासलेल्या राष्ट्रांच्या शोषण व नववसाहतवादाला विरोध करणारे भारत हे प्रथम राष्ट्र आहे. 'तृतीय जग' ही संकल्पना मागास राष्ट्रें दर्शविते. ही राष्ट्रे आहार, भांडवल, तंत्रज्ञान, वैद्यकीय सुविधा, उच्च शिक्षण सुविधांचा अभाव इत्यादी समस्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहेत. याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरण, म्हणजे मुक्त व्यापारी धोरण, जीवघेणी व चुकीची स्पर्धा, जागतिकीकरण या सर्वांचा अनिष्ट परिणाम मागास राष्ट्रांवर होताना दिसून येतो. या मागासलेपणावर व आर्थिक विषमतेवर मात करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटना व पुढारलेल्या राष्ट्रांनी सकारात्मक प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. प्रगती पथावर असलेले राष्ट्र व विश्वकुटुंबाचा जबाबदार सदस्य या नात्याने भारत जगातील सर्व राष्ट्रांना आर्थिक समानता व न्याय मिळावा यासाठी प्रयत्नशील आहे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

1. मानवी हक्क दिवस _____ या दिवशी साजरा केला जातो.
2. भारताने निरंतरपणे _____ मानवी हक्कांचा पुनरुच्चार केला आहे.
3. आफ्रिकेतील वर्णभेदाच्या विरोधात _____ यांनी लढा दिला.
4. मानवी हक्क म्हणजे _____ रहित समानता.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

1. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगाला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले?
2. मानवी हक्कासंदर्भात भारताची भूमिका स्पष्ट करा.
3. 'शस्त्रास्त्र स्पर्धा जगाला विनाशाच्या खाईत लोटणार' या विधाना आधारे शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे होणारे परिणाम लिहा.
4. आर्थिकरित्या मागासलेल्या देशांची लक्षणे कोणती?
5. आर्थिक असमानता दूर करण्यासाठी भारताने कोणती पाउले उचलावयास हवीत?
6. 'वर्णभेद मानवतेच्या विरोधात आहे' स्पष्ट करा.

III. उपक्रम :

1. मानवी हक्क आयोगाबद्दल माहिती मिळवा.
2. गरीबांच्या कल्याणासाठी कर्नाटक सरकारने सुरु केलेल्या योजनांची यादी तयार करा.

IV. प्रकल्प

1. वर्णभेदाविरोधात कार्य केलेल्या व्यक्तींची चरित्रे वाचा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण-5

जागतिक संघटना

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करूया :

- **युनोची स्थापना**
- **युनोच्या शाखा**
- **युनोची कार्यालये**
- **युनोची उद्दिष्टये**
- **युनोची सफलता**

संयुक्त राष्ट्रसंघटना (United nations organisation)

स्थापना - 20 वे शतक दोन महायुद्धांचे साक्षीदार होते. पहिल्या महायुद्धानंतर शांती प्रस्थापित करण्याकरीता 'लीग ऑफ नेशन्सची' स्थापना झाली परंतु 1939 साली दुसरे महायुद्ध सुरु झाल्यामुळे ती अयशस्वी झाली. दुसरे महायुद्ध सुरु असतानाच अधिक प्रभावी जागतिक संघटना प्रस्थापित करण्यासाठी गंभीर प्रयत्न सुरु होते. इंग्लंडचे विंस्टन चर्चील, रशियाचे जोसेफ स्टॅलीन आणि अमेरिकेचे फ्रँकलीन-डी-रुझवेल्ट यासारख्या नेत्यांनी एकत्र येऊन नवीन जागतिक संघटना स्थापण्याचें ठरविले. 'युनायटेड नेशन्स' (संयुक्त राष्ट्रे) हे नांव अध्यक्ष फ्रँकलीन डी. रुझवेल्ट यांनी सुचविले. 1 जानेवारी 1942 रोजी 26 देशानी यावर स्वाक्षऱ्या केल्या आणि हे नांव प्रथम घोषित केले. 26 जून 1945 मधे सॅन फ्रॉन्सिको येथील अधिवेशनात संयुक्त राष्ट्रसंघाच्या 51 देशांच्या प्रतिनिधीनी यावर स्वाक्षऱ्या केल्या. याप्रमाणे 24 ऑक्टोबर 1945 रोजी 'संयुक्त राष्ट्रसंघ' ही जागतिक संघटना अस्तित्वात आली. सध्या संयुक्त राष्ट्रसंघामधे 195 सदस्य देश आहेत. त्याचे मुख्यालय न्यूयॉर्कमध्ये आहे. शांतताप्रिय सर्व राष्ट्रांना त्याचे सदस्यत्व खुले आहे.



संयुक्त राष्ट्रसंघटना

संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्टये आणि ध्येय

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूल दस्तऐवजामध्ये 111 कलमे असून ती 19 भागात विभागली आहेत. विश्वसंस्थेच्या प्रस्तावनेची सुरुवात, 'आम्ही युनोचे सदस्य....' अशी होते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

संयुक्त राष्ट्रसंघटनेची उद्दिष्टये पुढील प्रमाणे -

1. आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि शांती प्रस्थापित करणे
2. सर्व देशांमध्ये मैत्री अथवा सलोख्याचे संबंध निर्माण करणे.
3. मानवाच्या मूलभूत हक्काबाबत विश्वास निर्माण करणे.
4. सर्व देशांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे तसेच जागतिक समस्यावर तोडगा शोधून काढणे.
5. आंतरराष्ट्रीय वादविवादांना न्याय आणि सन्मान प्राप्त करुन देणे.
6. राष्ट्रां राष्ट्रा मध्ये हितसंबंध जपण्याचे केंद्र म्हणून कार्यरत रहाणे.

युनोच्या शाखा आणि त्यांचे कार्य -

युनोच्या मुख्य सहा शाखा आहेत. त्या पुढील प्रमाणे.

1. महासभा (जनरल असेंब्ली) 2. सुरक्षा समिती (Security council) 3. आर्थिक आणि सामाजिक मंडळ (Economic and Social Council) 4. विश्वस्त समिती (Trusteeship Council) 5. सचिवालय (The Secretariat) 6.आंतरराष्ट्रिय न्यायालय (International Court of Justice)



1) महासभा : संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्यांचा समावेश असणारे हे एक सर्वसाधारण मंडळ आहे. यामध्ये प्रत्येक देश आपले पाच प्रतिनिधी पाठवू शकतो. परंतु प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार असतो. सभेच्या प्रथम सत्रामध्ये एका वर्षाच्या कालावधीकरता एका अध्यक्षाची निवड केली जाते. तसेच सतरा उपाध्यक्षांची आणि सात समित्यांसाठी सात चेअरमनांची निवड केली जाते. सर्वसाधारणपणे सप्टेंबर महिन्यात या सभेचे अधिवेशन भरविण्यात येते ते डिसेबंर महिन्यापर्यंत चालते. सर्व निर्णयावर 2/3 इतक्या मतांची आवश्यकता असते. वार्षिक आराखडा तयार करुन त्याला संमती देण्याचे काम महासभेचे असते. कांही वेळा

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

महासभा तातडीची सभा घेउन महत्वाच्या विषयावर चर्चा करते. जगातील सर्वच समस्या सोडविण्यासाठी जागतिक संसद म्हणून महत्वाची भूमिका निभावते.

2. सुरक्षा समिती : ही संयुक्त राष्ट्रसंघटनेची अत्यंत महत्वाची शाखा होय. या मंडळात 15 सभासद असतात. त्यापैकी पाच राष्ट्रे अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रॉन्स आणि चीन हे कायमचे सभासद आहेत. तर इतर हंगामी सदस्य आहेत. या सभासदाची निवड महासभेकडून दोन वर्षासाठी केली जाते. हे वेग-वेगळया भौगोलिक प्रातांचे प्रतिनिधीत्व करतात. प्रत्येक सभासदाला एक मत असते. कोणताही निर्णय घेण्यासाठी सर्व कायमस्वरूपी सदस्यांचा पाठिंब्याची गरज असते. भारताला शाखेचे कायमचे सदस्यत्व मिळावे अशी अपेक्षा आहे.

आंतरराष्ट्रीय कलह शांततेच्या मार्गा ने सोडविणे हे सुरक्षा समितीचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. आवश्यकतनुसार आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि शांततेकरीता राष्ट्रसंघ सुरक्षा दलाला पाचारण करु शकते. आंतरराष्ट्रीय न्यायालाचा न्यायाधीश निवडणूकीत स्वतःची भूमिका निभावतो आणि सचीवाच्या निवडीची शिफारस करतो.

3. आर्थिक आणि सामाजिक समिती : या समितीमध्ये महासभेकडून निवडलेले 54 सदस्य असतात. यापैकी 18 सदस्य तीन वर्षाकरीता निवडले जातात. ही समिती सभासदांमधूनच एका अध्यक्षाची निवड करते. अलिकडेच सतरा सदस्य या समितीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. आर्थिक आणि सामाजिक समितीचे कार्य खालीलप्रमाणे -

I. आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आणि आरोग्यविषयक समस्या इ.चा. अभ्यास करुन त्याची नोंद ठेवणे, त्याचप्रमाणे निराश्रित स्त्रियांचा दर्जा, निवारा इ.सारख्या समस्या या समितीच्या अखत्यारीत येतात.

II. मानवी हक्काची आणि मूलभूत स्वातंत्र्यांची शिफारस करते.

III. मानवी संसाधन, संस्कृती, शिक्षण इत्यादिंच्या संवर्धनाकरीता आंतरराष्ट्रीय अधिवेशन भरवू शकते.

IV. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), अन्न आणि कृषि संघटना (FAO), जागतिक आरोग्य संघटना (WHO) इ. सारख्या विशेष शाखामध्ये समन्वय साधते.

4. विश्वस्त समिती : महासभेचा सहाय्यक म्हणून ही समिती प्रत्यक्ष काम पहाते. विश्वस्त प्रदेश आणि व्यवस्थापकीय राष्ट्रांची संख्या घटल्यामुळे ही समिती लहान झाली. स्वायत्त न झालेल्या प्रदेशांची देखभाल करणे हे या समितीचे उद्दिष्ट होय.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5. आंतरराष्ट्रीय न्यायालय : ही संयुक्त राष्ट्रसंघाची अत्यंत महत्वाची न्यायालयीन शाखा होय. युनोचे सर्व सदस्य या न्यायालयाचे सभासद असतात. नऊ वर्षाच्या कालावधीकरीता 15 न्यायाधिशांची निवड केली जाते आणि ते पुन्हा निवडणूक लढविण्यास पात्र असतात या न्यायालयाचे मुख्य पीठ (कार्यालय) नेदरलँड येथील हेग मध्ये आहे. त्याच्या अध्यक्षाची आणि उपाध्यक्षाची निवड तीन वर्षाकरीता केली जाते. बहुमताच्या आधारे सर्व निर्णय घेतले जातात. आंतरराष्ट्रीय तंटे सोडविण्याबरोबरच कायदेशीर प्रश्नावर सल्ले दिले जातात. कोणत्याही देशावर आपला न्यायनिवाडा ते लादू शकत नाहीत. या बंधनाव्यतिरिक्त या न्यायालयाने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा निर्माण करण्यासाठी स्वतःचे असे वेगळे योगदान दिले आहे.

6) सचिवालय : या समितीमध्ये संयुक्त - राष्ट्रसंघटनेचे सचिव आणि सर्व कर्मचारी यांचा समावेश असतो. सचिव हा मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी असून त्याची नेमणूक महासभेद्वारा केली जाते. सुरक्षा समितीच्या शिफारसीवरुन त्याची मुदत पाच वर्षे असते. युनोचा सरचिटणीस न्यूयार्क येथील मुख्यालयात कार्यरत असतो. याच्या शाखा जिनेव्हा, व्हियन्ना आणि नैरोबी येथे आहेत. दैनंदिन व्यवस्थापन नियोजन आणि संघटना या बाबी याच्या अखत्यारीत येतात.

युनोचे सचीव : तुम्हास हे माहित आहे.

1) ट्रायरवे लाय - (1946 ते 1952) नॉर्वे
2) डॅग हॅमरर्स्क सील्ड - (1953 ते 1961) स्वीडन
3) यू. थॅन्ट - (1961 ते 1971) बर्मा
4) कर्ट व्हाल्डेम - (1972 ते 1981) ऑस्ट्रिया
5) जेव्हियर परेज डे कूयेल्लार- (1982 ते 1991) पेरु
6) बाउट्रस घाली - (1992 ते 1996) इजिप्त
7) कोफी-ऐ -अन्नान - (1997 ते 2006) घाना
8) बॅन-केमून - (2007 ते 2017) कोरिया
9) अँटोनियो गटेरस - (2017) पोर्तुगाल

युनोची सफलता :

1 . शांती प्रस्थापित करण्याच्या मोहिमा : संयुक्त राष्ट्र संघाला मोठ्या प्रमाणात राजकीय तंटे मिटवावे लागतात. त्यामुळे गुंतागुंतीची जागतिक परिस्थिती आणि सुरक्षा समितीच्या

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

कायमच्या सदस्यांमधील दुबळया संबंधामुळे युनोला मिश्र स्वरुपाचे यश मिळाले आहे. निरीक्षण दलाकडून युद्धबंदीने अथवा लष्कराला पाचारण करुन राष्ट्रसंघ कारवाया करते. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी युनोला पाठिंबा देत आला आहे.

सुऐझ कालवा इराण इंडोनेशिया, ग्रीस, काश्मीर, पॅलेस्टाईन, कोरीया, हंगेरी, कांशो, सायप्रस, अरब, इस्त्राइल, नामिबिया, अफगाणिस्तान इ सारख्या देशातील तंटे युनोकडून सोडविले गेले आहेत. अण्वस्त्र आणि शस्त्रास्त्रे यांचे निर्मुलन करण्यासाठी युनोने गंभीर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला आहे. शीतयुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी युनोने अत्यंत महत्वाची भूमिका निभावली आहे.

2. आर्थिक आणि वित्तीय सफलता : युनोची प्रस्तावना असे नमूद करते की समाजिक प्रगती आणि उच्च राहणीमान. हे कार्य आर्थिक आणि सामाजिक समितीच्या देखरेखीखाली केले जाते.G.A.T.T (General Agreement on trariff trade) या करारानुसार युनोने आर्थिक आणि वित्तिय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन दिले आहे. U.N.D.P (United nations development programme) या अंतर्गत येणारे कार्यक्रम नोंद ठेवण्या जोगे आहेत. IBRD, IMF युनोच्या विशेष संस्थाकडून विविध आर्थिक योजना राबविल्या जातात आणि आर्थिक सहाय्य दिले जाते.

3. सामाजिकसफलता: अनेकशैक्षणिक, आरोग्यविषयक, महिला आणि बालकल्याण योजना युनोद्वारे चालविल्या जातात. याकरीता WHO (World Health Organisation) UNESCO (United Nations Educational and Cultural organisation) UNICEF (United nations International Children Emergency Fund) UNHCR (United Nations high commission to refugees) इ संस्था कार्यरत आहेत. जागतिक मानवी हक्कांची घोषणा (The universal declaration of human rights 1948) ही एक 1948 मधील युनोची अत्यंत महत्वाची सफलता होऊ शकते. वर्णभेदाचे निर्मुलन म्हणजेच वंशभेद वसाहतवाद, साम्राज्यवाद इ. निर्मुलन करण्यामधे युनोचा अत्यंत मोठा वाटा आहे.

तुम्हाला हे माहित असू द्या.
संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयीन भाषा-चीनी, इंग्लिश, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश आणि अरेबिक.

युनोची इतर कार्यालये :

a) अन्न आणि कृषिविषयक संघटना (FAO) जगातील दारिद्रय, कुपोषण आणि उपासमारी या सारख्या अनावस्थांवर मात करण्यासाठी 1945 ला या संस्थेची स्थापना झाली यांच्या मुख्य शाखा a) अधिवेशन b) समिती c) संचालक. त्याची उद्दिष्टये शेतीचा विकास

www.textbookpdf.in

करणे, सकस आहाराची सोय करणे, उपासमारी पासून बचाव करणे, ग्रामीणजनतेच्या राहणी मानात बदल करणे, याचे मुख्यालय रोम येथे आहे.

b) जागतीक आरोग्य संघटना WHO : अखिल मानव जातीचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी 1948 मध्ये या संस्थेची स्थापना झाली. जगभरातील कॉलरा, प्लेग, मलेरिया, देवी यासारख्या सांसर्गिक रोगांचे उच्चाटन करणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे जगातील एड्स, कॅन्सर यासारख्या महाभंयकर रोगांच्या उच्चाटनाकरीता ही संस्था युद्धपातळीवर काम करत आहे. ही संस्था जगातून देवी रोगाचे निर्मूलन करण्यात यशस्वी झाली आहे. लोकसंख्या विस्फोट, परिसर सुरक्षा, उपासमार आणि कुपोषण यासारख्या समस्यांवर उपाययोजना करणे हे या संघटनेचे महत्वाचे काम होय. या सर्व क्षेत्रात या संस्थेचे योगदान लक्षणीय आहे. याचे मुख्यालय स्वित्झर्लंड मधील जिनेव्हा येथे आहे.

कृती : युनेस्कोने शोधून काढलेल्या कर्नाटकातील ऐतिहासीक स्मारकांची यादी करा.

c) संघटीत राष्ट्रांची युद्धपातळीवरील शैक्षणिक, वैज्ञानिक, आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO): ('जशा युद्धाच्या कल्पना मानवी मनात निर्माण होतात तशाच शांतीच्या कल्पनाही मानवी मनातच निर्माण होतात' - युनेस्कोची प्रस्तावना) या संस्थेची स्थापना 1946 मध्ये झाली आणि याचे मुख्यालय पॅरीस येथे आहे. ही एक युनोची अत्यंत महत्वाची शाखाअसून राष्ट्राराष्ट्रातील शैक्षणिक सुधारणा, सांस्कृतिक सुधारणा वैज्ञानिक आणि तांत्रिक सुधारणा करणे हे याचे प्रमुख कार्य आहे. त्याची आणखी काही उद्दीष्ट्ये तांत्रिक शिक्षण, माहिती आणि तंत्रज्ञान, सृजनशीलता, सांस्कृतिक आणि परिसर अभ्यास व विकास घडविणे जगातील सरकारी आणि खाजगी संस्थाना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या ज्ञानाचा विकास घडविणे हे युनेस्कोचे अत्यंत महत्वाचे काम आहे.

d) युनिसेफ (UNICEF) : संघटीत राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय बालकाचा आपत्कालीन निधी 1946 मध्ये विशेष करुन दुसऱ्या महायुद्धानंतर स्थलांतरित झालेल्या बालकांना मदत करण्यासाठी या विशेष संघटनेची स्थापना झाली. 1957 ला या संघटनेचे स्थान निश्चित झाले. या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे महिला आणि बालकाच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करुन देणे. यामध्ये 30 सदस्य असतात. जगभरातील सर्व गरजू लोकांना ही संस्था सहाय्य करते. आपले उद्धिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. 1965 मध्ये युनिसेफ ला नोबल पारितोषक मिळाले. युनिसेफच्या भेटकार्ड निधितून जमा झालेल्या पैशांचा विनियोग मुलांच्या कल्यांणाकरीता केला जातो. याप्रमाणे ही एक अत्यंत प्रसिद्ध अशी मानवतावादी संघटना आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

e) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी - IMF : या जागतिक वित्तसंस्थेची स्थापना 1945 साली झाली. परंतु प्रत्यक्ष कार्याची सुरवात मात्र 1947 मधे झाली यांचे मुख्यालय वॉशिंग्टन यथे आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक समस्या सोडविणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. जागतिक व्यापार, आर्थिक स्थायी चलनाचा समतोल राखणे यासाठी ही संस्था कार्यरत, आहे. या संस्थेमध्ये राज्यपालांचे मंडळ, कार्यकारी संचालक आणि व्यवस्थापकीय संचालक यांचा समावेश असतो पारदर्शकता आणि उत्तम क्षमता असल्यामूळे IMF च्या कारभाराचे संपूर्ण जगभरातून कौतुक केलेजाते. विविध देशातील 'केंद्रिय बँकांची केंद्रिय बँक' असे या संस्थेला संबोधले जाते. सर्व राष्ट्रामध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार निर्माण करुन गरीब आणि श्रीमंत देशातील आर्थिक व्यवहारामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी ही संस्था विशेष प्रयत्न करते.

f) पुनर्बांधणी व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक -IBRD : ही जागतिक बँक म्हणून ओळखली जाते आणि हिची स्थापना 1947 ला झाली. हिचे मुख्यालय वॉशिग्टंन येथे आहे. दुसऱ्या महायुद्धात ज्या देशांचे नुकसान झाले त्यांच्या पुर्नवसनासाठी प्रामुख्याने या बँकेची स्थापना झाली. ही बँक सर्व सभासद राज्यांना कृषि, औद्योगिक, वाहतूक आणि दळणवळण इ. च्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करते. जागतिक व्यापाराम ध्ये समतोलत्व आणणे यासाठी सुद्धा ही विशेष सहाय्य देते. सर्व विकसनशील देशांसाठी जागतिक बँक किंवा IBRD अत्यंत उपयुक्त अर्थसहाय्य देत आहे. यामध्ये राज्यपालांचे मंडळ, कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष यांचा समावेश असतो. IBRD च्या दोन उपशाखा आहेत. a) आंतरराष्ट्रीय विकास संघटना b) आंतराराष्ट्रीय वित्तिय निगम.

g) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना - ILO : जगातील कामगार वर्गाचे हित जपण्याकरीता या संघटनेची स्थापना करण्यात आली याचे मुख्यालय स्वित्झर्लंड मधील जिनेव्हा येथे आहे व्यवस्थापकीय समितीकरीता प्रत्येक सदस्य राष्ट्र दोन प्रतिनिधी पाठविते. त्यापैकी एक कामगारवर्गातून आणि दुसरा व्यवस्थापन वर्गातून. कामगारांना सामाजिक सुरक्षा प्राप्त करुन देणे, त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, त्याच्या आरोग्याची काळजी घेणे इ. गोष्टी या संघटनेच्या अखत्यारीत येतात. मजूरस्त्रियांना प्रसूतीकाळातील फायदा देणे. कामगारवर्गाला त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला देणे, निवारा, सकस आहार यासारख्या इतर सुविधा ही संघटना देते. हे सर्व निर्णय सल्ल्यांच्या स्वरुपात असूनही सर्व सदस्य राष्ट्रे त्यांचा सन्मान करतात. या संस्थेद्वारे होणाऱ्या अधिवेशनांमधून कामगारवर्गाचे राहाणीमान व दर्जा उंचावण्याचे कार्य अत्यंत प्रभावीपणे सुरु आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

h) युनोची व्यापार उद्योग विकास योजना : ही जागतिक संस्था आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाणिज्य विकासाशी संबधित आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सुरळितपणा आणण्यासाठी तांत्रीक सहाय्य पुरविते, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या योजनामधील अडचणी दूर करण्यास मदत करते अशारीतीने राष्ट्र कुटूंबाचा आर्थिक विकास करणे हा या संस्थेचा मुख्य हेतू आहे.

i) जागतिक व्यापार संघटना (WTO): जागतिक व्यापार संघटना या आणखी एका संघटनेची स्थापना 1 जानेवारी 1995 रोजी झाली. सर्व सदस्य राष्ट्रांनी गॅट (जनरल ॲग्रीमेंट ऑफ ट्रेड अँन्ड टॅरीफ) या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राशी संबंधित समस्याचे निराकरण करणे हा या संस्थेचा मुख्य हेतू आहे. जागतिक बँकेला सहाय्य करून आर्थिक योजनांना आकार देणे हे ही या संस्थेचे कार्य आहे. मुक्त व्यापार योजनेमुळे विकसनशील देशांना तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि पुर्नबांधणी आणि सुधारणेसाठी आंतरराष्ट्रीय बँक याबरोबरच जागतिक व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राचा तृतीय आधारस्तंभ म्हणून या संघटनेला ओळखले जाते.

प्रादेशिक सहकार : सदस्य राष्ट्रांमध्ये सामंजस्य आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी अनेक प्रादेशिक संघटना आजकाल कार्यरत आहेत त्यापैकी कांही मुख्य संघटना खालीलप्रमाणे आहेत.

1) राष्ट्रकुल संघ (कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स): सुरवातीला याला ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स असे म्हटले जात असे. पण काही काळानंतर ब्रिटिश हा शब्द त्यातून काढून टाकण्यात आला याची स्थापना 1926 ला झाली ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असणारी भारतासह बहुतांश राष्ट्रे या संघटनेमध्ये स्वेच्छेने सामील झाली. याचे नेतृत्व ब्रिटिशांकडे होते. सध्या यामध्ये 54 सदस्य राष्ट्रे असून लंडन येथे त्याचे मुख्यालय आहे. या संघटनेच्या सभांना पंतप्रधान, वित्त आणि परराष्ट्र मंत्री उपस्थित राहतात. लोकशाहीचे समर्थन करणे, स्वायत्तता मिळवून देणे, दारिद्रय निर्मूलनास सहाय्य करणे, जागतिक शांतता प्रस्थापित करणे, क्रिडा, विज्ञान आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये प्रगती घडवून आणणे ही या संघटनेची महत्वाची उद्दिष्ट्ये आहेत. सदस्य राष्ट्रांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण करण्यास ही संघटना मदत करते.

2) सार्क - (दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार संस्था) : ही संघटना 1985 साली अस्तित्वात आली. यामध्ये भारत, बांगला देश, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीवज, नेपाळ, भूतान आणि अफगाणिस्तान ही राष्ट्रे या संघटनेचे सदस्य आहेत. या सर्व सदस्य राष्ट्रांचे कल्याण करणे यासाठी ही संघटना मुख्यत कार्यरत आहे. याची प्रमुख उद्दिष्ट्ये-आर्थिक

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

विकासाला पुष्टी देणे, सामंजस्याने सांस्कृतिक आणि सामाजिक विकास घडवून आणणे ही होत. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अनेक तांत्रीक, तात्कालीक आणि कृतीशील समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. परस्पर सामंजस्याचा अभाव आणि सदस्य राष्ट्रामधील आपापसातील कलह यामुळे या संस्थेची म्हणावी तशी प्रगती होवू शकली नाही. सर्वाधिकाराचा नियम म्हणजेच सर्व राष्ट्रांनी मिळून निर्णय घेण्याच्या पद्धतीमुळे सार्क संघटना दुबळी झाली आहे ती सदस्य राष्ट्रांमधील भांडणे मिटवू शकत नाही तरीसुद्धा ठरावीक सत्रांमधे घेण्यात येणाऱ्या सभेद्वारे नेत्यांना फलदायी चर्चा करण्याची संधी लाभते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि शेती इ. क्षेत्रामधे विकास घडवून आणण्यासाठी अनेक चर्चासत्रे, कार्यशाला आणि प्रशिक्षण कार्यक्रम ाचे आयोजन सदस्य राष्ट्रांच्या समन्वयाने भरविले जाते. सार्कच्या कार्यक्षेत्रात भारत महत्वाची भूमिका बजावत आहे. त्याचे मुख्यालय नेपाळ मधील काठमांडू येथे आहे.

3) युरोपियन समुदाय (Europeon Union) : युरोपियन समुदाय हा 27 युरोपियन देशांचा समूह आहे. युरोपियन समुदायाच्या तहाद्वारे मॉस्ट्रिच येथे 1992 मध्ये याची स्थापना झाली. सर्वांसाठी एकच बाजारपेठ, एकच चलन, एकच कृषि आणि व्यापारी धोरण अंमलात आणणे हे याचे प्रमुख कार्य आहे. या समुदायाच्या अत्यंत महत्वाच्या संस्था - I) समिती II) आयोग III) युरोपियन संसद IV) युरोपियन न्यायालय याचे कार्य संयुक्त राज्याप्रमाणे चालते. युरोपियन समुदायाचे पाठीराखे अशी कबूली देतात की हे एक शांती आणि लोकशाही प्रदान करणारी दल आहे. युरोपियन समुदाय हा युरोपियन आर्थिक समुदायाचा यशोदाता आहे. युरोपियन समुदायांने त्याच्या सदस्यांना मानद सार्वभौमत्व प्रदान केले आहे.

4) दक्षिण पूर्व आशियायी देशांची संघटना (Association of South East Asain Nations) : ही संघटना 1967 मध्ये अस्तित्वात आली. सिंगापूर, मलेशिया इंडोनेशिया, फिलीपाइन्स आणि थायलंड हे याचे मूळ सभासद होत. सध्या या संघटनेमध्ये दहा राष्ट्रांचा समावेश आहे. या संघटनेची मुख्य उद्दिष्ट्ये - I) आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी प्रादेशिक स्तरावर सहाय्य करणे II) आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक, तांत्रीक, वैज्ञानिक व्यवस्थापकीय क्षेत्रामध्ये सक्रीय सहकार्याची भावना निर्माण करुन परस्परांना सहाय्य करणे.

आशियन ही संस्था लष्करी नाही. भारताला या संस्थेच्या ध्येय आणि उद्दिष्टांबद्दल सहानुभूती असुनही तो यामधे सामील झाला नाही. जागतिक लोकसंख्येपैकी 9% लोक या संस्थेचे सभासद आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5) आफ्रिकन एकीकरणांची संघटना (OAU) : या संघटनेची स्थापना 1963 ला झाली सुरवातीला आफ्रिकेतील स्वतंत्र राष्ट्रे मोठ्या प्रमाणात अनेक प्रादेशिक संघटनांशी संबधीत होती. तदनंतर आफ्रिकन राष्ट्रे एकत्र येउन त्यांनी या संघटनेची स्थापना केली. ही संघटना सर्व स्वतंत्र आफ्रिकन राष्ट्रांना ध्येयपूर्तीच्या तत्वांना पाठिंबा देते. आफ्रिकन राष्ट्राच्या स्वातंत्र्य, समानता, न्याय, खंबीरपणा इ. बाबीना ही संघटना पुष्टी देते. संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी मिळून एक ध्येय ठरविले आहे. 'नूतन वसाहतवादाविरुद्ध सर्वजण सर्वप्रकारे लढण्यास कटिबद्ध आहेत' हे मान्य करण्याची इच्छा असणाऱ्या आफ्रिकेतील सर्व स्वतंत्र आणि स्वायत्त राष्ट्राना याचे सभासदत्व खुले आहे.

या संघटनेमध्ये पुढील गोष्टीचा समावेश आहे -1.सदस्य राष्ट्रांचे प्रमुख आणि तेथील सरकारी प्रमुख व्यक्तिंची सभा 2. मंत्र्याची समिती 3. सचिवालय 4. चिंतन आणि समुपदेशनाचा आयोग, वसाहतवाद,वर्णभेद आणि साम्राज्यवाद इ. च्या विरोधात या संस्थेने अत्यंत महत्वाची भूमिका निभावली आहे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1) संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना _____ मध्ये झाली
2) संयुक्त राष्ट्रसंघटनेचे मुख्यालय _____ या शहरात आहे.
3) मंत्रीमंडळाशी जुळणारी संयुक्त राष्ट्रसंघाची शाखा _____ येथे आहे.
4) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिशांचा कार्यकाल _____ वर्षे असतो.
5) आंतरराष्ट्रीय न्यायालय _____ येथे आहे.
6) संयुक्त राष्ट्रसंघाचे सध्याचे सचिव _____ हे आहेत.
7) जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना _____ या वर्षी झाली.
8) सार्कची स्थापना _____ या वर्षी झाली.

II. समूहात चर्चा करुन खालील प्रश्नाची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यास कोण जबाबदार होते?
2) संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाखा कोणत्या?
3) सुरक्षा समितीचे कायमचे सभासद कोण आहेत?

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4) जागतिक आरोग्य संघटनेची उद्दिष्टये कोणती ?

5) आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या कार्याची यादी करा.

6) सार्कचे विस्तृत रुप लिहा.

III. समूहामध्ये चर्चा करुन खालील प्रश्नांची सहा ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

1) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांची यादी करा.

2) महासभेच्या रचनेबद्दल सविस्तर लिहा.

3) आर्थिक आणि सामाजिक समितीचे कार्य कोणते ?

4) जागतिक शांतता प्रस्थापित करण्यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका स्पष्ट करा.

5) युनेस्कोचे कार्य कोणते ?

6) जागतिक आर्थिक समस्या सोडविण्यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची (IMF) भूमिका स्पष्ट करा.

7) राष्ट्रकूल संघाच्या उद्दिष्टांची यादी करा.

8) युरोपियन समुदायाचे वर्णन करा.

IV. उपक्रम

1) युनेस्कोअंतर्गत येणाऱ्या कर्नाटकातील ऐतिहासिक स्मारकांची चित्रे गोळा करा. World Heritage Centres.

V. प्रकल्प :

1) वृत्तपत्राद्वारे माहिती घेउन शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य युनो कसे करते हे समजून घ्या.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

समाजशास्त्र

प्रकरण - 3

सामाजिक चळवळी

या पाठात आपण खालील गोष्टी जाणून घेवू

- **सामाजिक चळवळींचा अर्थ, स्वरूप, प्रारंभ आणि विकास**
- **परिसर चळवळी**
- **मद्य-प्रतिबंधक चळवळी**
- **कामगार चळवळी**
- **महिला चळवळी**
- **कृषी चळवळी**
- **अस्पृश्यता निर्मूलन चळवळी**

सामाजिक चळवळी - अर्थ व स्वरूप

सामाजिक चळवळ म्हणजे मानवी समाजातील बदल, चलन आणि रूपांतराशी संबंधित एक व्यवस्थित, नियोजनबद्ध, स्वाभाविक प्रतिकाराची सामाजिक प्रतिक्रिया होय. व्यवस्थित म्हणजे प्रत्येक चळवळीमागे एखादा उद्देश (लक्ष्य), नियोजन आणि कार्यक्रम असतो. स्वाभाविक म्हणजे समाजामध्ये अथवा मानवी विकासाच्या विविध टप्यात अशा चळवळी निरंतरपणे घडत आलेल्या आहेत, घडत होत्या व पुढेही घडत राहतील. कोणताही सामान्य जीव स्वतःच्या अस्तित्वाला धक्का पोहचल्यावर त्याविरुद्ध स्वाभाविकपणे प्रतिकार करतो. मनुष्यप्राणी आणि समाज या प्रक्रियेचाच एक भाग आहेत. या प्रतिकारालाच आपण 'प्रतिक्रिया' असे संबोधतो. मानवी समाजात घडत असलेल्या व घडलेल्या शोषणाविरुद्ध वैयक्तिक स्तरावर केल्या जाणाऱ्या विरोधाला सामाजिक चळवळ म्हणत नाहीत. कारण सामाजिक चळवळ म्हणजे लोकांनी सामुहिकपणे केलली प्रतिक्रिया होय.

मानवी समाजाच्या विशिष्ट सामुदायिक क्रियांमध्ये चळवळींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. यालाच मराठीत आंदोलन, प्रतिघटना, अभियान, हरताळ, क्रांती, संघर्ष इ. विविध नावाने संबोधले जाते. शैक्षणिक स्तरावर इंग्लीशमधील Movement (मुव्हमेंट) हा शब्द वापरतात.

सामाजिक चळवळ हे जनसमुदायाच्या मागण्या आणि विचार व्यक्त करण्यासाठी उपलब्ध असणारे एक व्यासपीठ होय. जे लोक या सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होतात त्यांना अनेक अनपेक्षित बदल, नवे अनुभव आणि समाजिक रितींमध्ये सुधारणा आढळून

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

येतात. उदा. महात्मा गांधीना सुरवातीला असे वाटे की ''परमेश्वर हेच सत्य' परंतू जेंव्हा त्यांचा संबंध डॉ. आंबेडकर आणि इतर कांही नेत्यांशी आला तेंव्हा त्यांनी आपले विधान बदलून 'सत्य हेच परमेश्वर' असे केले. चळवळींमूळे संबंध आलेल्या विविध व्यक्तींमूळे गांधीजींच्या जीवनावर हा परिणाम झाला. म्हणूनच प्रत्येक सामाजिक चळवळ समाजामध्ये बदल घडवून आणून एक आदर्श निर्माण करते.

19 व्या शतकापूर्वी पर्यावरणीय साधने ही सार्वजनिक मालमत्ता होती परंतू औद्योगिकीकरण, सरकारी व खाजगी कंपन्यांचा उदय झाल्यानंतर या सर्वांनी या साधनांवर स्वतःचा हक्क सांगण्यास सुरवात केली. या गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कांही कायदेशीर उपाय योजण्यात आले. नैसर्गिक इंधन वापरावर बंदी घालण्यात आली. कृषी चळवळी, महिला चळवळी आणि इतर सामाजिक चळवळी या पार्श्वभूमीवरच आधारित असत.

सामाजिक चळवळी सतत आणि सर्व ठिकाणी घडलेल्या आहेत. कांही चळवळींमुळे कायमस्वरूपी सामाजिक बदल घडून आले आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळ हे याचे एक उत्तम उदाहरण आहे. कांही चळवळी कायमस्वरूपी परिणाम घडवून आणण्यात असफल झाल्या आहेत. भारताच्या इतिहासात अनेक चळवळी घडल्या त्यापैकी भक्ती चळवळीमूळे समाजावर फार मोठा परिणाम झाला बुद्ध, महावीर, बसव, आंबेडकर यासाख्या महात्म्यांनी जातीयवादाविरुद्ध चळवळी करुन प्रचंड बदल घडवून आणला. यामुळे खालच्या वर्गाला वरच्या वर्गाकडे जाण्याची संधी मिळाली.

चळवळींचा प्रारंभ व विकास

आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला अनेक छोट्या छोट्या संघर्षांना सामोरे जावे लागते. त्यापैकी कांही आपोआप उद्भवतात आणि नंतर संपून जातात. असे संघर्ष तात्पुरती किंवा क्षणीक गमनशीलता निर्माण करतात. असे छोटे छोटे संघर्षच मोठ्या चळवळींची नांदी ठरतात. यापुढची पायरी म्हणजे जमाव. मोठा जमाव एकत्र येतो आणि दंगल घडवून आणतो, बऱ्याचदा कांहीही कारण नसतांना दंगल सुरु होते.

जमाव - अर्थ

कोणतेही पूर्वनियोजन किंवा सामान्य इच्छा, रस नसतांनादेखील लोक एकत्र येतात याला जमाव म्हणतात. एका विशिष्ट कारणाला प्रतिसाद देण्यासाठी जमलेल्या लोकांच्या समूहाला पण 'जमाव' म्हणतात. उदा. चित्रपटगृहाजवळ तिकीट घेण्यासाठी जमलेले लोक,

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

रस्त्यावर चाललेला डोंबाऱ्याचा खेळ पाहण्यासाठी जमलेली लोकांची गर्दी, अपघातस्थळी जम लेला जनसमुदाय इ.

तात्पुरत्या काळासाठी एकत्र जमलेले लोक म्हणजे जमाव. जमावात लोक एका विशिष्ट ठिकाणी एकत्र येतात. परस्पर भावना, क्रिया, मत यांचा जमावातील सदस्यांवर सहज प्रभाव पडतो जमावात अभिप्राय किंवा दबल्या गेलेल्या भावनांचे प्रदर्शन होत असते. कांहीवेळा याच भावनांचा उद्रेक होवून त्याला हिंसक वळणसुद्धा लागू शकते.

जमावाच्या हिंसक कृती

'हिंसक कृती' हे जमावाच्या वर्तणुकीचे आणखी एक अस्त्र आहे. जेंव्हा जमावाची वर्तणूक तीव्र होते तेंव्हा त्याला 'हिंसक कृती' असे म्हणतात. या हिंसक कृती करतांना जमावामध्ये एकी नसते. समाजविरोधी घटक जमावाला सार्वजनिक संपत्तीची तोडफोड करून हिंसाचार घडवून आणण्यास प्रवृत्त करतात. सुरवातीला गोंधळ निर्माण करतात. त्या गोंधळातूनच हिंसाचार भडकतो. बऱ्याचदा जमावाच्या या हिंसाचारामध्ये कांही निष्पाप व निरपराध लोकांचे प्राणही जातात.

जमावाच्या या हिंसक कृतीला कसलेही निश्चित कारण नसते. या हिंसक कृती कायदा व सुव्यवस्था बिघडवतात. जातीय दंगली, वर्णीय दंगली, राजकीय दंगली इ. जमावाद्वारे घडणाऱ्या हिंसक कृतींची उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या दंगली आता ग्रामीण भागातही घडत आहेत. जात, जमीनजुमला, धर्म इ. गोष्टी हिंसक दंगलीनां चेतावणी देतात. जमावाच्या या हिंसक कृती समाजविरोधी असतात.

या हिंसक कृती दीर्घकालीन नसतात. एखाद्या मुद्यावर चर्चा होवून थोडक्यात त्यांचा शेवट होतो. पोलिस, लष्कर व आणखी कांही संस्थांच्या सहाय्याने या हिंसक कृतींवर नियंत्रण ठेवले जाते.

पर्यावरणविषयक (परिसर) चळवळी

या चळवळी शास्त्रीय असुन सजीव सृष्टीचे संवर्धन करणे हे यांचे उद्दिष्ट असते. भूमी, हवा, पाणी इ. गोष्टींचे प्रदूषण रोखणे हे ही या शास्त्रीय चळवळींचे ध्येय असते. या प्रदूषणांचे परिणाम त्वरीत दिसून येत नाहीत. वर्षानुवर्षे निसर्गाद्वारे व आदिवासी लोकांद्वारे होणाऱ्या शोषणाचा तो परिणाम असतो. उदा 1930 चा झारखंड मुक्ती मोर्चा. परंतू या संघटनेच्या स्थापनेपूर्वी कितीतरी वर्षे झारखंडचे आदिवासी लोक औद्योगिक कंपन्यांना विरोध करीतच होते. खाणींच्या उत्खननामुळे हजारो आदिवासींना स्थानभ्रष्ट व्हावे लागले. झारखंड मुक्ती मोर्चा ही अशाच चळवळीचा एक परिणाम आहे.

www.textbookpdf.in

यानंततर 1978 - 79 मध्ये जागतिक बँकेच्या सहाय्याने जंगलतोडीविरुद्ध आणखी एक चळवळ सुरु झाली. तिला 'जंगल हटाव चळवळ' असे म्हणतात. जागतिक तापमानवाढ, पाण्याच्या स्त्रोतांचे शोषण इत्यादि विरोधी सर्व चळवळी पर्यावरणीय चळवळीमध्ये मोडतात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी अनेक विद्वान लोक व संस्था सामान्य लोकांमध्ये मिसळून चळवळीमध्ये सहभागी होतात. आता आपण अशाच कांही पर्यावरणीय चळवळींचा आढावा घेवू.

हे तुम्हाला माहित असू दे :
झारखंड मुक्ती मोर्चाची सुरुवात पर्यावरण विषयक चळवळ म्हणून झाली परंतु नंतर त्याचे राजकीय चळवळीत रूपांतर झाले.

चिपको चळवळ

उत्तर प्रदेश सरकारने तेहरी-गढवाल प्रदेशात देवदार (ash-tree) 2500 वृक्ष कापण्याची परवानगी दिली. तेथील लोकांना कळून आले की वृक्षतोडी बरोबर पर्यावरणाचा देखील नाश होणार. म्हणून वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी नागरिकांनी झाडाला कवटाळले आणि प्रतिरोध केला. सुंदरलाल बहुगणा आणि चंडीप्रसाद भट्ट यांच्या नेतृत्वाखाली 1973 साली 'चिपको चळवळ' सुरु झाली. लोकांचा विरोध लक्षात घेउन सरकारने वृक्षतोडीची परवानगी मागे घेतली.

कर्नाटक अप्पिको चळवळ

कर्नाटकच्या उत्तर कन्नड जिल्हयातील 'सल्यानी' गावातील शेतकऱ्यांनी 1983 मध्ये अप्पिको चळवळ सुरु केली. येथील 'केळसे' जंगलात ठेकेदार जेव्हा झाडे तोडण्यासाठी आले तेव्हा त्यांना थांबविण्यासाठी शेतकऱ्यांनी झाडांना आलिंगन देवून विरोध केला सामान्य लोकामध्ये पर्यावरणाबद्दल जागृती, झाडांचे संवर्धन, पर्यावरणाचे महत्व पटवून देणे, त्याचबरोबर झाडांचा चोरटा व्यापार यांना विरोध करणे हा या शेतकऱ्यांचा प्रमुख उद्देश होता.



नर्मदा बचाव आंदोलन

गुजरात राज्यात सरदार सरोवर प्रकल्पा अंतर्गत नर्मदा नदीवर बांधल्या जाणाऱ्या धरणाविरोधात हे आंदोलन सुरु झाले. या चळवळीचे नेतृत्व - पर्यावरण वाद्यानी केले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

मेधा पाटकर व बाबा आमटे यांना समजून आले की या धरणाच्या बांधकामामुळे मोठ्या प्रमाणात जंगलांचा नाश होवून आदिवासी विस्थापित झाले तसेच प्राणी प्रजातींचा नाश होउन पर्यावरणाला धोका निर्माण होणार म्हणून ही चळवळ करण्यात आली.

'सायलेंट व्हॅली' आंदोलन

केरळ राज्यातील पालघाट तालुक्यातील सायलेंट व्हॅली मध्ये धरण बांधकामाचे नियोजन करण्यात आले. ज्यामूळे पर्यावरणा बरोबरच अनेक प्राणी प्रजाती धोक्यात येऊ लागल्या त्यामुळे 'केरळ साहित्य परिषद' व वन्यजीव संरक्षकांनी याच्या विरोधात चळवळ सुरु केली. या चळवळीला यश आले आणि तेथील विविध प्रकारच्या प्राणी आणि वनस्पती प्रजातीचे संरक्षण झाले.

कर्नाटक किनाऱ्या लगतच्या परिसर चळवळी

कर्नाटकमधील मंगळूरु येथील MRPL (Mangaluru Refineries & petrochemicals) या कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या तीव्र वासाचा रासायनिक धूर बाहेर पडून पर्यावरणाचा नाश होत होता. म्हणून पर्यावरणवाद्यांनी या कंपनी विरोधात तीव्र आंदोलन केले.

कैगा अणुभट्टी विरोधी चळवळ

कारवारजवळील कैगा येथील अणुशक्ती विद्युत उत्पादन केंद्राविरोधात डॉ. शिवराम कारंत आणि इतर बुद्धीजीवीनी या प्रकल्पाला तीव्र विरोध केला. कारण या अणुऊर्जा प्रकल्पामुळे जंगलांचा नाश आणि भट्टीतून बाहेर पडणाऱ्या किरणोत्सर्गामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होऊन या परिसरात राहणाऱ्या प्राणी प्रजातींच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो.

अशा घटनांच्या विरोधात आंदोलन करण्याबरोबरच लोकांच्यात अशा समस्यांच्या बाबतीत जनजागृती होणे आवश्यक आहे. लोकांना समजावयास हवे की पर्यावरणाचे रक्षण आणि त्यांचे संरक्षण हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. तरच, लोक निरपेक्षपणे पर्यावरणाच्या संरक्षणाचे कार्य करतील. पर्यावरण संरक्षणा संबंधीत कार्यक्रमांची प्रभावी कार्यवाही होण्याची गरज आहे व हे फक्त जनजागृतीतूनच होऊ शकेल.

मेधा पाटकर, सुंदरलाल बहुगुणांसारख्या इतर आणखी कांही लोकांनी यासाठी प्रदीर्घ लढा दिला. या पर्यावरणीय चळवळींपैकी फक्त 'भूक चळवळ' ही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झाली. पर्यावरणशास्त्र हे एक स्वतंत्र शास्त्र नसून आपल्या जीवनाचाच एक भाग आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

महिला चळवळी

1980 च्या दशकात पक्षांतर्गत झालेल्या सामाजिक चळवळींपैकी 'महिला चळवळ' ही एक अत्यंत महत्वाची चळवळ होय. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे निर्माण झालेली स्त्री-पुरुष असमानता, अत्याचार, शोषण इत्यादि विरुद्ध महिलांनी केलेला विरोध (प्रतिकार) म्हणजेच 'महिला चळवळ' होय तसेच साहित्य क्षेत्रातही महिलांच्या शोषणाविरुद्ध अनेक वैचारिक तथा सृजनशील कृती लिहिल्या गेल्या आहेत.

इतका विरोध करूनसुद्धा आजही हुंड्यासाठी महिलांचा छळ करणारे असंख्य लोक आहेत. स्वतंत्र भारतात असमानतेमुळे होणाऱ्या महिलांच्या शोषणामध्ये परिवर्तन झाले आहे. पूर्वापार चालत आलेल्या पुरुषप्रधान परंपरेनुसार महिला म्हणजे घरकामासाठीच्या सेविकाच आहेत या दृष्टीकोनामुळे समाजामध्ये स्त्री-पुरुष असमानता दिसून येते.

या असमानतेबरोबरच स्त्रियांवर शारिरीक व मानसिक अत्याचार, हुंड्यासाठी छळ, लैंगीक शोषण यासारख्या घटना रोज घडतच आहेत. निंदा, अश्लील भाषेचा वापर, विविध प्रकारचे अत्याचार यामुळे कुटुंबात व कुटुंबाबाहेर स्त्रीच्या स्वातंत्र्याला व प्रतिष्ठेला बाधा येत आहे. याबरोबरच महिलांवरील ॲसिडहल्ले, बालकांचे व महिलांचे अपहरण आणि विक्री यासारखे नवनवीन शोषणाचे प्रकार दिवसें दिवस घडत आहेत, हे संपर्क माध्यमांद्वारे आपण पाहतोच आहोत. पूर्वी मर्यादा हा कुलाचा अभिमान असे मानला जात असे परंतू आजकाल हत्त्या (हिंसा) हाच कुलाचा अभिमान असे मानले जावू लागले आहे. आपल्या संविधानात 14, 15, 16 व 39 कलमांमध्ये महिलांच्या समान हक्कांचा व वेतनाचा उल्लेख असुनही महिलांना बरेच हक्क दिले जात नाहीत.

यासारख्या सर्व प्रकारच्या असमानता, अत्याचार व विविध प्रकारच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवून महिलांच्या हक्कांचे प्रतिपादन करणे म्हणजेच 'महिला चळवळ' होय.

मद्यपान प्रतिबंधक चळवळ

महिलांनी केलेल्या प्रमुख चळवळी पैकी मद्यपान प्रतिबंधक चळवळ ही एक महत्वाची चळवळ होय. या चळवळीला एका वेगळेपण प्राप्त झाले आहे. कारण या संदर्भात सर्व स्तरांवर महिलांचा एकत्रित सहभाग असतो.

मद्यपान प्रतिबंधक चळवळ ही स्वातंत्र्यचळवळीचाच एक भाग आहे. गांधीजीनीसुद्धा स्वातंत्र्यचळवळीबरोबरच संपूर्ण मद्यपान निषेधाच्या विचारांचे प्रतिपादन केले. माहिलांची ही मद्यपान निषेध चळवळ 'चिपको चळवळीचाच' एक भाग बनली आहे. तसेच ती कर्नाटक

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

कोकण किनारपट्टीवरील व मैदानी प्रदेशातील पर्यावरणीय चळवळींचाही भाग बनली आहे. कुसुमा, सोराब यासाख्या इतर कांही चळवळींनी आपले अस्तित्व घालवून घेतले आहे. मद्यपानामुळे सामाजिक तथा वैयक्तिक स्तरावर अनेक समस्या निर्माण होतात. यामूळे ग्रामीण महिलांच्या जीवनामध्ये ही अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. या व्यसनापायी कामगार आपली छोटीसी कमाई गमावून बसतात. कांहीवेळा आपल्या पत्नीलाही मारहाण करून जबरदस्तीने पैसे हिसकावून घेतात आणि आपली तल्लफ भागवितात. यामूळे महिलांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आणि म्हणूनच महिला मद्यपानाच्या निषेधार्थ संघटित झाल्या आहेत.

उपक्रम : समाजामध्ये व वर्गामध्ये महिलांना व मुलींना सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्या व त्याविरुद्ध लढा देण्याची जागृती निर्माण करण्याविषयक एखाद्या नाटुकलीचे सादरीकरण करा.

कृषी चळवळी

जमीनमहसुलीला विरोध करण्यासाठी कृषी आर्थिक समस्याविरुद्ध 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात हा लढा सुरु झाला 1970 ते 80 च्या दरम्यान झालेल्या चळवळींपैकी ही अत्यंत महत्त्वाची चळवळ होय, 1970 मध्ये D. देवराज अरस कर्नाटकचे मुख्यमंत्री बनले आणि विविध सामाजीक सुधारणा घडू लागल्या. जातीय वादाच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी विविध कायदेशीर उपाययोजना करण्याचे प्रयत्न केले. तसेच कूळ कायदा व वेठबिगारीच्या कचाट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी अनेक उपाय योजण्यात आले. या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे व त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठीही प्रयत्न करण्यात आले. डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या अमानवी प्रथेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तत्कालीन मंत्री श्री बसवलिंगप्पा यांनी अथक प्रयत्न केले.

त्यानंतरच्या काळात शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी अनेक कृषी चळवळींचे आयोजन करण्यात आले. या चळवळी राजकीय आहेत असे समजून त्या दडपून टाकण्यासाठी त्यांनी पोलिसांचा वापर केला लाठीहल्ले व गोळीबार केले. अशाप्रकारच्या घटनांचे खंडण करण्यासाठी जून 1980 मध्ये धारवाड जिल्ह्यातील नरगुंद

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

गांवामध्ये शेतकऱ्यांनी सरकारविरुद्ध बंड पुकारले. ही चळवळ फक्त पोलिसांचा बीमोड करण्यासाठी नव्हती तर समस्त शेतकरी बांधवांच्या ऐक्यासाठी व हितासाठी होती.

उपक्रम : स्थानिक शेतकऱ्यांना जमा करून त्यांना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते ते जाणून घ्या. या समस्या सोडविण्याबद्दल समूहचर्चा करून विद्यार्थ्यांना चर्चेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्या.

नरगुंदच्या या बंडानंतर शेतकरी चळवळीचे नेते, थोर समाजवादी प्रा.एम.डी. नंजुंडस्वामी यांनी 'कर्नाटक राज्य रयत संघाची' स्थापना केली ही संघटना शिवमोग्याचे गांधीवादी नेते एच.एस. रुद्राप्पा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. प्रा.नंजुंडस्वामी हे संचालक आणि एन.डी. सुंदरेश हे सचीव म्हणून या संघटनेचे कामकाज पाहू लागले. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देवून त्यांच्या अडचणी सोडविणे, कर्जामुळे शेतकऱ्यांवर येणाऱ्या जप्ती थांबविणे, खेड्यांना त्वरीत पायाभूत सुविधा देणे, खेड्यातील सांधनसंपत्तीतून मिळणाऱ्या उत्पन्नातील त्यांचा वाटा त्यांना देणे, लेव्ही पद्धत बंद करणे यासारख्या शेतकऱ्यांच्या असंख्य समस्या आणि मागण्या या संघटनेद्वारे सरकारपुढे मांडण्यात आल्या.

आजही शेतकरी काही चळवळी करत आहेत. अलिकडील कर्नाटकात महादाई व कावेरी नदीच्या पाणी वाटपा संदर्भात सरकारच्या व कोर्टाच्या निकालाविरुद्ध काही चळवळी झाल्या आहेत.

कामगार चळवळी

'कामगार चळवळ' अथवा 'कामगार संघ' म्हणजे सामान्यतः मजूर वर्गानी केलेली संघटना होय. कामाच्या ठिकाणी उत्तम वातावरण, सन्मानाची वागणूक, कायदेशीर सवलतींचा लाभ, योग्य वेतन, कामगारांच्या इतर कांही मागण्या अशा गोष्टी मिळवून देण्यासाठी सरकारवर अथवा कंपनी मालकांवर दबाव आणण्यासाठी केलेल्या चळवळीना 'कामगार चळवळी' असे म्हणतात कांही देशात राजकीय पक्षच कामगार संघटन म्हणून कार्यरत आहेत. भांडवलदारांकडून होणारे शोषण रोखण्यासाठी कामगार हितरक्षणाचे कायदे अंमलात आले आहेत.

औद्योगिकरणामुळे युरोपियन देशामध्ये कृषी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि कारखान्यांमध्ये रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्या. यामुळे कामगारांचे मोठ्या प्रमाणात शहराकडे स्थलांतर झाले.

शहरामध्ये मागणीपेक्षा जास्त कामगारवर्ग उपलब्ध झाला. त्यामुळे कामगारांचे शोषणही मोठ्या प्रमाणात झाले. ठरलेल्या कामाच्या तासांपेक्षा त्यांना जास्त राबवून घेतले जायचे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

कालांतराने कामगारांना या शोषणाची जाणीव झाली आणि याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी ते संघटित झाले. 19 व्या शतकाच्या दरम्यान कांही कामगार पक्ष आणि कामगार संघटना एकत्र येवून संपूर्ण जगभरातील कामगारांना संघटित करण्याचे काम यांनी सुरू केले. 'इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसिएशन' ही पहिली अंतरराष्ट्रीय कामगारसंघटना 1864 मध्ये लंडन येथे स्थापन झाली. कामगारांचे हीत जपणे हा या संघटनेचा प्रमुख उद्देश होय. कामगारांच्या कामाचे तास फक्त आठ तासच असावेत ही त्यांची एकच मागणी होती. 19 व्या शतकाच्या मध्यापर्यंत ही कामगार चळवळ जगातील बऱ्याच भागात पसरली होती.

कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसंबंधी 1923 मध्ये तत्कालिन सरकारने 'कामगार सामाजिक सुरक्षा कायदा' लागू केला. यामुळे कामगार संघटनांना अनुकुल परिस्थिती निर्माण झाली. आणि अनेक संघटनाना कायदेशीर मान्यता मिळाली. यानंतर कामगारांच्या बऱ्याच संघटना स्थापन झाल्या व आजही त्या कार्यरत आहेत. जेव्हा कामगारांच्या हितसंबंधांना धक्का पोचतो तेंव्हा या संघटना त्यविरुद्ध लढा सुरु करतात. आपल्या देशातही अनेक कामगार संघटना असून विविध चळवळींद्वारे लढा देत आहेत.

अस्पृश्यता निर्मूलन चळवळ

समाजातील वर्णवार जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यता ही अमानवी चाल परंपरागतपणे चालत आली आहे. अस्पृश्यता निर्मुलन चळवळीद्वारे अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे हे जातीवर आधारित एक प्रकारचे शोषणच आहे. अनेक वर्षांपासून अस्पृश्य लोक आपल्या हक्कांसाठी लढा देत आहेत. या चळवळींचा इतिहास थोडक्यात अभ्यासूया.

अस्पृश्यता निर्मुलन चळवळीचा इतिहास

अस्पृश्यताविरोधी चळवळींचा आरंभ 19 व्या शतकात झाला. महाराष्ट्राचे थोर समाजसेवक श्री.जोतिबा फुले यांनी अस्पृश्यांना व मागासवर्गीयांना समाजात समाविष्ट करून घेण्यासाठी ही चळवळ सुरू केली. वर्णव्यवस्थेवर आधारित असलेल्या या जातिरचनेला विरोध करणे हा या चळवळीचा प्रमुख उद्देश आहे. 1917 मध्ये याच उद्देशपूर्तीसाठी तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि इतर कांही राज्यात अस्पृश्यता विरोधी चळवळी सुरू झाल्या 1925 मध्ये पेरियार रामस्वामी यांनी स्वबळावर तामिळनाडु येथे चळवळ सुरु केली.

यानंतर डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या कल्पनेद्वारे लिंगभेद विरोधी चळवळ व अस्पृश्यता चळवळ जास्त जोमाने सुरू झाली. 1930 मधील गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी अस्पृश्यांना उद्देशून आपण सर्वजण एक आहोत असे आवाहन केले व दलिताच्या हक्कांसाठी आंबेडकरांनी निरंतर प्रयत्न केले.

www.textbookpdf.in

आंबेडकर अस्पृश्यांच्या व महिलांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढले. यासाठी त्यांनी 'मूकनायक' नावाचे नियतकालिक सुरू केले. या माध्यमाद्वारे त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध अत्यंत सामर्थ्यशाली लढा दिला. गांधीजीनी स्वातंत्र्यचळवळी बरोबरच अस्पृश्यता निर्मुलन चळवळीचेही प्रतिपादन केले. ते एक थोर समाजसुधारक होते. आजही विविध संघटना अस्पृश्यताविरोधी चळवळींद्वारे लढा देत आहेत व या सामाजिक समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी झटत आहेत.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. पर्यावरणविषयक (परिसर) चळवळी म्हणजे _____ होय
2. 'नर्मदा बचाओ' ही चळवळ _____ यांच्या नेतृत्वाखाली पार पडली
3. डॉ. शिवराम कारंथ यांनी _____ येथे अणुशक्ती केंद्र उभारण्यास विरोध केला.
4. महिला चळवळ म्हणजे _____

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

1. जमावाच्या वर्तणुकीची उदाहरणे कोणती?
2. महिला चळवळ म्हणजे काय? उदाहरण द्या.
3. जमावाच्या स्वरूपाचे वर्णन करा.
4. पर्यावरणविषयक चळवळी, त्याचा अर्थ व स्वरूप याबद्दल सविस्तर माहिती लिहा.

III. उपक्रम

1. महिला, पर्यावरणविषयक व दलित चळवळींमध्ये सहभागी झालेल्या लोकांना भेटून त्यांच्याशी चर्चा करा. तसेच या संघटनांविषयी अधिक माहिती गोळा करा.
2. महिला चळवळींमुळे महिलांचा आत्मविश्वास कसा वाढला व सामाजिक मनोभावना कशी वृद्धीगंत झाली याबद्दल महिलांशी चर्चा करा.

IV. प्रकल्प

1. कर्नाटकात पर्यावरण (परिसर) व वनसंरक्षणासाठी सुरु असलेल्या चळवळींबाबत वृत्तपत्रांची कात्रणे गोळा करा व त्याबद्दल अधिक माहिती मिळवा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 4

सामाजिक समस्या

या पाठात आपण खालील घटकांचा अभ्यास करू.

- **बालमजुरी**
- **लिंगभेद**
- **बालविवाह**
- **बालकांवरील लैंगिक अत्याचार**
- **भूक आणि कुपोषण**
- **समस्या सोडविण्यासाठीचे उपाय**
- **बालकांचे अपहरण**
- **स्त्री-भ्रूणहत्त्या**

बालमजुरी

सामान्यपणे लहान वयात पैसे मिळविण्यासाठी काम करणे म्हणजेच बालमुजरी होय. भारतीय संविधानानुसार पैसे मिळविण्यासाठी काम करणारी 14 वर्षाखालील मुले म्हणजेच बालमजूर होय.

भारतासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये बालमजुरी ही एक सामाजिक समस्या बनली आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 12.6 दशलक्ष मुलांना घरामध्ये, कारखान्यांमध्ये, कृषी व इतर अनेक क्षेत्रांमध्ये जबरदस्तीने कामाला लावले जाते, त्याचप्रमाणे संपूर्ण जगामध्ये 215 दशलक्ष मुलांना विविध क्षेत्रांमध्ये जबरदस्तीने कामाला जुंपले जाते. यामुळे बालकांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य खुंटते. त्यामुळे ती शिक्षणापासून वंचित रहातात आणि त्यांच्यातील कला, कौशल्ये विकसित होण्याआधीच खुंटतात.

बालमजूर म्हणजे कोण? 14 वर्षाखालील सर्व शाळाबाह्य मुलांना बालकामगार असे म्हटले जाते. ते पैशासाठी काम करोत वा न करोत, घरात असोत वा बाहेर तसेच शाळेत नाव दाखल करून दररोज शाळेत उपस्थित रहात नसतील तर त्यांना बालमजूरच म्हटले जाते. मग 15 वर्षानंतर ते काम करू शकतात का? नाही तसे कांही नाही. सरकारने कायद्यामध्ये दुरुस्ती करून 2016 च्या किशोरवयीन मजुरी प्रतिबंधक तथा नियंत्रण कायद्यानुसार ते कुठेही काम करू शकत नाहीत. या कायद्याने 1986 च्या 'बालमुजरी प्रतिबंधक कायद्यामध्ये' दुरुस्ती करून 15 वर्षावरील मुलांना धोकादायक ठिकाणी काम करण्यास बंदी घातली आहे. तसेच 14 वर्षाखालील मुलांना कुणीही कामावर ठेवून घेवू नये. ठेवून घेतल्यास तो शिक्षापात्र गुन्हा आहे असे नमूद केलेले आहे. या कायद्याबद्दल आपण अधिक माहिती घेवू.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1986 च्या किशोरवयीन मजुरी प्रतिबंधक तथा नियंत्रण कायद्यानुसार (जुलै 2016 च्या दुरुस्तीनुसार)(Child and Adolecent Labour Prohibition and Regulation Act)

1. 14 वर्षाखालील मुलांना कुणीही, कोणत्याही कारणासाठी, कुठल्याही क्षेत्रात नेमणूक करून घेवू शकत नाही. याचे उल्लंघन करणाऱ्यांना या कायद्याच्या 14 व्या कलमानुसार रू. 50,000 दंड व 2 वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.
2. शाळेच्या वेळेत कोणत्याही कुटुंबातील व्यक्तींनी 14 वर्षाखालील मुलांना घरगुती कामासाठी घरी ठेवून घेवू नये. या कायद्याचे उल्लंघन केल्यास त्याच्या पालकांना अथवा कुटुंबप्रमुखास दोषी ठरवून त्यांना रू. 10,000 दंड ठोठावण्यात येतो.
3. या कायद्यानुसार 15 ते 18 वयोगटातील मुले ही किशोरवयीन मुले होत. या मुलांना कोणत्याही धोकादायक अथवा जोखिमीच्या ठिकाणी कामासाठी वापरू नये. याचे उल्लंघन केल्यास त्यांना रू. 50,000 चा दंड ठोठावण्यात येतो.



1948 च्या औद्योगिक कायद्यातील 29 क्षेत्रामध्ये आणखी दोन क्षेत्रांची भर घालून एकूण 31 क्षेत्रे ही धोकादायक किंवा जोखिमीची ठरविण्यात आली आहेत. उदा. खाणकाम, स्फोटकांचे उत्पादन, ज्वालाग्रही उत्पादन, लोखंड व पोलाद उत्पादन, दुचाकी व इतर वाहनदुरुस्ती, सिमेंट व रबर उत्पादन, रासायनिक उत्पादने इ. क्षेत्रांमध्ये 18 वर्षाखालील मुलांची नेमणूक करता येत नाही. तसे केल्यास तो शिक्षापात्र गुन्हा ठरतो.

© KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बालमजुरीची कारणे

बालहक्कांचे संरक्षण व सन्मान करण्यासाठी लागणाऱ्या सामाजिक परिसराचा अभाव हे बालमजुरी, बालविवाह व बालकांच्या अपहरणाचे प्रमुख कारण आहे. कमी पैशात जास्त राबवून घेणारे लोभी मालक हेही बालमजुरीचे एक कारण आहे. ओल्या व सुक्या दुष्काळामुळे शेतीव्यवसायात चढउतार येतात. व रोजगाराच्या संधी उपलब्ध होवू शकत नाहीत. यामुळे बहुतांश कुटुंबे शहराकडे स्थलांतरीत होतात. अशा कुटुंबातील मुले हॉटेल्स, फटाक्यांचे कारखाने, इतर धोकादायक अथवा जोखिमीच्या असंघटित क्षेत्रात मिळतील ती कामे कमी पैशात करतात.

मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्कांची अंमलबजावणी योग्य प्रकारे झालेली नाही. सर्व मुलांना दहावीपर्यंतचे शिक्षण संपूर्णपणे मोफत मिळत नाही. त्यामुळे बालमुजुरीचे प्रमाण वाढले आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अल्पमजुरी व भूसुधारणा कायद्यातील अंमल बजावणी म धील उणिवा यामुळेही बालमजुरीचे प्रमाण वाढलेले आहे.

बालमजुरीचे दुष्परिणाम

1. बालमजुरीमुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासावर गंभीर परिणाम होतात.
2. लहान वयात काम केल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहून अशिक्षित बनतात. तसेच आपल्या मूलभूत हक्कांपासूनही वंचित रहातात.
3. बालमजुरीमुळे कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक चलनवलनावर मर्यादा येते. अशा कुटुंबातील मुलांना वारंवार शोषणाचे लक्ष्य बनविले जाते. यामुळे बालविवाह, मुलांचे अपहरण यासारख्या समाजविरोधी घटनांना वाव मिळतो. यामुळे लहान वयातच मुले, विशेषतः मुली हिंसा व लैंगिक अत्याचाराला बळी पडण्याची शक्यता वाढते. ही मुले अनेक प्रकारच्या संसर्गजन्य रोगांनी त्रस्त होवून कांहीजणांना कायम चे अपंगत्वही प्राप्त होवू शकते.

बालमजुरीची ही समस्या निवारण करण्याचा एक प्रमुख उपाय म्हणजे 18 वर्षाखालील मुलांना शाळेत दाखल करून घेवून ती दररोज शाळेत हजर रहाण्याची सक्ती करणे हा होय. यासाठी सर्वांचे सहकार्य, सहभाग व समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे.

उपक्रम : तुमच्या मित्रमैत्रिणींपैकी कुणीतरी बालमजूर असेल व तो/ती शाळेत येत नसेल तर ताबडतोब तुमच्या शिक्षकांना कळवा.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

उपाय

1. सर्व क्षेत्रात लिंग समानतेची हमी देणे
2. असहाय्य कुटुंबांचे स्थलांतर रोखणे
3. बालविवाह व अपहरणाबद्दल जागृती निर्माण करणे
4. ग्रामपंचायतीमार्फत बालहक्ककायदे लागू करणे

हे तुम्हाला माहित असू द्या : 2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 12.6 दशलक्ष मुले अजूनही कारखाने, कृषी आणि इतर क्षेत्रात काम करतात. त्याचप्रमाणे संपूर्ण जगात 215 दशलक्ष बालमजूर आहेत.

बालकांवरील लैंगिक अत्याचार

अलिकडे मुलांवर, शाळेत, कुटुंबात, सार्वजनिक ठिकाणी वाढलेल्या लैंगिक अत्याचारापासून मुलांचे रक्षण करण्यासाठी 2012 मध्ये 'Protection of children from sexual offences Act - 2012' हा कायदा जारी करण्यात आला या कायद्यानुसार 18 वर्षाखालील कोणत्याही मुलाला कोणत्याही प्रकारचा असुरक्षित स्पर्श, शोषण, हिंसा, छळ, प्राणघातक हल्ला (मुलगा/मुलगी) इ. घटना लैंगिक अत्याचारात मोडतात. हा कायदा 19 जून 2012 रोजी लागू करण्यात आला.

या कायद्यातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

1. भेदक लैंगिक हल्ला
2. तीव्र प्राणघातक लैंगिक हल्ला
2. लैंगिक हल्ला
4. तीव्र लैंगिक हल्ला
5. लैंगिक छळ
6. अश्लील चित्रपट निर्मितीसाठी मुलांचा वापर करणे
7. अश्लील छायाचित्रांचा संग्रह करणे

वरीलपैक्री मुलांवर कोणताही गुन्हा झाला तर गुन्ह्याचे स्वरूप बघून गुन्हेगाराला कडक शिक्षा होवू शकते.

स्त्री-भ्रूण हत्या :

मातेच्या गर्भातील स्त्री-भ्रूण गर्भातच मारुन टाकणे अथवा सक्तीने गर्भपात करणे म्हणजेच 'स्त्री-भ्रूण हत्या' होय. अलिकडील काळात ज्वलंत समस्या बनलेल्या स्त्री-भ्रूणहत्येची नक्की आकडेवारी उपलब्ध होणे अवघड बनले आहे. परंतु कांही सूचकांद्वारे स्त्री-भूणहत्येची माहिती आपल्याला मिळू शकते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतीय जनगणनेनुसार 1961 मध्ये 0 ते 6 वयोगटातील असणारे मुलींचे गुणोत्तर 1980 मध्ये कमी झाले आहे. 2001 च्या जनगणनेनुसार 1000 मुलांमागे मुलींचे गुणोत्तर 933 होते परंतु 2012 मध्येते 940 इतके होते. परंतु 0 ते 6 वयोगटातील 1000 मुलांमागे मुलींचे गुणोत्तर 914 झाले. भारतात दररोज अंदाजे 1600 मुलींचे अपहरण व दरवर्षी 6 लाख मुलांचे अपहरण होते. कांही अहवालानुसार आजपर्यंत भारतात सुमारे 100 दशलक्ष मुलींचे अपहरण झाले आहे.

1991 च्या जनगणनेनुसार 1000 पुरुषांमागे 960 स्त्रिया होत्या परंतु 2001 च्या जनणनेनुसार हा आकडा 965 पर्यंत वाढलेला दिसून येतो. परंतु 0-6 वयोगटातील मुलींची संख्या घटली आहे. 1991 मध्ये 1000 मुलांमागे 960 मुली होत्या परंतु 2001 मध्ये 1000 मुलांमागे 949 मुली होत्या.

प्रादेशिकरित्या पाहिले तर 80% नवजात बालकांचा मृत्यू शहरी भागात झाला असून 69% ग्रामीण भागात झाला आहे. 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य समीक्षा -3 नुसार मागील दहा वर्षात नवजात शिशुंमधील मृत्यूमध्ये मुलांच्या मृत्यूचा दर 53.6% असून मुलींच्या मृत्यूचा दर 34.6% आहे. परंतु जन्मानंतरचा मुलांचा मृत्यूदर 16.5% आहे व मुलींचा मृत्यूंदर 19.3% इतका आहे. यावरून मुलींच्या बाबतीत दुर्लक्ष असल्याचे सूचित होते.

पुरुषांपेक्षा महिलांची आयुर्मर्यादा जास्त असते. परंतु स्त्रियांच्या मृत्यूचा दर पुरुषांच्या तुलनेत वाढलेला आहे. खालच्या स्तरावर आरोग्य जागृती विषयक कार्यक्रम तसेच योग्य वयात योग्य व पौष्टीक आहारपुरवठा केला गेला नाही हेच याचे प्रमुख कारण आहे.

स्त्री-भ्रूणहत्त्या रोखण्यासाठी समाजात स्त्रियांना समान हक्क प्रदान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समानतेच्या मनोभावनेलाही महत्त्व देणे गरजेचे आहे (Pre-conception & Pre-Natal Diagnostic Techniques Act (PCPNDTA) 1994 यासारखे कायदे लागू करून अशा घटना रोखणे शक्य आहे.

इतके सारे करूनही अजूनही स्त्री-भ्रूणहत्त्या रोखण्यात संपूर्ण सफलता प्राप्त झालेली नाही. भारताम ध्ये समाजातील मध्यमवर्गीय उच्च-मध्यमवर्गीय आणि सुशिक्षित वर्गामध्येही स्त्री-भूणहत्त्येचे प्रमाण आढळून येते ही एक चिंतेची बाब आहे. आर्थिक दृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या पुढारलेल्या वर्गामध्येही

उपक्रम : तुमच्या परिसरात महिलांबद्दल असमानतेची भावना असल्याचे आढळून आल्यास त्यांना समानतेचे महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न करा.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्त्री-भ्रूणहत्त्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. या दुष्ट चालीचे मूळ वंशपरंपरागत प्राप्त होणाऱ्या संपत्तीमध्ये आहे. मुलीच्या लग्नाचा खर्च, सासरी हुंड्यासाठी होणारा छळ, कुटुंबामध्ये व समाजामध्ये होणारे शोषण, सार्वजनिक ठिकाणी होणारे अत्याचार, लैंगिक शोषण व अत्याचार यासारखे प्रकार एकीकडे तर दुसरीकडे वंशपरंपरागतरित्या आलेल्या संपत्तीचा हक्क मुलालाच मिळावा हा दृष्टिकोन समाजात पहावयास मिळतो. या पुरुष-प्रधानतेमुळे स्त्री-भ्रूणहत्त्येचे प्रमाण वाढण्याचे तसेच महिलांबद्दल भेदभाव करण्याचे प्रमाण वृद्धींगत झाले आहे.

भूक आणि कुपोषण

अन्न व कृषी संस्थेने (Food & Agriculture Organization F.A.O.) प्रत्येक व्यक्तीला लागणाऱ्या आहाराच्या/अन्नाच्या गरजेचे कॅलरीवर आधारित परिमाण तयार केले आहे. व्यक्तीचे वय, कामाचे स्वरूप, रहाण्याचा प्रदेश, हवामान इत्यादिवर आधारित व्यक्तीच्या आहारात आवश्यक पोषणघटक असणे गरजेचे आहे. व्यक्तीला जगण्यासाठी व किमान शक्ती मिळण्यासाठी आवश्यक आहार वैद्यकिय समाजशास्त्रांने प्रमाणित केलेला आहे.

भूक ही अशी स्थिती आहे जिथे व्यक्तीला आवश्यक कॅलरीजचा आहार उपलब्ध होवू शकत नाही. व्यक्तीच्या आहारात आवश्यक प्रथिने, कार्बोहैड्रेट्स, पिष्टमय पदार्थ, जीवनसत्वे आणि क्षार इत्यादिंची गरज असते. आहारावाटे या गरजा जर पूर्ण झाल्या नाहीत तर त्याला 'अदृष्य भूक' असे म्हणतात. भूकेमुळे गरीबांना कॅलरीज व पोषण घटक दोन्हीही मिळत नाहीत FAO नुसार भारतामध्ये एका व्यक्तीला दररोज किमान 1820 कॅलरीज आहाराची आवश्यकता आहे ज्या व्यक्तीला 1632 कॅलरीजपेक्षा कमी आहार मिळतो ती व्यक्ती भूकेलेली व कुपोषित आहे असे समजतात.

भूक-सूची (Hunger -Index)

भूकेचे अनेक प्रकार आहेत. एक जगण्यासाठी आवश्यक आणि हवे तेवढे अन्न उपलब्ध असणे. दुसरा सतत अपुऱ्या व कुपोषित आहारामुळे अशक्तपणा येणे, शारीरिक व्यंग निर्माण होणे, कांहीवेळा तर अकाली मृत्यूही येतो. म्हणूनच सध्या उपलब्ध असणाऱ्या संख्येच्या आधारावर भूकेची सूची ठरविण्यात आली आहे. भूकेची सूची खाली दिलेल्या तीन प्रमुख घटकांच्या सरासरीवरुन समजेल -

1. सरासरी लोक ज्यांना गरजेपेक्षा कमी कॅलरीज आहार उपलब्ध होतो.
2. सरासरी वजनापेक्षा कमी वजनाच्या 5 वर्षाखालील मुलांचे सरासरी प्रमाण
3. 5 वर्षाखालील मुलांचा सरासरी मृत्यूदर

www.textbookpdf.in

या सूचीनुसार जागतिक बँकेने सिद्ध केले आहे की भारतामध्ये सर्वात जास्त कुपोषित व भुकेलेल्या मुलांची संख्या आहे. तसेच कमी वजनाचीही बरीच मुले आहेत. आणि या सर्वांचा संबंध बालमृत्यूदर, जन्मदर, मुलांचे चलन-वलन आणि आर्थिक विकासाशी आहे. जागतिक भूकसूचीमध्ये भारताचा 20 वा क्रमांक लागतो. यावरून भारतातील भुकेच्या भीषण समस्येची जाणीव होते.

कुपोषण

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य अहवाल - 4 (National Family Health Survey - 4 NFHS -4) नुसार कर्नाटकातील ग्रामीण भागातील शेकडा 24.3 आणि शहरातील शेकडा 16.2 महिलांचा NFHS -4 किमान वजनापेक्षा कमी आहे. 06 ते 56 महिन्यापर्यंतची शेकडा 60.9 बालके रक्तहीन आहेत. शेकडा 45.2 गर्भवती महिला रक्तहीन आहेत. शेकडा 80.4 विवाहित महिला कौटुंबिक निर्णयांमध्ये क्वचितच समाविष्ट होतात. NFHS -4 नुसार 79.5% महिला त्यांच्या नवऱ्यांच्या छळाला/जाचाला बळी पडतात.

33% महिलांचा व 28% पुरुषांचा BMI जरूरीपेक्षा कमी आहे. 15ते 35 महिने वयोगटातील 79% मुले, 15 ते 49 वर्षे वयोगटातील 56% महिला व 24% पुरुष व 58% गर्भवती महिलांना अन्नाची कमतरता भासत असून ते कुपोषित आहेत 2015-16 च्या NFHS नुसार 70.4% मुले (06 ते 35 महिने वयोगटातील) अशक्त असून रक्तक्षयाने त्रस्त आहेत.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलेसुद्धा रक्तक्षयाने त्रस्त आहेत. यांना आरोग्य संरक्षण देण्यासाठी सरकारी शिधावाटप केंद्राद्वारे मोफत धान्य वितरित केले जाते थोडक्यात कुपोषण ही एक गंभीर समस्या असून प्रत्येक सरकार व संस्थानी यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले पाहिजे.

लिंगभेद

स्त्री व पुरुष असे वर्गीकरण करण्यासाठी वापरण्यात येणारी संकल्पना म्हणजेच लिंग होय. हा भेद फक्त स्त्री व पुरुषांच्या शारीरीक लक्षणांवर आधारित नसून सांस्कृतिक आचरण व सामाजिक स्तरावर अवलंबून असतो. सामाजिक स्तरावर प्रत्येकाचा दर्जा सामावलेला असतो.

फक्त महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून लिंग भेद केला जातो. विकासाच्या प्रक्रियेमध्ये नेहमी महिलांना व मुलांनाच मागे ठेवले जाते म्हणूनच लिंगाच्या दृष्टीकोनाद्वारे विकास समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

लिंगभेदाचे प्रकार

सर्वसाधारणपणे लिंगभेद संपूर्ण जगभरात अस्तित्वात आहे. परंतु या भेदाचे स्वरूप अथवा प्रमाण मात्र सर्वत्र सारखे नाही. अनेक सामाजिक विषयांमुळे ते गुंतागुंतीचे झाले आहे. थोर अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी खालीलप्रमाणे लिंगावर आधारित स्त्री-पुरुष असमानतेचे वर्गीकरण केले आहे.

जन्मदरातील असमानता

पुरुषप्रधान समाजामध्ये मुलाला मुलीपेक्षा जास्त प्राधान्य दिले जाते. परिणामतः लिगांवर आधारित स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण बहुतांश देशात जास्त आहे. हे प्रमाण पूर्वेकडील द.कोरिया, चीन, सिंगापूर व तैवान या राष्ट्रांमध्ये जास्त आहे.

पायाभूत सुविधांमध्ये असमानता

बऱ्याचदा जनसंख्या स्त्रियांना अनुकूल नसली तरी ती वेगळ्या पद्धतीने व्यक्त केली जाते. आशिया, आफ्रिका आणि द.अमेरिका यासारख्या देशात शाळेला जाणाऱ्या मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे.

संधीमधील असमानता

मूलभूत शिक्षणामध्ये फारशी असमानता नसली तरीसुद्धा उच्च शिक्षणामध्ये मात्र असमानता आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलाना उच्च शिक्षणाच्या संधी कमी आहेत. युरोप व उत्तर अमेरिकेसारख्या देशात हे प्रमाण जास्त आहे.

मालकी हक्कांमध्ये असमानता

समाजामध्ये स्त्री-पुरुषांच्या मालकी हक्कांमध्ये कमालीची असमानता आहे. जमीन व घराच्या मालकी हक्कासाठी लिंगभेद केला जातो. परिणामतः स्त्रिया आर्थिक व सामाजिक उपक्रमामध्ये भाग घेवू शकत नाहीत. जरी हा भेद सर्वत्र पहायला मिळत असला तरी या भेदभावाचे स्वरूप व प्रमाण प्रत्येक भागात वेगवेगळे आहे. उदा. भारतामध्ये वंशपरंपरेनुसार हा मालकीहक्क वंशपरंपरागत मुलाकडे दिला जातो. केरळमधील नायर कुटुंबामध्ये हा हक्क वंशपरंपरेने मुलीकडे दिला जातो. न्यायालयाच्या आदेशानुसार व कायद्यानुसार मुलीसुद्धा वडिलार्जित संपत्तीमध्ये समान हक्काची मागणी करू शकतात.

कौटुंबिक असमानता

कौटुंबिक स्तरावरसुद्धा लिंगावर आधारित भेदभाव केला जातो. अर्थात हे प्रमाण वेगवेगळ्या भागानुसार व समाजानुसार वेगवेगळे आहे. कांही कुटुंबात लिंगभेद मानत

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

नाहीत परंतु कुटुंबातील कामाच्या विभागणीमध्ये आणि मुलीची देखभाल करताना हा भेदभाव केला जातो.

बालविवाह

बालविवाह पद्धती ही एक आपल्या समाजातील गंभीर समस्या आहे. बालविवाह म्हणजे काय? ते आपण आता समजून घेवू. कायद्याने 21 वर्षाखालील मुलाचे व 18 वर्षाखालील मुलीचे लग्न हे बालविवाहामध्ये मोडते. दोघांपैकी एकाचे वय जरी कमी असले तरी त्याला 'बालविवाह' असेच म्हटले जाते. 18 वर्षाखालील मुलीने 21 वर्षापेक्षा जास्त वयाच्या मुलाशी लग्न केले तरी तो बालविवाहच ठरतो. लग्नासाठी. मुलीचे वय 18 वर्षे पूर्ण व मुलाचे वय 21 वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे.

बालविवाह का करू नयेत? पहिले, ते बेकायदेशीर आहे. दुसरे, विवाहसंस्थे मध्ये प्रवेश करण्यासाठी मुलगी शारीरिकरित्या, मानसिकरित्या विवाहाची कार्ये पार पाडण्यासाठी सक्षम व तयार झाली पाहिजे. विवाहाचे मूलभूत कार्य म्हणजे मुलांना जन्म देणे व त्यासाठी ती शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या तयार असली पाहिजे. विविध संशोधनाद्वारे गर्भाशयाची पूर्ण वाढ 18 वर्षानंतरच होते हे सिद्ध झाले आहे. परिपक्व गर्भाशयच 9 महिने भ्रूण (गर्भ) व्यवस्थित वाढवू शकतो. नाहीतर तो भ्रूण मध्येच मरतो व बऱ्याचवेळा मातेच्या मृत्यूलाही कारणीभूत ठरतो. म्हणूनच मुलीला लग्नासाठी 18 वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे.

बालविवाह हा एक गुन्हा आहे. बालविवाह फक्त विवाहित जोडप्यालाच अपायकारक ठरत नसून अशा विवाहाद्वारे जन्मलेल्या मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यालाही हितावह नसतो. आता आपण बालविवाहाची कारणे समजावून घेवू.

बालविवाहाची कारणे

1) लिंगभेद हे बालविवाहचे प्राथमिक कारण आहे. समाजामध्ये असा एक समज आहे की मुलगी लग्नानंतर दुसऱ्याच्या घरी जाते. तिची जबाबदारी हे एक आपल्यावरचे ओझे आहे. मग तिची लवकरच पाठवणी करणे केंव्हाही चांगले. कुटुंबामध्ये मुलगा/मुलगी असा केलेला भेदही बालविवाहास कारणीभूत ठरतो. बालविवाहच बालविवाहास कारणीभूत ठरतो. ज्या लोकांचे बालविवाह झालेले असतात त्यांना मुलेही लवकर होतात. आणि

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आपल्या मुलांची लग्नेही लवकर करून जबाबदारीतून लवकर मोकळे व्हावे यासाठी ते धडपडत असतात. अशिक्षितता हेही बालविवाहाचे एक प्रमुख कारण आहे. मुले शाळेत जात नसल्याने पालक लवकर लग्न करून रिकामे होतात. जर कुटुंबियांनी आपल्या मुलीना कमीत कमी दहावीपर्यंतचे शिक्षण जरी दिले तरी मुलींना समज येते व स्वत:हूनच त्या 18 वर्षापर्यंत लग्न करणार नाही असे ठणकावून सांगू शकतात. म्हणून बालविवाह रोखण्यामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

2) कायद्याच्या योग्य अंमलबजावणीचा अभाव. शालेय शिक्षणामध्ये कायद्याच्या अंमल बजावणीची कमतरता आहे. समाजाद्वारे अथवा सामान्य लोकांद्वारे बालहक्क व बालविकास कार्यक्रमामध्ये सहभागाच्या अभावामुळे बालविवाहाची समस्या आजही आढळून येते

2006 चा बालविवाह प्रतिबंधक कायदा

हा कायदा संपूर्ण भारतभरातील सर्व राज्यांमध्ये लागू केला गेला आहे. पूर्वीच्या कायद्यामध्ये आवश्यक तो बदल करून हा कायदा जारी करण्यात आला आहे. यापूर्वी असे कायदे 1929 व 1986 मध्ये जारी करण्यात आले होते. 1992 UNO च्या बालहक्क करारावर भारताने स्वाक्षरी केली आणि त्यामध्ये आवश्यक बदल करून नवीन कायदा लागू करण्यात आला.

या कायद्यानुसार जोडप्यापैकी कुणीही एक जरी कमी वयाचे असेल तर तो गुन्हा आहे. जास्त वयाच्या माणसाने कमी वयाच्या मुलीशी लग्न करणे हा कायद्याने गुन्हा आहे. जर एखादा बालविवाह झाला तर ज्यांनी विवाहासाठी पुढाकार घेतला ते लोक, ज्यांनी हा विवाह घडवून आणण्यास फूस दिली ते लोक, व ज्यांनी हा विवाह घडवून आणला ते सर्व लोक गुन्हेगार ठरतात आणि त्या सर्वांना 2 वर्षाचा कारावास व रू. एक लाख रोख दंड ठोठावला जातो. या कायद्यांतर्गत कलम 9,10 व 11 नुसार पुरोहित, फोटोग्राफर, व्हिडीओग्राफर, आचारी, मंडप डेकोरेटर, वादक, वाहनचालक व या विवाहसमारंभात सहभागी होणारे सर्व लोक शिक्षेस पात्र ठरतात.

मुलगा/मुलगीचे पालक हे प्रमुख गुन्हेगार ठरतात तसेच कार्यालयाचा मालक, पत्रिका छापणारा हेपण या कायद्यानुसार गुन्हेगार ठरतात. जे कोणी या विवाहाला प्रोत्साहन देतात व विवाहकार्यांत सहभागी होतात ते सर्वजण गुन्हेगार ठरतात. बालविवाहामध्ये सहभागी होणे म्हणजे बालहक्कांचे उल्लंघन करणे होय बालहक्कांचे उल्लंघन करणारे सर्वजण दोषी ठरविले जातात. 'बालहक्कांचे संरक्षण करणे ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे' असा या कायद्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. बालविवाहाचे दुष्परिणाम

बालविवाहामुळे बालकाचा समग्र/सर्वांगीण विकास खुंटतो आणि मुले त्यांच्यामध्ये असणारे प्रश्न विचारण्याचे सामर्थ्य गमावून बसतात. परिणामतः मुलांवरील हिंसक व लैंगिक हल्ल्यांचे प्रमाण वाढते. मुलांचे बरेच हक्क उदा. शिक्षण, बालपण, मनोरंजन, मित्रांमधील संवाद इ.चे उल्लंघन केले जाते. मुले कुपोषणाच्या, रक्तक्षयाच्या, रोगांच्या, गर्भपाताच्या, बालहत्त्येच्या आणि मृत्यूच्या सापळ्यात अडकतात. मुलींना लहान वयातच वैधव्य येण्याची शक्यता जास्त असते. तसेच आपोआपच ती हिंसाचाराची व अत्याचाराची बळी होते.

बालविवाह कसा रोखावा?

कर्नाटक सरकारने 47 अधिकाऱ्यांची निवड करून विविध स्तरावर 'बालविवाह प्रतिबंधक अधिकारी' म्हणून त्यांची नेमणूक केली आहे. ज्यावेळी एखादा बालविवाह घडतो त्यावेळी तुम्ही यापैकी कोणत्याही अधिकाऱ्याकडे थेट तक्रार नोंदवू शकता. ते तुमचे नावसुद्धा प्रकट न करता याची दखल घेतात. तसेच '1098' या टोलफ्री नंबरवरही थेट तक्रार नोंदवू शकता. तेही तुमचे नाव गुप्त ठेवतात. तसेच तुम्ही जवळपासच्या सरकारी शाळेतील मुख्याध्यापक, तलाठी, पंचायत विकास अधिकारी, आरोग्य अधिकारी आणि जवळपासच्या पोलिस स्टेशनमध्येही तक्रार नोंदवू शकता. या सर्व अधिकाऱ्यांनासुद्धा बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याचाच दर्जा आहे. याशिवाय सर्व जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सरकारी कर्मचारी हेसुद्धा बालविवाह प्रतिबंधक अधिकारीच असतात. यापैकी कुणाकडेही, कुणीही, केंव्हाही तक्रार करू शकते.

बालविवाह रोखण्याचे उपाय

1. शैक्षणिक विकास कार्यक्रमांचे आयोजन करून 18 वर्षे पर्यंतची मुले/मुली मध्येच शाळा/कॉलेज सोडून न देता निरंतर शिक्षण घेत राहतील यासाठी प्रयत्न करणे. याचाच अर्थ 100% मुलामुलींची नावे हजरीपटामध्ये दाखल केलेली असली पाहिजेत. तसेच त्यांच्या 100% उपस्थितीबरोबरच त्यांनी जन्मनोंदणी करून जन्मदाखला प्राप्त करून घेण्याचीही त्यांना सक्ती केली पाहिजे.

> **उपक्रम :** तुमच्या मित्रमैत्रिणीपैकी कुणीतरी बालविवाह करत असेल तर ताबडतोब बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांना कळवा. अथवा 1098 ला फोन करून माहिती द्या.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2. मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. प्राधान्यतेनुसार मुलींना अधिकार देवून त्यांचे सबलीकरण करणे. तसेच त्यांना बालविवाहापासून परावृत्त करून दूर ठेवणे. त्यांनी तसे केल्यास त्याबद्दल त्यांना जाब विचारणे व विरोध करणे.

मुलांचे अपहरण आणि विक्री

अत्यंत वेगाने वाढणाऱ्या आजच्या या समाजात त्याच वेगाने कांही चांगल्या/वाईट गोष्टीही वाढत आहेत. त्यापैकी आजच्या समाजापुढे असणारा ज्वलंत प्रश्न तसेच संपूर्ण जगापुढे उभी असणारी व सर्वांना भेडसावणारी समस्या म्हणजे 'माणसांची तस्करी किंवा अपहरण (Human Trafficking) होय. आज जगामध्ये शस्त्रास्त्रांच्या अवैध व्यवहारानंतर दुसऱ्या नंबरवर चालणारा अत्यंत मोठा अवैध व्यवहार म्हणजेच मानवांची तस्करी हा होय. अपहरण झालेल्या व्यक्तीमध्ये 70% महिला व मुलांचा समावेश असतो. दरवर्षी रू.32 बिलियन्स इतक्या मानवी तस्करी व्यवहाराची उलाढाल होते. अशी नोंद UNO ने 2012-13 मध्ये केलेली आहे.

भारतामध्ये देवदासीसारख्या अनिष्ट चालिरितीला मुले बळी पडतात. मुलांना लैंगिक गुलामगिरीची अथवा बालविवाहाची सक्ती केली जाते. बऱ्याचदा गरीब कुटुंबातील पालक स्वतःहून अशा बेकायदेशीर व्यवहारात अडकतात. कांहीवेळा दलालीच्या आमिषामुळे मुली अशा गैरव्यवहारास बळी पडतात तर कांहीजण जवळच्या नात्यातील मुलामुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, लग्नाचे आमिष दाखवून त्यांची विक्री करतात. काहीवेळा प्रेमाचे, लग्नाचे नाटक करून मुले, मुलींना माफियांना विकतात. तसेच छोट्या मुलीनांही चॉकलेटचे, नवीन कपडे घेवून देण्याचे, जत्रेत फिरवून आणण्याचे, सिनेमा दाखविण्याचे आमिष दाखवून पळवून नेवून लैंगिक छळ करून नंतर त्यांची विक्री केल्याची अनेक उदाहरणे घडलेली आहेत. आपण याबद्दल सावध व जागरूक झाले पाहिजे आपल्या शाळेच्या अवती-भवती अपरिचित व्यक्ती फिरत असतील, त्यांचे आपल्याशी वागणे विचित्र असेल तर याबद्दलही आपण सावध असले पाहिजे. असे आढळल्यास आपल्या शिक्षकांना अथवा पालकांना याची त्वरीत माहिती द्यावी. कांही दलाल गावात फिरून गरिब कुटुंबातील मुलींची माहिती काढतात. सुरवातीला त्या कुटुंबांशी मैत्री करून त्या पालकांना थोडी आर्थिक मदत करतात. नंतर मुलीला नोकरी लावतो असे सांगून त्यांना घेवून जातात व वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडतात सामाजिक विकास खात्याच्या अभ्यासानुसार सुमारे 4% मुली या लहान वयातील देवदासी मुली असून त्यांना वरीलप्रमाणे फसवून सापळ्यात अडकविले आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

बालकांचे अपहरण म्हणजे काय? 18 वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला शोषणाच्या हेतूने, रोजगारी दिल्यास, बदली केल्यास, इतर ठिकाणी हलविल्यास, आसरा दिल्यास, कुठेतरी पाठविल्यास अथवा विकत घेतल्यास त्याला बालकांचे अपहरण किंवा तस्करी असे म्हटले जाते. अंदाज पत्रकानुसार अपहरणकर्त्या मुलांपैकी 46% मुलांना लैंगिक व्यवहारात किंवा लैंगिक शोषणाकरिता वापरले जाते. व साधारण 27% मुलांना सक्तीने कामाला लावले जाते. व 27% मुलांना घरगुती कामासाठी वापरले जाते सक्तीने कामाला लावलेली बऱ्यापैकी मुले भीक मागण्याचे काम करतात.

मुलांच्या अपहरणाची कारणे

दुर्लक्ष, वेठबिगारी इ. कांही प्रमुख कारणे आहेत. याव्यतिरिक्त वारंवार केली जाणारी स्थलांतरे, निवासस्थाने बदलणे, इंटरनेट व सोशल मिडियाचा अतिवापर, सामाजिक असमानता, लिंगभेद कौशल्यांचा अभाव, कुटुंबातील आर्थिक अडचणी व आणखी इतर कांही गोष्टी या समस्येला कारणीभूत आहेत.

दुष्परिणाम

मुलांचा सर्वांगिण विकास खुंटतो. मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर गंभीर परिणाम होतात. मुले लैंगिक अत्याचाराला बळी पडतात. मुले HIV/AIDS सारख्या लैंगिक आजाराला बळी पडतात. तसेच मनाविरुद्ध गर्भधारणा, गर्भपात, लैंगिक अत्याचारावाटे झालेली गर्भधारणा, हिंसा, व्यसनाधीनता आणि समाजातील अनेक वाईट गोष्टींना बळी पडतात.

अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक कायद्यामध्ये - 1956 (Immoral Human Trafficking Prevention Act 1956) दुरुस्ती केली. हा कायदा कोणत्याही मुलाच्या, महिलेच्या अथवा व्यक्तीच्या अपहरणाचा प्रतिबंध करतो. या कायद्यानुसार कोणत्याही मुलांना, महिलांना अथवा व्यक्तींना कसलेही आमिष दाखवून, जबरदस्तीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेवून गेल्यास त्याला मुलांचे महिलांचे अथवा व्यक्तीचे अपहरण म्हटले जाते. अपहरणाकर्त्यावर IPC (Indian Pinal Code) नुसार गुन्हा दाखल करून त्याला कमीत कमी 10 वर्षे अथवा आजन्म कारावासाची शिक्षा होवू शकते.

कांही प्रतिबंधात्मक उपाय

बालमजुरी, बालविवाह, बालकांचे अपहरण, बालकांवरील लैंगिक अत्याचार इ. रोखण्यासाठी कांही प्रतिबंधनात्मक उपाय आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1. कर्नाटकातील प्रत्येक सरकारी/अनुदानित/अनुदानरहित शाळांमध्ये 'बालहक्क क्लब' ची स्थापना करणे.
2. कर्नाटकातील प्रत्येक सरकारी/अनुदानित/अनुदानरहित शाळांमध्ये 'बालसुरक्षा समिती' ची स्थापना करणे.
3. राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये 'बालग्रामसंभांचे' आयोजन करून 18 वर्षाखालील मुलांच्या समस्या जाणून घेवून त्यावर उपाययोजना करणे.
4. राज्यातील सर्व ग्राम/तालुका/जिल्हा पंचायत स्तरावर 'बालहक्क रक्षण समितीची रचना करून दोन महिन्यातून एकदा तरी एका सभेचे आयोजन करणे व त्या सभेत त्यांच्याशी संबंधित बाबींवर चर्चा करणे.
5. राज्यातील सर्व ग्राम/तालुका/जिल्हा पंचायत स्तरावर 'महिला' व बालक अपहरण प्रतिबंधक समितीची रचना करून दोन महिन्यातून एकदा एक तरी सभा आयोजित करणे व त्यांच्या समस्या सोडविणे. या समितीने आपल्या हद्दीत मुलांचे व महिलांचे अपहरण होवू नये याकडे लक्ष देणे.
6. राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रात 'बालिका संघा'ची स्थापना करणे

या संघाद्वारे 11 ते 18 वयोगटातील सर्व मुलींना लिंगभेद, बाल मजुरी, बालविवाह, बाल-अपहरण, असुरक्षित स्पर्श, वैयक्तिक स्वच्छता, लैंगिक अत्याचार, जन्मदाखला, शालेय शिक्षणाचे महत्त्व, किशोरावस्थेतील वाढ, बालहक्क, बालकायदे, कुपोषण, आरोग्य, HIV/AIDS बद्दलची माहिती, शौचालयाचा वापर, त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सवलती इ. सर्व बाबतीतली माहिती देवून मुलांमुलींना सक्षम बनविणे.

वरील सर्व उपाय सरकारने अनेक कार्यक्रमाद्वारे, सरकारी आदेशांद्वारे, सरकारी फतव्यांद्वारे, संस्थाद्वारे राबविले आहेत. परंतु हे सर्व उपाय व्यवस्थित लागू झाले आहेत की नाही हे पाहणे गरजेचे आहे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. संविधानाच्या _____ कलमानुसार बालमजुरीस मनाई आहे.
2. 'बालविवाह प्रतिबंधक कायदा' _____ मध्ये लागू करण्यात आला.
3. बालमजुरांच्या कल्याणासाठी _____ मध्ये 'राष्ट्रीय निती' ची स्थापना झाली..

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4. 'स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा' _____ मध्ये लागू करण्यात आला
5. लैंगिक अत्याचारापासून बालकांच्या संरक्षणासाठीचा कायदा _____ मध्ये लागू करण्यात आला

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या

1. भारतातील कोणत्याही दोन सामाजिक समस्यांची नावे सांगा
2. बालमजूर कोणाला म्हणतात?
3. स्त्री-भूण हत्या म्हणजे काय?
4. बालविवाह म्हणजे काय?
5. लिंगभेद म्हणजे काय?
6. बाल-अपहरण म्हणजे काय?

III. समूहामध्ये चर्चा करून उत्तरे द्या -

1. बालमजुरीची कारणे कोणती? स्पष्ट करा.
2. बालविवाहाचे दुष्परिणाम कोणते ?
3. बालमजुरीचे उच्चाटन करण्यासाठीच्या उपाययोजना कोणत्या?
4. स्त्री-भ्रूणहत्येचे दुष्परिणाम कोणते?
5. लिंगभेदाचे प्रकार कोणते?
6. भूकेचे दुष्परिणाम कोणते?

IV. उपक्रम

1. तुमच्या गावातील/शहरातील सामाजिक समस्यांची यादी करा व त्यासाठी कांही उपाय सुचवा.

IV. प्रकल्प

1. तुमच्या शाळेत कायदेतज्ञांना आमंत्रित करा. विद्यार्थ्यांसाठी भाषण व चर्चासत्राचे आयोजन करून बालविवाह, स्त्री-भ्रूणहत्या, लिंगभेद आणि इतर सामाजिक समस्यांवर चर्चा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भूगोलशास्त्र

प्रकरण - 8

भारतातील खनिजे व शक्तीसाधने (उर्जासाधने)

या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया

- **खनिजांचा अर्थ व त्यांचे महत्व**
- **भारतातील प्रमुख खनिजे, त्यांच्या खाणी, विभागणी व उत्पादन**
- **उर्जा साधने - त्यांचा अर्थ व महत्व**
- **पारंपारिक उर्जास्त्रोत - कोळसा, पेट्रोलियम व अणुऊर्जा**
- **भारतात विद्युत शक्तीचा अभाव (कमतरता) व त्यावरील उपाययोजना**

खनिजांचा अर्थ व त्यांचे महत्व

निसर्गात स्वाभाविकपणे मिळणाऱ्या ठराविक रासायनिक संयुगाने सामावलेल्या मिश्रणाला 'खनिजे' असे म्हणतात खनिजे ही अजैविक नैसर्गिक साधनसंपत्ती आहेत. उदा. लोहयुक्त खनिज, मँगनीज, बॉक्साईट इ. जमिनीतून खनिजे बाहेर काढण्याच्या क्रियेला 'खाणकाम' असे म्हणतात.

खनिजे ही नैसर्गिक देणगी आहे. देशाच्या समृद्धीसाठी खनिजांची भूमिका फार महत्वाची आहे. औद्योगिक विकास व उद्योगाची उभारणी, वाहतूक व दळणवळणाची प्रगती, व्यापार व वाणिज्य क्षेत्रतील प्रगती यासाठी खनिजे फार उपयुक्त आहेत. काही खनिजे फारच मौल्यवान असतात. उदा. सोने, हिरा इ. भारतात विपुल प्रमाणात खनिज संपत्ती आढळते.

प्रमुख खनिजे

लोहयुक्त खनिज : लोहयुक्त खनिजाचा लोखंड व पोलाद उद्योगधंद्यासाठी कच्चा माल म्हणून वापर करतात. भारतात लोहयुक्त खनिजाचा खूप मोठा साठा आहे. काही राज्यात मोठ्या प्रमाणात हे खनिज आढळते. उदा. कर्नाटक, ओडीशा, छत्तीसगड, झारखंड, तेलंगाणा, म ध्यप्रदेश, महाराष्ट्र व राजस्थान ही राज्ये लोहयुक्त खनिजाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात.

हे तुम्हाला माहित आहे का ?

धातू : ज्या पासून खनिजे मिळविली जातात त्यांना 'धातू' असे म्हणतात.

खनिजशास्त्र : खनिजांबद्दल शास्त्रीयदृष्ट्या अध्ययन करणारे शास्त्र.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in





ओडीशा राज्यात अत्याधिक प्रमाणात लोहयुक्त खनिजाचे उत्पादन केले जाते. ओडिशा राज्यातील मयूर भंज, केओंझारगढ, सुंदरगढ व कटक या जिल्ह्यामध्ये लोहयुक्त खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. छत्तीसगड राज्यातील बस्तर, दूर्ग व जबलपूर या ठिकाणी तर झारखंड राज्यातील सिंगभूम, पालमाऊ, धनबाद, हजारीबाग व कर्नाटक राज्यात संडूर - होस्पेट, केम्मनगुंडी, कुद्रेमुख या ठिकाणी लोहयुक्त खनिजे मोठ्या प्रमाणात आहेत.

गोवा, तमिळनाडू, पश्चिमबंगाल व उत्तर प्रदेशांतही लोहयुक्त खनिजाचे साठे आढळतात.

जगातील लोहयुक्त खनिजांच्या उत्पादनांमध्ये भारताचा चौथा क्रमांक लागतो. भारतात एकूण उत्पादनाच्या 35% भाग देशातील लोखंड व पोलाद कारखान्यांसाठी वापरला जातो व उरलेला भाग निर्यात केला जातो.

मँगनीज

हा एक मिश्र धातू असून फार महत्त्वाचा आहे. पोलाद तयार करण्यासाठी मँगेनीजचा वापर करतात. बॅटरी, रंग, काच, मातीची भांडी व कॅलिको प्रिंटींगसाठी पण मँगेनीजचा वापर करतात. जगात मँगनीज उत्पादनामध्ये व निर्यातीम ध्ये भारताचा पण महत्त्वाचा वाटा आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in



हे तुम्हाला माहित आहे का?

बॉक्साईट - हा शब्द लेसबॉक्स (Les bux) या शब्दापासून बनला आहे. लेसबॉक्स हे ठिकाण फ्रान्सच्या 'अरलेस' जवळ आहे पहिल्यांदा कच्चे बॉक्साईट या ठिकाणी सापडले.

ॲल्युमिनियम - याला 'वीसाव्या शतकातील अदभुत खनिज' असे म्हणतात याचा उपयोग विविध उद्देशांसाठी केला जातो.

ओडिशा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व कर्नाटकही भारतातील मँगनीज उत्पादन करणारी प्रमुख राज्ये आहेत. त्यात ओडिशा या राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. ओडिशा राज्यातील सुंदरगढ, कालहंडी व कोरापूट या जिल्हयात उच्च दर्जाच्या मँगनीजच्या खाणी आढळतात.

महाराष्ट्रात नागपूर, भंडारा व रत्नागिरी, तर मध्यप्रदेशात बालाघाट, छिंदवाडा, जबलपूर व देवास, कर्नाटकात उत्तर कन्नड, शिमोगा, बळळारी, चित्रदुर्ग व तुमकूर जिल्हे ही भारतातील इतर मँगेनीज उत्पादन करणारी मुख्य ठिकाणे आहेत. तेलंगाणा, राजस्थान, गुजराथ, झारखंड व बिहार या राज्यातही मँगनीजचे उत्पादन होते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जगात मँगेनीज उत्पादनमध्ये भारताचा पाचवा क्रमांक लागतो. भारत देशात बाकी राहिलेले मँगनीज जपान, ब्रिटन, अमेरिकेची संयुक्त संस्थाने (U.S.A) व बेल्जियम या देशांना निर्यात केले जाते.

बॉक्साईट :

हा ॲल्युमिनियम साठी लागणारा कच्चाधातू आहे. भारतात मोठ्या प्रमाणात बॉक्साईटच्या खाणी आहेत. ओडिशा, गुजराथ, झारखंड, महाराष्ट्र, छत्तीसगढ, तामिळनाडू व मध्य प्रदेश या राज्यात बॉक्साईटच्या खाणी आहेत.

भारतात ओडिशा राज्यात सर्वाधिक प्रमाणात बॉक्साईटच्या खाणी असून त्यातून उत्पादन घेतले जाते. या राज्यातील कालहंडी, कोरापूट, सुंदरगढ व संभळपूर जिल्ह्यात बॉक्साईटच्या खाणी आहेत.

छत्तीसगडमधील विलासपूर, दूर्ग, सुरगुज, व रायघर. महाराष्ट्रातील रत्नागिरी, कोल्हापूर, ठाणे व सातारा. झारखंड मधील रांची, लोहार डाग, पालमाऊ. गुजराथमधील जामनगर, जुनागढ, खेड व भावनगर, मध्य प्रदेशातील शाहडोल, मंडल व बालघाट, आंध्रप्रदेशमधील गोदावरी व विशाखापट्टण. तामीळनाडूतील सेलम व निलगिरी कर्नाटकातील उत्तर कन्नड, बेळगावी व चिक्कमंगळूर या जिल्हयात बॉक्साईटच्या खाणी आहेत.

अभ्रक : हे एक प्रमुख अधातू खनिज आहे. याचे अतिशय पातळ अशा पत्र्यात (sheet) विभाजन करता येते. हे पारदर्शक असून उष्णता रोधक आहे. विद्युत उपकरणे, टेलिफोन, विमान निर्मिती, स्वयंचलित वाहन निर्मिती, बिनतारी संदेश यंत्रणा इत्यादि संपर्क साधनात याचा वापर केला जातो.

आंध्रप्रदेश, राजस्थान, झारखंड व बिहार राज्यात अभ्रकाच्या खाणी आढळतात. त्यामध्ये आंध्र प्रदेश प्रथम क्रमांकावर आहे. आंध्र प्रदेशातील नेल्लोर, कृष्णा, विशाखापट्टण, गोदावरी व अनंतपूर जिल्ह्यात अभ्रकाच्या खाणी आहेत. अभ्रकाच्या उत्पादनात राजस्थानचा दुसरा क्रमांक लागतो. राजस्थान मधील जयपूर, अजमेर, भीलवाडा व उदयपूर जिल्ह्यात या खाणी आहेत.

> **हे तुम्हाला माहित आहे का?**
> आंध्र प्रदेशातील 'नेल्लोर' जिल्ह्यात मिळणाऱ्या अभ्रकाचा रंग हा फिक्कट हिरवा आहे. त्याला 'हनिमिका'(Honey mica) म्हणतात.

झारखंड मधील हजारीबाग, धनबाद, पालमाऊ, रांची व सिंगभूम जिल्ह्यात तसेच बिहारमधील गया, मोंगीर व भागलपूर जिल्ह्यात अभ्रकाच्या खाणी आढळतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

गुजराथ, महाराष्ट्र, ओडिशा, कर्नाटक, तामिळनाडू व छत्तीसगड राज्यात थोड्याशा प्रमाणात अभ्रक सापडते. अभ्रकाचे उत्पादन करणे व निर्यात करणे यात भारत जगामध्ये अग्रेसर आहे. परंतु अलिकडे काही देशात कृत्रिम अभ्रकाचे उत्पादन केले जात असल्याने भारतातील अभ्रक निर्यातीचे प्रमाण कमी होत आहे.

उर्जासाधने

अर्थ व महत्त्व : विद्युत्शक्तीच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसंपत्तीला 'उर्जासाधने' असे म्हणतात. एका देशाच्या आर्थिक विकासासाठी लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी उर्जासाधने अतिशय महत्त्वाची ठरतात. उद्योगधंदे, शेती, व्यापार, दळणवळण व वाहतूक या क्षेत्रातील प्रगतीमध्ये उर्जा साधने महत्त्वाची भूमिका बजावतात.

उर्जा साधनांच्या स्वरूपावरून त्यांची पारंपरिक व अपारंपरिक अशी विभागणी केली जाते. कोळसा, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू हे पारंपारिक (अपुनर्भव) उर्जासाधने आहेत. ही उर्जासाधने केव्हातरी संपणार आहेत. अपारंपरिक (पुनर्भव) उर्जासाधनांमध्ये सौरउर्जा, पवनउर्जा, लाटांची उर्जा, भूऔष्णिक उर्जा, जैविक उर्जा इत्यादींचा समावेश होतो. भारतात विद्युतशक्तीचा अभाव असल्यामुळे अपारंपरिक (न संपणारी) उर्जा साधनांचा उपयोग करून त्यांचा विकास करणे महत्त्वाचे ठरले आहे.

कोळसा : कोळसा हे नैसर्गिक वनस्पतींचे अवशेष असलेले एक इंधन खनिज आहे. तो वनस्पतीज पदार्थांपासून बनतो. हजारो वर्षांपूर्वी जमिनीत गाडल्या गेलेल्या वनस्पतींच्या अवशेषांचे अधिक उष्णतेमुळे व भूगर्भातील दाबामुळे कोळशात परिवर्तन होते. कोळशामध्ये कार्बनचे संयोजन झालेले असते.

महत्त्व

कोळसा हे भारतातील प्रमुख उर्जासाधन आहे. देशाच्या एकूण विद्युतशक्तीपैकी 67% विद्युत हे कोळशापासून बनविले जाते. कोळशापासून अनेक उपपदार्थ मिळतात. उदा. अमोनिया, डांबर, कोलगॅस बेंझॉल, न्याप्त, गंधक इ. विविध उद्योगधंद्यासाठी कच्चामाल म्हणून यांचा वापर करतात. उदा. रंग, प्लॅस्टिक, कृत्रिम धागे, कृत्रिम रबर इत्यादि.

भारतातील कोळसा हा दोन भौगोलिक कालखंडाशी संबंधित आहे. गोंडवना व टर्षियरी कोळसा अशी त्यांची विभागणी करतात. 'गोंडवना' या प्रकारातील कोळसा विपुल प्रमाणात उपलब्ध असून तो फार महत्त्वाचा आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in



विभागणी व उत्पादन

भारतात कोळशाच्या खाणी झारखंड, छत्तीसगड, ओडिशा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तेलंगाणा व पश्चिम बंगाल या राज्यात आढळतात. भारतातील 96% कोळशाच्या खाणी या वरील राज्यात दिसून येतात. आसाम, मेघालय व नागालँड मध्येही कोळशाच्या खाणी आहेत. कोळसा उत्पादनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो.

हे तुम्हाला माहित आहे का?
कोळशाच्या विविध उपयुक्ततेच्या आधारावर त्याला 'काला हिरा'(Black Diamond) असे म्हणतात.

पेट्रोलियम

हे प्रामुख्याने हैड्रोकार्बनचा समावेश असलेले खनिजतेल आहे. पेट्रोलियम हे एक प्रमुख इंधन असून अनेक उद्योगधंद्यांमध्ये कच्चामाल म्हणून त्याचा वापर करतात. व्यापारी दृष्टीने हे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

एक उर्जेचे प्रमुख स्त्रोत आहे. व वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात याचा वापर केला जातो. कृत्रिम रबर, कृत्रिम रेशीम, औषधे, रासायनिक खते रंग तयार करणे इ. उद्योगांमध्ये कच्चा माल म्हणून पेट्रोलियमचा वापर करतात.

पेट्रोलियमची विभागणी

भारतात बॉंबे हाय, गुजराथ, आसाम, आंध्रप्रदेश व तामिळनाडू राज्यात पेट्रोलियमच्या खाणी मोठ्या प्रमाणात आढळतात.

हे तुम्हाला माहिती असू दे :

- Petra व oleum या दोन लॅटिन शब्दापासून Petroleum हा शब्द बनला आहे. Petra म्हणजे दगड. oleum म्हणजे तेल असा अर्थ आहे. पेट्रोलियमला 'खनिज तेल' असे म्हणतात.
- त्याचा वापर व त्याच्या आर्थिक मूल्याच्या आधारे पेट्रोलियमला 'द्रवरूप सोने' असे म्हणतात.

बॉंबे हाय या तेल उत्पादक प्रदेशात अमाप अशा तेलाच्या खाणी आहेत. त्यामुळे कच्चा तेल उत्पादनाचे ते प्रमुख केंद्र बनले आहे. त्यानंतर गुजराथचा दुसरा क्रमांक लागतो. गुजराथमधील अंकलेश्वर, कँबे, कलोल, नवगाव, मेहसाणा येथे पेट्रोलियमच्या खाणी आहेत. भारतातील आसाममधील 'माकुम' येथे प्रथमच पेट्रोलियमच्या खाणींचा शोध लावण्यात आला. त्यामुळे पेट्रोलियम उत्पादनात आसाम पहिल्या क्रमांकावर होता. आज तृतीय क्रमांकावर आहे. दिग्बोई, नहरकटिया मोरान, हुग्रीजन, सिबसागर व रुद्रसागर हे आसाम मधील प्रमुख तेल उत्पादक प्रदेश आहेत. गोदावरी, कृष्णा, कावेरी नदीखोऱ्यातील व नदीमुखाजवळील भागात तेलविहिरी आढळून येतात.



भारतात पेट्रोलियमचे उत्पादन पुरेशा प्रमाणात नाही. त्यामुळे आपल्या अमर्यादित गरजा भागविण्यासाठी पेट्रोलियमची जास्तीत जास्त आयात करावी लागत आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जलविद्युतशक्ती

उंचावरून पडणाऱ्या पाण्याच्या जोरदार प्रवाहापासून उत्पादित केलेल्या उर्जेला जलविद्युतशाक्ती म्हणतात ही पुनर्भव व सहजपणे उपलब्ध होणारी साधनसंपत्ती आहे. कोळसा व पेट्रोलियम पेक्षा जास्त उष्णता व उर्जा यामध्ये असते. विद्युतशक्तीच्या वापरामुळे यंत्रे स्वच्छ राहतात. वीज दूर अंतरावर वाहून नेता येते.

भारतात कोळसा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू या सारखी पुरेशी जैविक इंधने नाहीत. यासाठी जलविद्युतशक्ती उत्पादनामध्ये प्रगती करणे अत्यावश्यक आहे. याबरोबर भारतात जलविद्युतशक्ती विकासासाठी पूरक घटक उपलब्ध आहेत.

भारतात प्रथम 1897 मध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग येथे जलविद्युतशक्ती निर्मिती केंद्राची स्थापना करण्यात आली.परंतु वास्तव पाहता 1902 मध्ये कावेरी नदीवरील 'शिवनसमुद्र' येथे प्रथम जलविद्युतनिर्मिती केंद्र सुरु करण्यात आले.

भारतातील प्रमुख जलविद्युतशक्ती निर्मिती केंद्रे

कर्नाटक : शिवनसमुद्र, शरावती, लिंगनमक्की, आलमट्टी, काली, भद्रा

तामिळनाडू : मत्तूर, पैकारा, पापनासम्, पेरियार, मोयार, कुंदहा, शोलयार व कोडयार

महाराष्ट्र : कोयना, खोपोली, भोल, भीवपुरी, भोर

ओडिशा : हिराकूड, भीमकुंड, बाली मेल, रिगाली

आंध्रप्रदेश : श्री शैलम् व रामपादसागर

तेलंगाणा : निजामसागर, नागार्जुनसागर, सिलेरु

केरळ : इडिक्की, शबरीगिरी, पल्लीवासल, कल्लड, परांबीकुलम

इतर : गुजराथमधील युकय, काडन, झारखंड मधील सुवर्ण रेखा, मैथॉन, तिलैय्या, पंचत पर्वत

पंजाब मधील : भाक्रानानगल

बिहारमधील : कोसी

मध्य प्रदेशातील : गांधीसागर इत्यादि

हे तुम्हाला माहिती असू दे : जीवाश्म इंधन : वनस्पती वा सजीवांच्या जैविक अवशेषात fossized निर्माण होते यालाच जीवाश्म इंधन म्हणतात.

अणुउर्जा -

अणुखनिजांपासून तयार होणाऱ्या विद्युतशक्तीला 'अणुउर्जा' असे म्हणतात. भारतात विद्युतशक्तीची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या मागणी एवढे विद्युतशक्तीचे उत्पादन केले जात नाही. यासाठी भारताने अणुउर्जेचे उत्पादन कराण्याची योजना आखली आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतात मोठ्या प्रमाणात अणुखनिजांचे साठे आहेत उदा. युरेनियम, थोरियम. यापासून अणुउर्जा तयार कतात. याबरोबर अणुउर्जा तयार करण्याचे आधुनिक तंत्रज्ञान भारतात उपलब्ध आहे. भारतात पहिले अणुउर्जा निर्मिती केंद्र 1969 मध्ये तारापूर येथे स्थापन करण्यात आले. आज भारतात एकूण 7 अणुउर्जा केंद्रे आहेत. ती म्हणजे.

1) मुंबई जवळील - तारापूर (महाराष्ट्र) 2) कोटाजवळील राणाप्रतापसागर (राजस्थान) 3) चेन्नईजवळील 'कल्पक्कम' (तामिळनाडू) 4) नरोरा (उत्तरप्रदेश) 5) काक्रापार (गुजराथ), 6) कारवारजवळील कैगा (कर्नाटक) 7) कुंदनकुलम (तामिळनाडू)

अपारंपारिक उर्जा साधनांची आवश्यकता

भारतात अफाट प्रमाणात अपारंपारिक उर्जा साधने आहेत. ते पुनर्भव उर्जास्त्रोत आहेत. ते पर्यावरणपूरक, प्रदूषणरहित असून मोफत मिळतात. त्यांचे ग्रामीण व शहरी भागात सहजपणे वितरण करता येते. भारतात अलिकडे विद्युतशक्तीचा वापर वाढला आहे. यासाठी जलदगतीने पर्यायी उर्जास्त्रोतांचा विकास करणे गरजेचे आहे.

विद्युतशक्तीची कमतरता

अलिकडच्या काळात भारतात भेडसावणाऱ्या समस्यांपैकी विद्युतशक्तीच्या कमतरतेची समस्या ही एक आहे. या पूर्वी उल्लेख केल्यानुसार मागणी प्रमाणे विद्युतशक्तीचे उत्पादन केले जात नाही. त्यामुळे विद्युतशक्तीची कमतरता मोठ्या प्रमाणात दिसून येते. याचा प्रतिकूल परिणाम उद्योगधंदे, शेती, वाहतूक, व्यापार इत्यादिंवर होत आहे.

कारणे - भारतातील उर्जेच्या कमतरतेची कारणे

1. भारतात कमी प्रमाणात पेट्रोलियमच्या तेलविहिरी आहेत.
2. हलक्या प्रतिचा कोळसा
3. अवकाळी पाऊस व जलविद्युत निर्मितीसाठी पाण्याची कमतरता
4. वीज वाहून नेण्याच्या प्रक्रिये मध्ये होणारे विद्युतशक्तीचे नुकसान
5. अपारंपारिक उर्जासाधनांचा कमी प्रमाणातील उपयोग

निवारण्याचे उपाय -

विद्युतशक्तीची उणीव भरून काढण्यासाठी उपाय योजना

1. देशातील कोळसा व पेट्रोलियमचे उत्पादन वाढविणे.
2. कोळसा व पेट्रोलियम या बदल्यात पर्यायी उर्जा साधनांचा उपयोग करण्यास योग्य पावले उचलणे.

www.textbookpdf.in

3. जलविद्युतशक्तीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी प्रोत्साहन देणे.
4. अपारंपारिक उर्जा साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर करणे.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. _____ हा अत्यंत महत्त्वाचा मिश्रधातू आहे.
2. _____ हा ॲल्युमिनियमचा कच्चा धातू आहे.
3. _____ हे भारतातील महत्त्वाचे अधातू खनिज आहे.
4. _____ हे वनस्पतिज पदार्थांपासून बनलेले खनिज आहे.
5. शिवनसमुद्र जलविद्युतकेंद्र _____ या राज्यात आहे.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. खनिज व खाणकाम यांची व्याख्या सांगा.
2. मँगनीजचे प्रमुख उपयोग कोणते?
3. भारतात बॉक्साईटचे उत्पादन करणाऱ्या प्रमुख राज्यांची नावे लिहा.
4. उर्जासाधने म्हणजे काय? भारतात शक्तीसाधनांचे महत्त्व कोणते ? त्याचे विवरण करा.
5. भारत देशात पेट्रोलियमची विभागणी कशी झाली आहे? सविस्तर लिहा.
6. भारतातील अणुउर्जा निर्मिती केंद्रांची नावे लिहा.
7. तामिळनाडू राज्यातील प्रमुख जलविद्युत केंद्र कोणती?

III. उपक्रम :

1. भारताचा नकाशा काढून त्यात पेट्रोलियम व अणुउर्जा उत्पादन केंद्रे दाखवून नावे लिहा.
2. भारताचा नकाशा काढून प्रमुख जलविद्युतकेंद्रे दाखवा.

IV. प्रकल्प :

1. भारतात आढळणाऱ्या खनिजांच्या नमुन्यांचा संग्रह करा व त्यावर टीपा लिहा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 9

वाहतूक आणि दळणवळण

या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया

- **वाहतुकीचा अर्थ व महत्त्व**
- **भारतातील वाहतुकीचे प्रकार**
  - **1) भूमार्ग वाहतूक व त्याचे प्रकार**
  - **2) जलमार्ग वाहतूक व त्याचे प्रकार**
  - **3) वायुमार्ग वाहतूक व त्याचे प्रकार**
- **दळणवळण - अर्थ,महत्त्व व प्रकार**

वाहतूकीचा अर्थ व महत्त्व

अर्थ : वस्तू, सेवा व प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याच्या व्यवस्थेला 'वाहतूक' असे म्हणतात. यामुळे स्थळकाळाची उपयुक्तता वाढते. उत्पादन, वितरण व विनिमय यांच्याशी संबंधित सर्व घटक जोडले जातात.

महत्त्व: प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्रातील मानवाच्या सर्व उपक्रमातील विकासात वाहतूक ही प्रमुख भूमिका बजावते. म्हणून शेती व उद्योगधंचे हे देशाच्या पाठीचा कणा व स्नायू असतात. तर वाहतूक मार्ग हे रक्तवाहिन्यांप्रमाणे कार्यरत असतात. अशी म्हण प्रचलित आहे.

माफक वाहतूक दर व सक्षम वाहतूक, शेती व साधनसंपत्तीच्या विकासाला पूरक ठरतात. उद्योगधंद्याच्या विकासाला प्रोत्साहन मिळते बाजारपेठांचा विस्तार, देशी व विदेशी व्यापाराचा विकास उद्योगाच्या संधी, जनतचे उत्पन्न व राहणीमान यात सुधारणा, पर्यटन क्षेत्राचा विकास व संरक्षण यंत्रणेलासुद्धा सहाय्य होते.

वाहतुकीचे प्रकार

वाहतुकीचे प्रकार समजून घेण्यासाठी खालील तक्त्याचा उपयोग होतो.

वाहतूक

भूमार्ग वाहतूक	जलमार्गवाहतूक	वायूमार्गवाहतूक
i) रस्ता वाहतूक	i) अंतर्गत जलवाहतूक	i) राष्ट्रीय हवाई वाहतूक
ii) रेल्वे वाहतूक	ii) सागरी जलवाहतूक	ii) आंतरराष्ट्रीय हवाईवाहतूक
iii) नळमार्ग वाहतूक (Pipeline Transport)		

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

i) भूमार्ग-वाहतूक :

भारतात प्राचीन काळापासून रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. ही एक सार्वत्रिक वाहतूक व्यवस्था आहे. ही देशाच्या आर्थिक विकासात प्रमुख भूमिका बजावते. भारत हा खेड्यांचा देश असून प्रामुख्याने शेतीप्रधान देश आहे. भारतातील शेती व ग्रामीण प्रदेशातील उद्योधंद्यांच्या विकासासाठी रस्ते महत्त्वाचे ठरतात. कारण देशातील कानाकोपऱ्यातल्या खेड्यांबरोबर संपर्क साधण्यासाठी रस्ते फारच उपयुक्त आहेत.

दुर्गम भागात म्हणजे अरण्ये, पर्वत, दऱ्या या ठिकाणी पण रस्त्यांची निर्मिती करता येते. रस्त्यामुळे कोणतेही खेडे शहरांबरोबर जोडता येते. घरोघरी वस्तू व सेवांचा पुरवठा करू शकतो. रस्ता वाहतूक ही रेल्वे, जल व वायूमार्ग वाहतुकीला पूरक अशी वाहतूक आहे. ही वाहतूक पर्यटन, व्यापार, वाणिज्य व उद्योगधंद्यातील विकासाला सहाय्यक ठरते. उद्योगाच्या संधी उपलब्ध होतात. संरक्षण खात्याला सीमेवरील वाहतुकीसाठी रस्ते फार उपयुक्त आहेत.

रस्त्यांचे प्रकार -

रस्ते बांधणीच्या पद्धतीनुसार त्यांची दोन प्रकारात विभागणी करतात.

i) पक्के रस्ते : सिमेंट काँक्रिट व डांबराचा वापर करून पक्क्या रस्त्यांची निर्मिती करतात.

ii) कच्चेरस्ते : हे रस्ते माती व खडकापासून तयार करतात. खेड्यांमध्ये अशा प्रकारचे रस्ते दिसून येतात.

खेड्यातील कच्च्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये 'प्रधानमंत्री ग्रामसडक योजना' ही एक योजना कार्यान्वित आहे. रस्त्यांची निर्मिती व व्यवस्थापन यावर आधरित त्याची पाच प्रकारात विभागणी करतात.

1) सुवर्ण चतुर्भुजा महामार्ग व सुपर राष्ट्रीय महामार्ग
2) राष्ट्रीय महामार्ग 3) राज्य महामार्ग
4) जिल्हा रस्ते 5) ग्रामीणरस्ते

1) सुवर्ण चतुर्भुजा महामार्ग सुपर राष्ट्रीय महामार्ग

ही एक चौपदरी ते सहापदरी रस्ता निर्मितीची योजना आहे. 1999 मध्ये या योजनेचा प्रारंभ झाला आहे. देशातील अनेक प्रमुख शहरे व सांस्कृतिक तसेच औद्योगिक केंद्रांशी या रस्त्याच्या जाळ्यांमुळे संपर्क साधणे शक्य झाले आहे. दिल्ली - जयपूर - अहमदाबाद -

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

सुरत - मुंबई - पुणे बेंगळूर - चैन्नई - विशाखापट्टण - भुवनेश्वर-कोलकत्ता अहमदाबाद - कानपूर - दिल्ली ही शहरे या रस्त्यामुळे जोडली जातात.

सुपर राष्ट्रीय महामार्गाचे दोन भाग आहेत.

a) उत्तर - दक्षिण - कॉरिडोर - श्रीनगरपासून कन्याकुमारी पर्यंत हा रस्ता विस्तारला आहे.

b) पूर्व-पश्चिम कॉरिडोर - आसाममधील सिलचारपासून गुजराथमधील पोरबंदरपर्यंत हा रस्ता विस्तारला आहे. हे रस्ते अनेक प्रमुख शहरे, औद्योगिक केंद्रे व बंदरांना जोडतात.

या रस्त्यांची निर्मिती व व्यवस्थापन याची जबाबदारी 'भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण' (National High Way Authority of India) यांच्याकडे आहे.

ii) राष्ट्रीय महामार्ग -

राज्यातल्या राजधानीपासून प्रमुख प्रमुख बंदरे व राष्ट्रीय पातळीवरील मुख्य शहरांना हे महामार्ग जोडले जातात. याची निर्मिती व व्यवस्थापन केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खाते (central public works department) यांच्याकडे आहे.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

iii) राज्य महामर्ग -

हे रस्ते राज्यातल्या राजधानी व जिल्ह्याचे ठिकाण व राष्ट्रीय महामार्गांना जोडतात. या महामार्गाची निर्मिती व व्यवस्थापन राज्यातील सार्वजनिक बांधकाम खाते (public works department) यांच्याकडे आहे.

iv) जिल्हारस्ते (District Roads)

याचे व्यवस्थापन जिल्हा पंचायतीकडे असते. जिल्हा केंद्रे ते तालुक्याचे ठिकाण, राज्य महामार्ग व रेल्वे स्थानके यांना हे रस्ते जोडतात.

v) ग्रामीण रस्ते : प्रत्येक खेडयांना जोडणारा हा रस्ता असतो. तालुक्याचे ठिकाण, प्रमुख शहरे व बाजारपेठांना हे जोडले जातात. जास्तीत जास्त ग्रामीण रस्ते हे कच्चे असतात. पावसाळ्यात वाहतुकीसाठी त्रासाचे व अडचणीचे ठरतात. या रस्त्यांचे पक्क्या रस्त्यात रूपांतर करण्यचे प्रयत्न सुरु आहेत.

हे तुम्हाला माहित आहे का ?

- **No.** 7 - हा राष्ट्रीय महामार्ग भारतातील सर्वात जास्त लांबीचा महामार्ग आहे.
- मनाली - लेह रस्ता हा जगातील अत्यंत उंचीवरील रस्ता आहे.

सरहद्दीचे रस्ते : देशाच्या सीमेवर संरक्षण खात्याच्या वापरासाठी हे रस्ते तयार करतात. पाकीस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश व म्यानमार या ठिकाणी भारताच्या सीमेवर हे रस्ते दिसून येतात. यांची निर्मिती व व्यवस्थापन 'सीमा रस्ते विकास प्राधिकरण' यांच्याकडे आहे.

ii) रेल्वे वाहतूक :

ही भारतातील एक महत्त्वाची भूमार्ग वाहतूक आहे. जास्त प्रमाणात वस्तूंची ने आण करणे, जास्त प्रमाणात प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाण्यास रेल्वे वाहतूक फारच उपयुक्त आहे. शेती, उद्योगधंदे व भारताच्या आर्थिक विकासात रेल्वेची भूमि का फार महत्वाची ठरली आहे. या शिवाय देशाचा व्यापार व पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी मदत झाली आहे.

रेल्वेमार्गाची निर्मिती ब्रिटीश काळातच सुरु झाली होती. दुष्काळी भागात अन्नधान्याचा व चाऱ्याचा पुरवठा करणे, सैन्याची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रवानगी करणे ही रेल्वेमार्गाची मुख्य उद्दिष्टे होती. भारतात इ.स. 1853 मध्ये ठाणे ते मुंबईया मार्गावर पहिली रेल्वे सुरु झाली. नंतर कोलकत्ता-राणीगंज (1854) मद्रास-अर्कोणम (1864) या रेल्वेमार्गांची निर्मिती झाली नंतर क्रमाक्रमाने देशाच्या इतर भागात रेल्वेमार्गांची निर्मिती करण्यात आली.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

रेल्वे वाहतूक ही एक भारतातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था आहे. आज भारतात 64,015 कि.मी. लांबीचे रेल्वेमार्ग असून सुमारे 7031 रेल्वेस्थानके आहेत. दक्ष कारभार व सुलभ व्यवस्थापनासाठी रेल्वेची 16 विभागात विभागात विभागणी केली आहे. सुरक्षित व आनंददायी रेल्वेच्या प्रवासासाठी अनेक उपाय योजना आखल्या गेल्या आहेत.

iii) नळमार्ग वाहतूक (Pipelines Taransport)

नळमार्ग हा एक नवीन वाहतुकीचा प्रकार आहे. जमीन पोखरून त्याच्याखाली नळमार्ग तयार केले जातात. कच्च्या तेलाची तेलशुद्धीकरण कारखान्यापर्यंत वाहतूक, नैसर्गिक वायू व चिखल रुपातील खनिजे यांची वाहतूक करण्यासाठी नळमार्गांचा वापर करतात. भारतात एकूण 35,676 कि.मी. लांबीचा नळमार्ग आहे.

हे तुम्हाला माहिती असू दे :
हाजिरा - विजयपूर - जगदीशपूर (HBJ) हा भारतातील सर्वात जास्त लांबीचा नळमार्ग आहे. (2300 कि.मी.)

2) जलमार्ग वाहतूक :

जगामध्ये प्राचीन काळापासून जलमार्ग वाहतुकीची व्यवस्था प्रचलित आहे. भारतात पण प्राचीन काळापासून जलमार्गांचा उपयोग होत अहे. जलमार्गात जहाज, बोट व होडी यांचा वापर करतात.

जलमार्ग वाहतुकीचे दोन प्रकार आहेत. i) अंतर्गत जलमार्ग ii) सागरी जल मार्ग

i) अंतर्गत जलमार्ग : नद्या, सरोवरे, कालवे, पश्चजल (Back Water) यातून अंतर्गत जलवाहतूक केली जाते प्राचीन काळात भारत देशामध्ये अंतर्गत जलवाहतुकीस फार महत्त्वाचे स्थान होते. आज रस्ते व रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणामुळे त्याचे महत्त्व कमी होत आहे. भारतात अंतर्गत जलमार्गाचा उपयोग वस्तू व प्रवाशांची ने आण करण्यासाठी करतात. गंगा, ब्रम्हपुत्रा व त्यांच्या उपनद्यांद्वारे ही जलमार्ग वाहतूक सुरु होती. दक्षिण भारतात नदी मुखा जवळील प्रदेशात हा मार्गआढळून येतो.

ii) सागरी जल मार्ग : समुद्र व महासागर यांच्यामार्फत सुरु असलेल्या जलवाहतुकीला सागरी मार्ग असे म्हणतात. भारताला लांबलचक किनारपट्टी लाभलेली असून काही नैसर्गिक बंदरे आहेत. भारत देश पूर्वगोलार्धाच्या मध्यभागी वसलेला आहे. आमचा

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जवळजवळ 85% विदेशी व्यापार हा सागरीमार्गाने होतो. हे सर्व घटक सागरी वाहतुकीला पूरक ठरले आहेत.

बंदरे : वस्तू गोदीतून जहाजात चढविणे व उतरविणे यासाठी जहाज थांबण्याच्या ठिकाणाला 'बंदर' असे म्हणतात. भूमार्ग वाहतूक व सागरीमार्ग या ठिकाणी जोडले जातात. भारतात अनेक बंदरे आहेत त्यात प्रमुख, मध्यम व लहान बंदरे अशी विभागणी केली आहे प्रमुख बंदरात मोठी जहाजे थांबण्यासाठी व नांगर टाकण्याची सोय असते त्याला 'धक्का' म्हणतात. बंदरात गोदीतून मालवाहू जहाजात वस्तूंची चढउतार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतात 14 प्रमुख बंदरे आहेत. त्यात 6 पश्चिम किनारपट्टीवर व 7 पूर्व किनारपट्टीवर व एक अंदमान निकोबार या बेटावर आहे.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

पश्चिमकिनारपट्टी वरील प्रमुख बंदरे

कांडला : हे गुजराथमधील कच्छ आखाताच्या वरच्या भागात आहे.

मुंबई : ते एक मोठे प्रमुख बंदर आहे येथे विशाल अशी जागा उपलब्ध असून जहाजे थांबण्यासाठी धक्क्यांची उत्तम सोय आहे. हे बंदर महाराष्ट्रात असून त्याला 'भारताचे प्रवेशद्वार' असे म्हणतात.

जवाहरलाल नेहरू बंदर : यापूर्वी या बंदराला 'न्हावाशेवा बंदर' असे म्हणत होते. हे मुंबईपासून 10 कि.मी. अंतरावर असून एलिफंटा गुहे जवळ आहे. मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी हे बंदर तयार केले आहे.

मार्मगोवा : हे गोवा राज्यातील 'झुआरी' नदी मुखाजवळ आहे.

नवे मंगळूर : याला 'कर्नाटकचे प्रवेशद्वार' असे म्हणतात. हे मंगळूरच्या उत्तरेला पनंबून येथे वसलेले आहे.

कोचीन : हे केरळच्या समुद्र किनाऱ्यावर आहे. या बंदरास 'अरबी समुद्राची राणी' म्हणतात

पूर्व किनारपट्टीवरील प्रमुख बंदरे

तुतीकोरिन : हे तामिळनाडूच्या किनाऱ्यावरील आग्नेय भागात वसले आहे.

चेन्नई : हे तामिळनाडू मधील अतिशय जुने व कृत्रिम बंदर आहे.

एन्नोर : चेन्नई बंदरावरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने याची निर्मिती झाली आहे. चेन्नई बंदराच्या उत्तर भागात हे बंदर आहे.

विशाखापट्टण : हे आंध्र प्रदेशातील किनारपट्टीवरील बंदर असून सभोवती भूभागाने व्यापलेले असून खोल व सुरक्षित बंदर अशी त्याची ख्याती आहे.

पारादीप : ओडीशाच्या नदीमुखाच्या भागातील हे बंदर आहे.

हाल्डीया : हुग्ळी व हाल्डी नद्यांच्या संगमावर हे बंदर वसलेले आहे (पश्चिम बंगाल) कोलकत्ता बंदरात प्रवेश करू न शकणारी मोठी जहाजे येथे थांबतात.

कोलकत्ता : हुग्ळी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर हे बंदर आहे. हे नदी तीरावरील बंदर असून भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे बंदर आहे. आग्नेय आशियाशी व्यापार करण्यासाठी हे प्रमुख सागरी बंदर आहे हुग्ळी नदीत वारंवार गाळ साचत असल्याने जहाज वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. नदीतील गाळ काढण्याचे काम त्वरित हाती घेणे गरजेचे आहे.

पोर्टब्लेअर : हे एक केंद्रशासित प्रदेशातील बंदर असून ते अंदमान निकोबार बेटात आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3) वायूमार्ग वाहतूक :

हा एक वेगवान असा वाहतुकीचा प्रकार आहे. टपाल व प्रवाशांना नेण्यासाठी व आणण्यासाठी उपयुक्त आहे. युद्धे, महापूर, भूकंपासारख्या आपत्ती काळात या वाहतुकीचा फार उपयोग होतो. भारत हा एक विशाल देश असून येथे हवाई वाहतुकीच्या विकासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध आहे.

आज भारतात प्रमुख हवाई वाहतुकीचे व्यवस्थापन व नियमन करणाऱ्या दोन प्रमुख संस्था आहेत.

i) एअर इंडिया इंटरनॅशनल : ही संस्था भारत व जगातील इतर देशांना हवाई वाहतुकीची सेवा पुरविते.

ii) इंडियन एअरलाईन्स : ही संस्था भारतात देशांतर्गत व इतर शेजारील देशांना हवाई वाहतुकीची सेवा पुरविते.

आज भारतात ही सेवा खाजगी क्षेत्रांकडे सोपविली आहे. सरकारचा परवाना घेऊन काही खाजगी संस्था हवाई वाहतुकीची सेवा पुरवित आहेत. उदा. जेट एअरवेज सहारा, पॅरामाऊंट, वायूदूत सेवा वगैरे.

विमानतळ -

भारतात 141 विमानतळ आहेत. त्यात 28 आंतरराष्ट्रीय व 88 देशांतर्गत व 25 वायूसेनेशी संबंधित संरक्षणखात्याची विमानतळ आहेत.

काही आंतरराष्ट्रीय विमानतळांची नावे

1. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ - दिल्ली
2. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ - मुंबई
3. नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ - कोलकत्ता
4. अन्ना आंतरराष्ट्रीय विमानतळ - चेन्नई
5. केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ - बेंगळूरु
6. राजीवगांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ - हैद्राबाद
7. श्रीगुरु रामदासजी आंतरराष्ट्रीय विमानतळ - अमृतसर
8. लोकप्रिय गोपीनाथ बागेलोयी आंतरराष्ट्रीय विमानतळ - गुवाहाटी
9. बिजू पटनाईक आंतरराष्ट्रीय विमानतळ - भुवनेश्वर
10. सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळ - अहमदाबाद
11. वीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळ - पोर्टब्लेअर

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

12. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ - नागपूर

13. झारूकी आंतरराष्ट्रीय विमानतळ - शिलाँग

14. लालबहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळ - वाराणसी



दळणवळण (संपर्क माध्यमे)

एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे किंवा एकाठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बातम्यांची देवाणघेवाण करणे यालाच दळणवळण (संपर्क माध्यमे) असे म्हणतात. यात अलिकडे नवनवीन संशोधनाची भर पडत आहे. प्राचीन काळी संदेश पोहचविण्यासाठी प्राणी व पक्षांचा उपयोग करीत असत.

महत्त्व

सरकारचे धोरण व विकासाच्या योजना याबद्दल जनजागृती करण्यास संपर्क माध्यमे मदत करतात. नैसर्गिक आपत्ती व इतर संकटांना तोंड देण्यास हवामान स्थितीची पूर्वसूचना

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आम्हाला मिळते. व्यापार, उद्योगधंदे, शेती व वाणिज्य इ.च्या विकासात यांची मदत होत आहे. मनोरंजन व जगातील दैनंदिन घडामोडींची माहिती मिळते. देशातील ऐक्य व अखंडता टिकविण्यासाठी दळणवळण महत्त्वाचे ठरते.

आज भारतात विविध प्रकारची दळणवळणाची साधने दिसून येतात. त्यांची दोन प्रकारात विभागणी करतात ती म्हणजे. i) वैयक्तिक संपर्क माध्यमे ii) सामूहीक संपर्क माध्यमे

टपाल, टेलिग्राम, टेलिफोन (दूरध्वनी), फॅक्स, इ-मेल, इंटरनेट, सेमिनार, परिषद इ. वैयक्तिक दळणवळणाची साधने आहेत.

वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन, पुस्तके ही सामूहिक संपर्क माध्यमे (दळणवळणसाधने) आहेत.

टपालसेवा

भारतात टपालसेवा ही प्राचीन काळापासून संपर्क माध्यम म्हणून अस्तित्वात आहे. पोस्टखाते अनेक सेवा पुरवितात. उदा. पत्रे, पार्सल, लिफाफा, मनिऑर्डर इत्यादि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचविणे याबरोबर बचत खाते, कायम ठेव (F.D.) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (N.S.C.) इत्यादि सेवा पुरवितात.

दूरध्वनी संपर्क (Teli Communication)

टेलिग्राम (तार), टेलिफोन व फॅक्स इत्यादि सेवा केबलमार्फत पोहचविणे यालाच 'टेलिकम्युनिकेशन') म्हणतात. आज देशातील सर्व भागात दूरध्वनी सेवा उपलब्ध आहे टेलिफोन व मोबाईलची सुविधा - टेलिग्राम ऐवजी सुरु झालेली सेवा असून व्यापक प्रमाणात त्याचा उपयोग होत आहे.

आकाशवाणी व दूरदर्शन : आज जनसंवाद माध्यमात आकाशवाणी व दूरदर्शन यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. देशातील कानाकोपऱ्यात राहणारे लोक रेडिओ वरच्या बातम्या ऐकू शकतात व दूरदर्शनवरील बातम्या पाहू शकतात. त्यामुळे ग्रामीण प्रदेशातल्या लोकांना ही माध्यमे फारच उपयोगी आहेत. कारण शेतकऱ्यांना कृषिविषयक समस्या, शेतीमालाचा दर, हवामानाची पूर्वसूचना व आधुनिक कृषिपद्धत याविषयी नवनवीन माहिती मिळते. या शिवाय ज्ञान, मनोरंजन व माहितीवर आधारित अनेक कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात. आकाशवाणीला 1936 मध्ये 'All India a Radio' असे नाव मिळाले 1959 मध्ये दिल्ली दूरदर्शन (D.D.National) ही सेवा सुरू झाली आहे.

www.textbookpdf.in

वृत्तपत्रे : ही मुद्रण माध्यमे असून महत्त्वाची व प्रचालित अशी संपर्क साधने आहेत. भारतात दररोज सुमारे एक लाख वृत्तपत्रे व नियतकालिके विविध भाषांमध्ये प्रसारित होतात. त्यामध्ये 41 वृत्तपत्रे ही 100 वर्षापूर्वी पासूनची आहेत. गुजराती भाषेतील 'बॉंबेसमाचार' (आज मुंबई समाचार) हे भारतातील अतिप्राचीन व आजपर्यंत आपले अस्तित्व टिकवून ठेवलेले वृत्तपत्र आहे. 1822 पासून हे वृत्तपत्र सुरू झाले आहे.

उपग्रह व संगणकाचे जाळे : इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान व अवकाश केंद्रातील वैज्ञानिक संशोधनाने संपर्क माध्यमात क्रांतीकारक बदल होऊ लागले आहेत. संगणकाच्या जाळ्यामुळे इंटरनेट, इ-मेल सेवा, फॅक्स या सेवा पुरविल्या जातात. कृत्रिम उपग्रहांद्वारे जागतिक संपर्क माध्यमाच्या इतिहासात नवीन युग निर्माण झाले आहे. भारतभर आकाशवाणी व दूरदर्शनच्या प्रसारात उपग्रह तंत्रज्ञान बहुमोलाचे ठरत आहे.

भौगोलिक माहिती व्यवस्था (Geographical Information system), जागतिक स्थिती निर्धारण प्रणाली (Global positioning system) व दूरसंवेदी (Remot sensing technology) तंत्रज्ञान यांची भारतात फार प्रगती झालेली दिसून येते.

भौगोलिक माहिती व्यवस्था (GIS) ही पृथ्वीच्या पृष्ठभागावरील माहिती सांगणारी व माहितीचा संग्रह करणारी एक संगणकीय व्यवस्था आहे. जागतिक स्थिती निर्धारण प्रणाली मुळे (GPS) पृथ्वीवरील स्थिर संपत्ती व चल संपत्ती आणि व्यक्तीचे स्थान निर्धारित करता येते. ही व्यवस्था संकेतावर आधारित आहे. या मध्ये अक्षांश, रेखांश व समुद्र सपाटीपासून उंची याच्या आधारे स्थान निश्चित करतात.

दूरसंवेदी (RST) तंत्रज्ञानाच्या आधारे पृथ्वीवरील माहिती संवेदनाद्वारे संग्रहित करतात. ही एक वस्तू, ठिकाण व वैशिष्ट्ये यांना थेट स्पर्श न करता दूरुनच अत्यंत संबंधित माहिती संग्रहित करणारी व्यवस्था आहे. दूरसंवेदी तंत्रज्ञानाच्या आधारे हवाई चित्रे व उपग्रहाद्वारे छायाचित्रे काढली जातात.

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. भारतातील ग्रामीण व कृषी विकासासाठी _____ ही वाहतूक अत्यावश्यक आहे.
2. भारतातील पहिला रेल्वे मार्ग _____ व _____ या दरम्यान निर्माण करण्यात आला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. बेंगळूरमधील आंतरराष्ट्रीय विमानतळाला _____ असे म्हणतात.
4. बाँबे समाचार हे वृत्तपत्र _____ मध्ये सुरू झाले.
5. _____ बंदराला 'भारताचे प्रवेशद्वार' म्हणतात.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. वाहतूक व दळणवळण म्हणजे काय?
2. सुवर्ण चतुर्भुजा महामार्ग व सुपर राष्ट्रीय महामार्ग यावर सविस्तर माहिती लिहा.
3. भारतातील रेल्वेमार्ग वाहतुकीचे वर्णन करा.
4. जलमार्ग वाहतुकीचे महत्त्व थोडक्यात वर्णन करा.
5. भारतातील वायुमार्ग वाहतूक यावर टीप लिहा.
6. भारतातील विविध दळणवळण साधनांची नावे लिहा.

III. उपक्रम :

1. भारताचा नकाशा काढून त्यात राष्ट्रीय महामार्ग दाखवा व त्यांची नावे लिहा.

IV. प्रकल्प:

1. भारतातून प्रक्षेपित झालेल्या उपग्रहांची छायाचित्रे गोळा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 10

भारतातील उद्योगधंदे

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया

- **उद्योगधंद्याचा अर्थ व महत्त्व**
- **उद्योगधंद्याचे स्थायीकरण**
- **भारतातील प्रमुख औद्योगिक प्रदेश**
- **भारतातील प्रमुख उद्योगधंदे - लोह पोलाद उद्योग, ॲल्युमिनियम, सुतीवस्त्रोद्योग, साखर व कागद उद्योग, ज्ञानाधारित उद्योगधंदे**

उद्योग धंद्यांचा अर्थ व महत्त्व

उपलब्ध असलेली विविध नैसर्गिक साधन संपत्ती व कच्च्या मालाचा थेट उपयोग करून घेता येत नाही. त्यावर प्रक्रिया करून त्याचे शुद्धीकरण करावे लागते. उदा. ऊसापासून साखर, कच्च्या लोखंडाचे पोलाद, कापसापासून कापड, लाकडाच्या लगद्यापासून कागद याप्रमाणे परिवर्तन करावे लागते. या प्रमाणे कच्च्यामालाचे जास्त उपयुक्त अशा पक्क्या मालामध्ये परिवर्तन करण्याच्या प्रक्रियेला उद्योगधंदे असे म्हणतात.

उद्योगधंद्यांमुळे देशाचा आर्थिक विकास होतो. त्याच्याविकासामुळे प्राथमिक गरजेच्या वस्तूंची निर्मिती होऊन त्यांची आयात कमी होते. राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात वाढ होते. देशाला परकीय चलन मिळते. उद्योगांच्या संधी निर्माण होतात. GDP (Gross Domestic Product - देशात एका वर्षात उत्पादन झालेल्या वस्तू व सेवांची एकूण किंमत) वाढतो. आणि लोकांचे राहणीमान सुधारते. शेतीवरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होते.

उद्योगधंद्याचे स्थायिकरण

उद्योगधंद्याचे स्थायीकरण व विकासासाठी काही घटक कारणीभूत असतात. उद्योगधंद्याच्या स्थायीकरणावर परिणाम करणारे घटक म्हणजे 1) कच्च्या मालाचा मुबलक पुरवठा 2) उर्जा व इंधनाची उपलब्धता 3) वाहतूक व दळणवळण साधनांची व्यवस्था 4) बाजारपेठांची सोय 5) भांडवल 6) कामगार व पाण्याची उपलब्धता 7) अनुकूल हवामान 8) सरकारचे धोरण.

प्रमुख औद्योगिक प्रदेश

एकाच प्रकारचे किंवा विविध प्रकारचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात एकाच ठिकाणी स्थापित झालेले असतात. त्या प्रदेशाला 'औद्योगिक प्रदेश' असे म्हणतात. उद्योगधंदे व

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

उद्योगधंद्यातील विविध उपक्रम हे जास्तीतजास्त शहरी भागात आढळून येतात. उद्योगधंद्याच्या स्थायीकरणासाठी पूरक असणाऱ्या ठिकाणी हे औद्योगिक प्रदेश असतात.

भारतात एकूण 8 प्रमुख औद्योगिक प्रदेश आहेत. ते म्हणजे

1) हुगळी कोलकत्ता प्रदेश
2) मुंबई पुणे प्रदेश
3) अहमदाबाद वडोदराप्रदेश
4) मदुराई कोईमतूर - बेंगळूरु प्रदेश
5) छोटा नागपूरचा पठारी प्रदेश
6) दिल्ली - मीरत प्रदेश
7) विशाखापट्टण - गुंटूर प्रदेश
8) कोल्लम - तिरुवनंतपूर प्रदेश

भारतातील प्रमुख उद्योगधंदे

1) लोखंड व पोलाद उद्योग - याला 'मूल उद्योग' असे म्हणतात. याला कारण म्हणजे हे उद्योगधंदे यंत्रसामुग्री, रेल्वे, जहाजबांधणी, विद्युतयोजना, पाणीपुरवठायोजना इमारतींची निर्मिती, गृहनिर्मिती इ. अनेक उद्योगांना आवश्यक कच्च्यामालाचा पुरवठा हे उद्योग करतात. हे भारतातील लोहआधारित प्रमुख उद्योगधंदे आहेत कच्चे लोखंड वितळवून त्याचे लोखंड बनविण्याची कला भारतीयांना प्राचीन काळापासूनच अवगत होती. दिल्लीमधील कुतुबमीनारचे लोहस्तंभ हे याचे उत्तम उदाहरण आहे.

भारतातील पहिला लोह पोलाद उद्योग 1874 मध्ये पश्चिम बंगालमधील 'कुल्टी' येथे स्थापन करण्यात आला. परंतु वास्ताविक पाहता लोह पोलाद उद्योग सुरु करण्याचे श्रेय जे. एन्.टाटा यांना मिळते. त्यांनी 1907 मध्ये झारखंड राज्यातील साक्ची (जमशेटपूर) जवळ टाटा लोखंड व पोलाद कारखान्याची स्थापना केली स्वातंत्र्यानंतर या उद्योगधंद्याला जास्त चालना मिळाली. या उद्योगांच्या प्रगतीसाठी पंचवार्षिक योजनांमध्ये योग्य ती तरतूद केली आहे.

लोखंड व पोलाद उद्योग धंद्याचे स्थायीकरण म्हणजे

i) कच्च्या लोखंडाचा पुरवठा
ii) मुख्य इंधन म्हणजे कोकिंग कोळसा व जलविद्युतशक्तीचा पुरवठा
iii) रेल्वे वाहतूक व बंदरांची सोय
iv) पाण्याचा योग्य पुरवठा

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

v) कमी वेतनात मिळणारे अनुभवी मजूर

vi) भांडवल व स्थानिक बाजारपेठेची सोय

उत्पादन केंद्रे

आज भारतात 14 प्रमुख लोहपोलाद उद्योग आहेत. त्यामध्ये 4 खाजगी क्षेत्रातील व 10 सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे आहेत.

खाजगी क्षेत्र

1) टाटा लोह पोलाद उद्योग (TISCO) जमशेटपूर (साक्ची) झारखंड

2) जिंदाल विजयनगर पोलाद लि. (JVSL) तोरणगल - बळ्ळारी जिल्हा - कर्नाटक

3) इस्पात लोहपोलाद लिमिटेड - दोलवी - रत्नागिरी जिल्हा - महाराष्ट्र

4) दुबारी पोलाद कारखाना - गोपाळपूर (NINL) ओडीशा

सार्वजनिक क्षेत्र

1) इंडियन आयर्न अँड स्टील कंपनी लिमिटेड (IISCO) बर्नपूर - पश्चिम बंगाल

2) विश्वेश्वरय्या लोखंड व पोलाद कंपनी (VISL) भद्रावती - कर्नाटक

3) हिंदुस्थान पोलाद लिमिटेड भिलाई, - दुर्ग जिल्हा, छत्तीसगड

4) हिंदुस्थान पोलाद लिमिटेड, रुरकेला सुंदरगढ जिल्हा, ओडिशा

5) हिंदुस्थान पोलाद लिमिटेड, दुर्गापूर-पश्चिम बंगाल

6) बोकारो पोलाद कारखाना, झारखंड

7) सेलम पोलाद कारखाना, सेलम - तामिळनाडू

8) विशाखापट्टण पोलाद कारखाना, विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश

9) दाईतरी पोलाद कारखाना पारादीप जवळ, ओडिशा

10) टाटा पोलाद कारखाना, ओडिशा कलिंगनगर

याशिवाय देशाच्या विविध भागात 199 पेक्षा जास्त लघु पोलादाचे कारखाने आहेत. पोलाद उत्पादनामध्ये जगात भारत देश 8 व्या क्रमांकावर आहे.

2. अल्युमिनियम उद्योग

अल्युमिनियम हा एक प्रमुख लोखंडेतर धातू आहे. हा विविधोपयोगी धातू आहे. याचा उपयोग विमाने, स्वयंचलित वाहने, रेल्वे वाहतूक, जहाज, रंग तयार करणे, गृहोपयोगी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

वस्तू तयार करणे, विविध प्रकारच्या उद्योगधंद्यामध्ये, विद्युत तारा तयार करणे, याचा पत्रा पॅकिंग करण्यासाठी वापरला जातो. याचा वापर पोलाद व तांब्याचा पर्याय म्हणून करतात.



ॲल्युमिनीयमच्या स्थायीकरणासाठी पुढील घटक आवश्यक असतात. 1) बॉक्साईट सारखी मूळ कच्च्या मालाची उपलब्धता 2) जलविद्युतशक्तीचा पुरवठा 3) भांडवल व विशाल बाजारपेठ.

विभागणी

भारतात लोखंड व पोलाद उद्योगधंद्यानंतर दुसरा महत्त्वाचा लोह आधारित उद्योगघंदा म्हणजे ॲल्युमिनियम पहिला ॲल्युमिनियमचा कारखाना 1942 मध्ये पश्चिम बंगालमधील

www.textbookpdf.in

'जयकाय' या शहरात सुरु करण्यात आला. आज भारत देशात एकूण 9 ॲल्युमिनियमचे कारखाने आहेत. ते म्हणजे पश्चिम बंगालमधील जयकायनगर, केरळ मधील अलुपुरम, तामिळनाडूमधील मेहुरु, कर्नाटकमधील बेळगावी, ओडिशामधील हिराकूड व दामनजोडो उत्तर प्रदेशातील रेनूकूट, छत्तीसगडमधील कोरब व महाराष्ट्रातील रत्नागिरी इ.

ॲल्युमिनीयमच्या उत्पादनात भारत जगात 11 व्या क्रमांकाच्या देश आहे. भारताला मोठ्या प्रमाणात याची आवश्यकता असल्याने ॲल्युमिनियमची आयात करावी लागत आहे.

3. सुतीवस्त्रोद्योग

भारतातील कापड उद्योंगामध्ये सुतीवस्त्रोद्योग हा प्रमुख व मोठ्या प्रमाणातील उद्योगधंदा आहे. हा उद्योगधंदा कृषिआधारित प्रमुख उद्योगधंदा आहे. प्राचीन काळापासून भारतीयांना सुती वस्त्रे विणण्याची कला अवगत होती. परंतु ती कला हातमागावरील कापड तयार करणे एवढया पुरतीच मर्यादित होती. भारतात प्रथम 1854 मध्ये आधुनिक प्रकारची सूत गिरणी मुंबईमध्ये सुरु करण्यात आली. नंतर अनेक सूत गिरण्यांची स्थापना झाली. या उद्योगात लक्षणीय प्रगती दिसून आली. आज चीननंतर कापड उत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. सुतीवस्त्रांच्या निर्मितीमध्ये ही भारताचा दुसरा क्रमांक आहे.

कापड उद्योगधंद्याच्या स्थायीकरणासाठी खालील घटक महत्वाचे ठरतात.कापूस या कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा, मोठ्या बाजारपेठा, विद्युत पुरवठा, भांडवल, अनुभवी मजूर व दमट हवामान.

विभागणी

भारतातील विविध अशा 76 पेक्षा जास्त नगरपालिका व शहरांमध्ये सुतीवस्त्रोद्योगांची विभागणी झाली आहे. जास्त प्रमाणत कापूस पिकणाऱ्या राज्यांमध्ये हे उद्योग केंद्रीकृत झाले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, तमिळनाडू, राजस्थान, उत्तरप्रदेश, पंजाब व हरियाणा या राज्यात हे उद्योग आढळतात. यामध्ये महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये देशाच्या सुती वस्त्रांच्या उत्पादनामध्ये अग्रेसर आहेत. मुंबई हे प्रसिद्ध सुतीवस्त्रोद्योग केंद्र आहे. मुंबईला भारताचे 'कॉटनोपोलिस' व 'मँचेस्टर' म्हणतात.

4. साखर उद्योग

सुतीवस्त्रोद्योगानंतर एक प्रमुख कृषी आधारित उद्योग म्हणून साखर उद्योगाची ख्याती आहे. फार पूर्वीपासून भारतात साखरेचे उत्पादन केले जाते. परंतु, त्यावेळी गूळ व खांडसारी तयार केली जात होती. भारतात आधुनिक प्रकारची साखर 20 व्या शतकाच्या आरंभी

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

तयार होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर यात भरपूर प्रगती दिसून येऊ लागली. साखर उद्योगाच्या स्थायीकरणासाठी महत्वाचे घटक म्हणजे ऊस या कच्च्या मालाचा पुरवठा, समर्पक व कमी दरातील वाहतूक व्यवस्था, सरकारचे प्रोत्साहन, विद्युत पुरवठा, भांडवल व वाजारपेठांची उपलब्धता.

विभागणी

ऊस पिकविणाऱ्या प्रदेशात हे साखर उद्योग केंद्रीकृत झाले आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, गुजरात, पंजाब, हरियाणा, बिहार व ओडिशा या राज्यात साखर कारखाने आहेत. भारत जगात साखर उत्पादनात ब्राझीलनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

हे तुम्हाला माहित आहे का?

साखर उद्योगातून मिळणारे उपपदार्थ काकवी, ऊसाच्या रसापासून साखर तयार करण्याच्या प्रक्रियेम ध्ये मिळणारे मोलॅसिस दारू तयार करण्यासाठी व खतासाठी वापरतात. ऊसाचा चोथा (भुसा) म्हणजे ऊसाचा रस काढून घेतल्यानंतर उरलेला भाग. याचा उपयोग कागद तयार करण्यासाठी इंधन म्हणून होतो.

5. कागद उद्योग

कागद ही अत्यंत उपयोगी पडणारी वस्तू आहे. विविध उद्देशांसाठी कागदाचा उपयोग करतात. उदा. लेखन, मुद्रण, पॅकींग इ. एखाद्या देशातील साक्षरतेचे प्रमाण त्या देशात वापरल्या जाणाऱ्या कागदाच्या प्रमाणावर समजून येते.

भारतात 10 व्या शतकापासून कागद तयार करण्याची कला माहित होती. त्यावेळी याला 'कुटिरोद्योग' म्हणत होते भारत देशात आधुनिक पद्धतीचा कागद कारखाना 1932 मध्ये पश्चिम बंगाल मधील सेहरामपूर येथे स्थापन करण्यात आता. परंतु लवकरच तो बंद करण्यात आला. परंतु वास्तविक पाहता 1870 मध्ये कोलकत्त्या जवळ 'बळी' येथे कागद, कारखाना यशस्वीपणे सुरू करण्यात आला. महायुद्धानंतर व स्वातंत्र्यानंतर या उद्योगाला जास्त चालना मिळाली.

हा अरण्याधारित उद्योग आहे. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे बांबू, लाकडाचा लगदा, मृदू झाडे, बाभळी व साबाई सारखे गवत. अलिकडच्या काळात अरण्यापासून मिळणाऱ्या कच्चा मालाची कमतरता भासू लागल्यामुळे भात, गहू, बार्ली, गवत, ऊसाचा चोथा, रद्दी कागद, कापडाच्या चिंध्या यांचा वापर कागद उद्योगामध्ये कच्चा माल म्हणून केला जात आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

याशिवाय मुबलक प्रमाणात पाणी, मोठ्या वाजारपेठा, मजुरांची उपलब्धता, वाहतुकीची सोय, विद्युत व काही रसायनांचा पुरवठा इ. कागद उद्योगाच्या स्थायीकरणासाठी आवश्यक आहेत.

विभागणी

भारतात सुरूवातीला कागद उद्योगाचा विकास पश्चिम बंगालमधील हुगळी नदीच्या खोऱ्यात झाला. आज महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश व ओडिशा राज्यात कागद उद्योग आढळतात.

भारतात कागदाचे उत्पादन स्थानिक मागणीपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे कागदाची आयात करावी लागत आहे.

ज्ञानावर आधारित उद्योगधंदे

ज्ञानावर आधारित उत्पादन व सेवा यात समाविष्ट असतात. तांत्रिक व वैज्ञानिक प्रगती जलदगतीने होण्यासाठी मदत करणारे व अधिक प्रमाणात उत्पादन घेणारे हे उद्योगधंदे आहेत. यात शारीरिक श्रम, शक्ती व कच्चामालापेक्षा बौद्धिक क्षमतेची जास्त गरज आहे. ज्ञानाधारित उद्योगधंद्याच्या विकासामुळे सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर जास्त प्रभाव पडतो भारतात अधिक प्रमाणात युवा वर्ग असून त्यांच्याकडे वाढते माहिती तंत्रज्ञान आहे. त्यामुळे भारतात ज्ञानावर आधारित उद्योगधंद्याचा जलदगतीने विकास होत आहे.

माहिती तंत्रज्ञान (Information Technology) हे ज्ञानावर आधारित उद्योगधंद्याम ध्ये फार प्रभावी व महत्त्वाचे ठरत आहे. सॉफ्टवेअर व हार्डवेअर ही त्याची प्रमुख अंगे आहेत. सॉफ्टवेअर उद्योगाच्या प्रगतीसाठी राज्यसरकार व केंद्र सरकार यांच्याकडून भरपूर प्रोत्साहन मिळते. या उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी देशातल्या विविध ठिकाणी 'सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (STP) ची 1995 मध्ये स्थापना झाली आहे. परंतु दक्षिण भारतात जास्त प्रमाणात याची प्रगती झालेली दिसून येते. उदा. कर्नाटक, महाराष्ट्र, तमिळनाडू व तेलंगाणा. कर्नाटक राज्याला सॉफ्टवेअर उद्योगात मानाचे स्थान मिळाले आहे. भारत देशातही काही माहिती तंत्रज्ञान संस्था स्थापन झाल्याआहेत. बेंगळूर, मुंबई, पुणे, चेन्नई, हैद्राबाद, कोलकत्ता, दिल्ली व नोएडा येथे त्या संस्था कार्यरत आहेत.

भारतात बेंगळूरु, हे शहर सॉफ्टवेअर उद्योगात अतिशय महत्त्वाचे केंद्र ठरले आहे. बेंगळूरुला 'भारताची सिलिकॉन व्हॅली' असे संबोधले जाते. म्हैसूर, मंगळूर, हुब्बळळी, उडपी ही कर्नाटकातील इतर सॉफ्टवेअर उद्योगकेंद्रे आहेत. याचबरोबर देशात हार्डवेअर उद्योगाची सुद्धा प्रगती होत आहे. सॉफ्टवेअर वस्तूंची भारत देशाकडून निर्यात केली जाते. यामुळे परकीय चलनाच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते.

www.textbookpdf.in

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. जिंदाल विजयनगर पोलाद कारखाना _____ राज्यात आहे.
2. कच्चे बॉक्साईट हे _____ उद्योगासाठी लागणारा कच्चा माल आहे.
3. _____ हा उद्योगाधंदा अरण्याधारित आहे.
4. भारतात प्रथम आधुनिक कागद करखान्याची स्थापना 1932 मध्ये _____ येथे झाली.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. उद्योगधंदे म्हणजे काय? उद्योगधंद्यांच्या स्थायीकरणासाठी कोणकोणते घटक महत्वाचे असतात?
2. भारतातील प्रमुख ओद्योगिक प्रदेशांची नावे लिहा.
3. भारतातील ॲल्युमिनियम उद्योगधंद्याची माहिती सविस्तर लिहा.
4. भारतात सुती वस्त्रोद्योगांची विभागणी कशी झाली आहे त्याचे विवरण करा.
5. भारतात ज्ञानावर आधारित उद्योगधंद्यांचे महत्त्व कोणते?

III. जोड्या जुळवा

1. बेंगळूर	a) विश्वेश्वरय्या लोखंड वपोलाद लिमिटेड
2. मुंबई	b) भारताचे कॉटनोपोलीस
3. भद्रावती	c) ॲल्युमिनियम कारखाना
4. रेनूकूट	d) भारताची सिलिकॉन व्हॅली

IV. उपक्रम :

1. भारताचा नकाशा काढून त्यात लोखंड व पोलाद उत्पादन केंद्रे दाखवून त्यांची नावे लिहा.

IV. प्रकल्प:

1. जवळच्या कोणत्याही एका कारखान्यास भेट द्या व अहवाल तयार करा.
2. कर्नाटकातील विविध कारखान्यांची यादी तयार करून तेथे उत्पादित होत असलेल्या वस्तूंचा तक्ता तयार करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 11

भारतातील नैसर्गिक आपत्ती

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया

- **नैसर्गिक आपत्तीचा अर्थ**
- **भारतातील वादळे, महापूर, दरडी कोसळणे, समुद्र किनापट्टीची झीज व भूकंप - यांची कारणे व विभागणी**

नैसर्गिक आपत्तीचा अर्थ

नैसर्गिकरित्या घडून येणारी जिवितहानी व आर्थिक हानीला 'नैसर्गिक आपत्ती' असे म्हणतात. नैसर्गिक आपत्तीमध्ये दोन प्रकार आहेत 1)मानवनिर्मित आपत्ती व 2) नैसर्गिक आपत्ती. भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी, दरडी कोसळणे, हिमवृष्टी इ. भूमीच्या अंतर्गत क्रियेमुळे संभवतात. याशिवाय वादळे, दुष्काळ, महापूर व साथीचे रोग या वातावरणाशी संबंधित नैसर्गिक आपत्ती आहेत. नैसर्गिक आपत्ती क्वचितच घडतात व त्याची पूर्वसूचना म ानवाला असत नाही. या आपत्तीबद्धलचे सविस्तर ज्ञान संपादन केल्यास होणारी हानी थोडया प्रमाणात टाळता येते.

भारत हा विशाल देश असून या देशाला विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीना सामोरे जावे लागते उदा. वादळे, महापूर, दरडी कोसळणे, किनारपट्टीची झीज, भूकंप इ.

चक्रीवादळे

कमी दाबाच्या प्रदेशाकडे वारे चक्राकार पद्धतीने वाहतात. यालाच चक्रीवादळे म्हणतात. ही आपत्ती वातावरणाशी संबंधित नैसर्गिक आपत्ती आहे. या चक्रीवादळाचे दोन प्रकार आहेत. 1) उष्णकटिबंधातील 2) समशीतोष्ण कटिबंधातील

भारतात उष्ण प्रदेशातील वादळे जास्त प्रमाणात आढळतात. कारणे - उष्णकटीबंधातील वादळाचा उगम व विकासाची कारणे पुढील प्रमाणे 1) अधिक उष्णता 2) थंड हवा व 3)हवेतील आर्द्रता या सर्व कारणामुळे कमी दाबाचा पट्टा तयार होतो. कमी दाबाच्या पट्टयासभोवती जास्त दाब असतो. यामुळे अधिक दाबाच्या प्रदेशातून कमी दाबाच्या प्रदेशाकडे हेवारे चक्राकार पद्धतीने वाहू लागतात व वादळे संभवतात ही वादळे मुख्यत्वेकरून उष्ण प्रदेशातील समुद्राच्या भागात संभवतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

परिणाम

उष्णकटिबंधातील वादळे फारच भयंकर व अधिक विंध्वंसक असतात. जीवहानी व संपत्तीची हानी मोठ्या प्रमाणात होते. इमारतींना धोका पोहचतो. वाहतूक व संपर्क माध्यमांना हानी पोहोचते विद्युत पुरवठा खंडीत होतो. पिके, वृक्षवेली व प्राणी यांची फार मोठ्या प्रमाणात हानी होते.

विभागणी

भारतात उष्णकटीबंधातील वादळे ही बंगालच्या उपसागरात मोठ्या प्रमाणात संभवतात. त्यामुळे भारताच्या पूर्व किनारपट्टीला वादळग्रस्त प्रदेश असे म्हटले जाते. तमिळनाडू, आंध्रप्रदेश, ओडीशा व पाश्चिम बंगाल या राज्यातल्या किनारपट्टीवर ही वादळे होत असतात. काही वादळे अरबी समुद्रात संभवतात पण त्यांचे प्रमाण फार कमी आहे.

भारतात उष्णकटिबंधातील वादळे ही जास्त करून ईशान्य मान्सून वाऱ्याच्या कालावधीत संभवतात. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात यांची तीव्रता जास्त असते. मे व जून महिन्यात ही वादळे क्वाचितच संभवतात.

प्रतिबंधक उपाय

वादळे ही नैसर्गिक आपत्ती असून त्यांना थोपविणे हे मानवाच्या हातात नाही. परंतु लोकांना वादळाची पूर्वसूचना देऊन जनजागृती करता येते. आकाशवाणी, दूरदर्शन व इतर संपर्क माध्यमातून प्रसारित होणाऱ्या सावधानतेचा इशारा याकडे लक्ष ठेवणे जास्त आवश्यक आहे. वादळग्रस्त भागातील लोकांना तात्पुरत्या स्वरूपातील अन्न, वस्त्र व निवारा यांची उपलब्धता करून देणे अगत्याचे आहे.

वादळाचा तडाखा व समुद्र किनारपट्टीची झीज यापासून रक्षण करण्यासाठी मॅग्रोव्ह अरण्ये व खोलवर मुळे असणारे वृक्ष समुद्र किनाऱ्यावर वाढवावेत.

महापूर

काहीवेळा नद्या आपले पात्र सोडून पात्राबाहेर वाहू लागतात व नदीकाठावरील प्रदेश पाण्याखाली जातो. यालाच महापूर असे म्हणतात भारतात वर्षभर महापुराची भीती कोणत्या ना कोणत्या प्रदेशात भासतच असते.

कारणे

ही फक्त नैसर्गिक कारणाने होणारी आपत्ती नसून ती मानवनिर्मित आपत्ती पण आहे. अधिक पाऊस, बर्फ वितळणे, वादळे, ढगफुटी, नदी प्रवाहात येणारे अडथळे, नदीत

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

गाळ साचणे इ. नैसर्गिक कारणे आहेत तर अरण्यांचा नाश, अवैज्ञानिक पद्धतींची पाणी पुरवठ्यांच्या योजना, चुकीची कृषीपद्धत, बांध फुटणे, धरण फुटणे, जलदगतीचे शहरीकरण ही मानवनिर्मित कारणे आहेत.

परिणाम:

जिवितहानी, संपतीची हानी, पिके व झाडांची हानी, वाहतूक व्यवस्था कोलमडणे, जमिनीची धूप लोकांना आवश्यक सुविधा पुरविण्यामध्ये अडचणी.

महापुरात येणारे प्रदेश

1. गंगा व ब्रम्हपुत्रा नदीचे खोरे - पंजाब, हरियाणा उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल व आसाम राज्यातील कांही भागांचा यात समावेश होतो
2. सतलज, बियास, रावी व चिनाब मैदानी प्रदेश (जम्मू व काश्मीर व हिमाचल प्रदेशातील काही भागांचा समावेश होतो).
3. द्वीपकल्पीय पठार व नदीमुखाजवळील जमीन उदा - महानदी, गोदावरी, कृष्णा व कावेरी इ. नदीमुखाजवळील भाग - (ओडीशा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तमिळनाडू व आंध्रप्रदेशातील कांही भागांचा समावेश होतो) या प्रदेशात महापुराचा धोका फार कमी असतो. पण अचानकपणे जास्त पाऊस पडून नद्यांना महापूर येतो
4. नर्मदा व तापी नदीजवळील प्रदेश उदा. गुजराथ.

महापूर रोखण्यासाठी उपाय योजना

i) या प्रदेशात अरण्ये वाढविणे व अति वेगाने वाहाणाऱ्या नदीप्रवाहावर नियंत्रण ठेवणे.

ii) धरणे बांधून त्यातील जलसाठा वाढविणे. नदीपात्रातील पाण्याचे प्रमाण कमी करणे. धरणातील पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरणे.

iii) लोकवस्ती व शेतजमीनीचे महापुरापासून रक्षण करण्यासाठी बंधाऱ्यांची निर्मिती करणे.

iv) महापुराची पूर्वसूचना देऊन लोकांना सतर्कतेचे आदेश देणे, माणसे, जनावरे व संपत्ती यांना कोणतीही हानी पोंहचू नये यासाठी योग्य ती खबरदारी घेणे.

दरडी कोसळणे :

उंच अशा पर्वत टेकडयावरील उतरत्या भागातील माती, दगड मोठ्या प्रमाणात खाली येऊन पडतात. याला 'दरडी कोसळणे' असे म्हणतात. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे उतार भागातील माती, दगड व इतर अवशेष खाली कोसळण्याची ही क्रिया आहे.

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

कारणे : मानवनिर्मित व निसर्गनिर्मित ही दोन्ही कारणे आहेत.

नैसर्गिक कारणे : समुद्र किनाऱ्यावर मोठमोठ्या लाटा जोराने आदळतात व किनाऱ्यावरील जमीन झिजते, भरपूर पाऊस, भूकंप इ.

मानवनिर्मित कारणे : अरण्यांचा नाश, रेल्वेमार्ग, रस्ते, धरणे, जलसाठा, जलविद्युत निर्मितीच्या योजना, मोठ्या प्रमाणातील खाणकाम व डोंगर पोखरणे. इ.

परिणाम : दरडी कोसळणे ही एक धोकादायक आपत्ती आहे. याचा परिणाम रेल्वेमार्ग, भूमार्गाला अडथळा होतो. लोकवस्ती व वृक्षवेली जमीनीत गाढले जातात जिवितहानी व संपत्तीची हानी होते. रस्त्यांचा संपर्क तुटतो.

विभागणी : पर्वतरांगा, डोंगर असलेल्या राज्यात दरडी कोसळणे ही आपत्ती जास्त प्रमाणात उद्‌भवते. उदा. जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश व ईशान्ये कडील राज्ये.

प्रतिबंधक उपाय : उतारांचा प्रदेश कमी करणे महामार्ग व इतर उतार प्रदेशातील दरडी कोसळणार नाहीत याची काळजी घेणे. उतार प्रदेशात व लोकवस्तीच्या ठिकाणी खाणकाम व डोंगर पोखरणे यावर निर्बंध घालणे, अरण्ये वाढविणे इ. उपाययोजना करून दरडी कोसळण्यावर नियंत्रण ठेवता येते.

किनारपट्टीची झीज : समुद्राच्या लाटा सतत अति वेगाने किनाऱ्यावर आदळतात यामुळे किनारपट्टीची झीज होते या लाटांमुळे होणाऱ्या नुकसानीला किनारपट्टीची झीज असे म्हणतात.

कारणे व विभागणी : समुद्रात अति प्रचंड लाटा निर्माण होऊन किनारपट्टी प्रदेशावर येऊन आदळतात यामुळे किनारपट्टीची झीज होते. याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

i) नैर्ऋत्य मान्सून वारे : या वाऱ्यामुळे पश्चिम किनारपट्टीची झीज होते. गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ व तमिळनाडू किनारपट्टीवर ही झीज मोठ्या प्रमाणात दिसून येते.

ii) उष्ण कटिबंधातील आवर्त वारे : ईशान्य मान्सूनच्या वाऱ्यामुळे ही झीज होते. हे वारे जास्त विनाशकारी असतात. यामुळे पूर्वकिनारपट्टीची जास्त झीज होते. तमिळनाडू, आंध्रप्रदेश व ओडिशा राज्यातील किनारपट्टीवर ही झीज मोठ्या प्रमाणात दिसून येते.

iii) त्सुनामी : समुद्राच्या तळाशी उद्‌भवणाऱ्या मोठ्या प्रमाणातील भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या प्रचंड लाटांना त्सुनामी असे म्हणतात यामुळे भारतातील किनारपट्टीची झीज होत आहे. पूर्व किनारपट्टी व अंदमान निकोबार बोटांवर याचा प्रतिकूल परिणाम दिसून येतो. कांही मानवी कृत्यांमुळे किनारपट्टीची झीज होत आहे. अमर्यादित वाळूचा उपसा व डोंगर पोखरणे इ.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

परिणाम : किनारपट्टीची झीज ही एक नैसर्गिक आपत्ती आहे.

i) किनारपट्टीवरील झाडे व इमारती पाण्यात वाहून जातात

ii) रस्ते व रेल्वे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.

iii) समुद्र किनाऱ्यावरील गावामध्ये जास्त प्रमाणात पाणी साचून रहिल्यामुळे तेथील बेघर लोकांना पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे अवघड जाते.

निवारण्याचे उपाय :

i) समुद्राच्या काठावर लाटांचा वेग थोपवून ठेवण्यासाठी तटरक्षक भिंती निर्माण करणे.

ii) किनारपट्टी प्रदेशातील खाणकाम व वाळूउपसा यावर निर्बंध घालणे

iii) समुद्र किनारा व तेथील वाळूचे संरक्षण करण्यासाठी त्या ठिकाणी मॅग्रोव्ह अरण्ये वाढविणे.

भूकंप : पृथ्वीच्या भूभागातील आंतरिक कंपनाने अचानकपणे पृथ्वीवरील पृष्ठभागावर झालेल्या हालचालीस 'भूकंप' असे म्हणतात ही एक नैसर्गिक आपत्ती आहे.

कारणे : जमिनीच्या आतील भूस्तरांची हालचाल, शिलावरणाला तडे जाणे, दरडी कोसळणे, भूभागातील गुहा कोसळणे, मानवनिर्मित धरणामुळे पाण्याचा दाब वाढणे इ मुळे भूकंप संभवतात. भारतात बहुतांश भूकंप हे जमिनीच्या प्रस्तरांच्या हालचालीमुळे होतात.

परिणाम : भूकंपामुळे जमीनीला तडे जातात. जमीनीला भेगा पडतात. इमारती, रेल्वेमार्ग, रस्ते, विद्युतपुरवठा, संपर्कमाध्यमे, पूल, धरण फुटणे, कारखान्यांची हानी, जीवहानी, संपत्तीची हानी याबरोबर आग लागणे, दरडी कोसळणे, अंतर्जलामध्ये फरक पडणे, नदीचा प्रवाह बदलणे या गोष्टी संभवतात.

विभागणी : भूकंपाची विभागणी तीन प्रमुख प्रदेशामध्ये केली आहे.

i) **हिमालयीन प्रदेश** - या प्रदेशात जास्त तीव्रतेचे भूकंप संभवतात. यात जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश उत्तरांचल व बिहार या भागांचा समावेश होतो. येथे जमीनीतील प्रस्तरांच्या हालचालीमुळे व चलनामुळे भूकंप संभवतात. उदा : चामोली व उत्तरकाशी.

ii) **सिंधू गंगा प्रदेश** - हिमालयीन प्रदेशांच्या दक्षिणेकडील भागात हा प्रदेश येतो. राजस्थान पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश व पश्चिम बंगाल या राज्यांचा यात समावेश होतो. येथे मध्यम तीव्रतेचे भूकंप संभवतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

iii) **द्विपकल्पीय प्रदेश** - यामध्ये लक्षद्वीप, अंदमान व निकोबार बेटे व कच्छ या प्रदेशांचा समावेश होतो या भागात फारसे भूकंप होत नाहीत. म्हणून या प्रदेशाला 'कमी भूकंपाचा प्रदेश' असे म्हटले जाते.

सावधगिरीचे उपाय :

- भूकंप प्रदेशात लोकवस्ती कमी करणे
- भूकंप प्रतिकारक इमारतींची निर्मिती करणे
- इमारतीच्या बांधकामासाठी उच्च दर्जाच्या बांधकाम साहित्याचा वापर करणे व जास्त मजली इमारती बांधण्यावर निर्बंध घालणे
- जास्त खोल असणाऱ्या विहीरी खोदण्यास मनाई करणे
- भूकंपाची जास्त तीव्रता असलेल्या प्रदेशात शहरीकरणाचा विकास थांबविणे
- अति मोठे धरण व जलसाठा निर्मितीवर निर्बंध घालणे
- अरण्यांचा नाश व मोठया प्रमाणातील खाणकाम थांबविणे
- भूकंपानंतर सर्व लोकांना मूलभूत पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे हे फार महत्वाचे आहे.

उदा अन्न धान्यांचा पुरवठा, बेघरांना आश्रय, साथीच्या रोगांपासून संरक्षण इ.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. _____ ही वातावरणाशी संबंधित एक मोठी नैसर्गिक आपत्ती आहे.
2. भारताची पूर्वकिनारपट्टी _____ ग्रस्त आहे.
3. भारतात द्वीपकल्पीय प्रदेशात _____ कमी प्रमाणात संभवतात.
4. _____ हे भारतातील डोंगराळ व पर्वत, प्रदेशातील उतारावर वारंवार संभवतात.
5. _____ मुळे किनारपट्टीची झीज होते.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. नैसर्गिक आपत्ती म्हणजे काय?
2. महापूर म्हणजे काय? महापूर येण्याची नैसर्गिक कारणे कोणती?
3. वादळे म्हणजे काय? त्यांचे प्रमुख परिणाम कोणते?
4. दरडी कोसळण्याची कारणे लिहा? त्याची विभागणी कशी झाली आहे ते लिहा.
5. भूकंपापासून होणारी हानी टाळण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना आहेत?
6. भारतातील किनारपट्टीची झीज होण्याची कारणे व त्याची विभागणी या बद्दल लिहा.

III. उपक्रम :

1. भारताचा नकाशा काढून त्यात महापूर व वादळग्रस्त प्रदेश दाखवा.
2. गेल्या शंभर वर्षात झालेल्या अत्यंत विनाशकारी भूकंपांची यादी करा.

IV. प्रकल्प:

1. नैसर्गिक आपत्तींची छायाचित्रे गोळा करून त्याचा अल्बम तयार करा.

समुद्र तटबांधणी - मोठ मोठे दगड व सिमेंट क्रॉंक्रीटच्या सहाय्याने समुद्रकिनाऱ्यावर तटबांधणी करून किनारपट्टीची झीज थांबविणे.

समुद्र तटरक्षक भिंती - समुद्राच्या प्रचंड लाटांपासून होणारी किनारपट्टीची झीज थांबविण्यासाठी मोठ्या तटरक्षक भिंती बांधणे.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 12

भारताची लोकसंख्या

या प्रकरणात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया

- **भारताच्या लोकसंख्येचा आकार**
- **भारतातील लोकसंख्येची वाढ**
- **लोकसंख्या वाढीची कारणे**
- **लोकसंख्येच्या विभागणीवर परिणाम करणारे घटक**
- **लोकसंख्येची घनतेनुसार विभागणी**

लोकसंख्येचा आकार

एखाद्या, विशिष्ट ठिकाणी रहात असलेल्या लोकांच्या एकूण संख्येला 'लोकसंख्या' असे म्हणतात. चीननंतर लोकसंख्येमध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या 121.01 कोटी होती. जगातील एकूण भूभागापैकी 2.4% भूभाग भारताने व्यापलेला असून संपूर्ण जगाच्या तुलनेत भारताची लोकसंख्या 17.5% इतकी आहे.

लोकसंख्यावाढ

गेल्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजेच 1901-1921 च्या दरम्यान लोकसंख्येची वाढ धीम्या गतीने होत होती. रोगराई, साथीचे रोग आणि वैद्यकीय सुविधांचा अभाव यामुळे 'वाढलेला मृत्यूदर' हे याचे प्रमुख कारण होते. 1921-1951 पर्यंतचा काळ हा सर्वसाधारण किंवा म ध्यमगतीच्या वाढीचा होता. साथीच्या रोगांवरील नियंत्रण, स्वच्छता व उत्तम आरोग्यसुविधा यामुळे 'घटलेला मृत्यूदर' हे याचे प्रमुख कारण होय.



1951-1991 या काळात लोकसंख्येची वाढ झपाट्याने झाली. लोकसंख्या सुमारे तिप्पटीने वाढली होती. 'दिवसेंदिवस सतत घटणारा मृत्युदर सतत वाढणारा जन्मदर' हे याचे प्रमुख कारण आहे. परंतु हा जन्मवाढीचा दर 1981 नंतर घटत चालला तो 1981 मध्ये 24.7% वरून 2011 मध्ये 17.64% इतका घसरला.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

लोकसंख्यावाढीची कारणे

भारताच्या लोकसंख्यावाढीला अनेक कारणे आहेत. त्यापैकी कांही प्रमुख कारणे खालील प्रमाणे.

जादा जन्मदर

भारताच्या लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीचे हे एक प्रमुख कारण आहे. बालविवाह धार्मिक व सामाजिक परंपरा, बहुपत्नीत्व, गरिबी, निरक्षरता, उष्ण भौगोलिक हवामान इ. जादा जन्मदराची कारणे होत.

हे तुम्हाला माहित आहे कां ?

- जनगणना - लोकसंख्येची अधिकृतरित्या केलेली गणना/मोजणी.
- जन्मदर - एका वर्षात प्रति 1000 जन्मलेल्या शिशुपैकी जगलेल्या बालकांची संख्या
- मृत्यूदर - एका वर्षात प्रति 1000 व्यक्तींपैकी मृत पावलेल्या लोकांची संख्या

कमी मृत्यूदर

लोकसंख्यावाढीचे हेही एक प्रमुख कारण आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा, साथीच्या रोगावरील नियंत्रण, शिशुंच्या मृत्यूचे घटलेले प्रमाण, शैक्षणिक प्रसार इ. गोष्टी मृत्यूदर कमी करण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

लोकसंख्यावाढीचे परिणाम

झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या उद्‌भवल्या. त्यापैकी कांही महत्त्वाच्या समस्या बरोजगारी, अन्नतुटवडा व कुपोषण, सामाजिक व मूलभूत नागरी सुविधांचा अधिक बोजा, कमी दरडोई उत्पन्न, आर्थिक विकासाची धीमी गती, गरिबी, हलक्या दर्जाचे राहणीमान, परिसरमालिन्य इ.

लोकसंख्यावाढीवरील नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजना

लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतसकारने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. त्यापैकी कांही प्रमुख उपाय - कुटुंब नियोजन, महिला कल्याण योजना, जाहिराती व प्रचार, ग्रामीण लोकांमध्ये जनजागृती इ.

लोकसंख्येची विभागणी

भारतामध्ये लोकसंख्येची विभागणी असमान आहे. विविध भौगोलिक व सामाजिक घटक ही याची प्रमुख कारणे आहेत. संपूर्ण भारतात उत्तर प्रदेश हे सर्वाधिक लोकसंख्या असणारे राज्य (1995 कोटी) तर या उलट 'सिक्कीम' हे सर्वात कमी लोकसंख्या असणारे राज्य (6.1 लाख)

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

आहे केंद्रशासित प्रदेशांमध्ये दिल्लीमध्ये सर्वाधिक लोकसंख्या (1.67 कोटी) तर लक्षद्वीपमध्ये सर्वात कमी लोकसंख्या (64,429) आढळून येते.

भारतामध्ये विरळ लोकसंख्या आढळणारी राज्ये म्हणजे - हिमाचल प्रदेश, केंद्रीय उंच टेकड्यांचा प्रदेश (central highlands), थर वाळवंटे आणि बेटे किंवा द्वीपकल्प. तर दाट लोकसंख्या आढळणारे प्रदेश म्हणजे नदीकाठावरील पठारी प्रदेश, कोंकण किनारपट्टीचा प्रदेश, औद्योगिक शहरे इ.

लोकसंख्येची घनता

दरचौरस किलोमीटरमध्ये रहाणाऱ्या लोकांच्या संख्येला 'लोकसंख्येची घनता' असे म्हणतात. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येची सरासरी घनता 382 प्रति चौरस किलोमीटर (Km^2) इतकी होती त्यापैकी बिहार हे सर्वात दाट घनता असणारे राज्य असून तेथील घनता 1102 प्रति चौरस किलोमीटर इतकी आहे. याउलट अरुणाचल प्रदेशाची घनता 17 प्रति चौरस किलोमीटर इतकी असून हे सर्वात कमी घनता असणारे राज्य आहे. तसेच केंद्रशासित प्रदेशांपैकी दिल्लीमध्ये सर्वाधिक घनता (11, 297) आहे तर याउलट अंदमान व निकोबार बेटांमध्ये सर्वात कमी (463) घनता आहे.

लोकसंख्येच्या आधारावर भारताचे तीन विभाग पडतात

1. दाट किंवा अधिक घनता असणारे प्रदेश.
2. साधारण घनता असणारे प्रदेश
3. विरळ किंवा कमी घनता असणारे प्रदेश

1. दाट किंवा अधिक घनता असणारे प्रदेश-

501 पेक्षा अधिक लोक प्रतिचौरस किलोमिटर मध्ये रहाणारे प्रदेश या विभागात मोडतात. उत्तरेकडील मैदानी प्रदेश, पश्चिम व पूर्वेकडील किनारपट्टीचा प्रदेश. हे सर्व प्रदेश दाट घनता असणारे प्रदेश होत. यामध्ये बिहार (1102), प.बंगाल (1030), केरळ (859), उत्तर प्रदेश (828), हरियाणा (573), पंजाब (550) आणि तामिळनाडू (555) इ. राज्ये मोडतात. सुपीक जमीन, दळणवळणाची व संपर्काची आधुनिक साधने ही येथील दाट घनतेची कारणे होत.

केंद्रशासित प्रदेशांमध्ये दिल्ली (17,297), चंदीगढ (9252), पुद्दुचेरी (पाँडिचेरी) (2598), दमण आणि दीव (2169), लक्षद्वीप (2,113) दादरा व नगरहवेली इ मध्ये दाट

www.textbookpdf.in

©KTBS Not to be republished

किंवा अधिक घनता आढळते. या भागात कांही औद्योगिक व वाणिज्य सुविधांची उपलब्धता असल्यामुळे इथे जास्त घनता आढळून येते. उदा. मुंबई, चेन्नई, बेंगळूरु, कोलकत्ता, पुणे इ.



2. साधारण घनता असणारे प्रदेश

प्रति चौरसकिलोमीटर 251 ते 500 लोकवस्ती असणारे प्रदेश या भागात मोडतात. बहुतेक भारतातील द्वीपकल्पीय प्रदेश यामध्ये मोडतात. यामध्ये झारखंड (414), आसाम (397), गोवा (394) महाराष्ट्र (365), त्रिपुरा (350), कर्नाटक (319), आंध्रप्रदेश (308), गुजरात व ओरिसा (269) ही राज्ये येतात. खनिज संपत्तीची विपुलता आणि लोहउद्योगातील प्रगती ही साधारण घनतेची प्रमुख कारणे होत.

©BSTBPC Not to be republished

www.textbookpdf.in

3. विरळ किंवा कमी घनता असणारे प्रदेश

प्रतिचौरसकिलोमीटर 250 पेक्षा कमी लोकवस्ती असणारे प्रदेश या विभागात मोडतात. उदा. मध्यप्रदेश (136), राजस्थान (201), उत्तराखंड (189), छत्तीसगढ (189), मेघालय (132), हिमाचल प्रदेश (123), मणिपूर (122), नागालँड (119), जम्मू-काश्मिर (124), सिक्कीम (86), अंदमान व निकोबार बेटे (46), व अरुणाचल प्रदेश (17), पर्वतीय व डोंगराळ प्रदेश अत्यंत कमी उष्णता असणारे प्रदेश, ओसाड प्रदेश इ. भागात लोकसंख्येची घनता विरळ असते.

लोकसंख्येची विभागणी नियंत्रित करण्याचे घटक

भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. गोष्टी भारतातील लोकसंख्येच्या विभागणीवर प्रभाव पाडतात. त्यापैकी कांही प्रमुख घटक खालीलप्रमाणे आहेत.

1) भौगोलिक वैशिष्ट्ये : सामान्यतः पर्वतीय व डोंगराळ (टेकड्यांच्या) भागात लोकसंख्या विरळ असते. उदा. उत्तर आणि ईशान्येकडील डोंगराळ प्रदेश (ईशान्य टेकड्यांचा प्रदेश)

2) हवामान : उत्तम हवामानाच्या प्रदेशात लोकवस्ती दाट असते तर अति उष्ण अथवा अति थंड तसेच कोरड्या प्रदेशात लोकवस्ती विरळ असते. उदा. वाळवंटे व हिमालयातील प्रदेश.

3) माती : सुपीक मातीच्या प्रदेशामध्ये दाट लोकवस्ती असते उदा. उत्तरेकडील मैदाने, पूर्व व पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश. याउलट पडित अथवा वालुकामय माती असणाऱ्या भागात लोकवस्ती विरळ असते.

4) साधनसंपत्ती : खनीजसंपत्तीनी समृद्ध असलेल्या व उर्जा-साधनांनी परिपूर्ण असणाऱ्या प्रदेशात लोकवस्ती दाट असते. उदा. प.बंगाल, ओरिसा इ.

5) उद्योग व व्यापार : औद्योगिक क्षेत्र, व्यापारी केंद्रे व शहरी भागामध्ये लोकवस्ती दाट असते. उदा. नवी दिल्ली, बेंगळूरु, मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, हैदराबाद इ.

तसेच पाणीपुरवठा, पर्यटन, मानवाला उत्तमपणे जगण्यासाठी व संपत्तीसाठी आवश्यक असणारे संरक्षण, अत्याधुनिक व अत्यावश्यक सुविधा या गोष्टींचाही लोकसंख्येच्या विभागणीवर बराच प्रभाव पडतो.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

स्वाध्याय

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

1. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या _____ कोटी होती
2. सध्या जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी शेकडा _____ भाग भारतामध्ये आहे.
3. _____ हे राज्य भारतातील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेले राज्य होय.
4. केंद्रशासित प्रदेशापैकी _____ मध्ये सर्वात कमी लोकसंख्या आहे.
5. भारतातील सर्वात कमी लोकसंख्येची घनता असणारे राज्य _____ होय.

II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. लोकसंख्या म्हणजे काय?
2. लोकसंख्येच्या घनतेची व्याख्या लिहा.
3. भारतामध्ये लोकसंख्यावाढीची प्रमुख कारणे कोणती?
4. लोकसंख्यावाढीचे भारतावर कोणकोणते परिणाम झाले आहेत?
5. भारतातील लोकसंख्येची विभागणी नियंत्रित करणारे प्रमुख घटक कोणते?
6. भारतातील काही भागात लोकसंख्येची घनता विरळ (कमी) आहे. याची कारणे स्पष्ट करा.

III. उपक्रम :

1. भारतातील लोकसंख्येची असमान विभागणी दाखविणारा नकाशा काढा.

IV. प्रकल्प:

1. तुमच्या जिल्ह्याच्या लोकसंख्येबद्दल सविस्तर माहिती गोळा करून त्याबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अर्थशास्त्र

प्रकरण - 3

पैसे आणि कर्ज

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **पैशाचा अर्थ, स्रोत व कार्ये**
- **बँकांचे महत्त्व**
- **भारतीय रिझर्व बँकेची कार्ये**
- **पैशांचा पुरवठा व त्याचे मोजमाप**
- **भारतीय रिझर्व बँकेने सुचविलेले कर्ज नियंत्रणाचे उपाय**

1. पैशाचा अर्थ व महत्त्व

पैसा हा एक मूलभूत अविष्कार आहे. ज्यामुळे दैनंदिन व्यवहार सोपा होतो. वस्तू आणि सेवांचे मूल्य ठरविता येते. संपत्ती साठवून भविष्यात व्यवहार करता येतात.

> 'ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत स्वतःचे मूलभूत संशोधन असते. यंत्रशास्त्रात चक्र, विज्ञानात अग्नी, राजकारणात मत, त्याप्रमाणेच अर्थशास्त्रात पैसे; मानवाच्या संपूर्ण व्यावहारिक व सामाजिक अस्तित्वात पैसा हाच मूलभूत शोध असून त्यावरच सर्वकाही अवलंबून आहे.
>
> -जाफरी क्रौथर

पैशामुळे वस्तू व सेवांची खरेदी करू शकतो. तो मोजता येतो आणि आपण त्याचा संग्रह करू शकतो. रॉबर्टसन् यांच्यामते 'वस्तूसाठी द्यावी लागणारी अथवा इतर व्यावहारिक कर्ज फेडण्यासाठी व्यापक प्रमाणात स्वीकारली जाणारी वस्तू म्हणजे पैसा'.

पैशाचा विकास : आज आपण कागदापासून तयार केलेल्या नोटांशिवाय नाणी पैसा म्हणून वापरतो. परंतु आज आपण वापरतो तो पैसा गेल्या बऱ्याच काही वर्षांपासून विकास पावत आहे. विकासाच्या या टप्प्यांचा आपण आता अभ्यास करूया.

वस्तूविनिमय पद्धत : अगदी प्राचीन काळात लोक वस्तूंच्या बदल्यात वस्तू देत व घेत. त्याकाळी पैशाचा वापर केला जात नव्हता. ही पद्धत अतिशय अवघड होती. त्यासाठी फारच वेळ व श्रम खर्च होई. उदा. 'अ' कडे गाय आहे व त्यास शेळी हवी आहे. त्यासाठी त्याला अशी एखादी व्यक्ती शोधावी लागेल की ज्याच्याकडे शेळी आहे आणि त्याला गाय हवी आहे. समजा 'अ' ला तशी व्यक्ती आढळलीच तर त्याला गाय हवी आहे की नको हा एक प्रश्न आहे. आणि एका गाईच्या बदल्यात किती शेळ्या द्यायच्या? हाही प्रश्न आहेच.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

म्हणूनच या वस्तू विनिमय पद्धतीत अनेक तोटे होते. जसे की मोजमापाचे सार्वत्रिक मूल्य, वस्तू वाटपातील अडचणी, परस्परांच्या गरजांमधील भिन्नता, संग्रहीत करण्याच्या समस्या या सारख्या समस्या होत्या.

वस्तूरूपातील पैसा : मानवाच्या सांस्कृतिक विकासानंतर विशिष्ट आकार व वजनाची वस्तू पैसा म्हणून स्वीकारण्यात आली. त्या प्रमाणित वस्तूंच्या आधारे इतर वस्तूंचे मोजमाप केले जायचे. पूर्वी विविध देशात वेगवेगळ्या वस्तू पैसा म्हणून वापरत असत. या द्वारे सुद्धा वस्तू विनिमय पद्धतीच्या सर्व समस्या सुटू शकल्या नाहीत.

धातूरूपी पैसा : सोने, चांदी, तांबे व कासे या मौल्यवान धातूंचा पैसा म्हणून वापर केला जात असे. विशिष्ट वजनाच्या विशेषत: राजमुद्रा असणाऱ्या सोने व चांदींच्या बिल्ल्यांचा विनिमयासाठी वापर होऊ लागला. ते वेगवेगळ्या किंमतीचे असल्यामुळे त्यांची विभागणी करणे सोपे होते. एकाठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणे व त्यांची देवाणघेवाण करणे सहजसाध्य होते. त्यांनाच पुढे 'नाणी' असे संबोधण्यात आले.

उपक्रम : इतिहासात विविध राजांनी वापरलेल्या नाण्यांची माहिती मिळवा.

कागदरूपी पैसा : धातूरूपी पैसा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे सुरक्षित नव्हते त्यामुळे व्यापारी व सावकारांनी लिखित हुंडीचा वापर करण्यास सुरुवात केली. ही हुंडी म्हणजे प्रत्यक्षात पैसे नव्हते. परंतु मागणी व खरेदी शक्य होऊ लागल्यामुळे सांकेतिक पैसा म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणात स्वीकार होऊ लागला. तद्नंतर बँकांनी दिलेल्या कागदाच्या नोटा पैसा म्हणून वापरू लागले. कालांतराने सरकारने केंद्र बँकेची स्थापना करून तिला नोटा छापून देण्याचे एकाधिकार बहाल केले. हा पैसा शासनमान्य पैसा झाला. देशातल्या कोणत्याही व्यक्तीस हा पैसा नाकारता येत नाही. भारत देशात रुपये, अमेरिकेत डॉलर, इंग्लंडमध्ये पौंड, जपान मध्ये येन, चीनमध्ये युवान इ. नावांनी चलने अस्तित्वात आली.

बँकेचा पैसा : व्यापार व वाणिज्य यांचा विकास झाल्यानंतर 'बँकेचा पैसा' अस्तित्वात आला. चेक्स, ड्राफ्टस्, क्रेडिट व डेबीट कार्डस् यांचा वापर होऊ लागला. यांचा वापर करून चेक्सच्या आधारे पैसे एका खात्यातून दुसऱ्याच्या खात्यात किंवा एका खात्यातून रोख पैशांमध्ये रुपांतर करता येऊ लागले. वस्तूंच्या व सेवांच्या व्यवहारासाठी चेक्सचा सर्रास वापर होऊ लागला.

प्लॅस्टीकचा पैसा : हा अलिकडच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा आविष्कार असून क्रेडीट कार्ड धारकाला वस्तू व सेवा खरेदी करता येतील. क्रेडीट कार्ड इलेक्ट्रॉनिक यंत्राद्वारे स्वाईप (swipe)

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

केल्यास खरेदी करणाऱ्याच्या खात्यातून पैसा विक्री करणाऱ्याच्या खात्यावर जमा होतो. त्याच पद्धतीने डेबीट कार्डच्या आधारेही व्यवहार केला जातो. त्यामध्ये खरेदी करणाऱ्याच्या बचत खात्यातून पैशाची कपात केली जाते. हे कार्डस् प्लॅस्टिकपासून तयार झालेले असल्याने 'प्लॅस्टीकचा पैसा' म्हणून ओळखतात. यालाच E-money असे म्हणतात.

2. पैशाची कार्ये :

पैशाच्या कार्याचे दोन भागात वर्गीकरण केले जाते प्राथमिक किंवा मुख्य कार्ये, व दुय्यम कार्ये पैशाची प्राथमिक कार्ये खालील प्रमाणे आहेत.

2.1.प्राथमिक कार्ये-

a) **विनिमयाचे माध्यम किंवा आदान प्रदानाचे साधन :** वस्तूंच्या खरेदी विक्रीसाठी पैसा हे प्रमुख साधन म्हणून वापरतात. पैसा वापरण्याच्या व्यवहारामध्ये दोन भाग आहेत.

1) बाजारपेठेत वस्तूंची व सेवांची विक्री करून पैसा मिळविला जातो.

2) पैशाच्या आधारे बाजारातून वस्तूंची व सेवांची खरेदी करता येते.

b) **मूल्यमापन :** वस्तू विनिमय पद्धतीतील मोठ्या समस्या पैशामुळे दूर झाल्या आहेत. वस्तू व सेवांची किंमत पैशाच्या आधारे ठरविली जाते. सर्व वस्तू व सेवांचे मूल्य पैशांच्या रुपात निश्चित केले जाते. त्यामुळे पैशाच्या रुपात व्यवहार करणे सोपे जाते.

2.2 दुय्यम कार्ये : पैशाची दुय्यम कार्ये म्हणजे -

a) **कालांतराने पैशाची परत फेड करणे :** पैशाची भविष्यकाळात सुद्धा परतफेड करता येते. भविष्यकाळामध्ये रक्कमेची परतफेड करण्याच्या लेखी करारावर एखादी व्यक्ती कर्ज काढू शकते. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती वस्तू खरेदी करून भविष्यकाळात पैशांची परतफेड करू शकते.

b) **संग्रह मूल्य :** वस्तू विनिमय पद्धतीमध्ये वस्तूंचा नाश होत असल्यामुळे संपत्तीची बचत व संग्रह करणे कठीण होते. आता पैशाच्या वापरामुळे वस्तूंचा किंमतीच्या रुपात संग्रह करणे सोपे झाले आहे.

c) **स्थानांतर मूल्य :** पैशाच्या आधारे वस्तू व सेवा यांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी देवाणघेवाण करणे सोपे झाले आहे. त्यामुळे व्यापाराचा विकास झाला आहे. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वस्तूंची व सेवांची देवाण घेवाण करणे सोपे झाल्यामुळे वाणिज्य व व्यापाराला चालना मिळाली आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

3. बँका :

आर्थिक विकासामध्ये बँकांचा सिंहाचा वाटा आहे. 1949 च्या बँकिंग नियंत्रण कायद्यानुसार बँकेचे व्यवहार करणारी कोणतीही कंपनी 'बँकिंग कंपनी' असते. बँकिंग म्हणजे कर्ज देणारी, भांडवल गोळा करण्यासाठी लोकांकडून ठेवी स्वीकारणारी, मागणीच्या आधारावर पैसे प्रदान करणारी या शिवाय चेक्स, ड्राफ्टस्, ऑर्डर इ. द्वारा पैशांचे आदान प्रदान करणाऱ्या प्रक्रियेला 'बँकिंग' असे म्हणतात.

भारताच्या बँकिंग व्यवस्थेला 20 सार्वजनिक क्षेत्रांच्या बँका (1969 मध्ये 14 राष्ट्रीयीकृत बँका 1980 मध्ये 6 वाणिज्य बँका) 1976 मध्ये खाजगी क्षेत्रातील बँका, सहकारी सोसायट्या, रिझर्व बँकेमध्ये नोंदणी झालेल्या बँका यांचा समावेश आहे.

बँकेचे महत्त्व : आर्थिक विकासामध्ये बँका महत्त्वाची भूमिका बजावतात त्या लोकांकडून पैसा संग्रहित करून गुंतवणूकदारांना कर्जरूपाने पुरवठा करतात. याद्वारे भांडवल संग्रह व बचतीमध्ये प्रमुख भूमिका बजावतात. विविध प्रकारच्या खात्याद्वारे व आकर्षक योजनांद्वारे ग्राहकांकडून पैसे स्वीकारतात. वाणिज्य व व्यवसायासाठी चालू कर्जदराने कर्जपुरवठा करून शेती, उद्योगधंदे व सेवाक्षेत्र यांच्या विकासात सहाय्यक ठरतात. बँका ड्राफ्टस् वटवितात. क्रेडिट कार्डस् डेबिट कार्डस् देऊन व्यवहार सोपे करतात. शेअर्स मध्येही पैसा गुंतवतात.

4. भारतीय रिझर्व बँक (RBI) :

रिझर्व बँक ही भारताची मध्यवर्ती बँक आहे. 1 एप्रिल 1935 मध्ये तिची स्थापना झाली व 1 जाने. 1949 रोजी ती राष्ट्रीयीकृत झाली.

रिझर्व बँकेची कार्ये :

1. चलनी नोटा छापण्याचा एकाधिकार :

रिझर्व बँकेला 2,5,10,20,50,100,500,1000 व 2000 च्या चलनी नोटा छापण्याचा एकाधिकार आहे. एक रुपयाची नोट केंद्र सरकार छापते आणि सरकारच्या अनुमतीने भारतीय रिझर्व बँक (RBI) ती वितरित करते.

हे तुम्हाला माहित आहे कां ?

भारतीय रिझर्व बँकेने आपल्या प्रस्तावनेत त्यांच्या कार्याचे वर्णन असे केले आहे. ''चलनी नोटांच्या वितरणावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक स्थैर्य टिकविणे, देशाला हितावह अशी पैसा व कर्जाची व्यवस्था करणे'.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2. सरकारची बँक म्हणून कार्य करणे :

भारतीय रिझर्व बँक केंद्र सरकार व राज्य सरकार कडून ठेवी स्वीकारते. सरकारच्यावतीने कर व इतर चार्जेस स्वीकारते. सरकारी आदेशानुसार पैसे वितरित करते. सरकारी रोखे, ट्रेझरी बिले, ड्राफ्टस् वितरित करते. सरकारचा आर्थिक सल्लागार म्हणून काम पाहते. सरकारला आवश्यक असल्यास अल्पमुदतीच्या कर्जाची व्यवस्था करते.

3. बँकांची बँक म्हणून कार्य करणे :

भारतीय रिझर्व बँक ही 'बँकाची बँक' म्हणून कार्य करते. देशातील सर्व बँकांवर नियंत्रण ठेवते. सर्व बँकांनी आपल्याकडे असलेल्या ठेवीं पैकी ठराविक रक्कम भारतीय रिझर्व बँकेकडे ठेवावी लागते. बँकांना जास्त रक्कमेची आवश्यकता भासल्यास त्यांना रिझर्व बँक कर्ज देते. बँकाना आर्थिक व्यवहार करण्यास मार्गदर्शन करते.

4. राष्ट्रीय समाशोधन केंद्र (National Clearing House) :

बँकाबँकातील व्यवहार सुरळीतपणे चालण्यासाठी भारतीय रिझर्वबँक (RBI) समाशोधन केंद्र म्हणून काम पाहते. यामुळे बॅकांमधील परस्पर व्यवहार करणे सुलभ होते.

5. कर्जाच्या प्रमाणावर नियंत्रण :

देशातील अपेक्षित परिस्थितीला अनुसरून वाणिज्य बँकांचे कर्जाचे प्रमाण भारतीय रिझर्व बँक नियंत्रित करते.

6. विदेशी विनिमय संग्रहाचे पर्यवेक्षण (Supervision) :

भारतीय रिझर्व बँक विदेशी विनिमय संग्रहाचे पर्यवेक्षक म्हणून काम पाहते. आपल्या देशातील पैशाचे दुसऱ्या देशाच्या चलनात रुपांतर करताना विनिमयाचा दर नियंत्रित करते. विदेशी विनिमय दरातील अनपेक्षित चढउतार कमी करण्यासाठी परिस्थितीनुसार परदेशी चलनाची खरेदीविक्री करण्याचे काम रिझर्व बँक पाहते.

7. बँकेची सवय लावणे :

देशातील सर्व लोकांना बँकेतील व्यवहार करण्याची व बचत करण्याची सवय लावणे. बँका नसलेल्या भागातील लोकांनाही बँकेच्या सेवा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करते.

भारताचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी भारतीय रिझर्व बँक (RBI) महत्वपूर्ण योगदान देते. परिणामकारी संशोधन करणे, आकडेवारी गोळा करणे, बँकिंग संबंधीचे ज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे या समृद्ध परंपरा तिने जोपसल्या आहेत. आर्थिक संकटांना तोंड देण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेचे (RBI) उपक्रम अत्यंत उपयुक्त आहेत.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

हे तुम्हाला माहित आहे कां ?

सर्वात प्राचीन सेंट्रल बँक 1668 मध्ये स्थापन झालेली स्वीडन मधील 'रिक्स बँक', ब्रिटनम धील सेंट्रल बँक (बँक ऑफ इंग्लंड) ची स्थापना 1694 मध्ये झाली, अमेरिकेमधील 'सेंट्रल बँक फेडरल रिझर्व सिस्टीमची स्थापना' 1913 मध्ये झाली.

5. पैशाच्या पुरवठ्यावरील नियंत्रण :

देशातील अर्थ प्राधिकरणाकडून चलनी नोटा व नाणी पुरवली जातात या शिवाय देशातील बँकामधील बचत व ठेवी आणि चालू खात्यांत असणारी शिल्लक रक्कमपण पैसाच समजली जाते.

या खात्यातील पैसा मागणीनुसार काढता येतो, म्हणून त्या पैशाला 'डिमांड ठेव' असे म्हणतात. बाकीच्या ठेवींना विशिष्ट अवधी असल्याने त्यांना 'मुदत ठेव' असे म्हणतात.

लोकांजवळ असणारा पैसा व बचत ठेवीतील पैसा एकत्रित केल्यास पुरवठ्याच्या एकूण पैशाचे प्रमाण कळते.

भारतात पैशाच्या पुरवठ्यासंबंधी चार पद्धती आहेत

M1, M2, M3 व M4.

M1 = चलनी नोटा व नाणी + वाणिज्य बँकामधील ठेवी

M2 = M1 + पोस्ट ऑफिसमधील बचत ठेवी

M3 = M1 + वाणिज्य बँकामधील मुदत ठेवी

M4 = M3 +पोस्ट ऑफिस मधील सर्व ठेवी

अर्थव्यवस्थेमध्ये M1 व M2 ही अत्यंत किरकोळ रक्कम (Narrow Money) आणि M3 व M4 ही मोठी रक्कम (Broad Money) म्हणून ओळखली जाते. या शिवाय व्यापारी बँका आपल्या जवळच्या ठेवींच्या आधारावर कितीतरी पटीने कर्ज देऊन त्यांचा उपयोग विकासासाठी करून घेतात. यामुळेपण अर्थव्यवस्थेतील चलनामधील रक्कमेचे प्रमाण वाढते.

वस्तू व सेवांचा पुरवठा किंमतीच्या चढउताराची स्थिती दर्शवितो पैशाचा पुरवठा प्रमाणापेक्षा जास्त होऊन त्या तुलनेत वस्तू व सेवांचा पुरवठा न झाल्यास वस्तूंच्या किंमती जलद गतीने वाढतात आणि चलनफुगवटा निर्माण होऊन भरपूर अडचणी येतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

वस्तूंची अल्पशी दरवाढ ही पोषक ठरते. वस्तूंची मोठ्या प्रमाणात दरवाढ झाल्यास लोकांची खरेदीची क्षमता कमी होऊन उत्पन्नाची विभागणी विस्कळीत होते. गुंतवणू कदारांचा अपेक्षाभंग होऊन आर्थिक विकासाला बाधा येऊ शकते.

अशा परिस्थितीत भारतीय रिझर्वबँक (RBI) पैशाच्या पुरवठ्यामध्ये बदल करते. बँकेकडून देणाऱ्या कर्जावर नियंत्रण आणण्यास काही उपाय योजते यामुळे कर्जावरील व्याजदरावर परिणाम होतो. कर्जावर नियंत्रण ठेवण्यासाठी योजलेले उपाय, अर्थव्यवस्थेतील सर्व पैसा व व्याजदर या सर्वांना मिळून 'चलननीती' असे ग्हणतात. आता आपण कर्जावरील नियंत्रण आणण्यासाठी भारतीय रिझर्व बँके (RBI) ने योजलेल्या उपायांबद्दल थोडक्यात माहिती घेऊया

6. कर्जावरील नियंत्रणाचे उपाय

याचे दोन प्रमुख विभाग आहेत a) संख्यात्मक b) गुणात्मक

A) संख्यात्मक कर्जनियंत्रणाचे उपाय : यामुळे व्यवसाय व लोकांना उपलब्ध होणाऱ्या रक्कमेची माहिती मिळते. त्याची तीन घटकात विभागणी केली जाते (i) बँकदर (ii) खुल्या बाजारपेठांचे कार्य (iii) राखीवगंगाजळीची आवश्यकता

i) बँक दर : भारतीय रिझर्व बँक (RBI) व्यापारी बँकांना रोख्यांच्या तारणाच्या बदल्यात काही निधी उपलब्ध करून देते. यासाठी भारतीय रिरझर्व बँक (RBI) त्यांच्याकडून विशिष्ट व्याजदर आकारते. बँकेचा दर कमी झाल्यास कर्ज देण्याची क्षमता वाढते व याउलट बँकेचा दर वाढल्यास कर्ज देण्याची क्षमता कमी होते यालाच 'बँकदर' असे म्हणतात रिझर्व बँक याच उद्देशाने 'रेपो व रिव्हर्स रेपोदर' ठरवित असते.

ii) खुल्या बाजारपेठांचे कार्य : सरकारी रोख्यांची केंद्र बँकेकडून खरेदी विक्री करणे म्हणजेच खुल्या बाजारपेठांचे कार्य होय. सरकारी रोखे विकल्यामुळे बँकेचा व जनतेचा पैसा केंद्र बँकेकडे जातो. सरकारी रोखे खरेदी केल्यामुळे केंद्र बँकेमधील पैसा बँकांकडे व जनतेकडे येतो.

iii) राखीव गंगाजळीची आवश्यकता : बँकांना आपला ठराविक निधी भारतीय रिझर्व बँकेच्या दोन खात्यांवर ठेवणे बंधनकारक असते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1) रोख राखीव निधी प्रमाण (CCR) (Cash Reserve Ratio)

2) कायदेशीर रोखता प्रमाण (SLR) (Statutory Liquiding Ratio)

सर्व बँकांना रिझर्व बँकेकडे रोख स्वरूपात काही रक्कम ठेवावी लागते त्याला रोख राखीव निधी प्रमाण (CCR) म्हणतात. सोने, तारण व काही ठराविक रक्कम सुद्धा भारतीय रिझर्व बँकेकडे ठेवावी लागते. त्याला 'कायदेशीर रोखता प्रमाण' (SLR) म्हणतात.

CCR व SLR ही भारतीत रिझर्व बँकेकडे असणारी कर्ज नियंत्रणासाठीची दोन शस्त्रे आहेत रिझर्व बँकेने हे प्रमाण जर वाढविले तर बँकांना आपल्या व्यवहारासाठी कमी पैसा शिल्लक राहतो. रिझर्व बँकेने प्रमाण जर कमी केले तर बँकाना रिझर्व बँकेकडे कमी ठेवी ठेवाव्या लागतात व बँकांना आपल्या व्यवहारासाठी जास्त पैसा उपलब्ध होतो.

b) गुणात्मक कर्ज नियंत्रणाचे उपाय : कर्ज घेण्याचा उद्देश व कर्जाचा विनियोग यावर गुणात्मक कर्ज नियंत्रणाचा परिणाम होतो. गुणात्मक कर्जनियंत्रणाचे उपाय खालील प्रमाणे आहेत.

i) कर्जाच्या मार्जिन प्रमाणातील बदल : कर्ज देण्यासाठी बँक काही तारण मागते. किंवा कर्जदाराने कर्जातील काही रक्कम बँकेकडे तारण म्हणून ठेवावी लागते. कर्जाला प्रोत्साहन देण्यासाठी तारण रक्कमेचे प्रमाण काहीवेळा कमी केले जाते. तारण रक्कमेचे प्रमाण जास्त असल्यास कर्जकमी मिळते.

ii) कर्जाची कमाल मर्यादा किंवा कर्जाचे वाटप : कर्जाची कमाल मर्यादा भारतीय रिझर्व बँक ठरवते. अमर्याद कर्ज देण्यावर नियंत्रण ठेवते.

iii) नैतिक दबाव : व्यापारी बँकांना कर्जाची रक्कम वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी रिझर्व बँक वेळेवेळी पाठपुरावा करीत असते या बाबतीत रिझर्व बँक वरचेवर परिपत्रके पाठवून बँकांवर नैतिक दबाव आणते.

iv) थेट कारवाई : वरील सर्व नियंत्रणाचे उपाय अयशस्वी झाल्यास रिझर्वबँक व्यापारी बँकावर व इतर वित्त संस्थावर थेट कारवाई करते. ही एक दंडात्मक कारवाई असून शेवटचा उपाय म्हणून तो वापरला जातो.

अशाप्रकारे भारतीय रिझर्व बँक (RBI) अनेकविध उपक्रमांद्वारे पैशांचा पुरवठा आणि भाववाढीवर होणाऱ्या परिणामावर नियंत्रण ठेवून विकासाची गती वाढवते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. वस्तू विनिमय पद्धतीमध्ये वस्तूंच्या बदल्यात _____ देतात.
2. भारतीय रिझर्व बँकेची स्थापना _____ मध्ये झाली.
3. _____ हे जपान देशातील चलन आहे.
4. _____ मध्ये भारत सरकारने 14 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले.
5. किरकोळ रक्कमेमध्ये _____ व _____ चा समावेश असतो.
6. जेव्हा पैशाचा पुरवठा देशातील उपलब्ध सेवा व वस्तूंपेक्षा जास्त असतो तेव्हा _____ निर्माण होतो.
7. चेक्स म्हणजे _____ चा पैसा आहे.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. 'वस्तू विनिमय पद्धत' म्हणजे काय?
2. पैशाचा अर्थ व त्याची कार्ये स्पष्ट करा.
3. भारतीय रिझर्व बँकेची कार्ये स्पष्ट करा.
4. भारतातील पैसा पुरवठा करण्याच्या पद्धती कोणत्या?
5. भारतीय रिझर्व बँकेने योजिलेले कर्ज नियंत्रणाचे उपाय कोणते?

III. प्रकल्प

1. चित्रांच्या आधारे पैशाचा विकास कसा झाला ते स्पष्ट करा.

IV. उपक्रम

1. व्यापारी बँकांच्या कामाचे प्रत्यक्ष निरीक्षण करून अहवाल द्या.
2. जवळच्या बँकेस भेट देऊन त्यांच्या कार्याचा अहवाल लिहा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 4

सार्वजनिक अर्थव्यवस्था आणि अंदाजपत्रक

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **सार्वजनिक अर्थव्यवस्थेचा अर्थ आणि महत्त्व**
- **अंदाज - पत्रक**
- **सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक उत्पन्न**
- **तुटीची अर्थव्यवस्था आणि आर्थिक तूट**

1. प्रस्तावना :

तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न कोणकोणत्या स्त्रोतांद्वारे मिळते हे तुम्हाला माहित आहे का? प्रत्येक कुटुंबातील सदस्य शेती, उद्योग किंवा सेवा क्षेत्रात काम करून उत्पन्न मिळवितात. व्यक्ती आपले उत्पन्न - भाडे (जमीन, इमारती इ.), मजुरी (विविध आर्थिक क्षेत्रात श्रम करुन), व्याज (वित्तसंस्थेत पैसा गुंतवून व दुसऱ्यांना कर्ज देऊन), नफा (एखाद्या उत्पादन क्षेत्रात पैसा गुंतवून) या स्वरूपात उत्पन्न मिळवितात.

सर्वसामान्यपणे एका वर्षाचे उत्पन्न मोजले जाते. अशाप्रकारे मिळविलेले उत्पन्न उदरनिर्वाहासाठी व भविष्यातील तरतूदीसाठी वापरतात. परंतु सर्वांनाच आपल्या गरजा पूर्ण करण्याइतपत उत्पन्न मिळविणे शक्य होत नाही. अशावेळी उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ राखणे कठीण होते. जेंव्हा आपण उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करतो तेव्हा आपल्याला कर्ज घेणे भाग पडते. उत्पन्न, खर्च व कर्ज यात समन्वय साधण्याच्या या व्यवस्थेला 'वैयक्तिक अर्थव्यवस्था' (Personal Finance) असे म्हणतात. याचप्रमाणे सरकार स्वतः चे आर्थिक व्यवहार करत असते. त्याला 'सार्वजनिक अर्थव्यवस्था' (Public Finance) असे म्हणतात. या प्रकरणात आपण सरकारचे आर्थिक व्यवहार कसे चालतात. याचा अभ्यास करूया.

2. सार्वजनिक अर्थव्यवस्था :

अर्थ व त्याचे महत्त्व : सरकारचे उत्पन्न, खर्च व कर्ज यांच्यात समन्वय साधण्याच्या व्यवस्थेला 'सार्वजनिक अर्थ व्यवस्था' असे म्हणतात, डॉल्टन यांच्या मते सरकारचे उत्पन्न व खर्च आणि त्यातील समन्वय साधण्याची प्रक्रिया म्हणजे 'सार्वजनिक अर्थव्यवस्था' होय.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

सार्वजनिक अर्थव्यवस्थेचे महत्त्व : आर्थिक विकास व आर्थिक स्थैर्य साधण्यासाठी सरकार आपले उत्पन्न व कर्जाशी संबंधित काही धोरणांचा अवलंब करते. या नीतीलाच ''आर्थिक-धोरण' असे म्हणतात. आर्थिक विकास व आर्थिक स्थैर्य मिळवून उत्पन्नाची समान वाटणी करणे हेच आर्थिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

विकासात्मक करप्रणालीचा अवलंब करून श्रीमंतांच्या उत्पन्नावर जादा कर लादून तो पैसा गरिबांच्या कल्याणासाठी वापरून असमानता कमी करणे व उत्पन्नाचा उपयोग विकासाच्या कामासाठी केल्यास विकासाची पातळी उंचावून सगळ्यांना त्याचा लाभ मिळतो.

आर्थिक मागासलेपणाच्यावेळी खर्च कमी करून आर्थिक स्थैर्य साधले जाते. उत्पन्न व खर्च यांच्यामधील ताळमेळाला 'वार्षिक अंदाजपत्रक' म्हणतात. सार्वजनिक अर्थ व्यवस्थेचा अभ्यास म्हणजे वार्षिक अंदाज पत्रकाचे विश्लेषण करणे होय.

अंदाजपत्रक (Budget) : सरकार आर्थिक वर्ष संपण्यापूर्वीच वार्षिक अंदाजपत्रक तयार ठेवते. भारतात आर्थिक वर्ष 1 एप्रिलला सुरु होऊन 31 मार्चला संपते. पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करून लोकसभेमध्ये ते मंजूर करून घ्यावे लागते. अंदाजपत्रकाद्वारे आर्थिक धोरणाचा अवलंब करण्याचा प्रयत्न सरकार करते. अंदाजपत्रक म्हणजे काय?

'सरकारच्या एका वर्षातील एकूण उत्पन्न व खर्चाच्या तपशीलालाच अंदाजपत्रक असे म्हणतात.' केंद्र सरकार व राज्य-सरकार आपापले अंदाजपत्रक स्वतंत्रपणे तयार करतात.

सामान्यपणे देशाचे अर्थमंत्री त्यांच्या खात्यातील अधिकाऱ्यांची मदत घेऊन अंदाजपत्रक तयार करतात. अर्थमंत्री फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये लोकसभेत अंदाज पत्रक सादर करतात. लोकसभेत व राज्यसभेत या अंदाजपत्रकावर प्रदीर्घ चर्चा होऊन 31 मार्चपूर्वी ते मंजूर करून घ्यावे लागते.

अंदाजपत्रकाचे तीन प्रकार आहेत : सरकारचे उत्पन्न खर्चापेक्षा जास्त असेल तर त्याला 'शिल्लकी अंदाजपत्रक' म्हणतात. आणि उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल तर त्याला 'तुटीचे अंदाजपत्रक' व उत्पन्न खर्च समान असेल तर त्याला 'संतुलित अंदाजपत्रक' असे म्हणतात. भारत देशासारख्या विकसनशील देशात विकासासाठी तुटीचे अंदाजपत्रक सादर केले जाते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

2.1 सार्वजनिक खर्च : सार्वजनिक खर्च म्हणजे सरकारने केलेला खर्च होय. लोकांच्या हितासाठी केलेला खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च. देशाच्या संरक्षणासाठी, लोककल्याणासाठी, प्रशासकीय कारभार सांभाळण्यासाठी व आर्थिक विकासासाठी सरकार जो पैसा खर्च करते त्याला 'सार्वजनिक खर्च' म्हणतात. 20 व्या शतकातील कल्याणकारी राज्याच्या उदयाने सरकारचे कार्यक्षेत्र व भूमिका यांचा विस्तार होऊन सार्वजनिक खर्च वाढला आहे. भारतात केंद्र व राज्यसरकार आपापल्या खर्चाच्या बाबी स्वतंत्रपणे सांभाळतात.

आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, तसेच सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, सार्वजनिक खर्च करावा लागतो. सरकार गुंतवणुकीसाठी पोषक वातावरणाची निर्मिती करते. सरकार लोकांना बचत, गुंतवणूक आणि नवीन उपक्रम राबविण्यास सतत प्रोत्साहन देते. आर्थिक विकासाची गती वाढवून आर्थिक स्थैर्याची हमी देते. सार्वजनिक खर्चाचे प्रमुख उद्देश खालील प्रमाणे

i) आर्थिक विकासाची गती वाढविणे
ii) उद्योग, व्यवसाय व व्यापार यांना प्रोत्साहन देणे.
iii) शेती व ग्रामीण विकासासाठी प्रोत्साहन देणे.
iv) प्रादेशिक विकासाचा समतोल साधणे
v) सामाजिक, आर्थिक, मूलभूत सुविधा पुरविणे (उदा रस्ते, रेल्वे, वीज इ)
vi) सामूहिक गरजा भागविणे व लोककल्याण साधणे
vii) सर्वांना रोजगार उपलब्ध करून देणे

2.2 सार्वजनिक उत्पन्न : सरकारी उपक्रम राबविण्यासाठी वापरले जाणारे उत्पन्न म्हणजेच 'सार्वजनिक उत्पन्न' होय. आर्थिक उपक्रम राबविल्यामुळे जनतेकडून मिळणारी कर रूपातील रक्कम, सरकारी उद्योगधंद्यामधून व जनकल्याण निधी यातून मिळणारी रक्कम या सर्वांचा समावेश सार्वजनिक उत्पन्नामध्ये होतो. जनतेच्या वाढत्या उत्पन्नामुळे व सरकारच्या वाढत्या गरजांमुळे सरकार महसूलाद्वारे आपले उत्पन्न वाढवीत आहे. केंद्र व राज्य सरकारची कार्ये व त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत घटनेमध्ये नमूद केले आहेत. आता आपण केंद्र सरकारच्या उत्पन्न बद्दल अधिक माहिती मिळवू.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

A) महसूलाद्वारे मिळणारे उत्पन्न :

कर व करेतर रूपाने सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नाला 'महसूल उत्पन्न' म्हणतात.

i) कररूपाने मिळणारा महसूल (Tax Revenue) : जनतेने कोणत्याही फळाची अपेक्षा न करता सरकारला दिल्या जाणाऱ्या सक्तीच्या रक्कमेला 'कर' असे म्हणतात. केंद्र सरकार लोकांवर अनेक प्रकारचे कर आकारून आपले उत्पन्न गोळा करते. कर हे सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. सरकार जास्त उत्पन्न असणाऱ्या लोकांवर जास्त कर आणि कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांवर कमी कर आकारते. गरिबांना करामध्ये सूट दिलेली आहे. श्रीमंत लोकांसाठी कराचा दर जास्त असतो तर सामान्य लोकांना कराचा दर कमी असतो. कर आकारताना सरकार काही धोरणांचा अवलंब करते. त्याला पुरोगामी कर प्रणाली (Progressive Taxation) म्हणतात.

केंद्र सरकार दोन प्रकारचे कर आकारते

a) प्रत्यक्षकर b) अप्रत्यक्षकर

a) प्रत्यक्षकर (Direct Taxes) :

ज्या व्यक्तीवर कर आकारलेला आहे, त्यानेच कर भरला तर त्याला 'प्रत्यक्षकर' असे म्हणतात. हा कर हस्तांतरित करता येत नाही. प्रत्यक्ष कराची उदाहरणे म्हणजे -उत्पन्नाचा कर, संपत्तीचा कर, स्टँप ड्यूटी, कंपनी कर वगैरे.

b) अप्रत्यक्षकर (Indirect Taxes) :

सरकारने आकारलेला कर दुसऱ्यांना हस्तांतरित करता येत असेल तर त्याला 'अप्रत्यक्ष कर' असे म्हणतात. सामान्यतः अप्रत्यक्षकर वस्तू व सेवांवर आकारले जातात. उदा. सरकार वस्तू व सेवांची निर्मिती करताना उत्पादकांवर कर आकारते. उत्पादक हा कर व्यापाऱ्यांवर आकारतात. व्यापारी हा कर ग्राहकांवर आकारतात. म्हणजे सरकारने उत्पादकांवर कर आकारला, परंतु तो कर ग्राहकांकडूनच भरला जातो.

अप्रत्यक्ष कराची उदाहरणे-अबकारी कर, आयातनिर्यात कर, सेवा कर, व्हॅट (VAT) इ. 2017-18 च्या आर्थिक वर्षा-पासून सरकारने अप्रत्यक्ष कराच्या स्वरूपात GST (Goods and Service Tax) लागू करण्याचे ठरविले आहे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

GST वस्तू व सेवाकर : GST एक अशा प्रकारचा अप्रत्यक्ष कर आहे की जो उत्पादन विक्री, वस्तू आणि सेवांच्या वापरावर संपूर्ण भारतात आकारला जाणार आहे. केंद्र व राज्य सरकार आकारत असलेल्या सध्याच्या करांच्या बदल्यात हा कर आकारला जाणार आहे. उत्पादक आणि विक्रेते सरकारला यापूर्वी देत असलेल्या करांचे प्रमाण कमी होणार आहे.

अप्रत्यक्ष करांच्या सुधारणेमध्ये GST हा प्रमुख बदल आहे. त्यामुळे समान राष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. ग्राहकांवरील करांचा बोजा कमी होतो. सर्व वस्तू एका राज्यातून दुसऱ्या राज्यात मुक्तपणे पाठविणे सुलभ होईल. त्यामुळे कमीतकमी कागदपत्रे लागतील.

ii) करेतर महसूल (Non tax Revenue) :

सरकारला करा व्यतिरिक्त इतर स्त्रोतांपासून मिळणारा महसूल म्हणजेच 'करेतर उत्पन्न' होय. करेतर उत्पन्नाचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

1) भारतीय रिझर्व बँकेकडून मिळणारा निव्वळ नफा
2) भारतीय रेल्वेकडून मिळणारा निव्वळनफा
3) पोस्ट व दूरसंचार खात्याकडून मिळणारा महसूल
4) सार्वजनिक उद्योग क्षेत्रांकडून मिळणारा महसूल
5) टांकसाळीद्वारे मिळणारा महसूल
6) विविध प्रकारची फी व दंडाची वसूल केलेली रक्कम

B) भांडवली उत्पन्न (Capital Reciepts)

भांडवली उत्पन्नामुळे सरकारवर बोजा पडतो आणि सरकारच्या संपत्तीत घट होते उदा. सरकारने कर्ज घेतल्यास सरकारवरील बोजा वाढतो. सार्वजनिक क्षेत्रातील कर्जरोख्यांची विक्री केल्यास सरकारच्या संपत्तीत घट होते. याला 'भांडवली उत्पन्न' असे म्हणतात.

2.3 सार्वजनिक कर्ज (Public Debt)

सरकार हे भांडवली उत्पन्न, अंतर्गत व विदेशी कर्जाद्वारे मिळविते. देशातील जनता, बँका, वित्तसंस्था, उद्योगधंदे याद्वारे मिळणारे कर्ज हे अंतर्गत कर्ज म्हणून ओळखले जाते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

विदेशी सरकार, विदेशी वित्तसंस्था व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था याद्वारे मिळणाऱ्या कर्जास विदेशी कर्ज म्हणतात.

कर्जाव्यतिरिक्त इतर स्त्रोताद्वारे सरकार भांडवल गोळा करते. सार्वजनिक उद्योगधंद्याम धील गुंतवलेला पैसा परत घेते. याला निर्गुंतवणूक म्हणतात. केंद्रसरकारकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड राज्यसरकार वेळोवेळी करते या प्रमाणे निर्गुंतवणूक व कर्जाची परतफेड यापासून मिळणाऱ्या रक्कमेला 'कर्जेतर भांडवल' म्हणतात.

खालील चित्र भारत सरकारच्या 2014-15 सालातील अंदाजपत्रकाचे विवरण दाखवते.

रुपया असा येतो **रुपया असा जातो**



उपक्रम : वरील चित्राचा अभ्यास करून अर्थ समजून घ्या.

3. तुटीची अर्थव्यवस्था (Deficit Financing)

वर सांगितल्याप्रमाणे सरकार प्रथम खर्चाचा अंदाज करून त्या अनुषंगाने आपल्या उत्पन्नाची योजना आखते. असे करताना उत्पन्नापेक्षा खर्च जास्त दाखवते. देशाच्या विकासाच्या दृष्टीने उत्पन्नापेक्षा खर्च जास्त दाखवते. देशाच्या विकासाच्या दृष्टीने ही अत्यंत चांगली बाब आहे. उत्पन्न व खर्चामधील फरक भरून काढण्यासाठी सरकार अंतर्गत व विदेशी स्त्रोतांच्याद्वारे कर्ज काढते. आवश्यकता भासल्यास जास्त नोटा छापते म्हणजेच तुटीची अर्थव्यवस्था होय. या सर्व उपक्रमांमुळे पैशांचे चलनवलन वाढून विकासाचे उत्तम फळ मिळते.

© KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

भारतात तुटीचे चार प्रकार आहेत. ते खालील प्रमाणे

i) **आर्थिक तूट :** अंदाजपत्रकात महसूली उत्पन्न व कर्जेतर भांडवली उत्पन्न यापेक्षा सरकारचा खर्च जास्त झाल्यास त्याला आर्थिक तूट म्हणतात. ती खालीलप्रमाणे दाखवितात.

आर्थिक तूट = (महसूली उत्पन्न + कर्जेतर भांडवली उत्पन्न) - एकूण खर्च

ii) **प्राथमिक तूट :** चालू वर्षामधील आर्थिक तुटीमध्ये गेल्या वर्षातील फेडलेले व्याज वजा केल्यास त्याला प्राथमिक तूट म्हणतात. सूत्र खालील प्रमाणे

प्राथमिक तूट = आर्थिक तूट - फेडलेले व्याज

iii) **महसूली तूट :** महसूल खात्याचा खर्च महसूल खात्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त झाल्यास त्याला 'महसूली तूट' म्हणतात. त्याचे सूत्र खालील प्रमाणे

महसूली तूट = महसूली उत्पन्न - महसूलीखर्च

iv) **तुटीचे अंदाजपत्रक :** एकूण उत्पन्न व एकूण खर्च यांच्यातील फरक म्हणजे 'तुटीचे अंदाजपत्रक' होय. त्याचे सूत्र खालील प्रमाणे

तुटीचे अंदाजपत्रक = एकूण उत्पन्न - एकूण खर्च

जास्त प्रमाणातील तूट अर्थव्यवस्थेला बाधक ठरते कारण देशावर खर्चाचा बोजा पडून आर्थिक अव्यवस्था निर्माण होते. चलन फुगवटा निर्माण होतो. म्हणून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने 2003 मध्ये आर्थिक जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा (Fiscal Responsibility and Budget Management Act.) अंमलात आणला आहे.

हा कायदा आर्थिक व्यवस्थेतील तूट कमी करतो, आर्थिक व्यवहार सुरळीत होऊन संतुलित अंदाज पत्रकाकडे वाटचाल करण्यास मदत होते.

2017-18 सालाचे केंद्र सरकारचे अंदाजपत्रक

अं.न.	विषय विवरण	कोटी रूपये
1	महसूल खात्याचे उपन्न	1515771
2	कर रूपातील उत्पन्न	1227014
3	करेतर उत्पन्न	288757
4	भांडवली उत्पन्न	630964

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

5	कर्ज वसुली	11932
6	इतर उत्पन्न	72500
7	कर्ज व इतर बोजा	546532
8	एकूण वसूली	2146735
9	योजना बाह्य खर्च	945078
10	महसूल खाते	674057
11	व्याज परतफेड	271021
12	भांडवली खाते	1201657
13	नियोजित खर्च	1162877
14	महसूल खाते	523078
15	भांडवली खाते	38780
16	एकूण खर्च	2146735
17	महसूल खर्च	1836964
18	अनुदान व भांडवल निर्मिती	195350
19	भांडवली खर्च	309801
20	महसूली तूट	321163
21	प्राथमिक तूट	125813
22	आर्थिक तूट	546532
23	प्राथमिक तूट	22454

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. सरकार सार्वजनिक उत्पन्नाची व्यवस्था _____ द्वारे करते.
2. अंदाज पत्रकामध्ये सरकारचे उत्पन्न खचपिक्षा जास्त असल्यास त्याला _____ अंदाजपत्रक म्हणतात.
3. _____ हे लोकसभेत केंद्र सरकारचे वार्षिक अंदाजपत्रक सादर करतात.
4. GST _____ या वर्षापासून अंमलात आले.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा:

1. सार्वजनिक उत्पन्न म्हणजे काय?
2. अंदाजपत्रक म्हणजे काय?
3. तुटीचे अंदाजपत्रक म्हणजे काय?
4. प्रत्यक्ष करांची नावे लिहा.
5. आर्थिक तूट मोजण्याचे सूत्र लिहा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे 5-6 वाक्यात लिहा.

1. सार्वजनिक खर्च वाढीची कारणे स्पष्ट करा.
2. सरकार कोणकोणत्या प्रकारचे कर आकारते?
3. केंद्र सरकारचे नियोजित खर्च म्हणजे काय? यादी करा.
4. केंद्र सरकारच्या करेतर उत्पन्नाचे स्त्रोत कोणते?
5. तूट म्हणजे काय? तुटीचे चार प्रकार लिहा.

IV. उपक्रम :

1. तुमच्या जवळच्या ग्रामपंचायती/तालुका पंचायतीस भेट देऊन तेथील अंदाजपत्रकाची माहिती मिळवा.
2. केंद्र व राज्य सरकारने सादर केलेले अंदाजपत्रक दूरदर्शनमध्ये पाहून वर्गात त्याबद्दल चर्चा करा.
3. अंदाजपत्रक सादर केलेल्या दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांचा संग्रह करून वर्गातील भिंतीवर चिकटवा.
4. तुमच्या कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व्यवहार अध्ययन

प्रकरण - 3

व्यवसायाचे जागतिकीकरण

या पाठात आपण पुढील घटकांचा अभ्यास करूया.

- **जागतिकीकरणाचा अर्थ**
- **जागतिकीकरणातील समाविष्ट घटक**
- **जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये**
- **जागतिकीकरणाचे फायदे**
- **जागतिकीकरणाचे तोटे**
- **जागतिक व्यापारी संघटना (W.T.O)**

'जागतिकीकरण' हा व्यापारी (व्यवसाय) क्षेत्रासाठी काही नवा चमत्कार नाही. 1870 ते 1913 पर्यंतच्या काळामध्ये उद्योगक्षेत्राचा जागतिकीकरणामध्ये वाढता कल होता. परंतु 1980 नंतरच विकसनशील देशांची आर्थिक प्रगती झपाट्याने झाली. माहिती आणि तंत्रज्ञान, दळण-वळण, इंटरनेट इ. क्षेत्रामधील अपार प्रगतीमुळे व्यवसायाचे जागतिकीकरण प्रचंड प्रमाणात झाले. याचा अर्थ असा आहे की हे व्यवसाय फक्त आपापल्या देशातच नव्हे तर जगभर पसरले. याचा परिणाम असा झाला की जगातील सर्व देशांमध्ये चांगले संबंध निर्माण झाले. व्यापाराच्या निमित्ताने ते सर्व देश एकमेकांवर अवलंबून राहू लागले. यामुळे व्यवसायाची वृद्धी होवून बाजारपेठा जगभर पसरल्या

जागतिकीकरणाचा अर्थ - आंतरराष्ट्रीय नाणे निधीने जागतिकीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'आर्थिक विकासाकरिता जगभरातील देशांचे वाढणारे परस्परावलंबन, देशांच्या सीमारेखा ओलांडून वस्तू व सेवांच्या देवाणघेवाणीचे व्यवहार करणे आणि आंतर राष्ट्रीय स्तरावर आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे म्हणजेच जागतिकीकरण होय''.

(IMF - has defined Globalisation as "The growing economic inter depedence of countries world through increasing volume and variety of cross-border transalational capital flows and also through the rapid and wide spread deffusion of Technology".

या व्याख्येद्वारे खालील गोष्टी स्पष्ट होतात-

- जागतिकीकरण म्हणजे सीमारेखा ओलांडून देशाबाहेर वस्तू व सेवा यांची देवाण - घेवाण करणे.
- भांडवल, माहिती आणि तंत्रज्ञान यांचा आंतरराष्ट्रीय प्रवाह वाढविणे.
- जगभरात बाजारपेठा स्थापन करून त्याद्वारे कच्चा माल घेवून स्वस्तात वस्तू खरेदी करण्यासाठी स्वस्त बाजारपेठा उपलब्ध करून देणे.
- कमी खर्चात जगाच्या कोणत्याही भागात वस्तूंचे उत्पादन करणे.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

जागतिकीकरणामध्ये समाविष्ट केले गेलेले घटक-

- जागतिकीकरण म्हणजे तांत्रिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक देवाणघेवाण करून जगभरात पोहचविण्याचे अपूर्व साधन आहे. तसेच दळणवळणाच्यासोयी वाढवणे आणि परस्पर संबंध दृढ करणे.
- जागतिकीकरण देशादेशांमधील राजकीय बंधने दूर करून आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवल वाढविण्यास प्रोत्साहन देते.
- आयात आणि निर्यातीवरील करांचे निर्मूलन करून मुक्त क्षेत्र निर्माण करते.
- जहाजाद्वारे मालाची ने - आण सुरू झाल्यामुळे जागतिकीकरण वाहतूक खर्च कमी करण्यास मदत करते.
- जागतिकीकरण भांडवल गुंतवणुकीवरील बंधने कमी करण्यास मदत करते. त्यामुळे भांडवलाचा ओघ वाढतो.
- जागतिकीकरण देशाला जागतिक व्यापार संघटनेशी (World Trade Organisation) व्यवहार करण्यास मदत करते.
- जेंव्हा बौद्धिक आणि मालमत्तेसंबंधिचे कायदे जास्त कडक केले जातात तेव्हा जागतिकीकरण हितसंबंध जपण्याचे काम करते. (उदा. चीनच्या मालकी हक्काच्या (petent) वस्तू अमेरिकेच्या प्रमुख बाजारपेठेत मिळतात)
- आंतरराष्ट्रीय व्यापाराला संरक्षण देवून जागतिक अर्थव्यवस्था वृद्धींगत करते.
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय भांडवलाच्या ओघाला संरक्षण देते.
- जागतिकीकरण जागतिक व्यापारी संघटना (World Trade Organisation) आणि तेल उत्पादन आणि निर्यात करणाऱ्या संस्था (Oil producing and exporting) यासारख्या संस्थाशी करार करण्यास खतपाणी घालते.
- जागतिक अर्थव्यवस्थेचा विकास करते
- आंतरराष्ट्रीय व्यवहार सांभाळणाऱ्या जागतिक व्यापारी संघटना (WTO), जागतिक बुद्धीमत्ता आणि मालमत्ता संस्था (World Intellectual Property Organization), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund IMF), यासारख्या संस्थाचे कार्य वाढते.
- बहुराष्ट्रीय कंपन्याद्वारे अर्थव्यवस्था बळकट करते.
- आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढविते.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

- बहुसांस्कृतिकरणाला गती देते आणि विविध सांस्कृतिक पद्धतीचा प्रसार होण्यास मदत करते.
- आंतरराष्ट्रीय पर्यटनाला संधी उपलब्ध करून देते.
- लोक मोठ्या प्रमाणात परदेशातून कायमचे वास्तव्य करण्यास येतात.
- स्थानिक अन्नपदार्थांचा प्रसार करते उदा. पिझ्झा, बर्गर इ. तसेच भारतीय पदार्थांचा परदेशात प्रसार करते.
- आंतरराष्ट्रीय दूरवाणी क्षेत्राचा विकास करते इंटरनेट, उपग्रहसेवा, फोनसेवा इ. तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्था वाढविते.

जागतिकीकरणाचे सकारात्मक परिणाम (जागतिकीकरणाचे फायदे) (Positive effects)

- जागतिकीकरणामुळे आर्थिक विकास वृद्धीगंत होतो. उत्पादने व सेवांची व्याप्ती वाढते.
- जागतिकीकरणमुळे लोकांचे राहणीमान उंचावते.
- जागतिकीकरणामुळे एखादी विशिष्ट वस्तू संपूर्ण जगभरात कोठेही उपलब्ध होवू शकते.
- जागतिकीकरणामुळे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न (G.D.P) वाढते.
- जागतिकीकरणाने लोकांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली.
- जागतिकीकरणामुळे लोकांना दुसऱ्या देशातील कार्यक्षेत्र उपलब्ध होते.
- जागतिकीकरण स्थानिक व्यापारांसाठी काही नियम बनविते. त्यामुळे स्पर्धा निर्माण होवून वस्तूंच्या किंमती कमी राहतात किंवा नियंत्रित राहतात.
- जागतिकीकरणामुळे वस्तूंच्या उत्पादनात कौशल्य वापरून विविध प्रकारच्या वस्तू तयार करतात. या वस्तू चांगल्या गुणवत्तेच्या असतात.
- वेगवेगळी राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या एकमेकांवर अवलंबून राहिल्यामुळे त्यांच्यातील सामाजिक व राजकीय संबंध सुधारतात.

जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम (Negative effects)

जागतिकीकरणाने लोकांना व्यवसायानिमित्त एकमेकांशी मोकळेपणाने मिसळण्याची नवी दिशा दाखविली हे जरी खरे असले तरी हे नवे वळण स्वीकारताना कांही आव्हानांना तोंड द्यावे लागले. जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे -

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

- उत्पादनावरील खर्च कमी करण्यासाठी कांही राष्ट्रांनी तिसऱ्याच राष्ट्रातील लोकांना पांढरपेशी रोजगार दिले कारण तिथे कमी पगारावर काम करण्यास कामगार मिळतात. जागतिकीकरणामुळे बाल कामगार आणि गुलामांची संख्या वाढली आहे.
- जागतिकीकरणामुळे जागतिक बाजारपेठत तीव्र स्पर्धा सुरू झाली. याचा परिणाम व्यवसायांमध्ये अवैध कारभार सुरू झाला.
- जागतिकीकरण दहशतवाद्यांना व गुन्हेगारांना सहाय्य करते.
- जागतिकीकरणामुळे शहरे प्रगतशील व विकसित झाली आहेत. त्यामुळे घाण, कचरा टाकण्यासाठी जागा नाही. त्यामुळे कारखान्यातून बाहेर पडणारे टाकावू पदार्थ एकाच ठिकाणी साठविले जातात व प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते.
- मॅकडोनल्ड (Mc Donald) Kentucky Fried Chicken (K.F.C) यासारख्या फास्ट फूडचा प्रसार जगभरात झपाट्याने होत आहे. लोक जंकफूडच्या मागे लागले आहेत. त्याच्या सेवनाने आरोग्य बिघडून रोगराई पसरत आहे. पारंपारिक अन्नपदार्थ हळूहळू लुप्त होवू लागले आहेत.
- श्रीमंत हे अती श्रीमंत होत चालले आहेत. तर गरीबांला दोनवेळच्या जेवणासाठीही झगडावे लागत आहे.
- एडस् (Aids), कॅन्सर, डेंग्यू यासारखे जीवघेणे आजार जगभर पसरत आहेत.
- जागतिकीकरणामुळे परिसर प्रदूषण वाढत आहे.
- कारखान्यांना व उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्चा मालावर मोठ्या प्रमाणात कर आकारला जातो. यामुळे नैसर्गिक खनिजसंपत्तीचा साठा कमी होवून हवा प्रदूषित होत आहे. जगण्यासाठी ज्या हवेची गरज आहे तीच पूर्णपणे प्रदूषित झाली आहे.
- विकसनशील देशातून स्वस्त वस्तूंची आयात केल्यामुळे विकसित देशांमध्ये बेकारीचे प्रमाण वाढले आहे. कारण तेथे उत्पादन खर्च जास्त असतो.
- लघुउद्योजकांना स्पर्धेला तोंड द्यावे लागते. कांही देश अति उत्पादनामुळे कमी किंमतीत वस्तू विकतात. त्याचा परिणाम इतर देशांच्या उत्पादनावर होतो कारण त्या महाग असतात.

जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation W.T.O)

जागतिक व्यापार संघटना (W.T.O) ही देशांतर्गत व्यापार विषयीचे कायदे हाताळणारी जगातील एकमेव आंतरराष्ट्रीय संघटना आहे. या संघटनेचे मुख्य कार्य म्हणजे व्यापार सुरळीत,

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व्यवस्थित, खुला आणि अनुमानानुसार चाललेले आहे की नाही ते पाहणे होय. ही संघटना 1 जानेवारी 1995 ला अस्तित्वात आली आहे. आज 149 देश या संघटनेची सदस्य राष्ट्रे आहेत. याचे मुख्य कार्यालय स्वित्झर्लंड मधील जिनेव्हा येथे आहे. ही 2 वर्षातून एकदा आपली सभा बोलावते.

जागतिक व्यापार संघटनेची प्रमुख उद्दिष्ट्ये

- जागतिक व्यापारी करारांचा कारभार पहाणे.
- व्यापारी तडजोडीची बोलणी करणे.
- व्यापारी वादविवाद सोडविणे.
- जगभरात मुक्त आणि स्वतंत्र व्यापारावर जोर देणे.
- आंतरराष्ट्रीय व्यापारातील कर कमी करणे.
- जगातील साधनसंपत्तीचा समर्थपणे उपयोग करून घेवून उत्पादन आणि व्यापाराचा विस्तार करणे सेवाक्षेत्रांवर काळजीपूर्वक देखरेख करणे.
- विकसनशील, सामान्य दर्जाच्या सदस्यांना तांत्रिक सहाय्य व प्रशिक्षण देणे.
- इतर आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्याने वागणे.

जागतिक व्यापार संघटनेची इतर उद्दिष्ट्ये

- जीवनावश्यक खर्च कमी करून सदस्य राष्ट्रांचे राहणीमान उंचावणे
- सदस्य राष्ट्रांमधील वादविवाद मिटवून व्यापारी ताण कमी करणे.
- आर्थिक विकास व रोजगाराला उत्तेजन देणे.
- आंतरराष्ट्रीय व्यवसायाचा खर्च कमी करणे.
- चांगला राज्यकारभार करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- सदस्य राष्ट्रांमध्ये शांतता व स्थैर्य निर्माण करण्यासाठी योगदान देणे.

स्वाध्याय

I. खालील प्रश्नांची चर्चा करून उत्तरे द्या.

1. 'जागतिकीकरण' म्हणजे काय? स्पष्ट करा.
2. 'जागतिकीकरण' जगभरातील आर्थिक चलनाला कसे सहाय्य करते?
3. जागतिकीकरणाचे फायदे कोणते?

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

4. जागतिकीकरणाची वैशिष्टये कोणती ?
5. जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम उदा. सहित द्या.
6. जागतिक व्यापारी संघटनेची उद्दिष्ट्ये कोणती ?

II. उपक्रम

1. जागतिकीकरणाच्या परिणामामुळे उद्‌भवलेल्या व्यापारी संस्थांची यादी तयार करा.
2. जागतिकीकरणाद्वारे पुरवल्या जाणाऱ्या विशेष वस्तूंबद्दल माहिती गोळा करा.
3. जागतिकीकरणापासून प्रारंभ झालेल्या एका वाणिज्य संस्थेला आणि परंपरागत आपल्याकडे असणाऱ्या वाणिज्य संस्थेला भेट देवून त्यांच्यातील फरकांची यादी तयार करा.

III. प्रकल्प (Project Work)

1. इंटरनेटद्वारे जागतिकीकरणाची माहिती गोळा करून चित्रांसह सविस्तर अहवाल तयार करा.
2. ''जागतिकीकरणामुळे आहाराविषयक सवयी बदललेल्या आहेत'' चर्चा करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

प्रकरण - 4

ग्राहक शिक्षण आणि संरक्षण

या पाठा मध्ये खालील घटकांचा अभ्यास करूया.

- **ग्राहकांचे हक्क, शोषण, ग्राहक जागृती याविषयी जाणून घेणे.**
- **ग्राहक संरक्षण कायद्यातील मुख्य घटक व त्यांचे महत्त्व**
- **वस्तू किंवा सेवा विकत घेताना घ्यावयाची खबरदारी**
- **ग्राहक शिक्षणाचे महत्व आणि ग्राहक न्यायालयात जाण्यासाठी लागणारी आवश्यक माहिती.**

ग्राहक आणि व्यापारी

सेवा व वस्तू विकत घेणाऱ्या व्यक्तींना स्वयंसेवी संस्थांनी 'ग्राहक' असे संबोधले आहे. सरकारनेही आपल्या ग्राहक संरक्षण कायद्यामध्ये 'ग्राहक' हाच शब्द वापरला आहे. पैशांच्या मोबदल्यात ग्राहकाला वस्तू व सेवा पुरवणाऱ्या व्यक्तीला 'व्यापारी' असे म्हणतात. ग्राहकांनी दिलेल्या किंमतीच्या मोबदल्यात दर्जेदार वस्तू व सेवांचा पुरवठा करणे हे वितरकांचे किंवा व्यापाऱ्यांचे कर्तव्य आहे. हा प्रत्येक ग्राहकाचा अधिकार आहे. आपण दिलेल्या पैशांच्या मोबदल्यात बाजारातून योग्य दर्जाच्या वस्तू व सेवा मिळविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने प्रयत्न करावा हेच ग्राहक चळवळीचे उद्दिष्ट आहे. ग्राहकाला 'उपभोक्ता' असेही म्हणतात.

ग्राहकांच्या शोषणाची कारणे.

पूर्वी उत्पादक ग्राहकांना वस्तूंचा पुरवठा थेट करीत असत. उदा : दूध, फळे, भाज्या इ वस्तू दलालांच्या मध्यस्थी शिवाय ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या जात असत. जेव्हा शेती आणि उद्योगांचा विकास झाला तेंव्हा वस्तूंच्या विक्रीच्या पद्धतीत बदल घडून आला. उत्पादक व ग्राहक यांच्यामध्ये दलालांचा शिरकाव झाल्यामुळे त्यांच्यातील थेट व्यवहार पूर्णपणे बंद झाला. उत्पादक आणि ग्राहक या दोघांनी मिळून वस्तूची किंमत ठरविण्या ऐवजी दलाल ती किंमत ठरवू लागले. त्यामुळे ग्राहकांच्या होणाऱ्या हाल अपेष्टा, नुकसान व समस्या उत्पादकांना समजेनाशा झाल्या. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आज घरबसल्या 'टेलिशॉपिंग' द्वारे ग्राहकाला वस्तूंची थेट खरेदी करता येणे शक्य झाले आहे.

टेलिशॉपिंग म्हणजे काय?

ग्राहक वस्तू खरेदीसाठी बाजारात जाण्याऐवजी आंतरजालाद्वारे (इंटरनेट) आपल्याला हव्या असणाऱ्या वस्तू, हव्या त्या दुकानातून घरबसल्या मागवू शकतो. वस्तू हातात मिळाल्यावर त्याची रक्कमही अदा करू शकतो. याच प्रमाणे दूरदर्शन (T.V.) वरील काही वाहिन्यांवरील जाहिराती पाहून सेलफोनवरून SMS द्वारे वस्तू मागवू शकतो. या जाहिरातदारांशी लँडलाईन फोनवरूनही संपर्क साधता येतो. या व्यवहारालाच 'टेलिशॉपिंग' असे म्हणतात.

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

ग्राहक : ग्राहक म्हणजे वस्तू व सेवा विकत घेणारी, तसेच वेतन देऊन सेवा घेणारी व्यक्ती होय. विकत घेतलेल्या वस्तू ग्राहक स्वतःसाठी वापरू शकतो किंवा त्याची पुनर्विक्री करून व्यापार करू शकतो. (नफा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला व्यवहार म्हणजेच व्यापार होय) प्रत्येक ग्राहकाच्या कांही मागण्या असतात. त्या पूर्ण करण्यासाठी तो वस्तूंची खरेदी करतो. प्रत्येक ग्राहकाचे समाधान करणे हे उत्पादकाचे कर्तव्य आहे. आपल्या देशात मुक्त अर्थव्यवस्था असून ग्राहक हा राजा मानला जातो. परंतु दुर्दैवाने बऱ्याचदा ग्राहकांकडे दुर्लक्ष करून त्याचे शोषण व फसवणूक केली जाते. त्यामुळे त्याचे प्रचंड नुकसान होते.

ग्राहक संरक्षण: व्यापारी आणि उत्पादकांकडून होणाऱ्या शोषणापासून ग्राहकाचे रक्षण करणे म्हणजेच ग्राहक संरक्षण होय. आज ग्राहक संरक्षणाची नितांत गरज आहे. ग्राहकांच्या आवडी निवडीं जपण्यास व हितरक्षणासाठी त्यांना अनेक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

ग्राहक संरक्षण कायदा : जेव्हा व्यापाऱ्यांकडून काही ग्राहकांची सतत पिळवणूक होऊ लागली तेव्हा ग्राहक संरक्षण चळवळीस सुरूवात झाली. अशा चळवळींमुळे सरकारवर दबाव आला त्यामुळे सावध होऊन त्यांनी ग्राहकहितासाठी नवीन कायदे लागू केले. गेल्या पाच दशकात 30 हून अधिक कायदे लागू करण्यात आले.

उदा : आवश्यक वस्तूंचा कायदा, वजन मापाचा कायदा, अन्नधान्य भेसळ प्रतिबंधक कायदा इत्यादि. 1986 चा ग्राहक संरक्षण कायदा म्हणजे या दिशेने उचललेले सरकारचे महत्त्वाचे पाऊल होय.

जागतिक ग्राहक दिन : ग्राहक चळवळीच्या इतिहासात 15 मार्च 1962 हा दिवस अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी एक विधेयक संमत करून तेथील ग्राहकांना नागरी सुरक्षा, माहिती, निवेदन व भरपाई हे चार हक्क प्रदान केले. म्हणूनच 15 मार्च हा दिवस दरवर्षी 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

या कायद्याची मुख्य उद्दिष्टे

- ग्राहक संरक्षण कायद्यान्वये सुरक्षितता व उत्तम दर्जा याला प्राधान्य देणे.
- अपायकारक वस्तूंची निर्मिती व विक्री थांबविणे.
- बाजारातील गैरव्यवहार रोखणे.
- दर्जा, वजन, माप व किंमती यावर नियंत्रण ठेवणे.
- ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू व सेवा याबद्दल काही तक्रार आल्यास त्याला योग्य ती नुकसानभपाई देणे
- ग्राहक शिक्षणाद्वारे लोकांमध्ये जागृती निर्माण करणे

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

एकंदरित निकोप स्पर्धा, योग्य किंमत व दर्जेदारवस्तू व सेवा पुरविणे हे या कायद्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

ग्राहक संरक्षण कायदा जम्मू व काश्मीर या राज्याव्यतिरिक्त भारतातील सर्व राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू केलेला आहे.

हा कायदा सर्व वस्तू व सेवांना लागू पडतो. या कायद्यान्वये ग्राहकांना खालील हक्क प्राप्त होतात.

1) अपायकारक वस्तूंच्या विक्रीला प्रतिबंध करण्याचा हक्क
2) माहिती मिळविण्याचा हक्क : वस्तू व सेवांचा दर्जा, प्रमाण, शुद्धता व दर या बद्दलची माहिती विचारण्याचा हक्क.
3) वस्तू निवडण्याचा हक्क : स्पर्धात्मक किंमतींची तुलना करून विविध वस्तू खरेदी करण्याचा हक्क.
4) तक्रार निवारण्याचा हक्क : अवैध व्यापाराद्वारे होणारी फसवणूक अथवा शोषणाविरुद्ध जाब विचारण्याचा हक्क
5) पिळवणुकीविरुद्ध भरपाई मिळविण्याचा हक्क : ग्राहकांची फसवणूक झाल्यास नुकसान भरपाई मिळविण्याचा हक्क.
6) ग्राहक शिक्षण हक्क : ग्राहकांना आपल्या अधिकाराबद्दल जाणून घेण्याचा हक्क
7) निकोप व उत्तम भौतिक परिसर उपलब्ध करून देऊन जीवनमान उंचावण्याचा हक्क.

राष्ट्रीय पातळीवर केंद्रीय संरक्षण परिषदेची स्थापना झाली आहे. राज्यपातळीवर राज्य ग्राहक संरक्षण परिषद आणि जिल्हापातळीवर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद यांची स्थापना झाली आहे. केंद्र सरकारमधील ग्राहक कल्याण खात्याचे मंत्री हे राष्ट्रीय संरक्षण परिषदेचे अध्यक्ष असतात. जिल्हाधिकारी हे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष असतात.

ग्राहक वाद व तक्रार निवारण संस्था आणि त्याची कार्ये.

1. जिल्हा मंच (District Forum) :प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक मंच असतो. जिल्हा न्यायाधीश किंवा तत्सम अधिकारी हे त्याचे अध्यक्ष असतात. 20 लाखांपेक्षा कमी भरपाईच्या तक्रारींचे येथे निवारण केले जाते. यात दोन सदस्य असून त्यापैकी एक महिला सदस्य असतात.

2. राज्य आयोग (State Commission) : राज्याच्या उच्च न्यायलयाचे निवृत्त न्यायाधीश किंवा आजी न्यायाधीश हे या आयोगाचे अध्यक्ष असतात. त्यामध्ये सार्वजनिक

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

व्यवहार क्षेत्रातील सामर्थ्यवान अशा दोन व्यक्ती असतात व त्यामध्ये एक महिला सदस्य असतात. या आयोगामध्ये 20 लाखांपेक्षा जास्त व एक कोटीपेक्षा कमी भरपाईच्या तक्रारीचे निवारण केले जाते.

3. राष्ट्रीय आयोग (National Commission) : केंद्र सरकारकडून नेमण्यात आलेल्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश हे या आयोगाचे अध्यक्ष असतात. यामध्ये इतर चार सदस्य असतात. हे चार सदस्य सार्वजनिक व्यवहार किंवा प्रशासकीय अनुभव घेतलेले असतात. यामध्ये एक महिला सदस्या असते. एक कोटीपेक्षा जास्त भरपाईचा दावा करणाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण येथे केले जाते.

ग्राहक न्यायालयाकडे तक्रार करण्यासाठी खालील गोष्टींची पूर्तता करावी लागते-

1. अर्ज हाताने लिहिलेला अथवा टाइप केलेला असावा.
2. अर्जामध्ये अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाइल नंबर नमूद करावा.
3. कुणाविरुद्ध तक्रार करायची आहे त्याचे पूर्ण नाव नमूद करावे.
4. कोणत्या वस्तूच्या खरेदीद्वारे किती रूपयांचे नुकसान झाले आहे याची सविस्तर माहिती द्यावी.
5. वस्तूखरेदीची पावती जोडावी
6. यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही.
7. वकिलाच्या मध्यस्थीशिवाय ग्राहक आपली तक्रार थेट नोंदवू शकतो.

स्वाध्याय

I. एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. 'ग्राहक' असे कुणाला म्हणतात?
2. ग्राहक चळवळीचे प्रमुख उद्देश कोणते?
3. प्रत्येक ग्राहकाचे हक्क कोणते?
4. भारत देशात ग्राहक संरक्षण कायदा केव्हा अंमलात आला?
5. जिल्हा ग्राहक न्यायालयाचे अध्यक्ष कोण असतात व त्यांची नेमणूक कोण करते?

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

II. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. ग्राहकांच्या समस्या कोणकोणत्या ?
2. ग्राहकांच्या शोषणाची कारणे कोणती ?
3. ग्राहक संरक्षण कायद्याचे चार महत्त्वाचे उद्देश लिहा.
4. ग्राहक संरक्षण परिषदेची मुख्य कार्ये कोणती ?
5. ग्राहक न्यायालयाचे तीन टप्पे कोणते ते स्पष्ट करा.
6. ग्राहक न्यायालयाकडे तक्रार करताना कोणती माहिती असावी लागते ?

III. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. ग्राहकाला असलेले दुसरे नाव _____
2. पैसे घेऊन वस्तू व सेवा पुरविणारा _____
3. 'जागतिक ग्राहक दिन' दरवर्षी _____ रोजी साजरा करतात.
4. भरपाईची रक्कम वीस लाखांपेक्षा जास्त असल्यास _____ या आयोगाकडे तक्रार करावी लागते.

IV. खालील चित्राचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.



©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in

1. पाकीटावर नमूद केलेल्या कंपनीचे नाव काय?
2. नमूद केलेल्या वस्तूची छापील किंमत किती?
3. या वस्तूची उत्पादित तारीख कोणती?
4. या वस्तूच्या वापराची अंतिम तारीख किती आहे?

V. प्रकल्प (Project Work) :

1. एका वस्तूच्या खरेदीमध्ये तुमची फसवणूक झाली आहे अशी कल्पना करून जिल्हा ग्राहक न्यायालयात तक्रार करण्यासाठी अर्ज तयार करा. त्याला लागणारी इतर कागदपत्रे तुमच्या कल्पनेप्रमाणे निर्माण करा.

VI. उपक्रम :

1. तुमच्या शिक्षकांसमवेत जिल्हा ग्राहक न्यायालयाला भेट द्या व तेथील कार्यपद्धती समजून घ्या.
2. ग्राहक जागृतीबद्दल चार घोषवाक्ये तयार करा.
3. 'जागतिक ग्राहक दिन' या दिवशी मिरवणूक काढून ग्राहक जागृती निर्माण करा.
4. विविध प्रकारच्या पावत्यांचा संग्रह करा.

***

©KTBS Not to be republished

www.textbookpdf.in